|| श्रीराम ||

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ८०

# श्रीरामपाठामृत

ॐ

संपादक

दीपक चंद्रशेखर केळकर

आवृत्ती दुसरी सांगली सन २०२०

**श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ८०**

# श्रीरामपाठामृत

**प्रकाशक : श्री. मुरलीधर गणपतराव माने**
मानेवाडा, सेनामंदिर रोड, गांवभाग,
सांगली ४१६४१६
मो. नं.९४०४३६९८७५

**संपादक : श्री. दीपक चंद्रशेखर केळकर**
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकरवाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
दूरध्वनी :०२३३-२३३१७४७ भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८
/ ९४२०५७४५७०

**द्वितीय आवृत्ती इ.स.२०२०**

**प्रकाशन दिन** : माघ शु. ९ शके १९४१
सोमवार दि. ०३.०२.२०२०
प.पू.श्रीमामामहाराज केळकर पुण्यतिथी

© **सर्व हक्क संपादकाचे स्वाधीन**

**अक्षर जुळणी** :
पॉप्युलर एस.ॲण्ड टी. इन्स्टिट्यूट, सांगली
**श्री.भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे**
**मुद्रक** :
श्रीकृष्ण मुद्रणालय, औद्योगिक वसाहत, सांगली

**स्वागत मूल्य : रु.१००/-**

**प्रत मिळणेचे ठिकाण** :
श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकरवाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
दूरध्वनी :०२३३-२३३१७४७ भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८/९४२०५७४५७०
**E-mail : dasrammaharajkelkar1920@gmail.com**




॥ श्रीराम प्रसन्न ॥

# रामपाठाच्या प्रथम आवृत्तीची प्रस्तावना

आजकाल समाजाचे अवलोकन केले असता, नानाप्रकारची संकट परंपरा व आपत्ती यांच्या आघाताने समाज गांजून गेल्याचे दिसून येत आहे. सुकाणू नसलेली नाव जशी खडकावर आदळून तिची अनंत शकले व्हावीत, तशी स्थिती समाज, देश व राष्ट्र यांची होईल की काय असे भय वाटते. अशा काळी दुर्घर संकट समुद्रातून समाजाचा उद्धार करण्यास हरिभक्ती, नामस्मरण यावाचून अन्य उपायच नाही. श्रीज्ञानोबाराय, श्रीएकनाथ, श्रीतुकोबाराय, श्रीसमर्थ वगैरे संत सत्पुरुष मंडळींनी प्रासादिक वाणीने गाईलेले हरिपाठ, हरिभक्ती व हरिनाम महिमा यांच्या प्रभावाने संपूर्ण राष्ट्रात अद्याप इतपत जागृती जिवंत आहे. या कलिकालात गु.भ.प. बापूरावांसारखे नित्यकीर्तन, नामस्मरण, काही मोबदला न घेता आपण परम आवडीने व भक्तीने करून, लोकांना सन्मार्ग दाखविणारे फारच थोडे लोक समाजात आढळून येत आहेत. नित्यनेमाने कीर्तन, गुरूभजन कायावाचामने करून फावल्या वेळेत स्वयंस्फुर्तीने व प्रासादिक वाणीने लोकसंग्रहाकरिता गाईलेले **श्रीरामपाठाचे** प्रेमळ अभंग समाजाला खरोखर परम उपकारी होतील यात संदेह नाही. आपण आधी करून, तसे करण्यास समाजाला शिकविणारे श्रीबापूरावांसारखे प्रेमळ गुरूभक्त फारच थोडे सापडतील. बत्तीस अभंगांचे त्यांचे हे पुस्तक आकाराने लहान, पण प्रभावाने फारच मोठे आहे. त्यांचे मोल करणे म्हणजे **श्रीप्रभूरामरायांचे** मोल केल्याप्रमाणे होणार आहे. श्रीबापूरावांची ही सत्कृती प्रत्येकाने आपल्या संग्रही अवश्य ठेवावी अशी माझी विनंती आहे व प्रत्येकाने नित्य एकांती श्रीरामसंन्निध एकवार तरी हा श्रीरामपाठ गावा अशी मी प्रेमळ सूचना देतो. माझे मंदमतीस सुचलेले हे चार शब्द भाविकांनी मान्य करावेत अशी विनंती करून येथेच विराम पावतो. शुभंभवतु !

**सांगली, दि.२६.०३.१९३८** **श्रीगोपाळनाथ कोटणीस**



|| श्रीराम प्रसन्न ||

# आशीर्वाद

श्री.प.प.वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज व श्री.प.प.श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज ट्रस्ट, श्री वासुदेव निवास, ४२-१७, कर्वे पथ, पुणे ४, श्री दत्त दिनांक १०.११.१९८३

श्री. वसंत केरोपंत कुलकर्णी यांना -
सप्रेम नमस्कार वि.वि.

श्री.ह.भ.प. दादासाहेब केळकर यांच्या येथे सुरु असणाऱ्या रामपाठावरील कीर्तनाचे एकत्र संकलन करून ते आपण छापून काढणार आहात असे काही दिवसापूर्वी येथे समक्ष आपण सांगितले व त्यापैकी काही भाग आपण वाचूनही दाखविला. ते ऐकून समाधान वाटले.

भगवंताचे नामगुणसंकीर्तनही नवविधा भक्तीपैकी एक महत्वाची भक्ती आहे. ही भक्ती आपल्या पूज्य पिताजींच्या प्रमाणे ईशकृपासंपन्न श्रीमान दादासाहेबांनीही अखंड चालू ठेवली आहे. यामुळे भक्तिमार्गातील साधकांना त्यांच्या तपःपूत अधिकार वाणीतून, भगवत प्रेरणेने योग्य मार्गदर्शन समाधानही नित्य मिळत आहे. ''बहुत सुकृताची जोडी । म्हणून विठ्ठली आवडी।'' अशा अधिकारी वक्त्याचा नित्य लाभ होणे हे श्रोत्यांचेही सुकृत आहे, यात शंका नाही. या कीर्तनांचे संकलन करून मातोश्रींचे स्मरणार्थ आपण ते प्रकाशित करणार आहात, हा आपला प्रयत्न स्तुत्य आहे. यामुळे प्रत्यक्ष श्रवणाचा लाभ घेऊ न शकणाऱ्या परग्रामस्थ सज्जनांना, हे पुस्तक घेता येऊन त्याचे चिंतन यथावसर घरी करता येऊन, समाधान मिळविता येईल. श्री.दादासाहेब जसे आपल्या अखंड वाङ्मयतपाने ''सर्वामुखी मंगल बोलवावे'' या संतांच्या आदेशाचे तंतमोतंत पालन करीत आहेत, त्याचप्रमाणे आपणाकडून घडून येणारे प्रकाशन कार्यामुळे ही भक्तिमार्गातील लोकसंग्रहाचे कार्य उत्तम घडून येणारे आहे. सर्व जिज्ञासू सज्जनांनी या आपल्या ग्रंथाचा अवश्य फायदा घ्यावा व सात्विक समाधान मिळवावे ही रघुनाथ चरणी प््रार्थना व आपणासही धन्यवाद!

आपला,
दत्तोपंत कवीश्वर -

|| श्रीराम प्रसन्न ||

## रामपाठाच्या द्वितीय आवृत्तीची प्रस्तावना
## श्रीरामपाठांतर्गत विषयांचा उपन्यास

सांगलीतील संत श्रीबापूरावजी केळकर यांनी प्रत्यक्ष श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे कृपेने आणि प्रेरणेने का श्रीरामपाठ लिहिला (३२.५). या श्रीरामपाठाचे महत्व पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनाकारांनी असे सांगितले आहे - ''बत्तीस अभंगांचे हे पुस्तक आकाराने लहान, पण प्रभावाने फारच मोठे आहे. त्याचे मोल करणे म्हणजे **श्रीप्रभू रामरायाचे** मोल केलेप्रमाणे होणार आहे.''

संतांचे अभंग हे अंतःस्फूर्त असतात. त्यामुळे त्यातील विषय हा नेहमी तार्किकदृष्ट्या सुसूत्र व सुसंगत असेलच असे नाही. म्हणून या श्रीरामपाठातील विषय थोडेफार सुसूत्ररित्या एकत्र सांगण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

### नरदेहाचे महत्व :-

मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न करणे हे संसारी जीवाचे कर्तव्य आहे, असे साधुसंत सांगतात. या संसारात नरदेह एकदाच प्राप्त होतो (२.४). याचा अर्थ असा नव्हे की, जन्ममरणाच्या फेऱ्यात पुन्हा नरदेह प्राप्त होणार नाही, पण तो केव्हा व काय प्रकारचा प्राप्त होईल हे मात्र सांगता येणार नाही. पुढे काय, किंवा आणि कसे होणार आहे, हे कुणी सांगावे! म्हणून आहे या घडीचा उपयोग करून घेतला पाहिजे. प्राप्त झालेल्या नरदेहाचा सदुपयोग करून 'नराचा नारायण' होण्याचे ध्येय साध्य करून घेणे आवश्यक आहे.

### सार आणि असार :-

त्यासाठी पहिली पायरी म्हणून या संसारात सार काय आहे आणि असार काय आहे याचा शोध प्रथम केला पाहिजे, तरच स्वतःचे हित प्राप्त -

करून घेता येते (२५.१). हा संसार सत्व, रज व तम यांनी युक्त, त्रिगुणात्मक आहे आणि तोच असार आहे. त्रिगुणातीत संसाराचे अतीत असणारे निर्गुणतत्त्व वा ब्रह्म हेच फक्त सार आहे (२५.२). साहजिकच गुणातीत होऊन, देवाचे दर्शन झाले की, परम-पुरुषार्थ साधण्याचे स्वतःचे कार्य सफल होते (२५.३).

**अखंड-सुखाचा शोध :**

या मायिक संसारात खंड सुख आहे (१७.१). म्हणजे एकदा मिळालेले सुख कायम टिकून रहात नाही. ''सुखदुःखाची आभाळे'' येतात व जातात. देहभाव आहे तोपर्यंत सुखदुःख चुकत नाही. तेव्हा देहभावरहित झाल्याविना, जीवाची संसारातील विपत्ती दूर होऊन, त्याला खरे अखंड सुख मिळणार नाही (१७.१.२). एक ईश्वर- श्रीराम मात्र अखंड सुखरूप आहे (१७.१). म्हणून ईश्वरप्राप्तीसाठी प्रयत्न करणे आवश्यक ठरते.

**कोणता प्रयत्न :**

देवाचा शोध करण्यास लोक उगीच नसती खटपट करतात, पण अशा खटपटींनी देव प्राप्त होत नाही. खरी खटपट काय हे न कळल्याने, लोक उगाच दाहीदिशा भटकत राहतात (५.१.२). योग-याग इत्यादीच्या खटाटोपात पडतात. योग, याग इत्यादि निरर्थक उपाधी चिकटवून घेऊ नयेत(५.४). कारण ही योगादिक कर्मे व्यर्थ आहेत, त्यांचे पायी वृथा श्रम होतात, पण पदरात मात्र फारसे काही पडत नाही (१४.१). या असल्या अन्य उपायांनी फक्त शीण होतो (६.३).

रामनाम नीट उच्चारणे हीच ईश्वरप्राप्तीची खरी खटपट होय (५.३). एक नाम घेतले की इतर कोणत्याही गोष्टींची गरज नाही (२३.४). भक्तीप्रेमाने नाम घेतले की देवाची भेट होते (५.४). एकभावाने नाम उच्चारित राहणाऱ्याचा देव अंकित होतो (६.१). रामनाम नित्यनेमाने उच्चारणाऱ्याला पुनः जन्म-मरण नाही (८.१). त्याला मोक्षाच्या अखंड सुखाचा लाभ होतो.

रामनाम घेणारा प्राणी दैववान म्हटला पाहिजे (२३.३.). रामनाम मुखी येणे ही महाभाग्याची गोष्ट आहे, त्याहून दुसरे श्रेष्ठ भाग्य नाही (१५.१). ऐहिक ऐश्वर्य आहे म्हणून ज्याला भाग्यवंत म्हणतात, तो खरा भाग्यवान नव्हे. कारण त्याला देवाचे दर्शन नाही. पण रामनामामामुळे जे भाग्यवंत आहेत, त्यांना मात्र देवाचे दर्शन होते (१५.२). एवं, देवाला संतुष्ट करणारे हे नाम, ज्याचा आदर-विषय नाही, तो माणूस पापाचे आगरच होय (९.२). रामनाम न घेणाऱ्याचे बोलणे अधमपणाचे, रामनाम न घेणारी वाणी अमंगल (४.१).

रामनामाची थोरवी इतकी आहे की, एकवेळ नाम घेतले तर अधम माणूससुद्धा उद्धरून जातो (२.३). रामनाम उच्चारणाऱ्या माणसाचा संपूर्ण वंशच पुण्यवंत होतो (२१.२). म्हणून रामनामाचा साठा करावा. नामाचा असा साठा करणारा भाग्यवंत हरिभक्त जगात धन्य होतो (१५.३.४). जो भक्त नाही, त्याचे जीणे लाजीरवाणे होते (३.१). हरिभक्ताजवळ मात्र देवाधिदेव वास करतो (१.४).

नाम हे सर्व तपात श्रेष्ठ आहे (१३.१). नामाच्या प्रकाशाने बुद्धितील अज्ञान दूर होते, रामनामी आसक्ति वाढत जाते आणि अंतरीची ज्योती प्रगट होते (१३.२.४). रामनाम हे सर्व सुखात श्रेष्ठ आहे (१७.४). थोडक्यात सांगायचे झाल्यास, रामनाम कंठी असणे हे हितकारक आहे, कारण त्यामुळे जगजेठी संतुष्ट होतो (२५.४).

**रामनाम घेताना पाळण्याची पथ्ये :**

रामनाम उच्चारण्यास काळवेळाचे बंधन नाही, ते सर्वकाळी उच्चारण्यास हरकत नाही (१२.३). सर्वसाधारणपणे रामनामोच्चारास बाह्य बंधने काही नाहीत हे खरे असले तरी, काही मानसिक पथ्ये पाळणे आवश्यक आहे. त्यामुळे रामनाम कसे घ्यावे हा प्रश्नही महत्वाचा ठरतो. रामनाम धीटपणाने घ्यावयाचे आहे (२३.२.३). म्हणजे मी रामनाम घेतले तर लोक काय

म्हणतील, इत्यादी प्रश्नांच्या बागुलबुवाला भीऊ नये. कितीही संकटे आली तरी, त्यांना न भिता धैर्य, धरून रामनाम घेतच रहावे. काय व्हायचे असेल ते होऊदे, रामनाम सोडणार नाही, हा दृढनिश्चय हवा (२४.३). रामनाम हे आवडीने घ्यावे (२१.१). करायचे म्हणून करायचे या जबरीच्या जाणिवेने करू नये. भक्तीप्रेमाने नाम घ्यावे (५.४). अंतःकरणातील काम दूर झाल्याविना, रामनामाचा साठा होत नाही (१५.३). कारण 'जहाँ काम तहाँ राम नहीं ।' असा प्रकार आहे. पतिव्रतेला ज्याप्रमाणे पती, त्याप्रमाणे देवाला सर्वस्व मानून एकविधपणे, एकनिष्ठेने नाम घेतले पाहिजे (२४.१). मग देवच भक्ताचा सखा होतो (२४.४). देवच भक्तांचा सांभाळ करतो (२४.२). असे झाल्यावर आणखी काय पाहिजे?

**सत्संगतीचा महिमा :**

देवाचे दर्शन झाले की मुक्ती मिळते (१.१). पण देवाचे दर्शन होण्याचा मार्ग तरी कोणता? संतांचे संगतीत देवदर्शन होते, म्हणून संत-सद्गुरुंना शरण जाणे आवश्यक आहे (१०.१). परंतु संतांची संगती सर्वांनाच साधणे कसे शक्य आहे? बाह्य अर्थाने आपण ज्याला संगती म्हणतो, ती येथे अभिप्रत नाही. संगती म्हणजे नामाची 'समगती' कशी हे, सद्गुरू-संत साधकाला स्पष्ट करून सांगतात (१०.२). आणि या समगतीत 'हरीचा आठव' झाला की, देहाचा देहभाव नष्ट होतो (१०.३). देहभाव लयाला जाणे म्हणजेच उन्मन होणे आणि या उन्मनी अवस्थेत आत्मसाक्षात्कार होतो, रामनामाने हे साधते, याची खूण पटते (१०.४).

**नाममार्ग :**

निराळ्या शब्दात सांगायचे झाल्यास, रामनाम हाच ईश्वरदर्शनाचा राजमार्ग आहे. हा मार्ग सर्वश्रेष्ठ आहे. ह्या मार्गावर जीवाला कोणत्याही प्रकारचे कष्ट पडत नाहीत. हा नामपंथ मनात दृढ धरून, इतर मार्गांनी जाण्याचा विचार टाकून द्यावा (१६.१.२).

हा नाममार्ग आहे कोठे? हा पंथ शोधण्यास दूर कोठे जाण्याची जरुरीच नाही (२३.२). कारण हा मार्ग अत्यंत सन्निध आहे, स्वतःच्या देहातच हा पंथ आहे. भौतिक मार्ग आपण शरीराने आक्रमण करतो, पण नाममार्ग फक्त मनाने आक्रमण करावयाचा आहे आणि रामनामाचे हे गुह्य कळले की, सहजपणे देवाचे दर्शन होते (१६.३.४).

रामनाम शंकरांचे अंतरात आहे आणि जीव चार वाचेच्या पलिकडे गेला की, हे नाम काय स्वरूपाचे आहे हे कळून येते (२१.३). चार वाचेच्या पलीकडे गेले की त्या स्थानी रामनाखेरीज दुसरे काही आढळतच नाही (२२.४).

**मनोमाळा :**

रामनामाचा राजमार्ग मनाने आक्रमावयाचा आहे. त्यासाठी '**मनोमाळा**' उपयोगी पडते. मनोमाळेच्या सहाय्याने रामनाम स्मरण केले की, द्वैताचा लय होऊन सर्वत्र अद्वैताची - एकमेव गोविंदाची - प्रतिती येते (१९.१.२). हिलाच 'रामकृष्णमाळा' म्हणावे. या माळेचे महत्व असे आहे की, नामाचे अखंड स्मरण होते (१९.४).

ही मनोमाळा कशी उपयोजावयाची? मनाचे स्वरूप संकल्प व विकल्प असे आहे. म्हणजे मनात एक वृत्ती येते, ती नष्ट होते, दुसरी येते, असा प्रकार चालत रहातो. या वृत्तीच्या क्रियेमध्येच रामस्मरण करावयाचे आहे (१२.४). म्हणजेच, संकल्पात राम आणि विकल्पात राम, असे जमले की, मनोमाळेचा उपयोग झाला (१९.३). निराळ्या शब्दात मनाचे संकल्प- विकल्प दूर होऊन, स्मरण होऊ लागले की मनोमाळा जमली. हाच अंतरीचा जप. हा जप साध्य झाला की, संसाराचा ससेमिरा सुटतो (२०.४).

**कोणत्या पुण्याने देवप्राप्ती :**

देवाचे दर्शन होण्यास थोर पुण्य लागते (१.१). हे थोर पुण्य म्हणजे पापपुण्यापलिकडील अनंत पुण्य होय. त्यासाठी प्रथम पापाचा नाश व्हावयास

हवा. रामनाम न उच्चारणे हेच पाप. नामाचा उच्चार सुरू झाला की, पापाच्या राशीच्या राशी लयास जातात. म्हणून रामनाम हे सर्वश्रेष्ठ आहे, असे मुनीजन, संतसज्जन यांनी सांगून ठेवले आहे (७.१.२). इतर कर्मात पापाचा प्रवेश होण्याची शक्यता आहे, पण रामनामात पापाचा विचारसुद्धा नाही. त्यामुळे मुखात रामनाम असणे हाच थोर सदाचार होय (७.३). सर्व पुण्यात नाम-पुण्य श्रेष्ठ आहे, त्यात कसलेही उणेपण नाही (२.२). रामपाठ-रामनामाचा पाठ - केला की, थोर पुण्य, अनंत पुण्य प्राप्त होते (१.२). रामनामाने अगाध- अनंत- पुण्याची प्राप्ती आहे (२१.४).

**नाममहिमा :**

रामनामाचा महिमा विविध प्रकारांनी सांगता येतो :- रामनामविना सर्व गोष्टी व्यर्थ आहेत (३.१). रामनाम हेच धन, मान, किंबहुना सर्वकाही आहे (३.२). या जगात व देहात मंगल म्हणून काही असेल तर, ते केवळ रामनामच होय (४.२). सर्व तीर्थापेक्षा रामनाम पावन व पवित्र आहे(९.१). नित्यनेमाच्या नामाने अंतःकरणातला काम दूर होतो (८.२). रामनामाच्या नित्य उच्चारणाने कळीकाळाचा थरकाप होतो (४.३). रामनामाने सावध झालेल्याला कळीकाळ वंदन करतो (१२.१). रामनाम उच्चारणाऱ्या भक्तांचे पाय यमधर्म वंदन करतो, मग इतरांची काय कथा? (७.४). शंकराने प्राशन केलेल्या हलाहल विषाचा उपशम रामनामाने झाला, हे तर प्रसिद्ध आहे. जीवांच्या बाबतीत त्यांची संसाराची हळहळ रामनामाने दूर होते (९.३.४). किंबहुना रामनामाच्या उच्चारण सुखापुढे समाधीचे सुखही तुच्छ आहे (१८.१).

**नाम हे तत्त्वरूप आहे :**

जे रामनाम इतके थोर आहे व ज्याने अनंत पुण्य प्राप्त होऊन देवदर्शन होते, त्या नामाचे स्वरूप तरी काय आहे? हे नाम असे आहे :- नाम हे अनित्य नाही, ते नित्यनेमाचे आहे (८.२). ते कमी-जास्त होत नाही, ते या देहात अखंडपणे स्फुरत आहे (८.३). हे रामनाम तत्त्वरूप आहे. इतर सर्व

तत्त्वे रामनामाविना विफल आहेत. या एकतत्त्वनामाचा शोध केला की, या एका तत्त्वात तीन गोष्टींची ऐक्यता आढळून येते. इडा, पिंगला आणि सुषुम्ना यांचे ऐक्य झाले की, तत्त्वरूप नाम हातात येते (अभंग क्र.११).

**रामनाम गतीरूप :**

रामनाम हे गतीरूप आहे व ही गती प्रत्येक देहात प्रतितीस येते (१.३, ३.४). या गतीच्या वेगात रामनामाचा उच्चार आहे (३.३). तिलाच संत, सद्गुरु वा ईश्वर यांची चरणगती म्हणतात. ही रामनामाची गती प्रत्येक देहात अखंडपणे चालू आहे आणि सद्गुरूंचा बोध झाल्यावरच ही रामनामाची गती अवगत होते (१७.३).

ही नामगती म्हणजेच **'नामजप'** होय. म्हणूनच या जपाला 'जपोनि जप' म्हणण्यास हरकत नाही (२०.१). यालाच 'अजपाजप' असेही दुसरे नाव आहे. या गतीकडे लक्ष नसले म्हणजे तेवढी गती, म्हणजे तेवढा जप वाया जातो (२०.१). या गतीवर लक्ष ठेवले की जप झाला. नरदेहात हाच जप करावयाचा आहे (२०.२).

**अनुभव :**

रामनामाची गती वायुरूप आहे. ती संथ होऊन हळू हळू स्थिर होऊ लागली की, 'राम - नाम - पवन' साधला आणि त्याबरोबरच परमार्थातील विविध अनुभव साधकाला येऊ लागतात. हे अनुभव असे :- एक श्वास पवन साधला की मनाला थोर समाधान होते, दोन श्वास पवन साधण्याने मन समधातुक होते, चार श्वास पवन साधण्याच्या क्रियेने मन हे देहबुद्धि विरहीत होते. एक पळ पवन साध्य झाला की, जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्थेत मन एकाग्र रहाते, दोन पळ पवन साधण्याने मनाचे उन्मन होते, मनाला उन्मनी अवस्था प्राप्त होते, चार पळे पवन साधला की, दशविध नाद ऐकू येतात, आठ पळे पवन साधण्याने कामाचा संपूर्ण नाश होतो, पंधरा पळे पवन साधण्याच्या क्रियेने (देहातील ब्रह्मांडस्थानी-भ्रूकुटी

मध्यावरचा भाग) ऊर्ध्वगमन साध्य होते, तीस पळे पवन साधला की, साधक ब्रह्मस्थानात पोहोचतो. एक घटका पवन साध्य झाल्याने सहजदृष्टीचा लाभ होतो, दोन घटका पवन साधला की, जीव ब्रह्मरंध्रस्थानातून पुढे सरकतो, चार घटका पवन साधल्यावर ब्रह्मदेवाचे 'तारक' रूप व शंकराचे 'बिंदू' रूप दर्शन होते. एक प्रहर पवन साधला की, देहधर्म आटून जातात, दोन प्रहर पवन साधण्याने विष्णुचे दर्शन होते, विष्णुचे दर्शन झाले की, जीवाचे अहोरात्र साधन चालू रहाते (अभंग क्र.२६-२९). हे साधन ढळत नाही. अशी समाधी साधली की, वैकुंठ (परमात्मा) आपल्याच हातात आहे (१८.३.४).

आत्मा हाच एकांत होय. त्यात सर्व वस्तुंचा आदी-अंत आहे, त्यामध्येच सर्वांचा अंत होतो (२२.२.३). हा एकांत बाणला म्हणजे आत्मदर्शन झाले की, सर्वत्र आत्मरुपाचेच दर्शन होऊ लागते (२२.१).

**काही पारमार्थिक शब्दांचे स्पष्टीकरण :**

परमार्थात काही शब्द पुनःपुनः येतात. त्यापैकी काहींचे अपूर्व स्पष्टीकरण श्रीरामपाठात आढळते. हे शब्द व त्यांचे स्पष्टीकरण येथे दिले आहे :- १. मंगल - मन गळाले व मनाची खळबळ उरली नाही म्हणजेच मंगल (४.४). २. खटपट - रामनाम नीट उच्चारणे म्हणजे खरी खटपट (५.३). ३. भाव - ज्यावीण सर्व वाव आहे व ज्याचा प्रभाव या देहात दिसतो आणि जो कळला म्हणजे देव कळतो, तो (६.२.३). ४. हलाहल -संसाराची हळहळ (९.४). ५. संगती - समगती (१०.२). सावध - षड्रिपू जिंकून निर्विकार होणे (१२.२). ७. तप - प्रकाशित होणे व बुद्धितील अंधार हाकून लावणे (१३.२). ८. स्वधर्म - जो सांगातीचा धर्म आहे, जन्मापासून मरणापर्यंत जो जीवाबरोबर असतो आणि ज्यात रामनामाचे वर्म आहे, तो स्वधर्म (१४.२.४). ९. एकांत - ज्या एकामध्ये सर्वाचा अंत होतो, ज्या एकात (इतरांचा) आदि अंत आहे, तो एकांत म्हणजे आत्मा (२२.२.३).

**संख्यावाचकांचा सांकेतिक अर्थ :**

परमार्थात काही संख्यावाचकांना विशिष्ट सांकेतिक अर्थ आहेत. १ ते २० या संख्यावाचकांचे सांकेतिक अर्थ श्रीरामपाठात अभंग क्र.३०-३१ येथे दिलेले आहेत, ते असे :- एक म्हणजे मीपण, दोन म्हणजे दुजाभाव, तीन म्हणजे त्रिगुण, चार म्हणजे चारखाणी, पाच म्हणजे (इंद्रियांचे) पाच विषय, सहा म्हणजे काम-क्रोध इत्यादी सहा रिपू, सात म्हणजे सप्तविध धातू, आठ म्हणजे पाच महाभूते व त्रिगुण. नऊ म्हणजे देहातील नवद्वारे, दहा म्हणजे दहा इंद्रिये, अकरा म्हणजे मन (मन हे अकरावे इंद्रिय आहे), बारा म्हणजे चित्त, तेरा म्हणजे कुबुद्धी, चौदा म्हणजे चौदा विद्या, पंधरा म्हणजे हंकार, सोळा म्हणजे सहा रिपू व दहा(इंद्रिये) मिळून, सतरा म्हणजे वासनेचे स्थान, अठरा म्हणजे जीवभाव, एकोणीस म्हणजे शिवाचे विस्मरण, वीस म्हणजे नामस्मरण, विसाव्या नामात विसावा आहे.

आतापर्यंत झालेल्या श्रीरामपाठातील विषयांच्या अवलोकनावरून, हा ग्रंथ पारमार्थिक दृष्टीने किती महत्वाचा आहे, हे चटकन कळून येईल. यात सांगितल्याप्रमाणे साधकाने साधन केले, तर त्याचे साध्य त्याला प्राप्त होईल. जो रामपाठ करील त्याचे राम सर्वत्र रक्षण करील (३२.४). जो रामपाठ करील त्यावर जगदीश रामप्रभू कृपा करील (३२.२), यापेक्षा आणखी काय अपेक्षा असणार!

**के.वा.आपटे**

मुंबई, दि.९.१.१९६३

## रामपाठामृताच्या प्रथम आवृत्तीची प्रस्तावना

### ।। मांगलिक नमन ।।

नारायणं हनुमंतं गोविंदं सद्गुरुं तथा ।
वासुदेवं दासरामं श्रीगुरं प्रणतोऽस्म्यहम् ।।१।।
स्वानंदरूप सिध्यर्थं कथं साधनमाचरेत् ।
प्रत्यक्षं दर्शितं येन तस्मै रामाय नमोनमः ।।२।।
गुरौः गुरुराजस्त्वं रामपाठंच दर्शितम् ।
गुरुगुह्यंच नामस्य भाष्येऽस्मिन् प्रकटी कृतः ।।३।।
ज्ञानं भक्तिं च वैराग्यं नाम रुपंच कीर्तनम् ।
दर्शितं सहजं येन श्रीराम गुरवेनमः ।।४।।
प्रल्हादो दासरामश्च रामरायाख्य ख्याततो ।
''रामपाठामृतं'' येन कृतं तस्मै नमोनमः ।।५।।

आमचे परमस्नेहांकित अध्यात्मसाधक मित्र श्री. वसंतराव केरोपंत कुलकर्णी हे आपल्या गुरुपरिवारापैकीच एक असून त्यांना इ.स.१९६९ मध्ये प.पू.योगिराज गुळवणीमहाराजांचा कृपानुग्रह लाभला. सांगलीत प.पू.श्रीदासराम तथा रामरायमहाराज केळकर यांच्या कीर्तनास ते नित्य येत असतात. श्री. वसंतराव यांचे मातापिता त्यांच्या बालपणी निवर्तल्यामुळे आपल्या प्रेमळ आईच्या स्मृतीसाठी आपण काहीतरी करावे, अशी तळमळ त्यांना लागून राहिली होती. श्रीदादांच्या रामपाठावरील कीर्तन श्रवणाने ते विलक्षण भारावून गेले आणि मातृप्रेमाची मंगलस्मृती म्हणून त्यांनी रामपाठामृतवाणीच ग्रंथरूपाने प्रकाशित करण्याचे ठरविले. त्यांच्या संकल्पाप्रमाणे प्रस्तुत ग्रंथाच्या रूपात पू.कै.सौ.पार्वती आक्का यांचे वाङ्मयीन स्मारकच उभारले जात आहे. या ग्रंथात कै. ती. सौ. मातोश्री सीतावहिनींचे चित्र समाविष्ट केल्याने ही पवित्रस्मृती अधिक हृद्य बनली आहे. श्री. वसंतराव यांचे वडील कै. ती.केरोपंत वासुदेव कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षातच योगायोगाने या ग्रंथाच्या प्रकाशनाचा योग येत आहे. ही घटना देखील खचितच लक्षणीय वाटते.

प.पू.श्रीदासराम तथा श्रीदादामहाराजांच्यावर त्यांची अतोनात निष्ठा आहे आणि महाराजांच्या छायेत सर्वांनाच गुरुप्रेमाची शीतल छाया लाभते. श्रीदादांना त्यांनी श्रीरामपाठावरील कीर्तनभाष्य थोडक्यात लिहून द्यावे म्हणून विनंती करताच, त्यांचा भाव जाणून श्रीदादांनी ते आनंदाने मान्य केले. वेळात वेळ काढून श्रीदादांनी प्रत्येक अभंगावर प्रकट केलेली ही सारभूत सखोल चिंतनानुभूती म्हणजेच, प्रस्तुतचा ''श्रीरामपाठामृत'' हा ग्रंथ होय. हे संकीर्तन मर्मग्राही, तलस्पर्शी असून सहज सुबोध असेच आहे. अध्यात्मप्रेमी भक्त साधकमंडळींना व्यक्तिशः किंवा सामूहिकरीतीने याचे प्रतिनित्यपठण करून कीर्तनानंद सहज साधता येईल. विशेषतः श्रीदादांच्या नित्यकीर्तनास ज्यांना उपस्थित राहाता येत नाही, अशा परगावच्या असंख्य मंडळींची या ग्रंथामुळे सोय झाली आहे. श्री.वसंतरावांची ही कामगिरी निःसंशय थोर आहे. कागद टंचाईच्या व मुद्रणमहागाईच्या या काळात त्यांनी खूप प्रयत्न करून हा ग्रंथ प्रकाशित केला, याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच! त्यांची ही भावपूजा माता-पिता आणि श्रीसद्गुरुंच्या चरणी नक्कीच रुजू आहे. प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे कृपाशीर्वाद ही त्याची साक्षच होय.

**अपूर्व हा सेवा लाभ :**

प्रस्तुत ग्रंथास प्रस्तावना लिहिण्यास प.पू.श्रीसद्गुरु श्रीदादांनी सांगितले. खरे तर हे गुरुमाऊलींचेच कौतुक होय! आपल्या या भक्तिसंप्रदायात भगवान श्रीनिंबरगीकरमहाराजांपासून सर्वच अधिकारसंपन्न व्यक्तीत पराकाष्ठेची प्रसिद्धीविन्मुखता आणि लोकेषणापराङ्मुखता प्रकटलेली दिसते. प्रसंगी पानाआडच्या कळीप्रमाणे, पडद्याआड राहून, शिष्याची ढाल पुढे करून, भक्तीचा सुगंध दरवळत ठेवण्यातच त्यांनी धन्यता मानली. प्रेमळ माऊलीने बालकास ''तू पुढे पाऊल टाक, मी मागे आहेच.'' असे म्हणून त्यास सिद्ध करावे, तद्वतच या नमन प्रास्ताविकाचे नवल कौतुक आहे. प.पू. श्रीदादांच्या या अध्यात्मग्रंथास प्रास्ताविक पुरस्कार लिहिण्याची नमन सेवा लाभावी

यात त्यांचाच गुरुभाव दिसून येतो. हे सारे गुरुकौतुक त्यांच्याच चरणी अर्पण करावयाचे. गंगेचेच गंगाजळ गंगेला अर्ध्य द्यावयाचे, 'इदं न मम' म्हणून! सूर्यप्रकाशातच सूर्याचे दर्शन घ्यावयाचे! 'गुरुकृपेचा महिमा नकळे आगमा निगमासी' हेच खरे! त्यांनीच पढवू घातलेल्या अक्षरांची ही 'अ-पूर्वाई'! 'तव पाईक पाठीशी घातला' या श्रीकृष्ण वचनाप्रमाणे स्वतः पुढे राहून पाठीशी घातल्याने ही प्रास्ताविक सेवा घडत आहे. अपूर्व हा सेवा लाभ!

**नामभक्तिपंथ व रामपाठ :**

आपला स्वरूप संप्रदाय हा मामांचा आणि नेमाचा साधन-संप्रदाय असून, या संप्रदायातील परमाधिकार संपन्न एकनाथावतारी संत श्रीगोविंद अनंत तथा मामामहाराज केळकर यांनी नामाचे मर्म आणि वर्म प्रकट करणारा श्रीरामपाठ लिहिला. श्रीज्ञानेशांच्या हरिपाठाप्रमाणे किंवा संतश्रेष्ठ तुकोबांच्या बारा अभंगांप्रमाणे, श्रीमामांचा रामपाठ असून, यात ३२ अभंग आहेत. आजवर या रामपाठाच्या ५ आवृत्या निघाल्या असून, प्रस्तुतची सहावी विवेचक आवृत्ती श्रीदादांच्या कीर्तन-भाष्यासह प्रकाशित होत आहे. श्रीमामांना आळंदीस प्रत्यक्ष श्रीज्ञानेश्वर माऊलींचे दर्शन घडले, त्याचवेळी पसायदानाच्या रूपात या रामपाठाचे त्यांना स्फुरण घडले. यावरून या रामपाठाचे महत्व ध्यानात येईल. ''ज्ञानेश्वर कृपाप्रसादे रचिले । तयांचिये बोले समाधान ।।'' असे श्रीमामांनीच रामपाठात म्हटले आहे. श्रीमामांनी १३ कोटी रामनामाचे पुरश्चरण केले असून, नामाचे तपस्तेजच त्यांच्या या रामपाठात अक्षरबद्ध झाले आहे. दुसरी गोष्ट म्हणजे प.पू.भ. श्रीकोटणीसमहाराजांचा कीर्तनानुग्रह लाभल्यापासून ३८ वर्षे त्यांनी अखेरच्या दिवसापर्यंत अखंड नामसंकीर्तन केले. वेदमूर्ती पं. सातवळेकरांनी 'अखंड नाम संकीर्तन योगी' म्हणून त्यांचा गौरव केला. त्यांच्या या अखंड नामसंकीर्तनाची सारभूत नामानुभूती रामपाठात प्रकटली आहे.

''नाम'' हे प्रकाश गतियुक्त विश्वतत्व असून, देहातील पवनगतीत संकल्प विकल्पातही ते नाम पूर्ण भरून, मनोमाळेने ''जपोनि जपणे'' म्हणजे नाम साधणे होय. त्यायोगे इडा, पिंगला, सुषुम्ना यांचा त्रिवेणी संगम घडून

येतो. देव, भक्त आणि नाम यांच्या संगमात नामाचे अद्वैत प्रचीतिस येते. चैतन्याचे निजधाम असलेले नाम साधणे हीच सहजसमाधी होय. रामपाठात ही नामसिद्धी सूत्ररूपाने सिद्ध झाली आहे. ''नाम्ना सिद्धिः कलौ युगे ।'' असे वचन असल्याने, कलियुगात नाम हेच तारक आहे. हे सोपारे नाम साराचे सार आहे. ''सार सार सार विठोबा नाम तुझे सार ।'' किंवा ''नाम सारांचेही सार । नाम सकळांसी आधार ।।'' इ. संतवचनातून नामाचे महत्वच प्रकटले आहे. नाम हेच परब्रह्म असून, ''चहू वर्णी नामाधिकार । नामी नाही लहान थोर ।।'' असा नामाचा महिमा आहे. अखिल वेदोपनिषदांनी या हरिनामाचाच आद्यंती उद्घोष केला आहे. ''वेदे रामायणे चैव पुराणे भारते तथा । आदौ अंतेच मध्येच हरिः सर्वत्र गीयते ।।'' असे अनादि चैतन्यनाम ब्रह्मा, नारद, व्यास, शुकमुनीपासून चालत आले असून, सकलसंतांनी व पुढे भगवान निंबरगीकरमहाराजांनी ते नामच जगापुढे मांडले. श्रीमामांचा रामपाठ म्हणजे अभंग नामोपनिषदच होय. देहातील पवन गतीतून, देवाकडे झेपापणाऱ्या गतिमान प्राणाचा व्यष्टी, समष्टी आणि परमेष्ठी यांच्यातील ''विष्णुमय जग'' अशा परमाद्वैतात्मक अनुबंधाचा साक्षात्कार घडविणाऱ्या विराट नामाची प्रचीति श्रीमामांनी रामपाठात स्वानुभूतीतून मांडली आहे. ते म्हणतात, ''रामनामगती देहात प्रचीति । धरोनिया चित्ती राम बोले ।।'' त्यातूनच ''सर्वत्र अद्वैत उरेल गोविंद । रामनाम छंद मनोमाळे ।।'' अशी अनुभूती येते. ''देवाचे दर्शन व्हाया थोर पुण्य'' अशा ओळीने सुरु झालेला हा रामपाठ जेव्हा लिहून पूर्ण झाला, तेव्हा साक्षात् रेवणसिद्ध तेजोरूपात त्यांच्या समोर प्रगट झाले. उपक्रमोपसंहाराची सप्रचीत गाठ पडली आणि तेव्हाच मामांचा रामपाठ सांगपरिपूर्ण झाला. ते लिहितात, ''गोविंद करी रेवणसिद्धपदी नमन। रामपाठ पूर्ण सांग झाला ।।''

**श्रीरामपाठामृत :**

श्रीमामांचा रामपाठ हा उपनिषदाप्रमाणे सूत्ररूपात अल्पाक्षराने मंडित झाला असून, या औपनिषदिक सूत्रपाठाचे भाष्यविवरण प्रस्तुत ग्रंथात मांडले आहे. प.पू. श्रीदासराममहाराजंच्या विवेचक कीर्तनासह निघत असलेली

रामपाठाची ही सहावी आवृत्ती संग्राह्य अशीच आहे. या भावार्थग्रंथाचा विचार करताना ब्रह्मचैतन्य श्रीगोंदवलेकर महाराजांच्या ज्ञानेश्वरीसंबंधीच्या वचनाची आठवण येते. ते म्हणत, ''ज्याने गीता सांगितली तेच भगवान श्रीकृष्ण कपडे बदलून, गीता भाष्यासाठी श्रीज्ञानेश्वरमाऊलींच्या रूपाने प्रगट झाले.'' या एका वाक्यात खरे पहाता खूप मोठा वेदांतच सूचकतेने सामावला आहे. श्रीरामपाठामृताच्या संदर्भात या वाक्याचे सतत स्मरण होते. श्रीमामांच्या श्रीरामपाठावर त्यांचे परमाधिकारसंपन्न सुपुत्र प्रल्हादावतार श्रीरामरायमहाराजांनी भावसंकीर्तन लिहावे आणि श्रीकृष्ण जन्मोत्सवात त्याच्या प्रकाशनाचा योग यावा यातील ''राम-कृष्ण'' भेटीचा औचित्यपूर्ण संकेत विलक्षण आगळा असाच आहे.

प.पू.श्रीदासराममहाराज हे वयाच्या ५ व्या वर्षापासूनच वेदांतप्रवण अशी कीर्तने करीत आहेत. श्रीमामांच्या महानिर्वाणाच्या दुसऱ्याच दिवसापासून त्यांचे नित्य अखंड कीर्तन गेली २२-२३ वर्षे सुरू आहे. यंदाच्या वर्षी श्रीमामांच्या अखंड कीर्तनानुष्ठानास ६० वर्षे पूर्ण होत असून, पुढीलवर्षी भगवान निंबरगीकरमहाराजांचे पुण्यशताब्दी वर्ष सुरू होत आहे. अशा नामसंकीर्तन महोत्सव पर्वकाळात या ग्रंथाचे प्रकाशन होत आहे.

प्रतिवर्षी चैत्र महिन्यात श्रीरामपाठावर होणारी श्रीदादांची कीर्तने ऐकणे हा एक नित्यनूतन असा जिवंत अनुभव असतो. अर्थात प्रत्यक्ष कीर्तन श्रवण करणे आणि ती कीर्तने लिखित ग्रंथबद्ध स्वरूपात वाचणे यात अविष्कार माध्यमाची मर्यादा येणे स्वाभाविक असून देखील प्रस्तुत ग्रंथात त्यांच्या अंतरीचा आध्यात्मिक जिव्हाळा भावार्थासह फुलारून आलेला दिसतो. रामपाठातील प्रत्येक अभंगावर स्वतंत्र, मूलगामी सखोल चिंतनात्मक अनुभूती प्रकटलेली दिसते.

प.पू. श्रीदादांच्या कीर्तनाची एक विशिष्ट पद्धती असलेली दिसते. व्यासशुकादिकांप्रमाणे निरूपणात्मक भाष्याचा हा थाट आहे. हरिदासी कीर्तनाप्रमाणे त्यात पूर्वरंग - उत्तररंग - रंजक आख्याने इ. प्रकार नसून,

अभंगाच्या अंतरंगात शिरून शब्द प्रमेयांची प्रतिपदी झोंबी घेत, नवनीता प्रमाणे सिद्धांतसूत्र ते सहजी ध्यानी आणून देतात. अध्यात्मिक तत्त्वाच्या सांगोपांग विवेचक मांडणीवर त्यांचा अधिक भर असून, अशा वेळी प्राचीन, अर्वाचीन सकल संतांची समर्थवाणी त्यांच्या वाक्गंगेतून धो धो वाहत असते. प्रस्तुत ग्रंथात याचे आपणास दर्शन घडते. आद्य कवी मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम, समर्थ रामदास, मस्त्येंद्र, गोरक्ष, सोहिरोबानाथ, संत कबीर, निळोबाराय, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, गुलाबरावमहाराज, ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज, स्वामी स्वरूपानंद, योगीराज गुळवणीमहाराज, भगवान श्रीनिंबरगीकरमहाराज, चिमडचे रामचंद्रमहाराज, तात्यासाहेब कोटणीसमहाराज, भाऊसाहेब उमदीकरमहाराज इ. अनेकानेक संतांची वचने सहजतेने प्रकटलेली आपणास दिसून येतात. या संतांच्या दृष्टांत कथेतून त्यांच्या निरूपणात मातेच्या ममतापूर्ण समजावणीची लय भरली असून, त्यात अपार कळवळ्याची प्रीती दिसून येते.

''श्रीरामपाठामृत'' या ग्रंथात मुळाप्रमाणे एक नामच सविस्तर विस्तारून मांडले आहे. दुर्लभ नरदेह, नामाची स्फुरद्रूप गती, मंगल नामाचे स्वरूप, नामाचे महत्व, नामाचा महिमा, नामाचे पावित्र्य, नामाची शक्ती, नामाचा प्रभाव, नामस्मरणाची प्रक्रिया, नामाची खूण, नामतत्त्वाची कळ, नामाचे ज्योतीः स्वरूप, स्व-धर्म = नामधर्म, नामधन्यता, नामभक्तिपंथ, नामातील अखंड सुख, नामाने वैकुंठ प्राप्ती, नामस्मरणाची मनोमाळा = रामकृष्ण माळा इत्यादींच्या सूक्ष्म विवेचनानंतर शेवटी नामाची निमिशोन्मेषापासून घटका-पळे-प्रहर-अष्टौप्रहरापर्यंत अखंड येणारी प्रतीति, अनुभूतीच्या पातळीवर समजावून सांगितली गेली आहे. विवेचनाच्या ओघात शब्दातील अध्यात्मिक अर्थसघनता उकलून दाखविली जाते आणि सूत्रबद्ध व्याख्येच्या रूपात अनेक वाक्ये संस्मरणीय बनतात. उदा. :-

१. देव हा दृश्याहून वेगळा आहे. दृश्य नव्हे तो देव. देव नव्हे तो आत्मा. व्यवहार नव्हे तो परमार्थ. ।।१।।

२. भाव तोचि देव असल्याने अंतरीचा अस्तित्वभाव कळून येताच

देवही कळून येतो. ।।६।।

३. चैतन्याकडे वृत्ती वळविणे याचे नाव भक्ती. ।।८।। किंवा

४. चैतन्याने चैतन्याच्याद्वारा चैतन्याशी तादात्म्य होऊन चैतन्याची अनुभूती घेणे हीच निखळ भक्ती.

५. रामनामगती । कोण पुण्य । कोणे गावी । रामनाम नीट इत्यादींचे विवेचन.

६. पापराशी - नामाखेरीज आपण कोणी (अन्य) वेगळे आहोत, या भूमिकेतून होणारे आचरण हीच पापराशी आहे.

७. चैतन्याच्या अनुसंधानात घडते ते पुण्य.

८. नित्ययज्ञ - 'स्व'च्या धर्माचे नित्य अनुदान हा एक नित्ययज्ञ आहे.

९. प्रभाते मनी - नामाची प्रभा मनात घेऊन रामाचे चिंतन करावे.

१०. नेम - प्राणाशी गाठ पडणे हा नेम. संगात असंगता झाली की असंगाचा संग होतो. इडा, पिंगला एक होऊन सुषुम्ना जागृत झाली की, गुरुघरचा नेम होतो.

केवळ वानगीदाखल काही वचने वर दिली आहेत. त्यावरून या नामसंकीर्तनाचे तळस्पर्शी स्वरूप आपल्या ध्यानी येईल. या छोट्या प्रस्तावनेत त्यांचे अल्पमात्र दिग्दर्शन केले असून, ''यदूल्पमपि तद् बहुः'' असे वाटते. श्रीमामांच्या श्रीरामपाठावरील हा ग्रंथ म्हणजे ''आधीच सोन्याचे वरी जडावाचे । लेणे श्रीमंतांचे शोभिवंत ।।'' असा प्रकार असून ''तेथ अलंकारिले कवण कवणा । हे निर्वचेना ।।'' असे याचे मोल आहे. सर्वच अध्यात्म प्रेमींना मार्गदर्शक, उपयुक्त ठरेल अशा या ग्रंथासंबंधी अधिक न बोलता, श्रीज्ञानेशांच्या शब्दात - ''न्यून ते पुरते । अधिक ते सरते । करूनि घेयावे तुमते । विनविले मिया ।।'' अशी प्रार्थना करून श्रीसद्गुरुंच्या चरणी उगेयाचि निवांतुपणे माथा ठेवीत आहे.

श्रावण व।। ८ श.१९०६ | श्रींचा नम्र दासानुदास
श्रीगोपालकृष्णाष्टमी | **दामोदर विष्णु कुलकर्णी**
दि.१९.०८.१९८४

## रामपाठामृताच्या द्वितीय आवृत्तीची प्रस्तावना

पुण्यक्षेत्र श्रीचिमड येथील प.पू.सद्गुरु श्रीनारायणमहाराज यांनी ज्यांना'श्रेष्ठ गुरुभक्त' म्हणून संबोधले, असे श्रेष्ठ साक्षात्कारी संत, प.पू.सद्गुरु श्रीमामामहाराजांना स्फुरलेला हा 'रामपाठ' आहे. 'ज्ञानेश्वर-कृपाप्रसादे रचिले। तयांचिये बोले समाधान ।।'. श्रीमामांना आळंदीस, प्रत्यक्ष ज्ञानदेवमाऊलींचे दर्शन घडले, त्याचवेळी त्यांना रामपाठाचे स्फुरण झाले. बत्तीस अभंगांच्या या रामपाठातून रामपाठाचे वर्मच प्रकट झाले आहे. रामनाम हाती आले असता, साक्षात्कार होऊन जीवन कृतार्थ होते. रामपाठाच्या बत्तीस अभंगातून विस्तारलेल्या नामाच्या अंतरंगाचे आकलन झाले असता, नामाचे सामर्थ्य प्रत्ययास येऊन, नाम व नामी यामधील भेद नाहिसा होतो. नाम हे स्वयंभू व शक्तीरूप आहे. दिव्यशक्तीरूप असलेल्या गतीरूप नामाच्या साधनेने, आत्मसाक्षात्कार कसा करून घ्यावा याचा वस्तुपाठ म्हणजे श्रीमामामहाराजांचा हा 'रामपाठ' होय. रामनामाची सिद्धी झाल्यानंतर प्राप्त होणाऱ्या अनुभवांच्या टप्प्यांचे वर्णन, हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. आकाराने लहान, सूत्ररूपाने असलेल्या या नामग्रंथाचे अध्यात्मिक दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे.

रामपाठाच्या आजवर सहा आवृत्या निघाल्या. श्रीदासराममहाराजांच्या विवेचक कीर्तनभावार्थासह, 'श्रीरामपाठामृत' या नावाने सन १९८४ साली पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. या ग्रंथास प.पू.श्रीदत्तमहाराज कविश्वर, पुणे यांचे कृपाशिर्वाद लाभले होते. या ग्रंथाची प्रस्तावना, मांगलिक नमन या शीर्षकाखाली, प्रा. श्री.दा.वि. कुलकर्णी यांनी लिहिलेली होती. तसेच या ग्रंथाचे प्रकाशन श्रीदासराममहाराज यांचेवर अतीव निष्ठा असलेले श्री. वसंतराव कुलकर्णी यांनी केलेले होते. परमार्थप्रेमी साधकांचा उदंड प्रतिसाद व मागणीमुळे या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे. यामुळे या ग्रंथाची थोरवी व उपयुक्तता सिद्ध होत आहे.

—

प.पू.श्रीमामामहाराज यांच्या रामपाठावरती श्रीदासराममहाराज हे प्रतिवर्षी चैत्र महिन्यामध्ये कीर्तन करीत. श्रीदासराममहाराजांची कीर्तने म्हणजे, स्वानुभवाच्या पायावर, आत्मसाक्षात्काराच्या अंगाने केलेले सखोल आत्मचिंतन होय. श्रीमामामहाराजांनी लिहिलेल्या बत्तीस अभंगांच्या या ग्रंथामध्ये मांडलेल्या विषयांची रूपरेषा श्रीदासराममहाराजांनी खालीलप्रमाणे मांडली आहे.

श्रीरामपाठातील पहिले पंचवीस अभंग हे सिद्धांतवजा असून, सव्वीस ते एकोणतीस हे अभंग अभ्यासाचे आणि अनुभूतीचे आहेत. पुढील तीस आणि एकतीस हे दोन अभंग, सिद्धांत व अनुभव यांचा ताळा करून पाहण्याचे असून, बत्तीसावा अभंग हा फलश्रुतीचा आहे. श्रीदासराममहाराजांनी निर्देश केलेल्या वरील रूपरेषेनुसार प्रस्तुत चार भागांचा थोडक्यात सारांश खालीलप्रमाणे दिलेला आहे.

**१) रामपाठातील सिद्धांतवजा अभंग (अभंग १ ते २५)**

रामपाठातील पहिले पंचवीस अभंग सिद्धांतवजा आहेत, याचा अर्थ अध्यात्मातील काही तत्त्वांचे प्रतिपादन निर्णायक स्वरूपात केलेले आहे. श्रीमामांनी प्रतिपादन केलेले सर्व सिद्धांत हे नामाला धरून आहेत. यातील काही प्रमुख तत्त्वविचार खालीलप्रमाणे आहेत -

**अ) देवाचे स्वरूप :** रामनामाचा पाठ केला असता, अनंत व अगाध पुण्याची प्राप्ती होऊन देवाचे दर्शन होते, असे पहिल्या अभंगामध्ये म्हटले आहे. ज्या देवाचे दर्शन आपणास घ्यावयाचे आहे, त्याचे स्वरूप आपणास माहित असणे आवश्यक आहे. अशा देवाचे स्वरूप स्पष्ट करताना, श्रीदासराममहाराज म्हणतात की, देव म्हणजे आपला प्राण असून 'प्राणैवात्मा' अशी श्रुती आहे. हा प्राण, पंचप्राणांपैकी नसून, तो चैतन्यरूप मुख्य प्राण आहे. चैतन्यरूप आत्मा हाच देव आहे. सर्व जीवमात्रांचे ठिकाणी हा देव/ परमात्मा सोहंहंस रूपाने विराजमान असतो. परंतु अज्ञानाने जीव त्याला जाणत नाहीत. हा देव दृश्यापेक्षा, देहापेक्षा वेगळा आहे. जीवाचा देहभाव लयास जाऊन, दृष्टीतील दृश्य ओसरले की, देवावाचून म्हणजेच चैतन्यावाचून

काहीच प्रतीत न होता, त्या जीवाला आत्मारामाची म्हणजेच हरीची प्राप्ती होते. (अभंग-२). जो आत्माराम सर्वव्यापी आहे, तो नादरुपाने सर्वत्र घुमत असतल्याचा अनुभव येतो. जेथे नाद, तेथे प्रकाश आहे. म्हणून नादानंतर प्रकाशरूपाने येणारा अनुभव हेच 'देवाचे दर्शन' आहे. आपले जीवन 'नादप्रकाशयुक्त' आहे. नाद व प्रकाश या भावाने म्हणजे गुणधर्माने आपले अस्तित्व सिद्ध होते. म्हणून भाव तोचि देव. अस्तित्वभाव म्हणजे देव. (अभंग-६). सर्वत्र नादप्रकाशयुक्त अस्तित्वाचा येणारा अनुभव हाच देवाच्या अस्तित्वाचा अनुभव. या विश्वाचा आत्मा म्हणजे देव (अभंग-२५) विश्वामध्ये प्रवेश करून असणारा विश्वात्मा हाच 'विष्णु' होय.

**ब) रामनाम पंथ :** देवाची प्राप्ती व्हावी, देवाचे दर्शन व्हावे म्हणून अनेकजण, अनेक मार्गाने प्रयत्न करीत असतात, परंतु जोपर्यंत 'नाममार्ग' सापडत नाही, तोवर देवदर्शनासाठी म्हणून केलेले यज्ञ, याग, विधी हे केवळ व्यर्थ श्रम ठरतात. या नाममार्गाचे रहस्य संतसंगतीशिवाय मात्र कळत नाही. 'देव ते संत । देव ते संत ।' असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात. संत व देव वेगळे नाहीत. परमात्म्याच्या कृपेनेच संतांची भेट होते.

'संगती म्हणजे समगती जाणे । दाविताती खुणे संतराय ।।' संतसंगतीमध्येच नामाच्या समगतीची ओळख होते. सारांशाने सांगायचे म्हणजे, संतसंगतीने जीवाला समगती प्राप्त होते व त्या समगतीमध्ये हरीस्मरणाची कळ साधून, तो जीव देहभावाच्या पलीकडे जातो व त्याला देवदर्शन होते (अभंग-१०).

देवाच्या प्राप्तीसाठी नामभक्तीपंथाचे महत्व सांगताना, सोळाव्या अभंगामध्ये मामामहाराज म्हणतात, हा रामनामभक्तीपंथ सर्वश्रेष्ठ आहे. देवाकडे जाण्याचा हा राजमार्ग आहे. तेवीसाव्या अभंगातील मोक्षमार्गाविषयी विवेचन करताना श्रीदासराममहाराज सांगतात की, सद्गुरुंनी सांगितल्याप्रमाणे, दृढनिश्चयाने हा मार्ग चोखाळला असता, साधनेमध्ये कष्ट नाहीत, भय नाही. आकाशमार्गीचा हा गुप्त पंथ असून, याचा शोध आपल्या देहामध्येच घ्यावयाचा आहे. चिदाकाशातील चैतन्याकडे जीवाने झेपावण्याचा हा —

ऊर्ध्वगामी नामपंथ आहे. मोक्षाची ही वाट अगदी जवळ असून, नीट नाकासमोर आहे. मनोधैर्याने आणि मनोमार्गाने आक्रमण करावयाचा हा मार्ग असून, सर्व संतांनी याच रामनाम पंथाच्या योगे देवाची प्राप्ती करून घेतली आहे.

**क) रामनामाचे स्वरूप :** रामनामाच्या पंथाने गेले असता देवाची प्राप्ती निश्चित होते. परंतु जोपर्यंत 'रामनामाचे' गुह्य उमजत नाही, तोपर्यंत नाममार्गाचे आकलन होत नाही. मामामहाराजांच्या सर्व तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी फक्त 'नाम' आहे. श्रीदासराममहाराजांनी श्रीरामपाठावरील केलेल्या भाष्यामधून रामनामाचे रहस्यच प्रगट केले आहे.

**i) तत्त्वरूप नाम :** श्रीदासराममहाराजांना अभिप्रेत असलेले नाम हे 'तत्त्वरूप' नाम आहे. येथे राम हा आत्मा किंवा आत्मा हाच तो राम आहे. हा आत्मा चिद्वायुरूप आहे. हा चैतन्यमय आत्मा नादप्रकाशयुक्त आहे. नाद व प्रकाश हे चैतन्याचे प्रकर्ष आहेत. नाद-प्रकाशरूपाने नामच प्रगट होते. ''तुका म्हणे नाम । चैतन्य निजधाम ।।'' चैतन्य आत्मा म्हणजेच नाम होय. आत्मा हा साध्यरूप असल्याने नाम हे आत्मरूप /साध्यरूप आहे. अशातऱ्हेने नामाचे आत्मरूप तत्त्व स्पष्ट होते.

**ii) गतीरूप नाम :** तत्त्वरूप नाम हे गतीरूप आहे. इडा व पिंगला, सुषुम्नाकार झाल्या असता, तेथे उमटणारा ध्वनी म्हणजे रामनाम होय. सारे विश्व गतिमान आहे. गतीमुळे पदार्थ, गतीमुळे जीव आहेत. ही जी विश्वाची मूलभूत गती आहे, तीच आपल्या देहामध्ये, नाडिद्वारा खेळणाऱ्या जीवनातून, प्राणगतीतून अखंडपणाने नादरूपाने स्फुरत असते. सुषुम्नेमध्ये हीच प्राणगती प्रकर्षाने नादरूपाने स्फुरत असते. त्यात अनित्यता नाही. (अभंग-८). जीवनात उमटणारे, उसळणारे नादब्रह्म हेच नाम असून, ते एक श्रेष्ठ तत्त्व आहे.

**iii) नाम बीजमंत्र :** सुषुम्पेतील होणारा ध्वनी हे सबीज नाम आहे. तो एक सबीज मंत्र आहे. हेच सहजसिद्ध नाम आहे. हे नाम स्वयंसिद्ध, स्वयंस्फूर्त, स्वयंचलित, स्वसंवेद्य व स्वयंध्वनीरूप असे आहे. या ध्वनीशी समरस होणे यालाच 'जप' म्हणतात. तपसाधनेने नामजप साधला असता, प्रकाशरूपाने

नाम प्रकट होते व त्या सोहंज्योती प्रकाशाने अज्ञान नाहिसे होऊन, सोहंभावाची प्रतीती प्रगट होते. (अभंग १३)

**iv) रामनामाचे महत्व :** पवित्राहूनही पवित्र असलेले नाम म्हणजे 'तीर्थराज' आहे. नाम हेच खरे तप होय. (अभंग ९ व १३). तेच खरे ज्ञान आहे, शाश्वत धन आहे. भाग्याचेही भाग्य असलेले रामनाम हेच खरे पुण्य आहे. चैतन्यरूप असलेले हे नाम दिक्कालातीत आहे. रामकृष्णनाम ही जीवनाची गती असून, त्यावरूनच जीवाचे अस्तित्व जाणवते, म्हणून रामकृष्ण वाचा हा जीवाचा भाव आहे, असे म्हटले आहे.

**ड) रामनामाचे साधन :** इडा व पिंगला एक होऊन सुषुम्ना जागृत होणे, याला साधन साधणे असे म्हणतात. हाच गुरुघरचा नेम आहे. इडा व पिंगला सुषुम्नाकार होणे ही एक 'कळ' आहे. सुषुम्नेतील नादरूपी रामनाम साधणे ही एकतत्त्वी कळा आहे. या नामकळेवाचून सर्व व्यर्थ आहे. सुषुम्नाकार जीवन हीच रामनामाची माला असून, ह्या माळेने आत्मस्वरूपी वृत्ती वेधली जाते. चैतन्याचा ध्वनी साधला तर सारे जीवन साक्षात्काराने उजळून निघते (अभंग १९/२०). सुषुम्नेतून सतत वाहणाऱ्या या जीवनकळेशी जीवाचे तादात्म्य झाले असता, आत्मसाक्षात्कार होतो. (अभंग ११) ही जीवनकळा अमृतमय, नादप्रकाशमय आहे. या ऊर्ध्वगामी जीवनात जीवाला त्रिगुणापलीकडील निर्गुणाचा साक्षात्कार होऊन, आत्मज्ञानाची प्राप्ती होते. सुषुम्नेतील नामानुसंधानाने/आत्मानुसंधानाने मनाचा लय होऊन, चित्ताची समता साधली जाते, त्यामुळे रामजप समत्वाने साधला जाऊन सहजसमाधी प्राप्त होते.

**इ) रामनामाचा अनुभव :**

चैतन्याचा नाद हेच नाम असल्याने, या नामस्मरणातून म्हणजेच नादश्रवणातून आत्मज्ञान प्रगट होते. दिक्काल व आकाश यांच्या अतीत असणाऱ्या नामाशी तादात्म्य पावल्याने, 'श्वास' हे नाममय होऊन ब्रह्मरुपता प्राप्त होते. नामातच आत्माराम प्रगट होतो. आत्मदेवाचा साक्षात्कार झाला असता, वासना शिल्लक रहात नाही. नाम हे कळवळ्याने व नित्यनेमाने

घेतल्याने साधक जीवन्मुक्त होतो.

नामतपाने अज्ञान नाहिसे होऊन, देहभावाचे आवरण नाहीसे होते. 'तै शरीरभाव नासती | इंद्रिये विषय विसरती ||' सोहंभाव जागृत झाल्याने इंद्रिये विषय विसरतात व चारी वाचा कुंठीत होऊन सोहंज्योती प्रगट होते (अभंग १३). अशा तऱ्हेने देहाकार जीव नामाकार होऊन, स्वरूपानुसंधानात तो जीव रममाण होतो. नामाकार झालेला जीव, सर्वत्र सम असणाऱ्या चैतन्याशी तादात्म्य झाल्याने, समत्वाचे सुखात येतो व यातच सारा भक्तीमार्ग सामावलेला आहे.

**२) रामपाठातील अभ्यासाचे व अनुभूतीचे अभंग (२६ ते२९)**

श्रीरामपाठातील पहिले २५ अभंग हे सिद्धांतवजा असून, २६ ते २९ अभंगांपर्यंत सिद्धांताचे प्रात्यक्षिक आहे. रामनामामध्ये पवन साधण्याच्या अभ्यासाचा हा विषय आहे. इडा व पिंगला, सुषुम्नाकार झाल्या असता, त्यातून वाहणारी, प्राणगती/पवन ऊर्ध्वगामी होऊन सुषुम्नेतून वाहू लागतो. पवनाचा व नामाचा निकटचा संबंध आहे. पवन हा गतीरूप/स्पंदरूप आहे. त्यामुळे तेथे नाद उत्पन्न होतो. पवन नादमय/नाममय होणे हे यातील वर्म असून, हाच पवनजप होय. हा पवन नादमय/प्रकाशमय होणे म्हणजे रामनाम हाती येणे होय. हा अभ्यास साधला असता, अनुभवाच्या खुणा, साधकाला दिसू लागतात. या चार अभंगामध्ये श्वास, पळ, घटिका व प्रहर हे, 'नामात पवन व पवनात नाम' असे साधन किती काळ साधले गेले, याचे निदर्शक आहेत.

**अ) अभंग २६वा अभंग - रामनामामाजी साधिलिया पवन |**

यामध्ये रामनामामध्ये पवन साधला असता, मनाचे शुद्धीकरण कसे होते हे सांगितले आहे. येथे 'श्वासाचा' उल्लेख हा कालदर्शक परिमाण म्हणून केलेला आहे. नामात पवन साधला असता, आपले श्वासोच्छ्वासरूप जीवन नाममय येते. त्यामुळे एक श्वास पवन साधला असता, मनाला थोर समाधान प्राप्त होते. दोन श्वास पवन साधला असता मन समधातुक होते म्हणजे, मनाचा तोल सुटत नाही, मनाचे चांचल्य संपुष्टात येते. तसेच चार श्वास

पवन साधला असता, मन हे देहबुद्धिपासून अलग होऊन मनाचे शुद्धीकरण होते.

**ब) अभंग २७ वा - जरी एक पळ साधेल पवन ।**

या अभंगात एका पळापासून तीस पळापर्यंतचा अभ्यास सांगितला आहे. श्वासाच्या अभ्यासाने शुद्ध झालेल्या मनासह सुषुम्नेतील प्राणगती, भ्रूमध्यापर्यंत होते. येथे एक पळ पवनात नाम साधले असता, देहानुसंधानाने अवस्थांचे झालेले तीन तुकडे गुरुकृपेने न राहता, एकच एक अवस्था अखंड राहते. तीनही अवस्थेत चैतन्य हा एकच विषय राहतो. दोन पळांच्या साधनेने, महाकारण देहातील 'तुरीय' अवस्था प्राप्त होते. तेथे चैतन्याच्या अखंड ज्ञानावस्थेत मनाचे मनत्व नाहिसे होऊन, उन्मनी अवस्था प्राप्त होते. चार पळ साधन साधले असता, महाकारणदेहातील आकाशाचा ग्रास होऊन दशविध नादांचे श्रवण होते. आठ पळापर्यंतच्या ह्या नादानुसंधानाने मनोलय झाल्याने, कोणत्याही प्रकारची इच्छाच रहात नाही. सर्वप्रकारच्या काम-क्रोधाची तीन चिमटे राख होते. या अवस्थेत १५ पळ साधन साधले असता, खालील देहांचा संबंध न राहिल्याने, शुद्ध झालेले जीवन ऊर्ध्वगामी होते. तीस पळांच्या साधनाने तो साधक ब्रह्मस्थानी प्रवेश करतो.

**क) अभंग २८ वा : जव एक घटिका साधेल पवन ।**

या अभंगात घटिकांचे साधन सांगताना, एक घटिका साधन साधले असता, त्या साधकाला 'सहजदृष्टी' प्राप्त होते असे म्हटले आहे. चिदाकाशातील सोहंआत्मस्वरुपाचे ठिकाणापासून 'स'कार व 'ह'कार जन्मास येतात. त्या सकार व हकाराचे ठिकाणी जेव्हा साधकाची दृष्टी पोहोचते, तेव्हा त्याला 'सहजदृष्टी' म्हणतात. ही दृष्टी चैतन्यावरच केंद्रित झालेली असते. पुढे दोन घटिकांच्या साधन अभ्यासाने चत्वार देहाचा निरास होऊन, सुक्ष्मतम असे शुद्ध आकाशरूप जीवन ब्रह्मरंध्रात म्हणजे चिदाकाशात प्रवेश करते. तेथे चार घटिकांच्या साधनाने, बिंदूरूप सोहंशिवात्म्याचे दर्शन होते.

**ड) अभंग २९ वा : ज्यासी एक प्रहर साधेल पवन ।**

या अभंगात प्रहराचे साधन सांगितले आहे. एक प्रहर म्हणजे तीन

तासाच्या साधन अभ्यासाने साधकाचे देहधर्म विसरले जातात. म्हणजेच 'देहभाव' विसरला जातो. ही अध्यात्मातील अत्युच्च अवस्था आहे. शरीरभाव नाहीसा झाल्यामुळे इंद्रियेही आपोआपच विषयांचे भान विसरतात. ''निमाली इंद्रिये विषय विसरले भान'' अशी त्या साधकाची अवस्था होते. या अवस्थेत सोहंभावाची प्रतीती प्रगट होते. याही अवस्थेत जर दोन प्रहर साधन साधले तर, चित्त हे चैतन्याकार होऊन साक्षात विष्णूचे दर्शन होते. 'विश्' म्हणजे प्रवेश करणे, यापासून 'विष्णु' हा शब्द बनला आहे. म्हणून विष्णुचे दर्शन म्हणजे विश्वात सर्वत्र भरून राहिलेल्या चैतन्याचा अनुभव घेणे होय. विष्णुच सतत समोर असल्याने मग हे साधन अखंडपणे चालूच राहते, हे यातील वर्म आहे.

**३) अभंग ३० व ३१ : रामपाठातील ताळ्याचे अभंग**

ज्याप्रमाणे गणिताचा ताळा करून, त्या गणिताच्या उत्तराची खात्री करून घेतली जाते, त्याप्रमाणे साधन अभ्यासाने येणारी प्रचीति, ही सिद्धांताशी जुळत असल्याची खात्री साधकाला येथे दिलेल्या ताळ्यावरून येऊ शकते. या करिता येथे १ ते २० अनुक्रमाने येणाऱ्या संख्यांचा उपयोग, परमार्थातील विशिष्ट सांकेतिक अर्थाच्या संदर्भाने केलेला आहे. १ ते १४ संख्यांचा ३० वा अभंग व १५ ते २० संख्या असलेला ३१ वा अभंग असे दोन येथे देण्यात आलेले आहेत.

**अ) अभंग क्र.३० : एक म्हणजे काय जाणावे मी पण ।**

त्रिगुण व पंचमहाभूतांनी मिळून अष्टधा प्रकृती निर्माण झाली. हा देह व भोवतालची सृष्टी ही अष्टधा प्रकृतीने बनली आहे. माणूस हा दशेंद्रिये तसेच मन, चित्त, बुद्धी आणि अहंकार या चित्तचतुष्टयानी युक्त आहे. माणूस हा पंचविषयांच्या भोगासक्तीने बांधला गेला असून, षड्‌रिपूंच्या अधीन होऊन राहिला आहे. या सर्वांच्या मुळाशी जीवाचा द्वैतभाव आहे. परंतु कुबुद्धीमुळे तो हे जाणू शकत नाही. जोपर्यंत या द्वैतभावाचा निरास होत नाही, तोपर्यंत चौदा विद्या आणि चौसष्ठ कला प्राप्त होऊनही व्यर्थ आहेत.

वरील आशय व्यक्त करण्यासाठी श्रीमामामहाराजांनी सारांशाने १ ते १४ या संख्यांचा पारमार्थिक अर्थ या तिसाव्या अभंगामध्ये दिलेला आहे.

**ब) अभंग क्र.३१ : पंधरा म्हणजे काय जाणावा हंकार ।**

वरील तिसाव्या अभंगामधील विषयच या अभंगामधून पुढे आलेला आहे. येथेही वरीलप्रमाणे १५ ते २० या अनुक्रमाने आलेल्या संख्यांचा या विषयाला अनुसरून, पारमार्थिक अर्थ दिलेला आहे.

दशेंद्रियामार्फत चालणाऱ्या षड्रिपुंचा खेळ हा देहाच्या अहंकारामुळे आहे. या देहांकाराचे कारण म्हणजे जीवाच्या मुळाशी असणारी 'वासना' होय. वासना ही जीवभावाचे सर्वात महत्वाचे द्रव्य आहे. वासनेमुळे जन्म घ्यावा लागतो. देह अहंकार व वासना यामुळेच जीवाला शिवाचे विस्मरण होते. म्हणूनच ''एकोणीस काय शिवाचे विस्मरण ।'' असे म्हटले आहे. सारांशाने सांगावयाचे झाल्यास, १ ते १९ पर्यंतचे सर्व विषय हा मायेचा प्रांत असून, ते बाजूस सारून, आत्मारामाचे स्मरणात खरा विसावा आहे. एकोणीस पैल विसाव्या नामात खरा विसावा प्राप्त होतो. हा ताळा ज्याला कळेल, तो निःसंदेह ज्ञानाने समाधानी होतो.

**४) रामपाठातील फलश्रुतीचा अभंग (अभंग क्र.३२)**

रामपाठातील एकूण ३२ अभंगापैकी हा शेवटचा फलश्रुतीचा अभंग आहे. ३२ अभंगांचा हा 'रामपाठ' जो कोणी विश्वास ठेऊन वाचेल, नित्य नेमाने याचा पाठ करेल, त्यावर तो परमात्मा जगदीश निश्चित कृपा करेल, म्हणून आळस झटकून याचा पाठ करा, असे श्रीमामामहाराजांनी येथे सूचित केले आहे. तिसऱ्या कडव्यामध्ये श्रीमामामहाराजांनी, जो कोणी शुद्ध मनाने व एकचित्ताने या रामपाठाचे स्मरण सदासर्वदा ठेवतो, त्याचे तो रामसीतापती, सर्वकाळी व अंतःकाळीही रक्षण करतो, असा निर्वाळा दिलेला आहे. श्रीज्ञानेश कृपेने हा रामपाठ लिहिला गेला असून, त्यांच्या आशीर्वादाने खरे समाधान झाले असे म्हणून, श्रीमामामहाराजांनी या अभंगाच्या शेवटच्या चरणात, श्रीरेवणसिद्धांच्या पदी माथा ठेवून, या रामपाठाची सांगता केली आहे.

'श्रीरामपाठामृत' ग्रंथाच्या प्रकाशित होत असलेल्या या दुसऱ्या आवृत्तीमध्ये, इ.स.१९३८ साली प्रकाशित झालेल्या 'रामपाठाच्या' पहिल्या आवृत्तीची प.पू.श्रीगोपाळनाथ कोटणीस यांनी लिहिलेली प्रस्तावना व इ.

स.१९६३ साली प्रकाशित झालेल्या रामपाठाच्या दुसऱ्या आवृत्तीतील प्रा.डॉ.के.वा.आपटे लिखित 'श्रीरामपाठातील विषयांचा उपन्यास' यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच इ.स. १९८४ साली 'श्रीरामपाठामृत' या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीस लाभलेला प.पू.ती.दत्तमहाराज कवीश्वर यांचा शुभाशीर्वाद व प्रा.डॉ.दा.वि. कुलकर्णी यांनी 'मांगलिक नमन' या शीर्षकाखाली लिहिलेली प्रस्तावना यांचाही अंतर्भाव करण्यात आला आहे.

'श्रीरामपाठामृत' स्वरूपात ग्रथित झालेले हे बहुमोल चिन्मय वाङ्मय जास्तीत जास्त मुमुक्षु व साधकांच्या हाती जावे, या हेतूने या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे संपादन श्री. दीपकजी केळकर यांनी केले आहे. व प्रकाशन श्री. मुरलीधर माने यांनी केले आहे. प.पू.श्रीमामामहाराजांचा 'रामपाठ' हा आत्मसाक्षात्कारासाठी अनुभवसिद्ध उपाय सांगणारा अलौकिक ग्रंथ आहे. अशा या अलौकिक ग्रंथावर प.पू.श्रीदासराममहाराजांनी आपल्या सिद्धहस्त लेखणीतून लिहिलेल्या 'श्रीरामपाठामृत' या ग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीस प्रस्तावना लिहिण्याची सेवा लाभावी, हे मी माझे परम भाग्य समजतो. या सेवेचा लाभ गु.भ.प.श्री. दीपकजी केळकर यांच्यामुळे मला प्राप्त झाला आहे, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. माझे सद्गुरु प.पू.श्रीदासराममहाराज यांची कृपा व प.पू.श्रीअण्णांचे प्रेम याचे हे फळ आहे.

अखेरीस भगवान सद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज, भगवान सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, प.पू.सद्गुरु श्रीमामामहाराज व प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज या सर्वांचे चरणी अनेक अनेक दंडवत घालतो व येथेच थांबतो.

सांगली.

दादांचा चरणरज,

नारायण देशपांडे

## प्रकाशकाचे मनोगत

प.पू.सद्गुरु श्रीदासराममहाराज तथा श्रीदादामहाराज केळकर यांची जन्मशताब्दी दि.६.८.२०१९ ते ६.८.२०२० अखेर साजरी होत आहे. या पर्वकाळात जन्मशताब्दी वर्ष शुभारंभा दिवशी प.पू. दासराममहाराज यांचा लेखसंग्रह म्हणजेच ''श्रीदासराम चिंतनिका'' हा ग्रंथ प्रकाशनाचे भाग्य मला लाभले आहे. त्यानंतर आज ''श्रीरामपाठामृत'' या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशनाचा योग येतो आहे. त्याबद्दल मला मनापासून आनंद होत आहे. श्रीरामनिकेतनमध्ये प.पू.श्रीगोविंदमहाराज तथा श्रीमामामहाराज केळकर यांनी प.पू.भगवान श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे आज्ञेनुसार सन १९२४ पासून कीर्तनसेवा सुरु केली. त्यांचेनंतर प.पू. श्रीदासराममहाराज तथा श्रीदादामहाराज यांनी ही कीर्तनसेवा पुढे नेली आणि त्यानंतर आज अखेर प.पू.श्रीअण्णामहाराज तथा चंद्रशेखर केळकर ही परंपरा चालवित आहेत. म्हणजेच गेली ९६-९७ वर्षे श्रीरामनिकेतनमध्ये अखंड कीर्तनसेवा सुरु आहे. या कीर्तनात दरसाल चैत्र महिन्यात प.पू. श्रीमामामहाराजांनी लिहिलेल्या रामपाठावर विवरण केले जाते.

प.पू.श्रीमामामहाराज तथा गोविंदमहाराज केळकर यांना त्यांचे दैवत श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे कृपाप्रसादाने हा श्रीरामपाठ स्फुरला. यातील एकूण अभंग ३२ आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे हरिपाठाचे अभंग २८ आहेत. यात चित्तचतुष्टय मिसळले तर २८ + ४ = ३२ आकडा येतो. बारा आणि सोळा यांची मिळणी म्हणजे हरिपाठ आहे. त्यात मन, चित्त, बुद्धि आणि अहंकार हे चित्तचतुष्टय मिसळले की रामपाठ होतो. वारकरी संप्रदायाची संध्या म्हणजे जशी हरीपाठ, तशीच आपले संप्रदायाची संध्या म्हणजे रामपाठ होय. असे प.पू.श्रीअण्णामहाराज कीर्तनात सांगतात. रामपाठ म्हणायला सोपा व गोड आहे. चालित म्हणायला तर चांगला आहे, परंतु कळायला फार अवघड आहे. म्हणूनच श्रीरामपाठावर प.पू.श्रीदादामहाराजांनी केलेले विवरण म्हणजेच ''श्रीरामपाठांमृत'' वाचल्याशिवाय काहीही कळत नाही.

श्रीरामपाठातील ३२ वा अभंग हा फलश्रुतीचा आहे. त्यात प.पू.श्रीमामामहाराज सांगतात की, 'हे ३२ अभंग असलेला रामपाठ जो कोणी विश्वास ठेवून वाचेल, त्यावर जगदीश कृपा करील. म्हणून आळस झटकून याचा पाठ करा.' श्रीरामपाठ म्हणजे आपल्या संप्रदायाची गुरुकिल्लीं आहे. हा रामपाठ प.पू.श्रीमामामहाराजांनी एका बैठकीतच लिहिला आहे आणि त्याची सांगता पौष शु. पंचमीस किंक्रांती दिवशी झाली आणि साक्षात् श्रीरेवणसिद्ध समोर प्रगट झाले, म्हणून त्यास फार महत्व आहे.

अशा या रामपाठाचे प.पू.श्रीदादामहाराजांनी विवरण केलेल्या 'श्रीरामपाठामृत' या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रकाशन करताना मला व आमच्या कुटुंबियांना फार आनंद होत आहे. ही संधी श्री.दीपक केळकर यांनी दिली तसेच प.पू.श्रीचंद्रशेखर (अण्णा) केळकर यांनीही आशीर्वादरुपाने दिली, याबद्दल आम्ही त्यांचे ऋणात आहोत. तसेच ग्रंथ छपाई व बांधणी श्रीकृष्ण मुद्रणालय यांनी केली. तसेच प्रुफ तपासणीचे किचकट काम श्री. रमेश लाळे व श्री. नारायण देशपांडे यांनी केले त्यांचेही आभार मानून माझे मनोगत संपवतो.

मुरलीधर गणपतराव माने.

।। श्रीराम प्रसन्न ।।

# १

**देवाचे दर्शन व्हाया थोर पुण्य ।**
**झालीया दर्शन मुक्ती लाहे ।।१।।**
**रामपाठ करी रामपाठ करी ।**
**पुण्याची हे थोरी वर्णवेना ।।२।।**
**रामनाम गती देहात प्रचीति ।**
**धरोनिया चित्ती राम बोले ।।३।।**
**गोविंद म्हणे याचा घ्यावा अनुभव ।**
**वसे देव देव भक्तापाशी ।।४।।**

देव हा दृश्यापेक्षा वेगळा आहे. दृश्य नव्हे तो देव, देह नव्हे तो आत्मा, व्यवहार नव्हे तो परमार्थ, हे सूत्र लक्षात घेणे सारखे आहे. सुताराने टेबल केले, येथे टेबलापेक्षा सुतार वेगळा आहे. कुंभाराने मडके घडविले म्हणजे मडक्यापेक्षा कुंभार निराळा. या अनंत विश्वाची जाणीव जी आपल्याला होते ती कशामुळे होते? हाच येथे महत्वाचा प्रश्न आहे. ज्ञानामुळे दृश्याची सिद्धी हा तर विज्ञानाचा सिद्धांत आहे. जे आपल्या ज्ञानात येत नाही त्याला अस्तित्वच नाही. साऱ्या विश्वाचे, दृश्याचे, देहाचे अस्तित्व ज्ञानाने सिद्ध होते. चैतन्याशिवाय ज्ञान तरी स्वतंत्र कोठे आहे? शरीरात जर सामसूम झाली तर तेथे कशाची जाणीव आहे? शरीरामुळे आत्म्याचे ज्ञान होते का आत्म्यामुळे शरीराचे होते? ज्ञानाने आत्मा सिद्ध होतो का आत्म्यामुळे ज्ञान होते? आपल्यासाठी घर की घरासाठी आपण ? काय आहे तरी काय? जाणीव आणि नेणीव तरी कशामुळे? हे काही आहे आणि हे काही नाही याची जाणीव कशाने होते? आहे आणि नाही हे दोन्ही ज्याच्यामुळे आहे

त्याचा शोध संतांनी घेतला आहे. जे आहे ते नाहीसे होते आणि जे नाही ते आहे असे होते. जन्म आणि मरण हे तर ठरलेलेच आहे. चैतन्य विरहित जन्म झाला तर बारसे कसे करणार? शरीर तर दिसते आहे, पण त्याची हालचाल मात्र नाही. मग ती हालचाल, हे जर सारे रासायनिक (केमीमल) आहे तर का होऊ नये? त्यात काय कमी आहे म्हणून ही हालचाल होत नाही, हा विचार महत्वाचा आहे. शरीरात जर चैतन्याची हालचाल असेल तरच शरीराची हालचाल होते, हे तर खरे ना? ''प्राण गेलीया शरीर । काय करील व्यवहार।।'' शरीरातून प्राण गेला तर शरीराचा व्यवहार होत नाही. प्राण आहे तोवर शरीरात काही बिघाड होवो, त्यावर मात करता येते, पण प्राण गेल्यावर तेथे दुरुस्ती हा शब्दच संपला. ''प्राणैवआत्मा'' असे श्रुतीने यासाठीच म्हटले आहे. जगात प्राण नाही असे कोणी म्हणत नाही. प्राण नाही म्हणणारा असा निष्प्राण या जगात कोण आहे? 'देव म्हणजे आपुला प्राण' असे जे श्रीसमर्थ म्हणतात ते तर्कशुद्ध आहे. प्राणाचे अस्तित्वावर आहे नाही चे ज्ञान होते. यावर कोणाचे नियंत्रण नाही. सर्वांवर मात्र त्याचे नियंत्रण आहे. प्राणाला प्राणवायू पूरक ठरतो. प्राण गेल्यावर त्याचाही उपयोग होत नाही. प्राण आहे तोवर श्वासोच्छ्वास आहे. प्राणाचा व श्वसनाचा संबंध आहे. श्वसन ही अनैच्छिक क्रिया आहे. ती आपल्या इच्छेवर अवलंबून नाही. श्वसनसंस्था ही स्वतंत्र असून त्यानेच शरीराची यंत्रणा चालते हे स्पष्ट आहे. नळीत फुंकले की वायू लगेच निघून जातो. टायरमध्ये हवा भरली की त्याला छिद्र पडताच हवा राहू शकत नाही. तसे येथे नाही. श्वासोच्छ्वास हा वायूच आहे, पण शरीराला येवढी छिद्रे असूनही तो निसटून जात नाही. अर्थात् यातच काही वर्म आहे. ''जव या वायूचा प्रकाशू । तव या भांडियाचा विश्वासू ।।'' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात ते या दृष्टीनेच म्हणतात. आपले जीवन हे वायु प्रकाशयुक्त आहे.

''दिवा वाऱ्या घाली खेव । याचा घ्यावा अनुभव ।'' हे श्रीतुकाराममहाराजांनी या दृष्टीनेच सांगितले आहे. देव म्हणजे एक वारेच आहे. ''या या देवाचे भरता वारे'' ही श्रीतुकोक्ती येथे चिंतनीय आहे. ''आत वारा बाहेर वारा । याचा निर्गुणात पसारा । त्या वाऱ्याचा शोध करा।।'' हे श्रीनामदेवमहाराजांचे वचन कुडीत प्राण आहे तोवर विसरू नये, इतके महत्वाचे आहे. वायुप्रकाशयुक्त जीवन हा ईश्वराचा साक्षात्कार आहे. हे जीवन स्वयंसिद्ध, स्वयंचलित, स्वयंपूर्ण व स्वसंवेद्य आहे. हे नादानुसंधान म्हणजे आत्मानुसंधान असल्याने नाद म्हणजेच नाम असल्याने या नामानुसंधानाने आपली जीवननिष्ठा उजळून निघाली की जीवास स्वास्थ्य, समाधान, शांती प्राप्त होते आणि यापेक्षा जीवाची तरी दुसरी अपेक्षा काय असणार ? जीव हा स्वस्थ नाही हेच त्याच्या अस्वथपणाचे खरे कारण आहे. त्याने 'स्व' काय आहे हे जाणून घेतले पाहिजे. 'स्व' चे ज्ञान झाल्यावर तेथे देहाचा अहंकारच राहत नाही. देहाचा, दृश्याचा, विषयांचा तो द्रष्टा झाल्याने त्यास जीवंत असतानाच एक आगळा आनंद होत राहतो, यालाच बंधनातीत मुक्ती असे संत महात्मे म्हणतात. अशा देवाचे दर्शन होण्यास थोर पुण्याची गरज आहे. म्हणून पहिल्या अभंगात माझे परमपूज्य पितृदेव श्रीमामामहाराज केळकर म्हणतात, ''देवाचे दर्शन व्हाया थोरपुण्य । झालीया दर्शन मुक्ती लाहे'' जीवनात मुक्ती प्राप्त होणे ही एक अवस्था असून ती विशिष्ट पुण्याने, देवच दिसू लागला व दृष्टीतील दृश्य ओसरून गेले, की तेथे देवावाचून म्हणजे चैतन्यावाचून काहीच प्रतीत होत नाही. तसे पाहिले तर या जगात चैतन्याशिवाय दुसरे काही नाहीच. कुठलेही दृश्य, प्राणी, वनस्पती किंवा माणूस जरी आपण पाहिला तरी स्पंदाशिवाय पदार्थ नाही, श्वसनाशिवाय स्पंद नाही, जीवाशिवाय श्वसन नाही असे दिसून येईल. याचा अर्थ निर्जीव काहीच नाही. म्हणजे

सारे चैतन्यच आहे. जडवाद हा वेगळा राहूच शकत नाही. फक्त जडसृष्टी, जडबुद्धी, जडवाद या शब्दातील जडत्व तेवढेच हट्टाग्राहाने म्हणावयाचे, तर तेवढे म्हणणेच शिल्लक राहते. वरचे आवरण भिन्न असेल, पण आतील वस्तू मात्र एकच आहे. साऱ्या विश्वाची गुंफण एका सूत्रानेच झाली आहे. मणी बाजूला केले की सूत्र दिसावे, असेच येथेही आहे. हे ज्ञान होणे त्यालाच गुरूबोध किंवा साधना, काही म्हणावे. मग असा जीव कोठेही कोणत्याही अवस्थेत असला तरी तो आत्मतृप्त असल्याने आत्मसमाधानीच राहतो. अशा एका धारणेमध्ये अखंड येणे हाच ‘‘**रामपाठ’’** आहे, म्हणून या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात श्रीमामांनी सांगितले आहे -

‘‘रामपाठ करी रामपाठ करी । पुण्याचीये थोरी वर्णवेना ।।’’ श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ‘‘माते जेणे पाविजे ते शुद्ध पुण्य’’ उलट सारा दंभाकारच आहे. ते म्हणतात, ‘‘मजची माजी असता । जेणे मी दुरावे पंडुसुता । तया पुण्य ऐसे म्हणता । जीभ न झडे काई ।।’’ देहाचे अनुषंगाने जे पुण्य जीवाला ईश्वरी साक्षात्कारापासून दूर नेते, त्याचा आत्मसाक्षात्काराचे दृष्टीने काही उपयोग नाही. जगातील साऱ्या अनुभवांची नोंद म्हणजे काही आत्मानुभव नव्हे. डोळ्याला दिसते ते दृश्य व मनाला गोचर होते तो भास, या पलीकडे येणारी ही अनुभूती असल्या कारणाने हा जो आत्माराम सर्वव्यापी आहे, तो नादरूपाने सर्वत्र घुमत आहे. ‘मुंगी के पावमें घुंगरू बाजे’ असे श्रीकबीरांनी यादृष्टीने म्हटले आहे. ते म्हणतात, ‘‘राम हमारा जप करे। हम बैठे आराम ।।’’ देहाकडे आकृष्ट करणारा जीवनातील अहंकार जीवनाची खरी ओळख झाल्यावर मावळला की तेथे उठणारा निसर्गसिद्ध ध्वनी हाच चैतन्याचा अनुभव देतो, तो नादच येथे खरा महत्वाचा आहे. ‘‘तुका म्हणे नाम । चैतन्य निजधाम ।।’’ किंवा ‘‘निजधाम हे नाम शोकापहारी’’ ही

श्रीसमर्थोक्ती येथे चिंतनीय आहे. असा रामपाठ चालू झाला तर त्या पुण्याला मोजमाप नाही, तेथे पापाचा -देहबुद्धीचा प्रवेशच नाही.

सारे विश्व गतिमान आहे. प्रत्येक पदार्थाला गती आहे. ज्या दगडाची भिंत उभी राहिली तो दगड गतिमान आहे. भिंतीतला मधलाच एक दगड काढला की वरचा दगड खाली येतो का? त्याला गती आहे म्हणूनच. प्रत्येक पदार्थाला गती आहे. गती हे विश्वातील फार मोठे तत्त्व आहे. म्हणून तर प्रत्येक पदार्थ गतिमान आहे. जीवही काही गती घेतच असतो किंवा जीव हे गतिमान आहेत, याचे कारण गतीमुळे पदार्थ किंवा जीव आहेत. ही जी विश्वाची मूलभूत गती, ज्या गतीने आपण आपल्या आयुष्याची वाटचाल करतो, ती नादरूप आहे. हे नाम आपण ईश्वरी कृपेने जाणून घेतले पाहिजे. ज्याला तळमळ आहे त्याला हे गुरूकृपेने लाभते. म्हणून या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात ''रामनाम गती देहात प्रचीति । धरोनिया चित्ती राम बोले'' असे म्हटले आहे. हे तत्त्व जाणून आपण कोणत्याही नावाने देवाला हाक दिली तर तेथे पोहोचून चैतन्याचा संपर्क साधता येतो.

हा सारा विषय अनुभवाचा असल्याने येथे जो एकरूप झाला, त्याला देवाच्या दर्शनाचे खरे समाधान होते. म्हणून, देहासक्तीने जो विभक्त नाही असा जो भक्त, त्याच्या जवळच देव राहतो, असे आमचे मामांनी अभंगाचे शेवटचे कडव्यात सांगितले आहे. ते म्हणतात, ''गोविंद म्हणे याचा घ्यावा अनुभव । वसे देवदेव भक्तापाशी ।।'' असा जीव खऱ्या अर्थाने निश्चिंत होतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''एऱ्हवी तरी माझीया भक्ता । आणि संसाराची चिंता । काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ।।''

✻✻✻✻✻

# २

**कोण पुण्ये हरि येईल हाताशी ।**
**विचारी मानसी हिताहित ।।१।।**
**सर्व पुण्यामाजी थोर नामपुण्य ।**
**ज्यात उणेपण काही नाही ।।२।।**
**एकवेळ मुखी उच्चारिता राम ।**
**तरती अधम हेळामात्रे ।।३।।**
**गोविंद म्हणे एकवेळ नरदेह ।**
**दुजी वेळ पाहे व्यर्थ असे ।।४।।**

आपले हित आणि अनहित याचा विचार करता कोणत्या पुण्याने तो श्रीहरी - आत्मा - आपल्या हाती येईल, ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे. जीवाला व शिवाला सम असणारा आत्मा तोच हरि आहे.

''एक हरि आत्मा जीव शीव समा ।'' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. हरि हा आनंदरूप आहे. ''हरि आला रे, हरि आला रे । संत संगे ब्रह्मानंदु जहाला रे'' हे श्रीज्ञानेश्वरांनी या दृष्टीनेच म्हटले आहे. दंभाचाराने हित साधत नाही. दंभ हा देहाला चिकटलेला आहे. आत्म्याचा दंभ कधीच दिसून येत नाही. ज्या आत्म्याने देहाचे ज्ञान होते, त्या देहाचे आवरणाने आत्मविस्मृती झाल्याने देहाचेच महत्व वाढले आहे. देहसुख हेच जीवनाचे सारसर्वस्व झाले आहे. देहसुखाने जीव आत्मसुख गमावतो. देहाचे दुःख ते आत्म्याचे सुख. आत्मसुखात देह-दुःखाची जाणीव नाही. देह आहे तो क्षणैक सुख व अपार दुःख देहात्मतेने भोगावेच लागते. ''देह दुःख ते सुख मानीत जावे'' असे श्रीसमर्थ या

हेतूनेच म्हणतात. देह सुखाला लोलुप झालेला जीव खऱ्या अर्थाने कधीच समाधानी होत नाही. असे असून, ''का भीतोस भटा तर पुढल्या एकादशीला'' या न्यायाने बरे आहे ना? असे कोणी विचारले, तर बरे आहे, असे तोंड वाकडे करूनच सांगावे लागते. हाच तो दंभाचार आहे. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ''हित व्हावे तरी दंभ दुरी ठेवा'' देहबुद्धी दूर झाल्याशिवाय निर्दंभ होताच येत नाही. ''तरी कीर्तनाचेनि नट नाचे'' नटनाम परमात्म्याचा अंतर्यामी होणारा नाच हेच कीर्तन. नट म्हणजे अनंत रुपाने नटलेला, नाटकातला नव्हे. अर्थात हा विश्वाच्या कणाकणातून चाललेला नाच हे कीर्तन असून, येथे समारंभ म्हणजे समत्वाचा आरंभ आहे आणि तो निर्दंभ आहे. श्रीनिळोबाराय म्हणतात,''कीर्तनाचा समारंभ | निर्दंभ सर्वदा||'' अशी निसर्गसिद्ध अवस्था जेथे अनुभूतीला येते त्याला कोणगाव, कोणजन, कोणमन, कोणपुण्य अशा शब्दात व्यक्त होणारे काही अनुभव येतात. 'कोण' हा शब्द परमार्थात, संतवाङ्मयात फार वेगळ्या अर्थाने येतो, उदाहरणार्थ ''कोणेगावी आहे सांगा हा विठ्ठल'' असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात. What म्हणजे काय ? पैकी हा प्रकार आहे. एकाने विचारले What म्हणजे काय? तो म्हणाला काय! अरे काय काय करतोस, सांग ना! पैकी हा तुकाराम महाराजांचा अभंग चरण आहे. कोणेगावी विठ्ठल आहे सांगा तरी? असा येथे प्रश्न नसून कोणी जर विठ्ठल कोठे आहे असे विचारले, तर दडपून सांगा ''कोणेगावी आहे'' असे महाराज म्हणतात. एखाद्या अशीलास वकिलाने कोर्टात काय सांगावयाचे ते पढवावे, पैकीच हे आहे. आपले शरीरात ज्याठिकाणी आत्मप्रचीति येते, ते जे कोणस्थान आहे, तेच कोणगाव आहे. दोन रेषा एका बिंदूत मिळाल्या की, कोण होतो. संतांच्या कृपेनेच हे जाणून घ्यावे लागते. या स्थानी ज्यांचे तादात्म्य आहे, ते कोणजन. यातच ज्यांचे विचार चालू राहून जे निर्विचार होतात आणि

अविचार होतच नाही ते कोणमन. येथे नामानुसंधानाने जे पुण्य साठले जाते ते 'कोणपुण्य!' कल्पनेसाठी येथे काही चरण देतो.'कोण जनाला, कोण मनाला, मानवले सार' असे श्री समर्थ शिष्या वेणाबाई म्हणतात. 'लागतसे पाया येतो लोटांगणी । मात तरी कोणी सांगायाची' ही श्रीतुकोक्ती आहे. ''कोण पुण्य फळा आले । आजि देखिली पाऊले ।'' हे उद्गार चिंतनीय आहेत. कोणस्थानी नामाने होणारा पुण्य संचय महत्वाचा आहे म्हणून अभंगाचे दुसऱ्या कडव्यात आमचे श्रीमामा म्हणतात, ''सर्व पुण्यामाजी थोर नाम पुण्य । ज्यात उणेपण काही नाही'' ''नाम श्वासोश्वासी असे । परब्रह्म तेथे वसे ।। '' या समर्थ उक्तीप्रमाणे श्वासात नाम असून, येथेच ब्रह्मसाक्षात्कार होत असल्याने हे नामपुण्य सर्वश्रेष्ठ असून, त्यात उणीवच रहात नाही. जीवभावाने होणारी जीवनातील उणीव शिवभावाने नाहीशी होते. नामात कोणताही दोष निर्माण होत नाही. ''मना पाप संकल्प सोडोनी द्यावा । मना सत्य संकल्प जीवी धरावा'' ही समर्थ उक्ती येथे सार्थ होते. देहासक्तीने सुखदुःखाचा होणारा संभ्रम नामाने मावळतो. एकवेळ जरी अशा नामाचा उच्चार झाला तरी, कसाही जीव असो, तो उद्धरून जातो. ''एकवेळ मुखी उच्चारिता राम । तरती अधम हेळामात्रे ।। '' हे यासाठीच या अभंगात श्रीमामांनी सांगितले आहे. नरदेह हीच एक वेळ अशी आहे की यातच काय ते साधता येते, मागून त्याचा काही उपयोग नाही. म्हणून शेवटच्या कडव्यात आमचे श्रीमामा म्हणतात, 'गोविंद म्हणे एकवेळ नरदेह । दुजीवेळ पाहे व्यर्थ असे ।।''

*****

## ३.

**अभक्ताचे जिणे होय लाजिरवाणे ।**
**रामनामाविणे सर्व व्यर्थ ।।१।।**
**रामनाम ज्ञान रामनाम धन ।**
**रामनामी जाण सर्व काही ।।२।।**
**म्हणोनिया नाम उच्चारावे वेगी ।**
**जव देह उगी चालतसे ।।३।।**
**गोविंद म्हणे वेग चाललासे पाही ।**
**साधनी या राही संसारात ।।४।।**

या तिसऱ्या अभंगात अभक्ताचे जिणे हे किती लाजिरवाणे आहे हे सांगितले आहे. चैतन्य व जड या दोन्ही गोष्टी विचारात घेणे सारख्या आहेत. चैतन्याशिवाय उपाधी नाही व उपाधीशिवाय चैतन्य नाही. चैतन्याला तहान लागली तर तोंड उघडल्याशिवाय पाणी पिता येत नाही आणि तोंड उघडावे म्हटले तर आत चैतन्य असावे लागते. इतके असूनही जडाचा व चैतन्याचा संपर्क नाही. चैतन्याचे कक्षेत जडाचे चलन-वलन होते. कक्षा सुटली की, सारा ग्रंथ आटोपला. 'दे दान आणि सुटे गिराण' अशी ती अवस्था आहे. आकाश व वायूची गाठ पडली की आत्मा हृदयाकाशात समाविष्ट होतो. आकाशावर प्राणाचा संघात म्हणजे विश्वाची उत्पत्ती. आत्मा हृदयाकाशात समाविष्ट झाला की नळकांड्यातून

वारे आत-बाहेर होत रहाते. जडाची जडाकडे खेच हा निसर्गाचा धर्मच आहे. पृथ्वीच्या पोटातील दगडही एकमेकाकडे आकृष्ट होत असतात. चैतन्याने जडाची हालचाल होत राहिली तरी, होत राहिलेली हालचालच ध्यानी येते. ज्या चैतन्याचे हालचालीने ही शरीराची हालचाल होते, त्या चैतन्याची स्मृतीच रहात नाही. जीव देहासक्त, विषयलंपट दृश्याशी तादात्म्य होतो आणि या कारणामुळे ही जीवनाची सारी बैठकच अस्थिर असल्याने, त्यास स्थिरता येत नाही व त्यामुळे त्यास खऱ्या अर्थाने समाधान न झाल्याने, सारखी सुख-दुःखाचीच जाणीव देहाच्या अनुषंगाने देहपातापर्यंत होत रहाते. देहपात झाल्यावर तो झालेला दुसऱ्याला जाणवतो, पण ज्याचा झाला, त्याला आता चैतन्याचे महत्व कळून तरी पुढे काय? शरीर आणि चैतन्य अलग झाले आहे हे कळावयास तेथे राहिले आहे तरी कोण? पुन्हा जीवाचे परिभ्रमण हे वासनेमुळे अटळच झाले. चैतन्य आणि जड या संघर्षात मी कोण आहे असे वाटणारा जीव वासनेने बद्ध झाला, तर तो आता मुक्त व्हावा कसा! कारण चैतन्याकडे वृत्ती ही कधी वळलीच नाही. सुखासमाधानाचे वर्म ज्या स्थिरतेत आहे, ती स्थिरता अस्थिर बैठकीवर व्हावी कशी? ''निश्चयाच्या अंगावरी उठती चंचळाच्या लहरी'' ही संतोक्ती या विश्वाचे मुख्य सूत्र आहे. हे सतत घडत राहिले आहे. त्या निश्चळाचा शोध, निश्चळ होऊन घेतला पाहिजे. निश्चळ भक्तीच माणसाला निश्चळ करते. श्रीमुक्ताबाई म्हणतात, ''सद्गुरूला दया कैसियाने येती । हे निश्चळ भक्ती सांगा माते ।।'' सूक्ष्मतर सूक्ष्मतम चंचलता हेच निश्चलतेचे वर्म आहे. अगदी निर्वात म्हटले तरी तेथे काही वात असतोच. एक सारे वारेच जगात नटले आहे. चैतन्य घनीभूत झाले की जड शून्यभूत होते व जड घनीभूत झाले की चैतन्य शून्यभूत होते. चैतन्याशी

तादात्म्यस्थिती हीच भक्ती. ''चैतन्याकडे वृत्ती वळविणे या नाव भक्ती ।'' श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''नाही ज्यासी भक्ती ते पतीत अभक्त ।'' पत म्हणजे पतन पावणे - पडणे. गोफणीत दगड घालून मारताना त्याला त्रिविध गती येते, अशीच जीवाची अवस्था आहे. अग्नीतून स्फुल्लींग बाहेर पडावे किंवा सूर्यातून ग्रहमाला सूर्याभोवती फिरत रहावी, असे चैतन्यातून जीव फेकले गेले. एखादा मनुष्य हवा खाणेस बाहेर पडावा आणि तो हवाच खात रहावा, किंवा गोफणही तिकडेच आणि दगडही तिकडेच अशी अवस्था झाल्याने हवा खाणेसाठी बाहेर पडलेला जीव, त्याला हवेशिवाय जगता येईना. आपल्या जीवनाचा गाभाच विसरल्याने त्याची जीवन-निष्ठाच राहिली नाही, मग भक्ती कुठली? भक्ती नाही म्हणून तो अभक्त झाला आणि भक्ती केली तरी ती अभक्तीच्या नावे सुरू झाली. चैतन्याने चैतन्याचेद्वारा चैतन्याशी तादात्म्य होऊन चैतन्याची अनुभूती घेणे हीच निखळ भक्ती आहे. याशिवाय जीवनात शांती नाही. म्हणून भगवान म्हणतात, 'अगा माझिया भक्तीवीण । जळो ते जियालेपण । पृथ्वीवरी पाषाण । नसती काई ।।' किंवा श्रीनाथमहाराज म्हणतात, 'भक्तीवीण पशू कशासी वाढला । सटवीने नेला कैसा नाही ।' हा सर्व आशय ध्यानी घेतला म्हणजे आमचे श्रीमामांना येथे काय म्हणावयाचे आहे याची कल्पना येईल. म्हणून त्यांनी म्हटले आहे, 'अभक्ताचे जीणे होय लाजिरवाणे । रामनामाविण सर्व व्यर्थ ।' नाम हीच खरी भक्ती आहे. 'हेच भक्ती हेचि ज्ञान । एक विठ्ठलची जाण ।' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज या दृष्टीने सांगतात. चैतन्यनाद हेच नाम असल्याने त्यातूनच ज्ञान प्रकट होते व ज्ञानाने असाध्य गोष्टी साध्य होतात. ज्ञान आहे म्हणून जग चालले आहे. जडालाही काही प्रेरणा आहे

म्हणून ते व्यवस्थित चालले आहे. हे पाहिले म्हणजे दुसऱ्या कडव्यात श्रीमामांनी जे सांगितले आहे, त्याचे महत्व अजमाविता येते. ते म्हणतात, 'रामनाम ज्ञान रामनाम धन । रामनामी जाण सर्व काही ।' यासाठी ज्या वेगाने आयुष्य चालले आहे, त्यात नाम घ्यावे. श्रीमामा म्हणतात, 'म्हणोनिया नाम उच्चारावे वेगी । जव देह उगी चालतसे ।।' फक्त हा वेग ओळखून घेतला पाहिजे.

ज्या वेगाने सारे जग चालले आहे, तोच वेग आपल्या शरीराला, आयुष्याला आहे. संसरणावरच शरीराची-जीवनाची आणि अंतर्बाह्य अनुभूतीची धारणा आहे. म्हणून अभंगाच्या शेवटच्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, 'गोविंद म्हणे वेग चाललासे पाही । साधनी या राही संसारात ।।' श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आपले हरिपाठात असेच म्हटले आहे, ''असोनी संसारी जिव्हे वेगु करी । वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ।।''

*****

# ४.

**रामनामाविण अमंगल वाणी ।**
**जाणा ती बोलणी अधमाची ।।१।।**
**मंगल ते काय शोधोनिया पाही ।**
**रामनाम देही मंगल असे ।।२।।**
**तेचि उच्चारावे सदा सर्वकाळ ।**
**जेणे कळिकाळ भीती पावे ।।३।।**
**गोविंद म्हणे मन गळता मंगल ।**
**मनाची खळबळ जेथे नुरे ।।४।।**

मुळात हा देहच पाहिला तर याचा विश्वास धरता येत नाही. सर्व नासका, कुजका माल शरीरात वापरून त्याचा तो बनलेला आहे. वर तळपते ते आत करपते अशी याची अवस्था आहे. शरीरातील यंत्रणा दिसत नाही तेच चांगले आहे. ते अविश्वासाचेच बनले आहे. तर त्याचा विश्वास कसा धरता येईल? ''अविश्वासीयाचे शरीर सुतकी । चांडाळ पातकी महादोषी ।। '' असे श्रीतुकाराममहाराज या दृष्टीनेच म्हणतात. त्यामुळे त्या शरीरातील जीभ गोड धोड खाईल कुठे, निंदा - स्तुती करील कोठे आणि देवाचे नाव घेईल कोठे अशी स्थिती आहे. ''घेई घेई माझे वाचे । गोड नाम राघोबाचे ।'' अशी आर्जव करूनही ती नाम घेणेस प्रवृत्त होत नाही. जी नामाचीच जिव्हा आहे, तीच नाम घेऊ शकते आणि त्या नामाचे महापूर वाहू लागले की अगदी ही चवचाल जीभ देखील नाममय होते. तापलेल्या पळीवर चार पाण्याचे थेंब टाकले

तर चर्र्र् होऊन ते नाहीसे होतात. पण ती पळी कृष्णामाईत टाकली तर थंड होते. स्फुरद्रुप नाम हे अगदी बाह्यतः जिव्हेपर्यंत आले, तर जिव्हा थंड होऊन मन थंड झाल्याने अमृत स्त्रवू लागते. ''ज्याचे मुखी नाम अमृत सरिता| तोचि एक पुरता घटू जाणा ||'' ज्याच्या मुखातून नामामृताची सरिता वाहते, तो परमार्थात पुरा होतो असे श्रीनिवृत्तीनाथमहाराज म्हणतात. ''हरीनाम सार जिव्हा या नामाची |'' या श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या उक्तीप्रमाणे या नामाच्याच जिव्हेने हरिनाम सारभूत ग्रहण केले की, ''नाम घेता मन निवे| जिव्हे अमृत हे स्त्रवे |'' ही श्रीतुकोपनिषदातील अनुभूती येऊ लागते. आत जोपर्यंत नादब्रह्म उसळत राहिले आहे, तोपर्यंतच देहाला आणि वाणीला पावित्र्य आहे. याविना देह हा सुतकी आणि वाणी अमंगलच आहे. ''पवित्र तो देह वाणी पुण्यवंत | जो वदे अच्युत सर्वकाळ |'' हा श्रीतुकाराममहाराज यांनी सांगितलेला विषय येथे चिंतनीय आहे. अंतर्गत नामाशी तादात्म्य झाले तर वैखरी नाममय होते. वैखरीतून आत जाणे हे बोलणे आणि ऐकणेच ठीक आहे. देवाचे नाव चार वेळा घेण्याची सुद्धा येथे पंचाईत होते. अर्थात नाम घेणाऱ्यालाच याची कल्पना येईल. पंढरपूरला मी केव्हा पोहोचेन या विचाराने पंढरपूर गाठता येत नाही, त्याला पाऊलच टाकावे लागते. तात्पर्य, नामाशिवाय जगणेच फुकट आहे. इतके ते जीवनाशी निगडीत आहे. नाम ही जीवननिष्ठा आहे. ही जेथे नाही, तेथे जीवनालाही अर्थ नाही. श्रीतुकाराममहाराज आमचेसाठी तळमळीने म्हणतात, ''नामाविण माझी वाचा अमंगल | ऐसा का चांडाळ निर्मियेला |'' म्हणून रामनामाशिवाय कितीही चांगले बोलणे असले तरी ते बोलणे अधमाचे आहे. या दृष्टीने आमचे श्रीमामा म्हणतात, ''रामनामाविण अमंगल वाणी | जाणा ती बोलणी अधमाची||''

मंगल काय आहे हे जाणून घेणे महत्वाचे आहे. त्याचा शोध घेतला पाहिजे. तो घेतला तर हे नाम आहे तोवरच जीवीत आहे, हे स्पष्ट

होते. शरीराचे संघटन त्यानेच झाले आहे. त्याचे अभावी विघटनच आहे. तेथे सारा कारभारच संपतो. म्हणून श्रीमामा म्हणतात, ''मंगल ते काय शोधोनिया पाही। रामनाम देही मंगल असे।।'' एरव्ही आपण जे मंगल म्हणतो, ते खऱ्या अर्थाने काही वेगळेच अनुभवास येते. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ''मंगल हे नोहे कन्या पुत्रादिक। राहिला लौकीक अंतरपाट ।।'' किंवा श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''मंगलाचिया वाहणी । आहे अमंगलाची पुरवणी ।।'' पत्रिकेत मंगळ आहे असे म्हटले तर त्या स्थळाचा विचारदेखील कोणी करीत नाही. येवढा त्याचा झटका आहे. देव नाही धर्म नाही म्हणणारे देखील, मंगळाला भिताना दिसतात. म्हणून भगवंताचे नाम हेच खरे मंगल आहे. ''सकल मंगल निधी । श्री विठ्ठलाचे नाम आधी ।।'' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, तर ''मंगलाचे जे मंगल । राम कौसल्येचा बाळ ।।'' असे श्रीसमर्थ स्पष्ट करतात. ''सकल मंगल निधी सर्व कार्यसिद्धी । तरणोपाय जनी । नाम तुझे अमृत संजीवनी ।।'' हे श्री समर्थांचे उद्गार जन्मभर विचार करावा इतके महत्वाचे आहेत.

आता तिसऱ्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, ''तेचि उच्चारावे सदा सर्वकाळ । जेणे कळीकाळ भीती पावे ।।'' नाम हे शरीरात स्फुरद्रुपाने सदा घुमणारे आहे. देव सदा आणि म्हणून त्याचे नाम सदा, ही मौज आहे. श्रीसमर्थ म्हणतात, ''सदा देवकाजी झिजे देह ज्याचा । सदा रामनामे वदे नित्य वाचा।।'' किंवा ''सदा सर्वदा देव सन्निध आहे ।'' यावरून दिसून येईल. जे नाम सदा आहे, ते आम्ही कदा घेतो, याला काय अर्थ आहे, म्हणून परमार्थात सदा या शब्दाला फार महत्व आहे. ''सदा सर्वदा योग तुझा घडावा । तुझे कारणी देह माझा पडावा ।।'' अशी स्थिती आहे. पण आमचे म्हणणे मात्र वेगळे आहे. ''कदा ना कदा

योग तुझा घडावा । क्वचित् कारणी देह माझा पडावा।।'' हे योग्य नाही. आम्ही नाम केव्हा केव्हा घेतो असे म्हणणे म्हणजे, आम्ही केव्हा केव्हा जिवंत असतो आणि केव्हा केव्हा मरतो असे म्हणण्यापैकी आहे. केव्हा केव्हा जिवंत असतो या म्हणण्याला काय अर्थ आहे? याप्रकारे नामाचे रहस्य जाणून ते नाम सदासर्वदा घेतले तर, तो काळावर विजय आहे. आपले आयुष्य श्वासावर मोजले जाते. श्वासाचा व नामाचा संबंध पाहिला तर, नाममय श्वास झाल्यावर जीवनाचे सार्थक झाल्याने, ते ब्रह्ममय होते. हा काळ तेथे दिक्, काल आणि आकाश याच्या अतीत असणाऱ्या नामाशी झालेल्या तादात्म्यामुळे काही करू शकत नाही. ''काळ हमारा पोंगडा मैं करू गुलाम । यहा से डेरा उठावु तो वैकुंठ करू मुकाम ।'' या कबीरसाहेबांच्या उक्तीप्रमाणे अवस्था होते. वय जेथे कुंठीत होते अशा परमात्म्याशी त्या जीवाचे ऐक्य होते. ''वैकुंठः पुरुषः प्राण'' असे विष्णुसहस्रनामात म्हटले आहे. वैकुंठ हे नाम परमात्म्याला आहे. या परते या जगात मंगल काय आहे ? म्हणून श्रीमामा शेवटच्या कडव्यात म्हणतात, ''गोविंद म्हणे मन गळता मंगल । मनाची खळबळ जेथे नुरे ।।'' येथे मनाचा लय झालेला असतो. मनात कोणती खळबळ रहातच नाही. या प्रकारे येथे सारे जीवन मंगलमयच झालेले असते. तात्पर्य काय, सारे मांगल्य एका नामातच अनुभवास येते.

## ५.

**करिती खटपट शोधावया देव ।**
**परि देवदेव हाता नये ।।१।।**
**खटपट काय कळेचिना पाही ।**
**व्यर्थ दिशा दाही भ्रमताती ।।२।।**
**खट पटती तरी खरी खटपट ।**
**रामनाम नीट उच्चारावे ।।३।।**
**गोविंद म्हणे प्रेमे घेता देवभेटी ।**
**योगयाग गोष्टी उपाधी ते ।।४।।**

प्राणीमात्र देव शोधण्याचे खटपटीत आहे खरा, पण तो सापडत नाही हे तितकेच खरे आहे. श्रीसमर्थ म्हणतात, 'साराचि झाला जन आंधळा हो । म्हणोनिया आला भव गोंधळा हो । नाचे उडे आणि पडे रडे हो । प्रत्यक्ष हा देव न सापडे हो ।।'' आंधळेपणाने सारा गोंधळच होत राहिला आहे. नाचले, उडले किंवा पडले तरी प्रत्यक्ष देव सापडत नाही. अडचणीत सापडले की देव आठवतो व अडचण दूर झाली की, देव पावला असे वाटते. प्रत्यक्ष देव फारच थोड्यांना भेटला. ज्यांना देव भेटला असे जे डोळस, तेथे आपण आंधळे, तर हे डोळस आहेत हे तरी कशावरून आपणास वाटते? त्यांनी ती दृष्टी दिली तर देव भेटेल, पण तसाही योग येत नाही. 'आंधळ्यासी जन सारेचि आंधळे ।' कारण 'आपणासी डोळे दृष्टी नाही' हे जे तुकोपनिषद सांगते तेच खरे आहे आणि आपले जीवनात हीच खरी मोठी हानी आहे. श्रीपांडवगीतेत म्हटले आहे, 'साहानिस्त्वन् महःच्छिद्रं साचांध जडमूढता । यन्मुहर्तं क्षणंवाऽपि वासुदेवं न चिन्तयेत् ।।' योग्य दृष्टीने प्रयत्न चालू झाला तर त्या प्रयत्नाला यश येते. औषध घेणे म्हणजे गुण येणे, अन्न खाणे म्हणजे लठ्ठ होणे, अभ्यास करणे म्हणजे पास होणे, असे कुठे आहे ? तसेच येथेही आहे. जो सर्वांना काही

सतत देतच राहिला असा देव, ज्याच्या सत्तेमुळे आपल्या प्रयत्नांना यश येत आहे, त्याची प्राप्ती कोणत्या प्रयत्नाने व्हावी? असा येथे प्रश्न आहे. जानव्याचा गुंता सोडवावयास गेले तर गुंता वाढतच जातो. पण ते ताडकन तोडावे म्हणून हिसडा मारताच तो सुटतोही. ईश्वरी सत्तेनेच जे आज निसर्गात काही उपलब्ध आहे, ते बाहेरूनच प्रयत्नाने मिळावावे लागते. कोथींबीरीची काडीही बसले ठिकाणी मिळत नाही. पण जो देव उपलब्ध आहे, ज्याने हे अनंत उपलब्ध करून आपल्या समोर ठेवले आहे, तो देव उपलब्ध होणेसाठी कोणते साधन आहे या विचाराने मौज वाटते. देवही उपलब्ध होतो, पण खटपटीने नव्हे. तेथे चाललेली खटपट ही लटपटच होते. श्रीचिमडचे महाराज म्हणतात, 'अरे नरा व्यर्थ तुझी खटपट ती । अनभ्यासे अभ्यासे याची प्राप्ती होती ।' त्याचे मागे लागले तर तो हाती येत नाही. पण आपण स्वस्थ झालो की तेथेच तो स्वस्थ होतो. आपली सारी खटपट कोणत्या सत्तेने चालली आहे, हे निश्चित कळले तर तेथेच देवाची प्राप्ती आहे. नुसत्या खटपटीने आपण दूरच जातो. ज्या खटपटीने आपण दूर जातो ती खरी खटपटच नव्हे.

या दृष्टीने आमच्या श्रीमामांनी या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात सांगितले आहे, 'खटपट काय कळेचिना पाही । व्यर्थ दिशा दाही भ्रमताती ।।' ज्याने सर्व दिशा आपल्याला दाखविल्या, तो कोणत्या दिशेला सापडेल? त्याने जिथून दिशा दाखवल्या, ती दशा आपल्या अंगी बाणली पाहिजे. श्रीतुकाराममहाराज आमचेसाठी एका अभंगात आपली तळमळ व्यक्त करतात. ते म्हणतात, 'कई ऐंशी दशा येईल माझे अंगा । चित्त पांडुरंगा झुरतसे ।।' यावरून येथे काय म्हणावयाचे आहे हे स्पष्ट होईल. दिशाच नुसती पहात बसलो तर निशा म्हणजे अज्ञानच वाढत जाते. 'दिशा पाहता ते निशा वाढताहे ।' हे समर्थ वचन चिंतनीय आहे. 'पश्चिम दिशेसी जाता उजवा ठाकिला मेरू ।' असे श्रीमुकुंदराज म्हणतात. येथे पश्चिम दिशा हा शब्द अंतर्मुख होणे या दृष्टीने आलेला आहे. 'अवघड पश्चिमेची वाट' हे श्रीज्योतीपंत भागवत याच अर्थाने म्हणतात. 'पश्चिमेचेनि पाठे' हा श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचा शब्दप्रयोग याच अर्थाने आहे. बाहेरील दिशा या भ्रमणालाच पूरक आहेत. स्थिर झालेशिवाय

भागत नाही. स्थिर होणे हेच आसन, 'स्थिरमासनं' हे श्रीशंकराचार्य या दृष्टीनेच म्हणतात. तेथेच एकाग्रमन होते. म्हणून 'घालोनी आसन करी एकाग्रमन' असे श्रीतुकाराममहाराजांनी म्हटले आहे. अभंगाच्या तिसऱ्या कडव्यात 'खट पटती तरी खरी खटपट । रामनाम नीट उच्चारावे ।' असे श्रीमामा सांगतात. काम क्रोधादि खट पटले तरच ती खऱ्या अर्थाने खटपट झाली. 'न लगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती । वैकुंठ पेठ मोठी नामावर हीन दीन खट पटती ।।' असे एका आर्येत म्हटले आहे. तर 'खट नट यावे शुद्ध होवोनी जावे' असे मोठी दवंडी पिटून श्रीचोखोबांनी सांगितले आहे. 'दवंडी पिटी भावे चोखामेळा' यापेक्षा काय सांगावे? श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे आरतीत 'रामा हो जनार्दनी पायी ठकचि ठेले' असे म्हटले आहे, ते याच अर्थाने. श्रीमामांनी याच कडव्यात पुढे 'रामनाम नीट उच्चारावे' असे म्हटले आहे. श्वासोश्वासात नाम आहे. श्वासाची गती ही वेलांटी सारखी आहे. ती आधारापासून सहस्रदळी गेली की ती नीट होते. त्यात होणारा उच्चार महत्वाचा, म्हणून 'रामनाम नीट' असा शब्द वापरला आहे. 'आधारी नाभी मुळी तीहि एकचि तंतू । सहस्र दळावरी स्थिर राहे निवांतु ।।' हे श्रीमुकुंदराजांचे वचन सतत विचारात घ्यावे असे आहे. 'करविली तैसी केली कटकट । वाकडी की नीट देव जाणे' आम्ही देव जाणला आहे. भगवंताने कटकट करविली तैसी केली, जी कटकट कधी कटकट वाटलीच नाही व म्हणून बाहेर कधी कटकट झालीच नाही. मग ही वाकडी आहे का नीट हे जाणत्यांनी ठरवावे, असे श्रीतुकाराममहाराज सांगतात. अशी जर भक्ती-प्रेमाने देवाची भेट घेतली, तर योगयागादि गोष्टी ही उपाधीच आहे, असे श्रीमामांनी शेवटच्या कडव्यात सांगितले आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज आपले हरिपाठात स्पष्टपणे बजावतात, 'योगयाग विधी येणे नोहे सिद्धी । वायाची उपाधी दंभ धर्म ।' यावरून येथे आता वेगळे भाष्य करणेची जरूरीच नाही, असे वाटते.

*****

# ६

**एकभावे राम उच्चारणी रत ।**
**तयाचा अंकित देव असे ।।१।।**
**भाव म्हणजे काय ज्यावीण सर्व वाव ।**
**जयाचा प्रभाव देही दिसे ।।२।।**
**भाव कळो येता देव कळो येई ।**
**अन्यत्र उपायी शिणतसे ।।३।।**
**गोविंद म्हणे  भाव अंतरी धरावा ।**
**अभाव टाकावा नाम योगे ।।४।।**

भावाचा आणि देवाचा अतिनिकटचा संबंध आहे. एकभावाने रामनामाचे उच्चाराशी जर जीवाचे तादात्म्य झाले तर देव त्याचा अंकित होऊन रहातो. ज्याचे जवळ भाव आहे, असे हे कोणी जे भाविक त्यांचे हातीच देव असतो. 'तुका म्हणे देव भाविकाचे हाती । शहाणे मरती तरी नाही ।' शहाणपणा देवापाशी चालत नाही. 'शहाणपणे वेद मुका' असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात, तर 'जाणीव शहाणीव ओझे सांडोनिया दुरी । आपण वस्तीकर वर्ततसे संसारी।।' असे श्रीनाथमहाराज एक रहस्य सांगतात. आसेतु हिमाचल या विश्वात जरी आपण पाहिले, तरी खरा भाव ज्याला म्हणतात तो एकच आहे. त्यात भिन्नता नाही. कमी जास्त तो होत नाही आणि बाजारभावाप्रमाणे तो बदलणाराही नाही. अनेक जीव आणि पदार्थ आहेत, अनेक ब्रह्मांडे गरगर फिरत आहेत, पण मातीच्या कणापासून सर्वांचे अस्तित्व एकच आहे. हा जो अस्तित्वभाव आहे त्यात फरक नाही. आपले अस्तित्वाची जाणीव ज्या भावाने म्हणजे गुणधर्माने

होते, तो आपला अस्तित्व भाव आहे.  याला धरून नामसाधना होणे आवश्यक आहे. राम हा आत्मा किंवा आत्मा हाच तो राम आहे. 'जयदेव जयदेव आत्मया रामा' हे श्रीसमर्थ यादृष्टीनेच म्हणतात. तर 'आत्मया रामाचे ध्यान लागले मज कैसे' असे श्रीनाथमहाराज प्रतिपादन करतात. 'रामजप जो निसर्गसिद्ध होत राहिला आहे, तोच शिवाचा आत्मा आहे' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज स्पष्टपणे दाखवून देतात. ते म्हणतात, 'आत्मा जो शिवाचा रामजप', हा जो रामजप आहे तो आत्मारामाचा अंगभूत आणि उत्स्फूर्त असा ध्वनी आहे. 'रामनाम ध्वनी उमटे' हे श्रीबांदकरमहाराज आपल्या अनुभवाने बजावीत आहेत आणि जेथे नाद आहे तेथेच प्रकाश आहे. दीप म्हणजे प्रकाशणे, प्रकाशाचे रूप म्हणजेच देव. नादानुसंधानात प्रकाशाचा आविष्कार होतो म्हणून देव तेथेच अंकित होऊन रहातो. 'जव या वायूचा प्रकाशू' या श्रीज्ञानेशोक्तीप्रमाणे वायुप्रकाश हा देवच आहे. हा स्वयंप्रकाश स्वयंपूर्ण, स्वसंवेद्य, जडाला आणि चेतनेला प्रकाश देणारा, बुद्धीतील अंधार घालवणारा, हा अंधार आणि हा उजेड, हे ज्ञान आणि हे अज्ञान स्पष्ट करणारा असा हा प्रकाश सर्व प्रकाशापेक्षा वेगळा आहे. 'नवल प्रकाश प्रकाशा वेगळा। झाकिलीया डोळा पुढा दिसे ।।' हे याचे वैशिष्ट्य श्रीनिळोबारायांनी प्रतिपादिले आहे. याशिवाय सारे जीवनच फुकट आहे.

म्हणून आमचे श्रीमामा या अभंगाच्या दुसऱ्या कडव्यात म्हणतात, 'भाव म्हणजे काय ज्यावीण सर्व वाव । जयाचा प्रभाव देही दिसे ।' हा भाव आहे तोवर आपले अस्तित्व आपल्यास जाणवते. हा नाहीसा झाला की आपले अस्तित्वच संपले. याचा प्रभाव या देहात स्पष्ट होतो. याचे अभावी देह हा जड होऊन निचेष्टीत होतो. 'प्राण गेलीया शरीर । काय करील व्यवहार ।।' या श्रीतुकाराममहाराज यांचे वचनावर निराळे

भाष्य करण्याची जरुरीच नाही. म्हणून अभंगाच्या तिसऱ्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, 'भाव कळो येता देव कळो येई । अन्यत्र उपायी शिणतसे ।।' हा भाव जर कळला, तर देव कळला असाच त्याचा अर्थ आहे. किंबहुना श्रीनाथमहाराज याहीपुढे जाऊन म्हणतात, 'भाव तोचि देव भाव तोचि देव। ये अर्थी संदेह नका धरू ।।' भाव म्हणजेच देव आहे. 'Existance is God' हे वचन येथे चिंतनीय आहे. अस्तित्व हाच परमेश्वर यापेक्षा काय सांगावे हे न उमगल्याने जीव हा नाना प्रयत्ने शिणून जातो. त्याला प्रत्यक्ष ईश्वराचा साक्षात्कार होत नाही. असा हा विषय पहाता श्रीमाणिकप्रभू म्हणतात, 'समज मूढा गुरूविण तुज गती नाही ।।ध्रु.।। योगयागे विधी येणे नोहे सिद्धी। व्यर्थची खटपट पाही ।।१।। हिंडुनी देशोदेशी कोटीतीर्थ वासी । शिणसी तू नाना उपायी ।।२।। सांगतसे माणिक करू नको आणिक । लाग तू सद्गुरूपायी ।।३।। तात्पर्य - 'एका भाव भक्तीवीण । सारा वेदांताचा शीण।' हेच खरे. आता हा जो भाव कोठे बाहेर नसून तो आत आहे आणि त्याची प्रचीतिही तेथेच आहे. येवढ्यासाठी आमचे श्रीमामा या अभंगाच्या चौथ्या चरणात म्हणतात, ''गोविंद म्हणे भाव अंतरी धरावा । अभाव टाकावा नाम योगे।'' भाव हा आपल्या आत आहे तो झाकून रहात नाही. त्याची लक्षणे त्या जीवनात स्पष्ट होतात. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' हा विचार महत्वाचा आहे. श्रीसमर्थ म्हणतात, 'असे हो जया अंतरी भाव जैसा । वसे हो तया अंतरी देव तैसा ।' भावही अंतरी आणि देवही अंतरी, ही अंतर्खूण जाणली पाहिजे.

आमचे श्रीमामा एका अभंगात म्हणतात, 'बाहेर देव नाही । तो देव आत पाही ।' एका भांड्यात पाणी आहे, आम्हाला तेथे हवा साठवावयाची आहे, मग काय करावे लागेल? भांड्यातील पाणी ओतले

की झाले.  मग हवा साठविणेची क्रिया काही वेगळी नाही. आपल्याला भाव धरावयाचा आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज आपल्या हरीपाठात म्हणतात, 'न सांडी रे भावो ।' भाव सोडू नको म्हणजे काय? तर भाव धर, हा कसा धरावा? ते लगेच सांगतात, 'टाकी रे संदेहो।' संशय गेला की भाव धरलाच. धरणेची क्रिया निराळी नाही. 'संशयात्मा विनश्यति' असेच भगवद्वचन आहे. किंबहुना हेच मोठे पाप आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'यया संशया होनी थोर । आणिक पातक नाही घोर । की जे विनाशाची वागुर । प्राणियासी ।।' संशयानेच आपला खरा नाश होतो. संदेहाची निवृत्ती म्हणजेच आत्मज्ञानाची प्राप्ती. 'संदेह फिटला । जनी म्हणे उदय झाला ।' श्रीजनाबाईंनी एक वर्मच येथे सांगितले आहे. अर्थात हा संशय जाणेचे साधन एकच. 'रामकृष्णी टाहो नित्य फोडी' या स्थितीत एकदा भाव धरला की अभाव रहातच नाही. म्हणून श्रीमामा म्हणतात, 'गोविंद म्हणे भाव अंतरी धरावा । अभाव टाकावा नाम योगे ।।' हे सर्व काही एका नामाने होते, हे आमचे श्रीमामांचे एक वाक्य कीर्तनात वारंवार येत असे. त्याची आठवण होते. नामच खरे महत्वाचे आहे हेच खरे.

✻✻✻✻✻

## ७

**अन्य आचरणी पातकांच्या राशी ।**
**जाती विलयासी नाममात्रे ।।१।।**
**म्हणोनि रामनाम सकळा वरिष्ठ ।**
**बोलियेले श्रेष्ठ संतमुनी ।।२।।**
**रामनाम मुखी थोर सदाचार ।**
**पापाचा विचार ज्यात नसे ।।३।।**
**गोविंद म्हणे यम वंदितसे पाय ।**
**इतर ते काय तया पुढे ।।४।।**

आपण कोणी वेगळे आहोत या भूमिकेतून होणारे आचरण हीच पापाची रास आहे. ''कलीमाजी झाल्या पातकांच्या राशी । हे काय तुम्हासी न कळेचि।।'' असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात, तर 'कलीयुग चवथे हे दोष सिंधूची सारा । सकलहि नरकाच्या साधनाचा पसारा ।' असे श्रीसमर्थ सांगत. 'हरिविण जन्म नरकची पै जाणा ।' या श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या उक्तीप्रमाणे ज्याचा सारा जन्म हरिला न जाणताच गेला, मग वेगळा तर्क राहिला कोठे? 'पर्वताप्रमाणे पातक करणे ।' अशीच त्या जीवाची श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे अवस्था झाली. 'पर्वत' हा शब्द येथे 'तृणवत्' सारखा आहे. आत्म्याशी जो परवत् झाला आणि त्याप्रमाणे वागून आत्म्याची प्रतारणा करू लागला. यापरते पाप आणि वेगळे कोठून असणार? म्हणून या अभंगात आमचे श्रीमामा म्हणतात, 'अन्य आचरणी पातकांच्या राशी । जाती विलयासी नाममात्रे ।' श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांनी एकदा चिमड येथे आपले कीर्तनात साधक मंडळींना प्रश्न केला, 'पुण्य म्हणजे काय बोला?' कोणास सांगता

आले नाही.  मग 'बापूराव तुम्ही रोज कीर्तन करता, तुम्ही सांगा' असे आमचे श्रीमामांचेकडे बोट करून म्हणाले. मामांनी हात जोडून सांगितले, 'नाम हे पुण्य आणि अनाम हे पाप' यावर सारेच निरूत्तर झाले. श्रीकेशवस्वामी म्हणतात, 'नामी अनाम साचले तेथे लाधले परमगूज । सद्‌गुरूकृपे केशवी डोळा उघड देखिले निज ।।' नाम हे चैतन्य आणि अनाम हे जड आहे. नाम हे निश्चल असून, निश्चलत्वाने घेतले की तो घेणारा, निश्चलच होतो. 'तुका म्हणे नाम । चैतन्य निजधाम।' किंवा 'निश्चलाच्या अंगावरी उठती चंचलाच्या लहरी ।' ही श्रीहरिबुवांची उक्ती येथे चिंतनीय आहे. 'नामासी विन्मुख तो नर पापीया ।' नामाला विन्मुख तो पापी, अशी हरिपाठात श्रीज्ञानेश्वरांनी पाप्याची व्याख्या केली आहे. देहाच्या अनुषंगाने घडते ते सारे पापच आहे. चैतन्याचे अनुसंधानात घडते ते पुण्य आहे. म्हणून देहासक्तीने आपण चैतन्यापेक्षा कोणी निराळे आहोत, या जडवादाने जडवादी होणारा जीव कोठे तरी पस्तावतो. कित्येकवेळा चांगले करता करताही त्यात काही वेगळेच होऊन बसते. पाप आणि पुण्य विसरले नाही, त्याचे परिणाम सुख दुःखात्मक अस्थिरपणे होत राहतात. यामुळे चिरसुखाची प्राप्ती होत नाही. दुःख हलके होणे म्हणजेच सुख, इतकेच काही घडते. सारे पाप पण त्यात उजवे डावे पहावे असे होते. विस्तार भयास्तव जागृती विश्लेषण करता येत नाही. नामविन्मुखता पाप म्हटल्यावर ते नामानी जाते यावर भाष्याची जरूरी नाही.

या दृष्टीने आमचे श्रीमामांनी अभंगाचे दुसऱ्या कडव्यात म्हटले आहे. 'म्हणुनी रामनाम सकळा वरिष्ठ । बोलियेले श्रेष्ठ संतमुनी ।' यादृष्टीने रामनाम सर्वश्रेष्ठ आहे असे संतांनी, ऋषीमुनींनी सांगितले आहे. श्रीहंसराज स्वामींनी या रामनामाचे महत्व अगदी युक्तीने पटवून दिले आहे. ही दोन्ही अक्षरे सर्व अक्षरांच्या डोक्यावर बसतात. म्हणजे हे नाम सर्वश्रेष्ठ आहे असे त्यांनी प्रतिपादिले आहे.  'रेफस्योर्ध्वा गतिः' 'र' कार जो आहे

तो अक्षराचे डोक्यावर येतो. उदा. गर्व, शर्व, पर्व, खर्व, त्याचप्रमाणे 'म'कारही अक्षराचे डोक्यावर येतो. भाषेतील सर्व अनुस्वार जरी गाळले तरी टिंब या शब्दात तरी 'टि' वर अनुस्वार द्यावा लागेल. तात्पर्य 'र' कार व 'म' कार सर्व अक्षरांचे मस्तकी येत असलेने हे नाम श्रेष्ठ आहे. पांडवगीतेत सर्व ऋषीमुनींनी नामाचे महत्व मुक्तकंठाने सांगितले आहे. श्रीगौतमऋषी म्हणतात, 'गो कोटीदानं ग्रहणेषु काशी प्रयागगंगा युतकल्पवासः। यज्ञायुतं मेरू सुवर्णदानं गोविंद नाम्ना न कदापि तुल्यम्।।' काशीक्षेत्रात, प्रथम वेताच्या रत्नालंकाराने मढलेल्या एक कोट गाई, ग्रहण-पर्वकाळात दान केल्या तर काय पुण्य असेल, पावलीतले गोप्रदान नव्हे, विमानाने कोणी गंगास्नान करून आला तर आपण त्याला वंदन करतो, आणि घरबसल्या ते पुण्य मिळविण्याचे उद्योगात असतो. पण अयुतकल्प प्रयागक्षेत्री ज्याने गंगास्नान केले, याची कल्पनाही करता येईल का? हल्लीचे काळात वैश्वदेव होणे दुरापास्त मग आपले सांगली येथील वेदमूर्ती श्री.शंकर भटजी नातू यांचेसारखे अग्निहोत्र किंवा यज्ञकर्म दूरच राहो. शंकर भटजींनी सांगलीस यज्ञ केल्याने आपल्यास तो निदान पहाता तरी आला. या गोष्टी काही सोप्या आहेत कां? पण ज्याने हजारो यज्ञ केले आणि गुंजभर सोने नव्हे, सोन्याचा मेरू दान केला. या सर्व पुण्याईचे गठ्ठे जरी एका पारड्यात घातले तरी 'गोविंद' या नामाचा नुसता उच्चार केला तर, त्या पुण्याईचे पासंगालाही येत नाहीत. यापेक्षा नामाची थोरवी कोणत्या शब्दात सांगता येईल असा प्रश्न आहे.

नाम हाच एक थोर सदाचार आहे. हा विषय सांगताना अभंगाचे तिसऱ्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, 'रामनाम मुखी थोर सदाचार । पापाचा विचार ज्यात नसे।।' श्रीसमर्थ म्हणतात, 'प्रभाते मनी राम चिंतीत जावा । पुढे वैखरी राम आधी वदावा । सदाचार हा थोर सांडू नये तो । जनी तोचि तो मानवी धन्य होतो।।' 'ती प्रभा' मनात होऊन रामाचे चिंतन करावे. जे नाम आपल्यास नको वाटते, तेच आधी घेऊन मोकळे

व्हावे. जेवावयास बसले की पानात घातलेले टाकावयाचे नाही, असा पूर्वी एक कटाक्ष असे. आवडत नाही ते आधी खा. मागून फार तर घेऊ नको, असे वडील मंडळींनी लहानांना सांगावयाचे. त्यातीलच हा प्रकार आहे. 'पहाटेच्या प्रहरी म्हणा हरी हरी ।' हा चरण येथे चिंतनीय आहे. झोप झालेली आहे, डोक्यात दुसरे विषय अजुनी यावयाचे आहेत, वेळ प्रशांत आहे. या वेळेत नाम घेत असताना लय लागतो. मागून सारा दिवस चांगला जातो. म्हणून मागून वैखरी चालू दे, आधी नामच घ्यावे, असे समर्थांचे सांगणे आहे. श्रीज्ञानेश्वर माऊली 'राम राम स्मरा आधी ।' असेच सांगत आहेत, हाच एक मोठा सदाचार आहे. याने मानवी जीवनात धन्यता प्राप्त होते. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'तुका म्हणे ऐसा ओहे श्रेष्ठाचार । नाम हेचि थोर विठोबाचे ।।' भगवंताचे नाम हा श्रेष्ठ आचार असून 'यद्यदाचरति श्रेष्ठ' या भगवदुक्तीप्रमाणे श्रेष्ठांनी हाच आचार संपादन केला आहे. 'यज्ञानां जप यज्ञोऽस्मि ।।' या उक्तीप्रमाणे हा एक नामजप यज्ञच आहे. पापाचा म्हणजे देहबुद्धीचा येथे प्रवेशच होत नाही असे याचे आगळे वैशिष्ठ्य आहे. ''स्वधर्मु जो बापा । तो नित्य यज्ञ जाण पा ।। जये ठायी वर्तता पापा । संचारू नाही ।।'' असा खुलासा श्रीज्ञानेश्वरमहाराज करतात. हा जो 'स्व'चा धर्म आहे, त्याचे सतत अनुसंधान हा एक नित्य यज्ञच आहे. हेच वर्तन झाल्याने किंवा येथे सातत्याने राहिल्याने, पापाला आत रस्ताच नाही. म्हणून श्रीमामांनी अभंगाचे चौथ्या कडव्यात नामाची श्रेष्ठता सांगताना म्हटले आहे, 'गोविंद म्हणे यम वंदितसे पाय । इतर ते काय तयापुढे।।' श्रीतुकाराम महाराज म्हणतात, 'यम सांगे यमदूता । तुम्हा नाही तेथे सत्ता । जेथे होय हरि कथा । सदा घोष नामाचा ।।' जेथे नामाचा घोष आहे तेथे तुम्ही जाऊच नका, असे यमधर्मांनी आपल्या दूतांना बजावून ठेवले आहे. असा प्राणी भगवन्नामाने काळाचे तडाख्यात न सापडता, जीवन्मुक्तच होतो. यापेक्षा काय सांगता येईल?

*****

# ८.

**रामनाम मुखी नित्य नेमे गाता ।**
**त्या नसे मागुता जन्म घेणे ।।१।।**
**नित्याचे नेमाचे असे एक नाम ।**
**घेता सरे काम अंतरीचा ।।२।।**
**कमी जास्त काही अनित्यता नाही ।**
**स्फुरतसे देही अखंडित ।।३।।**
**गोविंद म्हणे घ्यावे तेचि वेळोवेळा ।**
**अंतरी कळवळा धरोनिया ।।४।।**

रामनाम जो कोणी नित्यनेमाने मुखाने घेईल, त्याला पुनः जन्म घ्यावा लागत नाही, असे त्याचे महत्व आहे. श्रीनाथमहाराज म्हणतात, ''हरी मुखी गाता हरपली चिंता । त्या नाही मागुता जन्म घेणे ।।'' हरिनाम मुखाने घेतल्याने चिंताच नाहिशी होते आणि तो मुक्तच होतो. काही का होईना पण नित्यनेम पाहिजे. नेम थोडासा का होईना पण तो न चुकता घडला पाहिजे. किती नेम करतो यापेक्षा देखील, कोणत्या परिस्थितीत तो चालला आहे, हे जास्त महत्वाचे आहे आमचे श्रीमामा सांगावयाचे, दुपारी बाराची तोफ उडाली की नुसते मोरया म्हणायचे, हा नियम काही फार आहे का? मुळीच नाही. पण वाटेल ते झाले तरी तो चुकता उपयोगाचा नाही. मात्र तोफ ऐकायलाच आली नाही वगैरे चालणार नाही. तोफेकडे लक्ष ठेऊन मोरया म्हटले पाहिजे. त्याचा परिणाम काही वेगळाच होतो. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ''काही नित्य नेमाविण । अन्न खाय तोचि शीण । वाया मनुष्यपण। भार वाही तो वृषभ ।।'' काही

नित्यनेम न करिता अन्न खाणे हा शीण आहे. नित्यनेम करणारा जगात दुर्लभ आहे आणि ज्याने तो साधला तेथेच परमात्मा वास्तव्य करतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''नित्यनेम नामी तो प्राणी दुर्लभ । लक्ष्मीवल्लभ तया जवळी ।।'' नित्यनेमाने नाम घेणारा प्राणी सापडणे कठीण. श्रीचिमडचे महाराज म्हणतात, ''ऐसा सद्गुरू महिमा । जाणुनि भजा नित्य नेमा । आवडीने तारी आम्हा । समर्थस्वामी ।।'' सद्गुरूंचा महिमा जाणून नित्य नेमाने भजन घडले पाहिजे. हे ज्याने साधले तो तरलाच. नित्य काय आहे जाणून, त्याचा नेम साधणे याचे नाव नित्यनेम. याची एकदा गोडी लागली की तेथे काळवेळेचे बंधनच रहात नाही. आम्ही चिमडची मंडळी ज्याला साधन म्हणतो, त्याला इंचगेरी संप्रदायात नेम म्हणतात. नेम हा शब्द ''नित्यनेम प्रातःकाळी । माध्यान्हकाळी सायंकाळी । नामस्मरण सर्वकाळी। करित जावे ।।'' या ओवीवरून रूढ झाला असावा. श्रीसमर्थ म्हणतात, नित्यनेम प्रातःकाळी, माध्यान्हकाळी, सायंकाळी फार काय सर्वकाळीच होत राहिला पाहिजे. त्याचे सामर्थ्यच आगळे आहे. नित्य एक ब्रह्म आहे, बाकी सारे अनित्य आहे. ''नित्यत्वेकं ब्रह्म तद्व्यतिरिक्तं सर्वं अनित्यं ।'' असे श्रुतिवचन आहे. या नित्याचा नेम, नेमाने न चुकता साधणे, हेच खरे विशेष आहे. नेमाची उत्कृष्ठ व्याख्या श्रीतुकाराममहाराज यांनी केली आहे, ''तुका म्हणे नेम प्राणासवे गाठी'' किंवा ''इडा पिंगलेचा त्रिवेणी संगम । तुका म्हणे नेम गुरू घरचा ।।'' प्राणाशी गाठ पडणे हा नेम. असंगाशी संग आणि प्राणाशी गाठ अशी म्हणच आहे. संगात असंगता झाली की असंगाचा संग होतो. देहाचा संग सुटणे हे त्यातील वर्म आहे. काही जिद्द असल्याशिवाय हे घडत नाही. भक्ती ही पणाला लावली पाहिजे. ''तुका म्हणे येथे कराराचे काम। तया आहे राम जवळीच ।।'' श्री येशु ख्रिस्तांच्या कराराप्रमाणेच हा श्रीतुकाराममहाराजांचा करार आहे. कराराने नेम होत राहिला की राम

जवळच आहे. इडा पिंगला एक होऊन सुषुम्ना जागृत झाली की, गुरू घरचा खरा नेम झाला.

आमचे श्रीमामा या अभंगाच्या दुसऱ्या कडव्यात सांगतात, ''नित्याचे नेमाचे असे एक नाम । घेता सरे काम अंतरीचा'' ''रामनाम नित्य है'' असे श्रीतुलसीदास म्हणतात. जे नाम नित्य आहे, तेच नेमात बसविलेले आहे. म्हणून या नित्याचा नेम, तो नित्य नेम. नाम हाच खरा नित्यनेम आहे. ''ज्ञानदेवी यज्ञ याग क्रिया धर्म । हरिवीण नेम नाही दुजा ।।'' श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे दृष्टीने हरि हाच नेम आहे. या अवस्थेत जो कोणी आला, त्याचे अंतःकरणात काही इच्छाच रहात नाही. श्रीतुलसीदास म्हणतात, ''जहाँ राम तहा काम नही । जहाँ काम तहा राम नही ।।'' जेथे राम आहे तेथे काम नाही व जेथे काम आहे, तेथे राम नाही. ''करी काम निष्काम या राघवाचे'' हे श्रीसमर्थ यादृष्टीनेच सांगतात. देवाचे नाम हेच खरे मुख्य काम आहे. जेथे काम म्हणजे इच्छा रहात नाही. ''या राघवाचे काम । करी निष्काम ।'' हे श्रीसमर्थ वचन आहे. तर ''कामामध्ये काम । काही म्हणा राम राम । जाईल भवश्रम । सुख होईल दुःखाचे ।।'' असे तुकोपनिषद सांगते. नाम हे जे मुख्य काम याने ''काम नाही काम नाही । झालो पाही रिकामा ।।'' अशी अवस्था झाली. एका भांड्यात एका वेळेला दोन पदार्थ मावत नाही. एका खुर्चीवर एका वेळेला दोन माणसे बसत नाही. तसेच येथे आहे. भांड्यात पाणी किंवा हवा, काही तरी एक राहील. ''तुका म्हणे देह भरीला विठ्ठले । काम क्रोधे केले घर रीते ।'' यातच नित्यनेमाचे खरे रहस्य आहे.

हे जे नाम आहे, ते आहे तरी कसे, हेही मोठे पाहण्यासारखे आहे. या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात श्रीमामा सांगतात, ''कमी जास्त काही अनित्यता नाही । स्फुरतसे देही अखंडीत'' ज्यात कमी जास्त न होता जे

अखंडत्वाने या देहात अनस्यूत रीतीने स्फुरण पावत आहे, तेच ते नाम आहे. श्रीतुकाराममहाराज यांनी हे नाम जाणून घेतले. ''नाम जाणे तुकया वाणी । दिले संसाराला पाणी ।।'' ही श्रीतुकोक्ती येथे चिंतनीय आहे. श्रीतुकाराममहाराज यांनी हे नाम जाणले आणि संसाराला पाणी दिले. ऊसाला पाणी देणे वेगळे आणि संसाराला पाणी देणे हे वेगळे, हे आपण ओळखले पाहिजे.

हे नाम घेताना कळकळीने घेतले पाहिजे. श्रीरामकृष्ण परमहंसांना एकाने प्रश्न केला, तुम्हीही देवाचे नाव घेता आणि आम्हीही देवाचे नाव घेतो, मग तुम्हालाच का साक्षात्कार होतो व आम्हाला का होत नाही? यावर श्रीरामकृष्ण परमहंस म्हणाले, देवाचे नाव हे कळवळ्याने घेतले पाहिजे. नाम हे सद्गतीत अंतःकरणाने घेतले तरच त्याचा परिणाम होतो. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ''कंठी प्रेम दाटे नयनी नीर लोटे । हृदयी प्रगटे राम रूप ।।'' कंठ दाटून नेत्रातून प्रेमाश्रू जर ओघळू लागले, तर या नित्यनेमात हृदयात रामरूप प्रगट होऊन, आत्मसाक्षात्कार होतो. यादृष्टीने श्रीमामांनी या अभंगाचे शेवटच्या कडव्यात नामाचे एक रहस्य सांगितले आहे. ते म्हणतात, ''गोविंद म्हणे घ्यावे तेचि वेळोवेळा । अंतरी कळवळा धरोनिया ।।'' नाम हे कळवळ्याने पुनः पुनः घेत राहिल्याने, या नित्यनेमाने याच देही साधक जीवन्मुक्त होतो. जन्म मरणाची यातना त्याला रहात नाही.

*****

# ९.

**सर्व तीर्थातीर्थ पवित्रापवित्र ।**
**रामनामे वक्त्र धन्य होय ।।१।।**
**तया रामनामी नसे ज्या आदरू ।**
**पापाचा आगरू होत असे ।।२।।**
**रामनाम घेता हलाहल शमवि ।**
**इतर ते कायी तया पुढे ।।३।।**
**गोविंद म्हणे संसाराची हळहळ ।**
**तेचि हलाहल जीवा नुरे ।।४।।**

सर्व तीर्थांचे तीर्थ आणि पवित्रानेहि पवित्र व्हावे की, ज्यापेक्षा या जगात पवित्र असे काही असे एक रामनामच असून त्याने आपल्या मुखाला धन्यता प्राप्त होते. 'नाम पावन पावन । त्याहुनि पवित्र आहे कोण ।' असे श्रीसमर्थ म्हणतात. नाम हे पतितालाही पावन करणारे असून, जीवाला बंधनातून मुक्त करणारे आहे. 'एकाजनार्दनी पतितपावन नाम । गाता निजधाम जोडे मुक्ती ।' असे श्रीएकनाथमहाराज म्हणतात. 'नामे पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरिले । महापापी तेचि जहाले परमपवित्र ।।' पाषाणासारखे पाषाण ज्या नामाने तरले तेथे असंख्य भक्तांचा उद्धार झाला यात नवल ते काय? महापापी ज्या नामाने पवित्र झाले, ते सर्व पवित्राहून पवित्र आहे, यावर भाष्याची जरुरी नाही. 'नारायण नामे पावन झाला अजामेळ ।' अजामेळासारखा पापी ज्या नामाने तरला म्हणून वाणीही नाममय होणे ही फार महत्वाची गोष्ट आहे. ज्याची वाणी या नामात रंगून गेली आहे, याचा माझा संवाद घडावा अशी प्रार्थना उद्धवचिद्घन करतात. ते म्हणतात, 'ज्याची वाणी रंगली रामनामी ।

त्याचा माझा संवाद घडो स्वामी ।।' म्हणून आमचे श्रीमामांनी या अभंगाचे पहिल्या कडव्यात 'सर्व तीर्थातीर्थ पवित्रापवित्र रामनामे वक्त्र धन्य होय ।' असे म्हणटले आहे. परंतु या अशा नामाबद्दल ज्याचे मनात आदर नाही, तो जीव मूर्तीमंत पापाचे आगरच होऊन रहातो. म्हणून मामा पुढील कडव्यात सांगतात, 'तया रामनामी नसे ज्या आदरू । पापाचा आगरू होत असे ।' ज्याला नामाचा आदर नाही, तो नाम घेतोच कशाला? हे नाम न घेणाराच खरा पापी आहे. 'नामासी विन्मुख तो नर पापिया ।' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज आपले हरिपाठात म्हणतात. तर 'तया रामनामी सदा जो विकल्पी । वदेना कदा जीव तो पापरूपी ।।' असे श्रीसमर्थ सांगतात. या नामाचे महत्व येवढे मोठे आहे. भगवान शंकरांनी प्राशन केलेले हलाहल विषही शमन झाले. मग बाकीचे काय?

'रामनाम घेता हलाहल शमवी । इतर ते कायी तयापुढे ।।' असे या दृष्टीनेच श्रीमामांनी तिसऱ्या कडव्यात म्हटले आहे. श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर यांचे अधिकारी शिष्य श्रीपांडुरंग महाराज ताम्हनकर म्हणतात, प्याला शंकर विष हलाहल । शांत झाला जाऊनी तळमळ ।। नित्य मनी जपा जपा रामनाम । सर्व मंगल कल्याण धाम ।।' 'अगाध महिमा न वचे वदला । नामे बहुत जन उद्धरिला । हलाहला पासोनी सुटला । प्रत्यक्ष चंद्रमौळी ।।' या श्रीसमर्थोक्तीनुसार विचार केला तर नामाचे सामर्थ्य दिसून येईल. देव, दानव वासुकीचा दोर करून मंदाराचल समुद्रात घुसळू लागले. या समुद्रातून काही रत्ने, अमृत निघेल असे त्यांना वाटत होते. पण या समुद्र मंथनाने हलाहल विष निर्माण झाले आणि आताच हे जग नामशेष होणार असे वाटू लागले. म्हणून ते सारे श्रीशंकराकडे येऊन आम्हाला यातून वाचवा म्हणून प्रार्थना करू लागले. शंकराने ते विष प्राशन प्राशन केले, तो साऱ्या अंगाचा दाह होऊ लागला. काही केल्या तो थांबेना. दहिभात खाऊन पाहिला, मस्तकी गंगा धारण केली, चंद्र

ठेवला, 'कंठी शोभे वासुकी हार ।' कंठाला वासुकी गुंडाळला, हत्तीची, वाघाची कातडी लपेटून घेतली, कशानेही गुण नाही. शेवटी त्यांनी रामनामाचा जप केला आणि अंगाचा दाह शांत झाला. देव दानवाना या संकटातून सोडविणाऱ्या शंकराचा दाह या नामाने शांत झाला. विषाची सारी तारांबळ उडाली. 'राम हृत्कमळी गळवेना । राम नाम वदनी पळवेना ।। कालकूट विष ते शिवकंठी । काळ राघव भयास्तव कंठी ।।' अशी स्थिती झाली. हृदयात रामरूप प्रकट झाल्याने त्या विषाला खाली जाता येईना. तोंडातून बाहेर पडावे ती रामनामाची खीळ तेथे बसलेली असल्याने, त्याची तेथूनही सुटका होईना. म्हणून ते कंठातच राहिले व म्हणून शंकरांना नीलकंठ हे नाम प्राप्त झाले. 'नीलकंठ नाम प्रसिद्ध झाले' ही श्रीसमर्थोक्ती येथे चिंतनीय आहे. श्रीसमर्थ म्हणतात, 'जो सिद्धाचाही सिद्ध । ज्ञान वैराग्य प्रसिद्ध । सामर्थ्य सिंधू अगाध । कैलासीचा राणा ।।१।। तोही सिद्ध परि करि साधन । सर्व काळ राम चिंतन । ध्यान धारणा अनुष्ठान। चुको नेदी ।।२।। ऐसे अपार महामती । झाले तरी साधन करिती । तेथे बापुडे किती । मानव किंकर ।।३।।' सर्व संप्रदाया जेथून निर्माण झाले असे सिद्धांचाही सिद्ध भगवान शंकर जेथे मूर्तीमंत ज्ञान वैराग्य प्रखरतेने प्रतीत होत होते, असे सामर्थ्य सिंधू कैलासीचे राजे, पण त्यांनी सर्व काळ रामचिंतन हेच साधन केले. तेथे सामान्य जीवाची कथा काय? ज्या शंकरांनी रामनामाने हलाहल विष पचवले तेथे काय विंचु उतरणार नाही? असे आमचे मामा म्हणावयाचे, अर्थात ते त्यांनीच म्हणावे. नामावर अलोट श्रद्धा. एकदा मामांना विंचू चावला होता. पण त्यांनी नामाशिवाय त्यावर कोणता उपाय केलाच नाही. आश्चर्य असे रामनामानेच त्यांनी विंचू उतरविला. हे सारे बोलावयास सोपे आहे. विशिष्ट अवस्थेत गेल्याशिवाय असे घडत नाही. हेच त्यातील वर्म आहे. 'भवरोगा ऐसे जाय । येर काय क्षुल्लक ।' असे श्रीतुकाराममहाराज या नामासंबंधाने ठासून सांगतात. अरे नामाने भवरोग निवारण होतो, तर फ्लू काय जाणार

नाही का? पण ते नाम कसे घ्यावे लागेल हे अंतरी बिंबले पाहिजे. सर्व दुखण्यावर एकच रामबाण उपाय आहे आणि तो म्हणजे नाम. पण तेवढा जबरदस्त विश्वास पाहिजे. 'अच्युतानंद गोविंद नामोच्चरण भेषजं। नश्यन्ति सकलरोगः । सत्यं सत्यं वदाम्यहं ।' असे धन्वंतरींनी पांडव गीतेत सांगितले आहे. नामाने काय होत नाही, असा प्रश्न आहे. 'काय नोहे केले । एका चिंतीता विठ्ठले ।' असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात. तर 'नामे विषबाधा हरती । नामे चेडे चेटके नासती । नामे होय उत्तम गती । अंतकाळी ।।' असे प्रतिपादन श्रीसमर्थ करतात.

हा सर्व आशय ध्यानात घेता मामांनी या अभंगाचे शेवटच्या कडव्यात नामाने जीवाला कोणता अनुभव प्रत्यक्ष प्रमाणाने घेता येतो ते स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, 'गोविंद म्हणे संसाराची हळहळ । तेची हलाहल जीवा नुरे ।।' जीव मात्राला जी संसारात एकप्रकारची हळहळ आहे की ज्या योगानी त्याचा अस्वस्थपणा, अस्थीरपणा जाता जात नाही आणि जो कितीही सुखाची साधने जरी उपलब्ध असली तरी बेचैनच रहातो. हे जे काही हलाहल आहे ते या नामानेच नाहीसे होते, असे म्हटले आहे. 'गोविंद म्हणे संसाराचि हळहळ । तेची हलाहल जीवा नुरे ।' श्रीसर्थांनी तर या संसाराला शत्रूच म्हटले आहे आणि याला नामोहरम करण्याचे सामर्थ्य फक्त एका नामातच आहे, हे दाखवून दिले आहे. आपण हे तारतम्याने जाणून घेतले पाहिजे. ते म्हणतात, 'महाघोर संसार शत्रू जिणावा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।' सारा संसार चिंतेने ग्रासला आहे. पण चिंतनात जर काळ गेला तर ही चिंता नाहिशी होऊन जीवन निश्चिंत होते हे याचे सार आहे. 'उजळले भाग्य आता । अवघी चिंता वारली ।' हाच खरा जीवनाचा उत्कर्ष आहे.

*****

## १०.

**संतसंगतीने देव पडे ठायी ।**
**तयाचिये पायी लीन व्हावे ।।१।।**
**संगती म्हणजे समगती जाणे ।**
**दाविताती खुणे संतराय ।।२।।**
**समगती माजी हरीचा आठव ।**
**नुरे देहभाव देहामाजी ।।३।।**
**गोविंद म्हणे मन होतसे उन्मन ।**
**रामनाम खूण दर्शनाची ।।४।।**

संतांचे संगतीने देव ठायी अनुभवास येतो असे असल्याने त्यांचे पायी आपण लीन व्हावे असे येथे आमचे श्रीमामांनी सांगितले आहे. श्रीज्ञानेश्वर महाराज हे 'संतांचे संगती मनोमार्गे गती । आकळावा श्रीपती येणे पंथे ।' असेच म्हणतात. तर 'संतांचेनी संगे देव पाठी लागे । सांडू जाता मागे सांडवेना' असे श्रीसमर्थ सांगतात. यादृष्टीने संत संगतीचा आणि देव ठायी पडण्याचा काय संबंध आहे हे पहाणे आवश्यक आहे. एक तर संतांनी देव पाहिलेला आहे. ज्यांनी देवाला पाहिले त्यांना आम्ही पाहिले की देवाला पाहिले असे होते. 'हरी पाहिला रे हरी पाहिला रे । सबाह्य अभ्यंतरी अवघा व्यापक मुरारी।' येथे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी हरी पाहिला आहे असे एकदा नव्हे, दोनदा सांगितले आहे. आपण हरी पाहिला असे संतांशिवाय कोणी सांगत नाहीत. म्हणून संताविना हरीची प्राप्ती नाही हे उघड आहे. 'संताविना प्राप्ती नाही । ऐसी वेद देती

ग्वाही ।' बरे अशी ग्वाही वेदांनी दिली आहे असे श्रीनाथांचे म्हणणे आहे. 'हरी तेथे संत संत तेथे हरी । ऐसे वेद चारी बोलियेले।।' या श्रीनाथांच्या सांगण्याप्रमाणे हरीचे ठिकाणी संत व संतापाशी हरि हे वेदांचे म्हणणे स्पष्ट होते. यापुढे जाऊन, 'देव ते संत देव ते संत । निमित्य त्या प्रतिमा।' हे श्रीतुकोपनिषद लक्षणीय आहे म्हणजे संत हे देवच आहेत. याचा अर्थ संतांचे दर्शन हे देवाचे दर्शनच आहे. ज्यांनी आमचे भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेब कोटणीस महाराज यांना पाहिले, त्यांनी खऱ्या अर्थाने देवालाच पाहिले. आम्ही देव पाहिला नाही असे म्हणणेचे कारणच नाही. बरे, परमात्म्याने कृपा केली तरच संतांची भेट होते, हे तितकेच खरे आहे. 'बहू अवघड आहे संतभेटी । परी या जगजेठी करूणा केली ।।' संतांची भेट कठीण, पण देवाने कृपा केल्याने ती झाली असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात. 'देव पहावया गेलो। तव तो अंगे देवचि झालो ।।' ही श्रीतुकोक्ती येथे विचारात घेणेसारखी आहे. देव पहावा असे वाटते, पण देवाला पहावयाचे म्हणजे काय? हाही येथे प्रश्न आहे. 'देव पहावा देव पहावा । ऐसा मानवांचा केवा ।' 'भिंत येई काकुळती । म्हणे दाखवा मज माती ।' हे श्रीतुकाराममहाराज यांचे म्हणणे जन्मभर विचार करावा, असे आहे. जे देव पहावयास गेले ते देवच झाले, याचा अर्थ जे देव झाले त्यांनीच देव पाहिला असा नव्हे काय? ज्यांनी देव पाहिला आहे तेच देव दाखवू शकतात. आधी संतांनाच पाहिले पाहिजे. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'तैसे हारपले आपण पे पहावे । जे संताते पहाता गिवसावे । म्हणोनी वानावे ऐकावे । तेचि सदा ।।' आपले स्वरूप जो ईश्वर त्याचा साक्षात्कार संतांना पाहिल्यानेच

होतो. म्हणून आमचे श्रीमामांनी 'संत संगतीने देव पडे ठायी ।' असे म्हटले आहे. हा जो साक्षात्कार होतो तो ठायी होतो. हा ठाय कोणता! हा विषय येथे महत्वाचा आहे. ज्या ठिकाणी बसले असता चित्त हे एकचित्त होते, तो ठायच महत्वाचा. ''ठायीच बैसोनी करा एकचित्त ।'' हे जे श्रीतुकाराममहाराज म्हणतात ते याच दृष्टीने म्हणतात. किंवा ''असाल तेथे करा नामाचे चिंतन ।'' हे श्रीसेनामहाराज यांचे विचार येथे चिंतनीय आहेत. आपण जे कोणी आपले असणेपणाने आहोत, ते असणेपण जाणून तेथे म्हणजे असाल तेथे हा अभिप्राय तेथे अभिप्रेत आहे.''कापुराची वाती । उजळली ज्योती । ठायीच समाप्ती । झाली जैसे।।'' हा श्रीहरीपाठातील चरण ध्यानात घेणे सारखा आहे. हा ठाय देहाचे निरसनाने प्राप्त होतो. तेथेच संतसंगतीने देवाचा साक्षात्कार होतो. म्हणून ''देहाच्या निरसने पाविजे त्या ठाया ।' असे श्रीतुकोबा म्हणतात. संतांच्या पायाशी आपण लीन झालो तर हे सारे घडणारे आहे. म्हणून श्रीमामांनी पहिल्या कडव्यातील उत्तरार्धात ''तयांचीये पायी लीन व्हावे'' असे म्हटले आहे. ''तेचि संत तेचि संत । ज्यांचा हेत विठ्ठली ।।'' विठ्ठलाशिवाय ज्यांचे आत दुसरा हेतूच नाही ते संत अशी श्रीनिळोबारायांनी उत्कृष्ट व्याख्या केली आहे. आता यांची संगत म्हणजे काय? हा प्रश्नही येथे महत्वाचा आहे. ज्या आत्मसाक्षात्कारात विषयाची संगत संतांनी लावून दिली, त्या विषयाची काय संगती आहे ही जर आपले ध्यानी आली तर ती संत संगती झाली. मग ''संगतीने होतो पंगतीचा लाभ'' ही तुकोक्ती उघडच आहे. संत बसले की आम्ही बसलो, ते उठले की आम्ही उठलो, ते आत की आम्ही आत, ते बाहेर की आम्ही बाहेर, ही संगती नव्हे.

तर खरी संगती काय हे स्पष्ट करणेचे दृष्टीने श्रीमामांनी या अभंगाच्या दुसऱ्या कडव्यात दाखवून दिले आहे. ते म्हणतात, ''संगती म्हणजे समगती जाणे । दाविताती खुणे संतराय ।।'' जीवनाची समगती जी आपल्या अंतर्खुणेने संतांनी दाखवून दिली तीच खरी संत संगती आहे. ''अंतरनिष्ठाचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती ।।'' हे समर्थ वचन येथे चिंतनीय आहे. ही जी जीवनाची समगती आहे, त्यामध्ये भगवंताचा आठव होणे हे सर्वात महत्वाचे आहे. ''आठव तो ब्रह्म । नाठव तो भवभ्रम।।'' हा श्रीतुकाराममहाराज यांचा विचार श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर वारंवार म्हणून दाखवीत, इतका तो महत्वाचा आहे. म्हणून आमचे मामा या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात म्हणतात,''समगती माझी हरीचा आठव । नुरे देहभाव देहामाजी ।।'' या समगतीत हरीचा आठव होऊ लागला की तेथे देहभावच रहात नाही. ''देहभाव जेथे विरे । ऐसे साधन दिले पुरे । बापरखुमादेवीवरे । विठ्ठलु रे ।।'' या श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे वचनावरून येथे काय म्हणावयाचे आहे ते स्पष्ट होईल. देहभाव नाहीसा व्हावा असेच हे साधन आहे. मग या अवस्थेत आनंदाला काय तोटा आहे! श्रीकेशवस्वामी म्हणतात, ''आठवी आठव आटला तेथे लागला तुझा छंद । सबाह्य संतोष दाटला जोडिला परमानंद ।।'' परमात्म्याचे आठवात देहाचा आठव न राहिल्याने अंतर्बाह्य संतोषच झाल्याने, परमानंदाची जोड झाली. यास्थितीत गेल्यावर मनाचे मनपणच रहात नाही आणि तेथेच देवाचा साक्षात्कार होतो.

म्हणून श्रीमामांनी या अभंगाचे चौथ्या कडव्यात सांगून ठेवले आहे, ''गोविंद म्हणे मन होतसे उन्मन ।'' येथे मनाचे उन्मन होते.

‘‘रामकृष्ण नामी उन्मनी साधिली’’  रामकृष्ण ही जीवनाची गती असून तेथे उन्मनी अवस्थाच, केवळ तादात्म्य झाल्याने प्राप्त झाली. यामुळे ‘‘तयासी लाधली सकलसिद्धी ।’’ असे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी म्हटले आहे.  या साधकाला येथे आता काही मिळवायचे असे राहिलेच नाही. जीवमात्राचे उद्दिष्ट जे देव-दर्शन, तेच संतगतीने जीवनाची समगती साधून, त्यात हरीचा आठव झाल्याने व देहभावातीत तो जीव झाल्याने मनाला प्राप्त होणाऱ्या उन्मनी अवस्थेत, देवाचे दर्शन झाले. ‘‘उन्मनीच्या सुखा आत । पांडुरंग भेटी देत ।।’’ असे श्रीसेनामहाराज म्हणतात. अर्थात देवाचे दर्शन झाल्यावर त्या जीवनात नामाशिवाय दुसरे काही रहातच नाही. हे या दर्शनाचे खरेखुरे वैशिष्ट्य आहे. अखंड नाममयच तो जीव होतो. म्हणून या अभंगाचे शेवटच्या कडव्याच्या उत्तरार्धात श्रीमामा म्हणतात, ‘‘रामनाम खूण दर्शनाची ।’’ ‘‘नामी रूप ते बिंबले । सर्ववृत्ती मौनावले ।।’’ या श्रीतुकाराममहाराज यांचे वचनाचा जर विचार केला तर सर्व वृत्तीचे मौन होऊन, नामातच रुपाचा साक्षात्कार होतो व तेथे पुनः नामच रहाते हा विषय स्पष्ट होतो.

✽✽✽✽✽

## ११.

**रामनाम हे तो एकतत्वी कळा ।**
**सर्वतत्वे विकळा तयाविण ।।१।।**
**एकतत्वी कळा शोधोनी पाहता ।**
**तिन्हीची ऐक्यता दिसो येई ।।२।।**
**इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता ।**
**रामनाम हाता येत असे ।।३।।**
**गोविंद म्हणे सर्व नामामाजी वसे ।**
**सकळा श्रेष्ठ कसे नव्हे सांगा ।।४।।**

रामनाम ही एकतत्त्वी कळा असून त्याशिवाय सर्व तत्त्वे विकळाच आहेत. त्या अभावी या सर्व तत्त्वांचा मग काही उपयोगच नाही. ''चौदा विद्या चौसष्ठ कला । जरी का प्राप्त झाल्या सकळा । एक नसता नामकळा । सर्वही विकळा जाणाव्या '' या संतोक्तीप्रमाणे चौदा विद्या चौसष्ठ कला हस्तगत झाल्या तरी नामकळेवाचून त्या सर्व विकळाच आहेत. इडा आणि पिंगला जर सुषुम्नाकार झाल्या, तरच सतरावी जीवनकला प्रगट होते. मग अमृतस्त्राव होऊ लागतो. योग्याने योगीक प्रक्रियेने अभ्यास करून ही कला आत्मसात केली काय किंवा भक्ताने नामसाधनाने या नामामृताची गोडी चाखली काय, त्यात फरक आहे तो शब्दांचा. नामानेही काही काळाने निसर्गतः हेच तत्त्व साधले जाते. फक्त त्या जीवाला, जिभेला येणारा गोडवा कोणत्या कारणाने आला हे समजून

येत नाही, एवढेच. समजून पेढा खाल्ला काय किंवा डोळे मिळून खाल्ला काय, पोट हे भरणारच. समजून निखाऱ्यावर पाय दिला काय? अगर नकळता पाय निखाऱ्यावर पडला काय?, चटका हा बसणारच. तसेच येथेही आहे. यादृष्टीने श्रीज्ञानेश्वरमहाराज आपले हरीपाठात म्हणतात, ''नामामृत गोडी वैष्णवा लाधली । योगीया साधली जीवनकळा।।'' ज्या कळेने जीवनाचा प्रवाह सतत चालू रहातो, तेथे तादात्म्य झाल्यावर जीवाला आत्मसाक्षात्कार होतो. तीच जीवनकला आहे. ईडा-पिंगला या दोन्ही सतत शरीरात वहात असतात. तिकडे लक्ष नसलेने जीव हा बहिर्मुख होतो. त्या वहात असलेने आपण जिवंत राहू शकतो. पण ती दृष्टी नसलेने व पाच तत्त्वांची खेच पाच तत्त्वांकडेच नैसर्गिक असलेने, जीव हा आत काय आहे हे पहाणेस उत्सुक रहात नाही. आपण जिवंत आहोत, त्याचा उपयोग देहसुखाकडे करणेसच तो प्रवृत्त होतो. आत्मविचार जागृत होत नाही. उंबऱ्यावरचा दिवा आत आणि बाहेर प्रकाश पाडतो, पण काय पहायचे आहे हे शेवटी ठरविणार कोण? हा प्रश्न रहातो. जे पहावे तेच दिसते, तेच तो पहात असतो. या एका ईश्वरी सत्तेने डोळा उघडला की त्याला दृश्य दिसूच लागते. यामुळे अंतरीचा विचार करणेचा तेथे प्रश्नच येत नाही. ज्यावेळी बाह्यसुख हे काय स्वरूपाचे आहे ते सापेक्ष आहे, काहीकाळ आहे, त्याबरोबर दुःखही घ्यावेच लागते. तांदुळाबरोबर खडे येणारच आणि ते तर नको आहेत, याचा निश्चय होतो, त्यावेळी कोणा संतांची गाठ पडली तरच आत काय आहे हे पहाण्याची प्रवृत्ती निर्माण होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''ईडा पिंगलेचा ओघ सैरा दिसे । त्यावरी प्रकाशे आत्मतेज ।।'' या उक्तीवरून येथे काय म्हणायचे आहे ते

स्पष्ट होईल. जीवनात उसळणारे  नाद ब्रह्म हेच नाम असून, ते एक श्रेष्ठ तत्त्व आहे. हे सर्व संतांनी साधले आहे. ''एकतत्त्वी नाम साधिती साधन । द्वैताचे बंधन न बाधी जे ।।'' 'एक नाम हरी द्वैत नाम दूरी ।' 'एक तत्त्व नाम दृढ धरी मना ।।' हे ज्ञानेश्वरमहाराज यांचे हरिपाठातील चरण इतके बोलके आहेत की त्यावर कोणाचे भाष्याची जरुरीच नाही. जीवनकळा ही अमृतमय, नादप्रकाशमय आहे. अर्थात हा अभ्यासाने येणाऱ्या अनुभूतीचा विषय आहे. श्रीनिळोबाराय म्हणतात, ''काळा ना सावळा ढवळा ना पिवळा। जीवीच्या जीवनकळा प्रकाशितु ।।'' या चैतन्याने जीवनातील जीवनकला प्रकाशित केली आहे. या कलेनेच जीवाला खरे आत्मज्ञान होते. 'कळे आकळे रुप ते ज्ञान होता । जेथे आटली सर्वसाक्षी अवस्था । मना उन्मनी शुद्ध कुंठीत राहे । तो गे तोचि तो राम सर्वत्र पाहे ।।' हा श्रीसमर्थांचा श्लोक येथे चिंतनीय आहे. तत्त्पदाचे ज्ञान झाले तर त्या कळेने त्या चैतन्यरूपाचे ज्ञान होते. सूर्यप्रकाशाने सूर्यदर्शन होते म्हटल्यापैकीच आहे. चित्सूर्य हा वेगळा आणि बाहेर दृगोचर होणारा सूर्य हा वेगळा. सर्व विषय ध्यानी घेता आमचे श्रीमामांनी या अभंगात पहिल्या कडव्यात, ''रामनाम हे तो एक तत्वी कळा । सर्व तत्वे विकळा तयावीण ।।'' हे कोणत्या दृष्टीने म्हटले आहे याची कल्पना येईल.  श्रीबांदकरमहाराज यांचे उक्तीप्रमाणे, 'रामनाम ध्वनी उमटे ।' हा चरण महत्वाचा आहे.  या एकतत्वी कळेचा जर शोध घेतला तर त्यात तिनींची ऐक्यता आहे असे दिसून येते.

म्हणून श्रीमामांनी या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात म्हटले आहे,

''एकतत्वी कळा शोधूनी पहाता । तिन्हीची ऐक्यता दिसो येई ।।'' या तिन्हीचे ऐक्य म्हणजे काय हे लगेच पुढे सांगितले आहे. तिसऱ्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, ''इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता । रामनाम हाता येत असे ।।'' इडा आणि पिंगला सुषुम्नाकार झाल्या की नामाचा ध्वनी होऊ लागतो. हा बीजमंत्र आहे. म्हणून हे सबीज नाम आहे. ''रामनाम बीजमंत्र । स्वामी जपे अहोरात्र ।।'' असे स्वामी स्वरूपानंद आपल्या एका अभंगात म्हणतात. यावरून याचे महत्व दिसून येईल. सोऽहंच्या अनुसंधानाने साधक या अवस्थेत येतो. ही जी कला आहे ती सहजसिद्ध आहे. जीवाचे तादात्म्य जर येथे झाले तर वृत्ती ही अखंड सुखाने समृद्ध होते. या साधनेत मग दिवस आहे की रात्र आहे याचेही भान रहात नाही. आपण पृथ्वीवर आहोत म्हणून दिवस रात्र, पण सूर्यलोकाला गेल्यावर तेथे अखंड प्रकाश आहे. तेथे दिवस रात्र हे शब्द इतिहास जमा होतात. ''दिवस ना राती । प्रकाश ना ज्योती । तेथे निजवस्ती केली मने । बहिणी म्हणे सोऽहं हंस या सकट । करूनी ठेला घोट एकसरा ।।'' हे श्रीबहिणाबाईंचे उद्गार मोठे चिंतनीय आहेत. ''नवल प्रकाश प्रकाशा वेगळा । झाकिलीया डोळा पुढा दिसे ।।'' हे जे निळोबाराय सांगतात त्याचे हे प्रत्यंतर आहे. हा प्रकाश आहे, आणि हा अंधार आहे, हे कोणत्या प्रकाशाने कळते? असा प्रश्न आहे. हा जो प्रकाश आहे, त्याला आत्मप्रकाश म्हणतात. तो चंद्र, सूर्य, अग्नि यापेक्षा वेगळा आहे. डोळा झाकल्यावर तो अनुभवास येतो. ''सूर्यप्रकाशक सहस्ररश्मी ।'' सहस्रदळी असणाऱ्या सूर्यकलेला प्रकाश देणारा आत्माराम सर्वांघटी, देहोदेही एक आहे. आत्मप्रकाश शरीरात असेल तर ज्याचे डोळे धड आहेत त्याला सूर्यप्रकाशाने सूर्यदर्शन होते. आंधळा मला काही दिसत नाही म्हणतो. हे ज्ञान ज्याने व्हावे हा

प्रकाशच वेगळा आहे. त्या प्रकाशाने माणसाला ज्ञान होते. ''ऐसे ज्ञान प्रकाशे पाहेल । तै मोहांधकाल जाईल । जे गुरूकृपा होईल । पार्था गा ।।'' ही ज्ञानेशोक्ती येथे महत्वाची आहे. येथे ज्ञान काय करील ? ''अखंड वृत्ती कोंदली सुखे दाटली नयन पाती। सहज कळा लाधली तेथे हरपली दिनराती ।।'' असे केशवस्वामी यादृष्टीनेच म्हणतात. ज्या बीजातून वृक्ष फोफावतो ते बीज काय किंमतीचे असेल याचा विचार करावा तेवढा थोडाच आहे. बाजीरावाचे सैन्याचा तळ एका वटवृक्षाखाली पडला होता असे ऐकिवात आहे. हा वृक्ष ज्यातून निघाला त्या बीजात काय शक्ती असेल असा प्रश्न आहे.

म्हणून या अभंगाचे चौथ्या कडव्यात आमचे श्रीमामांनी म्हटले आहे, ''गोविंद म्हणे सर्व नामामाजी वसे। सकळा श्रेष्ठ कसे नव्हे सांगा ।।'' सर्व हा शब्द ब्रह्माला आहे. ''सर्वं खल्विदं ब्रह्म।'' असे श्रुती वचन आहे. मग हे ब्रह्म ज्या नामात साठले आहे, त्याची बरोबरी या जगात कोण करू शकेल बरे? यादृष्टीने नामच सर्वश्रेष्ठ आहे. यात तिळमात्र शंका रहात नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड । गगनाहोनी वाड नाम आहे ।।''

*****

## १२.

**रामनाम योगे सावध जो झाला ।**
**कळिकाळ त्याला वंदितसे ।।१।।**
**सहा जिंकोनिया होणे निर्विकार ।**
**सावध प्रकार ऐसा असे ।।२।।**
**काळवेळ नामस्मरणासी नाही ।**
**सदा सर्वदाही उच्चारावे ।।३।।**
**गोविंद म्हणे वृत्ती उठता बैसता ।**
**रामनाम चित्ता धरूनी राही ।।४।।**

आपले आयुष्य म्हणजे काही गंमत नव्हे. हे पुनःपुन्हा मिळणारे नाही. ही एक आत्मसाक्षात्काराची संधी आहे. हे चार दिवसाचे नाटक नव्हे. सर्व नाटके करता येतात, पण आयुष्याचे आणि पैशाचे नाटक करता येत नाही. आयुष्य हे दुर्मिळ आहे. ते प्रयोगावारी घालवून चालणार नाही. एका बाजूने इतकी नाकेबंदी आहे की, तेथे मुंगीलाही प्रवेश नाही. उलटपक्षी एकाबाजूला एवढे खिंडार पडले आहे की अंबारीसकट हत्ती येतो आहे आणि जातो आहे, तरी मालकाला पत्ता नाही. जेथे प्राणीमात्र दक्ष रहावयास पाहिजे तेथे तो आराम आहे आणि जेथे आराम पाहिजे तेथे तो फारच दक्ष आहे. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ''जन्मा येऊनी काय केले । तुवा मुद्दल गमाविले ।।१।। केली गाठोडीची नासी । पुढे भिकची मागसी ।।२।। का रे न फिरसी माघारा । अजुनी तरी फजितखोरा ।।३।। अजुनी तरी होई जागा । तुका म्हणे पुढे दगा।।४।।'' श्रीकबीरांनी म्हटल्याप्रमाणे ''आया मुद्दलमें तोटा'' अशीच जीवाची स्थिती आहे. सारा आतबट्ट्यातला व्यापार आहे. कोठे तोंड दाखविणेस जागाच नाही. परमात्म्याने जन्माला येताना असे काही देऊन ठेवले आहे की

त्या भांडवलावर मिळवावे तेवढे थोडे आहे. ‘‘अमोलिक रत्न जोडले रे तुज । का रे ब्रह्मनीज नोळखसी ।।’’ असे श्रीज्ञानेश्वरमहाराज याच दृष्टीने म्हणतात. श्रीतुकाराममहाराज यांनी रोखठोक सवाल या जीवापुढे टाकला आहे. ते म्हणतात, ‘‘आणियेली वस्तु कोठे ठेवियेली । आहे की जवळी नाही सांगा।।’’ गंमत अशी आहे की, देवाने जे काही दिले आहे, तेथे हा जीव गाफीलच आहे. त्यामुळे तो त्यातच हकनाक बुडतो आहे. पण त्याची कल्पना त्यास येत नाही. मुलगा घरातून भांडून जावा. बरे, बाबा कोठेही सुखी रहा म्हणून आई वडिलांनी त्यास घासातला घास द्यावा, त्यात त्याने काही वाढ केली तर त्याला घरी यावयास तोंड आहे. नाहीतर तो आणि त्याचे नशीब, अशीच त्याची गत आहे. तीच अवस्था येथे आहे. जीव हवा खावयास जो बाहेर पडला त्यास आपले घराची शुद्धच राहिली नाही. दगडही तिकडेच आणि गोफणही तिकडेच अशी अवस्था झाली. तो हवाच खात राहिला, पण ही हवा आपण कशामुळे घेऊ शकतो हे त्याचे गावीही राहिले नाही. जी हवा आपण घेतो ती घेत असताना आत घेणारा राजी असावा लागतो. त्याने जर आत नाक मोडले तर या बाहेरच्या हवेचा काही उपयोगच नाही. आपले आयुष्य ज्या श्वासावर मोजले जाते, त्याची किंमत करता येईल काय? असा येथे प्रश्न आहे. पण ही देणगी ज्या परमेश्वराने दिली, त्याची आठवण तरी कोठे होते? ही तर खरी मजा आहे. श्रीतुलसीदासजी म्हणतात, ‘‘तीन भुवन और चौदा लोक एक श्वास का मोल । तुलसी कहे राम भजन बिन वृथा श्वास मत खोल ।। श्वासो लेवे नाम बिना सो जीवन धिक्कार । श्वास श्वासमो रामजप ओही धारणा धार ।।’’ श्रीतुलसीदासजी म्हणतात, तीन भुवने आणि चौदा लोक इतकी एका श्वासाची किंमत करता येईल. इतका तो श्वास मोलाचा आहे आणि न जाणो इतके जरी एका श्वासाच्या मोबदल्यात दिले तरी पुनः गेलेला श्वास परत मिळत नाही. म्हणून राम भजनाविना एकही श्वास फुकट जाता उपयोगाचा नाही. नामाविना श्वास जात असेल तर त्या जीवनाला म्हणजे जगण्याला धिक्कार असो. नाम आहे म्हणून श्वास आहे

कारण नाम हे श्वासातच आहे. ही संतांची अनुभूती आहे आणि श्वास आहे म्हणून आपले आयुष्य आहे. आयुष्यभर नाम घेणे हेच खरे महत्वाचे आहे. म्हणून संतांनी हे आयुष्य साधनीभूत केले. आयुष्यभर साधन करणे आणि आयुष्यच साधनीभूत करणे यात फारच अंतर आहे. ''आयुष्याच्या या साधने। सत्‌चिदानंद पदवी घेणे।'' असे श्रीतुकाराममहाराज याच दृष्टीने म्हणतात, आणि ''सीताराम कहोजी मनमो । जब लग श्वास चला तनमो ।।'' असे श्रीकबीरसाहेब सांगतात. मग त्या जीवाला सत्‌चिदानंद पदवी प्राप्त होते. तो नराचा नारायण होतो. ''जयाचे पिसाट शब्द । सुखे म्हणो येती वेद । तरी मग सदेह सच्चिदानंद । का नोहावेते ।।'' ही ज्ञानेश्वरमहाराज यांची उत्कृष्ट अशी ओवी जन्मभर चिंतन करावी इतकी महत्वाची आहे. आयुष्य काय कसेही निघून जाईल. पण ते कसे घालवायचे! जीवमात्राने गाफील न होता सावधपणे रहाणे हे महत्वाचे आहे. 'गाफल मत रहना बेटा । शिखर गगन है खोटा ।' असे श्रीकबीर यासाठीच बजावित आहेत. कोठे सावध व्हावयास पाहिजे ते नेमके श्रीतुकाराममहाराज स्पष्ट करतात. ते म्हणतात, ''नाशीवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ।।'' या देहाला काळ कोठेच धक्का लावत नाही. त्यातील आयुष्याचा तो ग्रास करत असतो. म्हणून येथे सावधता जरूर आहे. ऊसातील चोथा चोथा टाकून रस घेणेपैकीच येथे काळ करतो. '' परिमळ गेलीया वोस फूल दिठी । आयुष्या शेवटी देह तैसा ।।'' हे संतवचन येथे चिंतनीय आहे. फुलातील सुगंध गेल्यावर त्या फुलाची किंमत काय? सुगंधानेच त्या फुलाची किंमत होते. तो गंध हा त्या फुलातील आत्मा आहे. त्याप्रमाणे आयुष्य गेल्यावर देह ओसच झाला. आत्म्याचे महत्व जाणून आत्मानुभूती घेणे हे खरे. यादृष्टीने श्रीमामा या अभंगात प्रथम सांगतात, ''रामनाम योगे सावध जो झाला । कळीकाळ त्याला वंदितसे ।।'' रामनामाचे योगाने जे सावध झाले, तेथे कळीकाळ लोटांगण घालतो. ''काळ गुलाम सलाम करी । तुकया घरी राबतो ।।'' अशी अवस्था येथे होते. कारण आहे, काळ उगीचच बरा गुलाम होईल? या नामाने त्या महात्म्याने काळाचे खरे सार्थक केले आहे. हे उघड आहे. ''काळ सार्थक केला त्यांनी । धरिला मनी

विठ्ठल ।।'' हा निळोबारायांचा अभिप्राय येथे बोलका आहे.

अभंगाचे दुसऱ्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, ''सहा जिंकोनिया होणे निर्विकार । सावध प्रकार ऐसा असे ।।'' ज्याने सहांचा वध केला, तोच खरा सावध झाला. ज्याने सावध होऊन काळाचे सार्थक केले, त्याला परमानंदाला काय तोटा. ''एक दोन तीन चार पाच आणि सहा । इतुकियांचा विचार करूनी परमानंदी रहा।।'' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात. हे षडविकारच आपले खरे वैरी आहेत. ''तरी हे काम क्रोधु पाही । जयाने कृपेची साठवण नाही ।। हे कृतांताचे ठायी । मानिजेसी ।।'' असे तर श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी म्हटले आहे. हे नाहीसे व्हावयास पाहिजेत. ''आधि याने जिणावे । मग ते ज्ञान पावावे । तव पराभवो न संभवे। रागद्वेषा ।।'' म्हणून यांना मोकळा अवसरच द्यावयाचा नाही. यांना जर अवसरच मिळाला नाही, तर ते हतबल होतात. ''ऐसा जो कामक्रोध लोभा । झाडी करूनी ठाके उभा । तोचि एवढिया लाभा । गोसावी होय ।।'' या श्रीज्ञानेशांच्या उक्तीप्रमाणे तो जीव या गोनाम इंद्रियांचा स्वामी, गोसावी होतो. म्हणून तिसऱ्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, ''काळवेळ नाम स्मरणासी नाही । सदा सर्वदाही उच्चारावे ।।'' नामाला काळवेळेचे बंधन नाही. ते केंव्हाही घ्यावे, म्हणजे केव्हाही वाटले घ्यावे, न वाटले न घ्यावे, असे नसून, दिक्कालातीत ते नाम असल्याने ''काळवेळ नाम स्मरणासी नाही'' म्हणजे काय हे सांगताना ''सदा सर्वदाही उच्चारावे'' असेच मामांनी येथे सांगितले आहे. केवळ नामावरच मामांचा किती भर होता हे यावरून दिसून येईल. नामाशिवाय त्यांनी आयुष्यात काही केलेच नाही. म्हणून त्यांचा हा अभिप्राय येथे महत्वाचा आहे. अर्थात हे कसे साधता येईल हेच अभंगाचे चौथ्या कडव्यात मोठ्या युक्तिने सांगितले आहे. ते म्हणतात,''गोविंद म्हणे वृत्ती उठता बैसता । रामनाम चित्ता धरूनी राही ।।'' ''बोलता चालता, देखता ऐकता । न ढळे सर्वथा तेचि साधी ।।'' असे एक या नामसाधनेतील वर्म श्रीमुक्ताबाईंनी श्रीचांगदेवांना सांगून ठेवले आहे. यावरून येथे काय म्हणावयाचे आहे ते स्पष्ट होईल असे वाटते.

*****

## १३.

**तपाचे जे तप रामनाम देख ।**
**उच्चारिता हरिख ब्रह्मादिका ।।१।।**
**तप म्हणजे काय प्रकाशित होणे ।**
**अंधार दवडणे बुद्धीतील ।।२।।**
**प्रकाशित होता अंतरिची ज्योती ।**
**जडेल आसक्ती रामनामी ।।३।।**
**गोविंद म्हणे अज्ञान उरेल कशाला ।**
**पेटता मशाला देवाजीची ।।४।।**

अध्यात्मशास्त्राला मुख्य काही असेल तर ती ब्रह्म जिज्ञासा आहे. म्हणून 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' असे श्रुतीने म्हटले आहे. हे ब्रह्म जर जाणून घ्यावयाचे झाले तर हेच खरे ब्रह्माचे स्वरूप आहे. 'तपोब्रह्मेति' या वचनावरून हे स्पष्ट होते. आमचे भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज हे मूर्तीमंत तपच अवतीर्ण झालेने ते प्रत्यक्ष ब्रह्म श्रीनिंबरगी क्षेत्री वावरत होते. ज्यांना त्यांचे दर्शन झाले त्यांना देवाचेच दर्शन झाले यात संशय नाही. ते खरे भाग्यवान. दासरामाने त्यांचेवरून केलेल्या आरतीत म्हटले आहे. 'आरती नारायणा । धन्य जगज्जिवना । सगुण ब्रह्ममूर्ती । काय तपो निधाना ।।ध्रु.।।' अर्थात हे ब्रह्म जाणून घ्यावयाचे झाले तर त्याला तपाची जरुरी आहे. म्हणून 'तपस्तत्वा तद्ब्रह्म विजिज्ञासस्व' असे श्रुतीने दाखवून दिले आहे. तपाच्या योगाने ते ब्रह्म तू जाण. असे म्हटले आहे. या तपासंबंधी जर विचार केला तर बारा वर्षे कोणतीही गोष्ट नियमाने

केली तर त्याला तप ही संज्ञा आहे आणि त्यात काही सामर्थ्यही निर्माण होते. यात प्रश्नच नाही. बारा वर्षे मौन धरले तर त्याला वाचासिद्धी प्राप्त होते. बारा वर्षे डोळे मिटून धरले तर त्याने पाहताच मेलेला प्राणी जीवंत व्हावा किंवा जीवंत असेल तर तो जळून भस्म व्हावा येवढी शक्ती येते. गांधारीने डोळ्यावर पट्टी बांधली होती. तिचे दृष्टीत मोठी शक्ती निर्माण झाली. दुर्योधनास अमर होण्याचा उपाय धर्मराजांनी सांगितला. दुर्योधन जर विवस्त्र स्थितीत गांधारीपुढे गेला असता तर तो अमरच झाला असता. भगवंतांनी त्यात युक्ती केली, त्यामुळे ते घडले नाही, हे निराळे. कौशिकऋषीं तपश्चर्येला बसले होते. अंगावर विष्ठा पडली म्हणून त्यांनी वर रागाने बघितले, तो ज्या बगळीची विष्ठा पडली होती, ती बगळी जळून खाक झाली. हा इतिहास सर्वांना माहित आहेच. परंतु आत्मसाक्षात्काराचे दृष्टीने या तपांचा तादृश उपयोग होत नाही. आपल्या कल्पना मात्र या प्रकारच्या असतात. शेखमहंमद म्हणून एक मोठे सत्पुरुष होऊन गेले. त्यांनी देवाचे दर्शन कसे होईल म्हणून आपले आईला प्रश्न केला. तपावाचून देव भेटत नाही, असे आईने सांगितले. मग ते जंगलात गेले व बारा वर्षे झाडाचा पालाच खाऊन राहिले. पण देव भेटला नाही. मग ते आईकडे आले व म्हणाले मी तप केले पण मला देव भेटला नाही. आईने विचारले तप म्हणजे काय केलेस? बारा वर्षे फक्त झाडाचा पाला ओरबडून खाल्ला आणि देवासाठी तप केले, पण तो भेटला नाही. शेखमहंमद यांचे केस खूपच वाढले होते. ते आईने ओढताच ते ओरडले. आई म्हणाली, तुला आता जसा त्रास झाला तसाच त्या झाडांनाही झाला. जो तुझ्यात आत्मा आहे तोच झाडात आहे. मग आत्म्याला त्रास देऊन तो कसा भेटेल? भगवंताचे नाम हेच खरे तप आहे. मग पुढे त्यांनी नामसाधना

केली आणि त्यांना ईश्वराचा साक्षात्कार झाला. ते आपल्या एका अभंगात म्हणतात, 'शेख महंमद अविंध । परी हृदयी गोविंद ।।' या योग्यतेला ते गेले. तात्पर्य काय? सर्व तपात नामतप हेच श्रेष्ठ आहे. भगवंताचे ज्ञान होणे जरुर आहे. 'ज्ञानं प्रधानं तपः' असे म्हटले आहे. ''हेचि भक्ती हेचि ज्ञान । एक विठ्ठलाची जाण ।।'' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज यादृष्टीनेच म्हणतात. ज्ञान झाले तर अहंकार रहात नाही. 'अहंतागुणे सर्वही दुःख होते । मुखे बोलिले ज्ञान ते व्यर्थ जाते । सुखी राहता सर्वही सुख आहे। अहंता तुझी तुचि शोधोनि पाहे ।।' हा श्रीसमर्थांचा श्लोक येथे विचारात घेणे सारखा आहे. 'अहंभाव गेला । तुका म्हणे देव झाला ।।' हेच खरे आहे. 'योग तप याचि नावे । गलित व्हावे अभिमान ।' असे श्रीतुकोपनिषद सांगते. अहंकाराची निवृत्ती म्हणजेच योग किंवा तप. नामाने अहंकार जातो म्हणून नाम हेच खरे तप आहे. यादृष्टीने आमचे श्रीमामा या अभंगात म्हणतात, ''तपाचे ते तप रामनाम देख । उच्चारिता हरिख ब्रह्मादिका।'' यामुळे इतर तपांची जरूरीच नाही. 'कासया करावे तपाचे डोंगर । आणिक अपार दुःखराशी।' असेच श्रीतुकाराममहाराजांनी म्हटले आहे. तर 'अखंडित ध्यानी । पांडुरंग जपा मनी ।।', 'पांडुरंग महाजप । हेचि माझे महातप ।' असे श्रीजनाबाईंनी सांगितले आहे. पांडुरंगाचा नामजप हेच श्रीजनाबाईंचे तप आहे. हे जर साधले तर ब्रह्मादिकांना आनंद होतो. 'घेऊनी पूजेचा संभार । ब्रह्मा येतसे सादर ।' असे श्रीनामदेवमहाराज यांनी याचे महत्व सांगितले आहे. तर 'ब्रह्मा विष्णू रुद्र येताती सामोरे । नामधारक निर्धारे तया वंद्य ।। त्रिभुवना परता नामाचा महिमा । जाणे शंकर उमा सत्य सत्य ।।' असे श्रीनाथमहाराजांनी स्वानुभूतीचे उद्गार काढले आहेत. नामाने तप होते व तपातूनच नाम प्रकट होते. असा हा अन्योन्य संबंध आहे. 'अनंता जन्माचे तप एक

नाम।' अनंताचा जन्म म्हणजे साक्षात्कार झाला की तप, म्हणजेच जो प्रकाश आहे तेच नाम. व्यापाराचे भांडवल म्हणजे पैसा आणि होणारा नफा म्हणजे पैसा. तसेच येथे आहे. नामाने नाम वाढतच जाते. नामाने नामाचा, दिव्यनामाचा साक्षात्कार होतो. तप म्हणजे एक प्रकाश आहे. प्रकाशरूपाने नाम प्रकट होते.

म्हणून अभंगाचे दुसऱ्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, ''तप म्हणजे काय प्रकाशित होणे । अंधार दवडणे बुद्धीतील।।'' आम्ही सिटी हायस्कूल, सांगली येथे शिकत असताना संस्कृतचे तासाला 'तप टू शाईन' असे श्री.दीक्षित मास्तर शिकवावयाचे, त्यांची आठव होते. प्रकाशित होणे असाच तप या शब्दाचा खरा अर्थ आहे. याने बुद्धीतला अंधार नाहिसा होतो. 'भर्ग' या शब्दावर व्याख्यान करताना जगद्गुरू शंकराचार्य 'स्वसाक्षात्कारेण अविद्या शक्तिदाहकृत' असेच सांगतात. येथे अज्ञानाचा नाश होतो. देहभावाचे आवरण नाहीसे होते. 'ते शरीर भाव नासती । इंद्रिये विषय विसरती । जे सोऽहं भाव प्रतीती। प्रगट होय ।' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी स्पष्ट करून ठेवले आहे. सोऽहंभाव जागृत झाला की, इंद्रिये विषय विसरतात आणि तेथे देहभाव शिल्लकच रहात नाही. अंतर्यामी असा एकदाचा प्रकाश दाटून गेला की विषयासक्त जीव हा नामासक्त होतो. रामनामाची आसक्ती निर्माण होते. म्हणून श्रीमामांनी या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात म्हटले आहे, ''प्रकाशित होता अंतरीची ज्योती। जडेल आसक्ती रामनामी।।'' या ज्योतीचे वर्णन श्रीजनाबाईंनी आपल्या एका अभंगात केले आहे. त्या म्हणतात, ''ज्योत पहा चमकली। काय सांगु इचि बोली ।।१।। प्रवृत्ती निवृत्ती दोघीजणी । लीन होती तिचे चरणी ।।२।। परा पश्यंती मध्यमा । वैखरीची झाली सीमा ।।३।।चारी

वाचा कुंठीत झाली । सोऽहंज्योती प्रगटली ।।४।। ज्योत परब्रह्मी जाणा। जनी म्हणे निरंजना।।५।।'' चारीवाचा कुंठीत झाल्या की, सोऽहंज्योती प्रगट होते. मग तेथे 'न गमे दिवस राती । अखंड लागलीसे ज्योती ।' अशी अवस्था होते. त्या धारणेत मग नामाशिवाय दुसरे काही रहातच नाही. देहाकार असणारा जीव येथे नामाकार होतो. नामाशीच त्याचे अखंड तादात्म्य होऊन रहाते. मग येथे अज्ञान राहणारच कसे? असा प्रश्न आहे. यादृष्टीने मामांनी शेवटच्या कडव्यात सांगितले आहे, ''गोविंद म्हणे अज्ञान उरेल कशाला? । पेटता मशाला देवाजीची।।'' अशा प्रकारे एकदा का साक्षात्कार झाला की तेथे अज्ञान रहातच नाही. 'खुंटलासे शब्द राहिला व्यवहार । झाला साक्षात्कार सदोदित ।' या मुक्ताबाईंचे म्हणण्याप्रमाणे शब्दाचा ग्रास झाला, शरीराचा व्यवहार थांबला, अशा स्थितीत होणारा साक्षात्कारही तसाच, तो साक्षात्कार सदोदित आहे. ते जीवनच साक्षात्कारी आहे. साक्षात्कारामुळेच आपले जीवनाचा आरंभ, मध्य आणि शेवट आहे याचे हे अशा प्रकारचे जीवन म्हणजे एक ज्वलंत उदाहरणच आहे असे म्हणावे लागेल.

*****

## १४.

**योगादिक कर्म वाऊगाचि धर्म ।**
**करोनिया श्रम व्यर्थ होय ॥१॥**
**सांगातीचा धर्म नाही वोळखिला ।**
**रामनामी आला तरी कळे ॥२॥**
**जन्मापासुनिया मरणांतावरी ।**
**जीवाबरोबरी सदा असे ॥३॥**
**गोविंद म्हणे तोचि आपुला स्वधर्म ।**
**रामनाम वर्म ज्यात वसे ॥४॥**

योगादिक कर्म ही जर नुसती कवायत झाली तर तालीम गेली आणि आखाडे राहिले, भजन गेले आणि अड्डे राहिले, सण गेला आणि शिमगा राहिला असे होते. प्रत्येक गोष्टीतील वर्म पाहिले पाहिजे. नाही तर सारे कठीणच आहे. ''तुका म्हणे देह पंढरी उमगा । नाही तरी शिमगा अखंडित॥'' देह ही पंढरी जर कळली नाही तर श्रीतुकाराममहाराज यांचे मते सारा आनंदच आहे. योग किंवा कर्म जर नुसते देहाचे अनुषंगाने होत राहील, तर आत्मसाक्षात्कार हे जे काही आपले उदिष्ट आहे, ते साधणार नाही. श्रीसमर्थ म्हणतात, ''ऐशा योगे भगवंत केवी भेटे रे ॥ध्रु.॥ आपण भोग भोगीताती साचे रे । देवा लागी देतो मानसाचे रे ॥१॥ आपण कानी घालितो कापसाचे रे । देवी लागी देतो कापसाचे रे ॥२॥ दास म्हणे वियोगाचा योग रे । त्याचे फळ सदा दुःख भोग रे ॥३॥'' देहाचे योगाने चैतन्याचा वियोग होणार, या योगे देव कसा भेटेल? आपण मात्र खरे भोग भोगावयाचे आणि देवाला मात्र मानसिक उपचार

करावयाचे. मानसिक उपचारांनी आपण तरी संतुष्ट होतो का? असा येथे श्रीसमर्थांचा प्रश्न आहे. 'काप' या नावाचा पूर्वीचा दागिना आहे. तो मात्र आपण खरा घालावयाचा आणि देवीला मात्र कापसाचे अलंकार समर्पण करावयाचे. हा जो योग आहे, हा वियोगाचा योग असून, दुःख भोग हाच त्याचा परिपाक आहे. परमात्म्याची भेट पाहिली तर ती अखंडच आहे. त्याचे शिवाय आपले अस्तित्वच असू शकत नाही. फक्त मीपणाने सारा घोटाळा झाला आहे. ''अखंडित भेटी रघुराज योग'' पण ''मना सांडिरे मी पणाचा वियोग'' असेच समर्थांनी म्हटले आहे. ''एकचि मीपणे नागविले घर । ना तरी संसार ब्रह्मरूप ।।'' एक मीपणा गेला तर सारा संसार ब्रह्मरूप आहे, अशी श्रीज्ञानेश्वरमहाराजांची अनुभूती आहे. ''एका जनार्दनी सार । ब्रह्मरूप हा संसार ।।'' असे श्रीनाथमहाराज म्हणतात. आकाशातील शब्दगुण गेला तर आकाश हेच ब्रह्म आहे. ''खं ब्रह्मेति व्यजानात्'' असे श्रुतींनी सांगितले आहे. पितळेला जर डाग येण्याचा गुणधर्म गेला तर पितळ म्हणजेच सोने आहे. ''नातरी पितळेचिया गंधीकळिका । जरी का जाय निःशेखा । तरी सुवर्ण काई आणिका । जोडू जाई जे ।।'' असे श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणते. जीवपणाचा वियोग, तो स्वरूपाचा योग, देहाचे अनुषंगाने कसा साधावा? हा प्रश्न आहे. ''नवल स्वरूपाचा योग । जीवपणाचा वियोग।।'' हे वर्म समर्थांनी स्पष्ट केले आहे. तर, ''तुझिया वियोगे जीवित्व आले'' असेही सांगून ठेवले आहे आणि यादृष्टीनेच ''सदा सर्वदा योग तुझा घडावा ।'' असे समर्थ परमात्म्याची प्रार्थना करतात. ज्या कर्माने पुढे उपासना घडते व उपासनेने ज्ञानप्राप्ती होते, ते कर्मही शारीरिक म्हणून अभिप्रेत नाही. ''आधी ते करावे कर्म । कर्ममार्गे उपासना । उपासका सापडे ज्ञान । ज्ञाने मोक्षचि पावणे ।।'' हे समर्थ वचन येथे चिंतनीय आहे. कर्माकर्माला मोहर बसून अहंकार उठणार नाही आणि संसाराला धाक निर्माण होऊन तो ब्रह्मरूप

होईल, असे एक विधायक कर्म आहे.  या कर्माचा येथे विचार होणे आवश्यक आहे. ''कर्माकर्माचिया मोहरा। उठू नेदू अहंकारा । संसाराचा दरारा। सांडला येणे ।।'' ''देख पा जनकादिक कर्मजात अशेष । न सांडिता मोक्षसुख । पावते झाले ।।'', ''दिपाचेनि प्रकाशे । गृहीचे व्यापार जैसे । देही कर्मजात तैसे । योगयुक्ता ।।'' या श्रीज्ञानेश्वरमाऊलींच्या ओव्या येथे सतत विचारात घ्याव्यात, अशा आहेत.  सहज कर्म काय आहे हा विचार येथे महत्वाचा आहे.  याचे अभावी योगादिक कर्म हा वाऊगाची धर्म असून पदरात श्रमच येतील, अशी यात व्यवस्था आहे. ''योग याग क्रिया धर्माधर्म माया । किंवा योग याग विधी येणे नोहे सिद्धी ।'' अगर ''जप तप कर्म क्रिया नेम धर्म । हरिविण श्रम व्यर्थ जाय।।''  ही श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे हरिपाठातील चिंतनीय सूत्रे आहेत. या सर्व गोष्टीचे आकलन झाले तर धर्माचे वास्तवरूप वास्तवतेने डोळ्यासमोर येणारे आहे.

म्हणून आमचे श्रीमामांनी पहिल्या कडव्यात ''योगादिक कर्म वाऊगाची धर्म। करोनिया श्रम व्यर्थ होय ।।'' असे सांगून या अभंगाचे दुसऱ्या कडव्यातच ''सांगातीचा धर्म नाही ओळखिला । रामनामी आला तरी कळे ।।''असे लगेच पुढे म्हटले आहे. हा जो धर्म आहे तो देश काल परिस्थितीत विभागलेला नाही, हे एक येथे लक्षात घेणेसारखे आहे. ''स्वधर्मु जो बापा । तो नित्य यज्ञ जाण पा । जये ठायी वर्तता पापा । संचारू नाही ।।'' हा श्रीज्ञानेश्वरमाऊलीस अभिप्रेत असणारा स्वधर्म येथे विचारात घेणे आवश्यक आहे. सर्व ज्ञानेश्वरीत हाच धर्म सांगितला असून माऊलीने नऊ हजार ओव्यांचे एक धर्म-कीर्तनच केले आहे. ''किंबहुना तुमचे केले । धर्म कीर्तन हे सिद्धी गेले । एथ माझेजी उरले । पाईकपण ।।'' असे आमचे माऊलीने म्हटले आहे. हा धर्म बाह्यात्कारी

कळणारा नाही म्हणून श्रीतुकाराममहाराजांनी ''धर्म सांगाती सांगाती । धर्मावाचुनि नाही गती ।।'' असा उकल केला आहे हा जो धर्म आहे तो आपल्या सांगाती आहे. आपण धर्म सोडला पण या धर्माने मात्र आपल्याला सोडले नाही. ही जाण आपण ठेवली पाहिजे. ''प्राणो रक्षिती धर्मः।'' हे वचन चिंतनीय आहे. ''कां रायाचे देह चाळू । रंका परौते गाळू । हे न म्हणेचि कृपाळू । प्राणु पै गा ।।'' या श्रीज्ञानेशोक्तीप्रमाणे हा धर्म आपण जाणून घेतला पाहिजे. या धर्मावाचून प्राणिमात्राला गतीच नाही. याने काही गती आली तर सद्‌गती आणि मग साक्षात्कार ठेवल्याप्रमाणे आहे. ''सद्‌गती झालीया सहज साक्षात्कार'' असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात. हा धर्म पांडवांनी आचरून दाखविला. ''धर्म पांडवांनी केला । देव घरी राबविला।।'' हे श्रीतुकोपनिषद सांगते. तर ''ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणा । द्वारकेचा राणा पांडवा घरी।।'' या शब्दात पांडवांची श्रेष्ठता श्रीज्ञानेश्वरमहाराज आपले हरिपाठात दाखवून देतात. गुरूकृपेशिवाय हा धर्म कळणारा नाही अशी जाणीवही श्रीतुकाराममहाराज यांनी करून दिली आहे. ते म्हणतात, ''तुका म्हणे ऐसा धर्म । गुरूविण न कळे वर्म ।।'' बरे, हा धर्म सांगाती आहे म्हणजे तरी काय?

याचा खुलासा आमचे श्रीमामांनी या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात केला आहे ते म्हणतात, ''जन्मापासोनिया मरणांतावरी । जीवा बरोबरी सदा असे ।।'' हा जो धर्म आहे तो जन्मापासून तो अगदी आयुष्यातील शेवटच्या क्षणापर्यंत म्हणजे मरणापर्यंत तो जीवाबरोबरच असतो. त्याला घेतल्याविना जन्मही नाही आणि मरणही नाही. हा धर्म आपण ओळखिला पाहिजे. येथे धर्म म्हणजे गुणधर्म असा अर्थ घेता येईल. स्थितीस्थापकता हा जसा पदार्थाचा धर्म आहे, त्याप्रमाणे चेतनेमुळे जन्म आणि चेतना गेली की मरण हे जर आपण जाणले, तर या धर्माची खरी ओळख होईल आणि तोच खरा आपला धर्म आहे. म्हणून श्रीमामांनी चौथ्या कडव्यात

सांगितले आहे, ''गोविंद म्हणे तोचि आपुला स्वधर्म । रामनाम वर्म ज्यात वसे ।।'' जगात अनेक धर्म आहेत, पंथ आहेत, पण ते देश काल परिस्थितीने विभागलेले आहेत. पण या सर्व प्राणीमात्रांचे अस्तित्व ज्या एका धर्माने सिद्ध होते असा जो अस्तित्व दाखवणारा धर्म आहे, जो नाही असे म्हणताच येणार नाही आणि तो नाही असे म्हणावयाचे झाल्यास, तो नाही असे म्हणावयास आपणच शिल्लक राहणार नाही. तोच आपला एकमेव असा 'स्व' धर्म आहे. ''स्व'' चा धर्म तो स्वधर्म. हे यातील वर्म आपण जाणून घेतले तर त्याचे खरे महत्व आहे. यादृष्टीने श्रीसमर्थ म्हणतात. ''सकळ धर्मामाजी धर्म । स्वरूपी रहाणे हा स्वधर्म ।।'' सर्व धर्मामध्ये स्वरूपानुसंधानात सतत रहाणे हाच खरा स्वधर्म आहे. आता स्वरूप म्हणजे तरी काय? हा प्रश्न आहे. स्वतःचा चेहरा देखील स्वतःला पाहता येत नाही असे परमेश्वराने काही करून ठेवले आहे. असे किती चेहरे आले आणि गेले, परंतु यात जे चैतन्य आहे की ज्यामुळे या चेहऱ्याला महत्व आले आहे, ते जे काही रूप आहे ते जाणणेसाठी आपण एकाग्रतेने साधना साधली पाहिजे. श्रीनामदेवमहाराज आपल्या एका अभंगात म्हणतात, ''सर्वांचे जे अधिष्ठान । तेचि माझे रूप पूर्ण ।।'' सर्वाला अधिष्ठानभूत जे पूर्ण स्वरूप आहे तेच खरे आपले रूप आहे. ज्याला पहात असताना पाहणाराही तेच होऊन जातो. तेथे त्रिपुटी रहातच नाही. श्रीनाथमहाराज म्हणतात, ''एका जनार्दनी देखियले रूप । रूप पहाता जहाले तद्रुप ।।'' ''बोधी बोधिले बोधिता नये ऐसे झाले । बापरखुमादेवीवरू विठ्ठले माझे मीपण हारविले ।।'' हीच याठिकाणी जीवाला येणारी अनुभूती आहे. या परता धर्म कोणता? असा प्रश्न आहे. हा संतांनी स्थापिलेला भागवत धर्म हाच खरा विश्वधर्म आहे. यात सारे विश्व सामावलेले आहे. यापेक्षा काय म्हणता येईल?

*****

## १५.

**भाग्याचे भाग्य रामनाम पाही ।**
**येर भाग्य होई श्रेष्ठ कसे ।।१।।**
**येर भाग्यवंता देव भेटी नाही ।**
**एरंड कदा पाही ऊस नव्हे ।।२।।**
**म्हणोनिया जनी साठवावे नाम ।**
**अंतरीचे काम निवारोनी ।।३।।**
**गोविंद म्हणे तोचि भाग्ये विनटला ।**
**जगी धन्य झाला हरिभक्त ।।४।।**

रामनाम हे सर्व भाग्यात श्रेष्ठ आहे. इतर भाग्यांची तुलना येथे करता येत नाही. नाना प्रकारचे भोग आहेत. भाग्याने भाग्यसंपन्न होणारे वैभवशाली आहेत. पण हे भाग्य ज्यावर ठरविले जाते ते सारेच नाशिवंत आहे म्हणून मग खरे भाग्य कोणते हा खरा प्रश्नच उभा रहातो. ''नाना भोग भाग्य विराजे वैभव साजे मोठे । संपत्ती विपत्ती दो दिवसांची सकळही मायीक खोटे ।।'' हे श्रीसमर्थांनी म्हटल्याप्रमाणे सर्व काही उपलब्ध असून ते नाशिवंत आहे. कडेला यातील काहीच येत नाही. हे काही खरे तगणारे नव्हेच. ''तगत नाही तगत नाही तगत नाही काही । तगत एक देव निरंजन अनन्य तेथे राही ।।'' तगणारा एक देव आहे. त्याला निरंजन म्हणतात. ''हालत नाही, बोलत नाही, चालत नाही, ते निरंजन ।। दिसत नाही भासत नाही, नासत नाही, ते निरंजन।।'' अशीच व्याख्या श्रीसमर्थांनी केली आहे. डोळ्याला दिसणारे दृश्य व मनासमोर येणारा भास, यापलीकडे काही सत्य आहे. ''शरीर आटे संपत्ती आटे ।

हरीनाम नाटे ते बरवे ।।'' हे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी दाखवून दिले आहे. बरे, कितीही मिळवले ते घेऊन जावयाचे कोठे ? ते तर कोठे नेताच येत नाही. मग इतक्याचा उपयोग तरी काय? ''तुका म्हणे ज्याची संपदा एवढी । सांगा ते कवडी गेली नाही ।।'' असा एक पौराणिक दाखला श्रीतुकाराममहाराज यांनी दिला आहे. रावणाचे राज्यात एक कोटी घरे कासे व तांबे यांनी ओतलेली असूनें निखळ सोन्याच्या विटांची घरे सात कोटी होती, असे श्रीतुकाराममहाराज यांनी म्हटले आहे. ''एक कोटी घरे काशा नी तांब्याची । शुद्ध कांचनाची सात कोटी ।'' ज्या रावणाचे प्रजाजन अशा दिमाखाने रहात होते, त्याचे वैभव संपत्ती काय असेल? पण त्याचे बरोबर एक कवडीही गेली नाही. याचा विचार करता, संतांनी अशा प्रकारची अभिलाषा न धरता, शाश्वत भाग्याकडेच ते का वळले हे ध्यानी येईल. म्हणून व्यावहारिक अपेक्षा त्यांची फारच थोडी, असे दिसून येते. ''निर्वाहापुरते अन्न आच्छादन। आश्रमासी स्थान कोपी गुहा । कोठेही चित्तासी नसावे बंधन । हृदयी नारायण साठवावा ।।'' हीच अपेक्षा श्रीतुकाराममहाराजांनी व्यक्त केली आहे. गोब्राह्मण प्रतिपालक छत्रपति श्रीशिवाजीमहाराज यांनी उगीच नजर नजराणा म्हणून पाठवलेले दिवटी, अब्दागीर, छत्री, घोडे या सरंजामानिशी लाख रुपयांचे जडजवाहीर ज्या महात्म्यांनी साभार परत केले. त्यापेक्षा त्यांनी काही निश्चितच मिळवले होते. म्हणून हा त्याग तेथे घडून आला. एऱ्हवी ते परत करण्याचे सामर्थ्य कोणात आहे? असा प्रश्न आहे. श्रीशिवाजीमहाराजांनी श्रीतुकाराममहाराजांना बोलावणे केले होते. त्यावेळी श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ''दिवट्या छत्री घोडे । हे तो बऱ्यात न पडे । तेथे गोविसी कासया। मजलागी पंढरीराया ।।'' ''राया छत्रपति ऐकावे वचन । रामदासी मन लावा वेगी । तुम्हापाशी आम्हा येवोनिया काय । वृथा शीण आहे चालण्याचा ।।'' एवढ्यावरून येथे काय अभिप्रेत आहे ते स्पष्ट होईल.

आजच्या जगात स्वस्थता, स्थिरता, शाश्वती, निश्चिति, यांचीच उणीव आहे. ही उणीव आत्मज्ञानसंपन्न संतांना तर कधीच भासली नाही. म्हणून कोणत्याही परिस्थितीत त्यांचे चित्ताचे समाधान कधी ढळलेच नाही आणि हे जेथे आहे तेथे कमी काय आहे असा प्रश्न आहे. ''देखे अखंडीत प्रसन्नता । आथी जेथ चित्ता । तेथ रिगणे नाही समस्ता । संसार दुःखा ।।'' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी या दृष्टीनेच म्हटले आहे. आपण अभागी आहोत असे तर संतांनी कधीच रडगाणे गाईले नाही. खरोखरीच हे आश्चर्य आहे. ''आम्ही भाग्याचे भाग्याचे । आम्हा तांबे भोपळ्याचे । तुका म्हणे आम्ही सुडके । आम्हा देखोनी काळ धाके ।।'' हे श्रीतुकाराममहाराज यांचे उद्गार मोठे चिंतनीय आहेत. या सर्व दृष्टीने आमचे श्रीमामांनी या अभंगाचे पहिल्या कडव्यात म्हटले आहे, ''भाग्याचे भाग्य रामनाम पाही । येर भाग्य होई श्रेष्ठ कसे ।।'' रामनाम हे जर खरे भाग्य आहे तर बाकीची भाग्ये श्रेष्ठ होणारच कशी? याचे कारण असे आहे कितीही भाग्य असो, त्यावर ईश्वराचा साक्षात्कार अवलंबून नाही. ज्याला ईश्वरी साक्षात्कार झाला तो खरा भाग्यवंत, भाग्यवान, ''यावच्चंद्र दिवाकरौ'' कीर्तिमान होतो. संतांनी कोठे लढाया जिंकल्या आहेत? त्यांनी कोठे राज्ये स्थापन केली आहेत? पण त्यांनी जे काही करून दाखविले ते आगळेच होते. ''राजे महाराजे चक्रवर्ती । झाले आहेत पुढे होती । परी ऐसी सायुज्यमुक्ती । कोणी देणार नाही ।।'' हे समर्थ वचन विचार करावे असे आहे.

या अभंगाचे दुसरे कडव्यात श्रीमामा म्हणतात, 'येर भाग्यवंता देव भेटी नाही । एरंड कदा पाही ऊस नव्हे ।' एरंडाचे गुऱ्हाळ कधी होत नाही. ऊसाच्या शेजारी एरंडाची झाडे. पण ऊस तो ऊस, ज्यात काही रस आहे. एरंड त्याची बरोबरी काय करील? ''जरी झाला भाग्यवंत । तरी

का भेटे भगवंत। असा श्रीतुकाराममहाराजांचा सवाल आहे. संपत्ती भाग्याने देव मिळणारा असता, तर तो श्रीमंतांनी खरेदीच केला असता. तो प्रकार येथे नाही. लगेच पुढे ते म्हणतात, ''उंच वाढला एरंड । तरी का होये इक्षुदंड ।'' शेवटी याचा निष्कर्ष काढता एका अभंगात श्रीतुकाराममहाराज प्रतिपादन करतात, ''भाग्यवंत म्हणो तया । शरण गेले पंढरीराया ।। तरले तरती हा भरवसा । नामधारकाचा ठसा ।।'' नामापुढे सर्व काही गौण आहे. नामनिष्ठेनेच हे भाग्य जोडता येते. साडेतीन कोटी रामनामाचे पुरश्चरण चालू असताना आमचे मामांची बदली तासगावला झाली. परान्न घ्यावयाचे नाही व वेस ओलांडायची नाही, असा त्या पुरश्चरणाचा कटाक्ष होता. आमचे मामा सांगली सिटी हायस्कूलमध्ये त्यावेळी लाईफ मेंबर बोर्डाचे चेअरमन होते. पण त्यांनी आपले नोकरीचा राजीनामा दिला आणि पुरश्चरण पूर्ण केले. त्यावेळी त्यांना जी अनुभूती आली ती महत्वाची आहे. म्हणून त्यांचे म्हणणेस महत्व आहे. वाटते येवढे हे सोपे नाही. आयुष्याचा पूर्ण विचार केल्याशिवाय ते अवघड आहे. ''नोकरी त्यागोनी पूर्ण सेवा केली । मूर्ती जिंकियेली रामराय ।।'' असे श्री अप्पाराव पोवार म्हणतात. तर ''औट कोटी पुरश्चरण करिता झाले प्रभूदर्शन।'' असे श्री. गणपतराव कानिटकर सांगतात. मोठी नोकरी लाथाडली, काय सोपी गोष्ट झाली! हे श्रीरामानंदमहाराजांसारख्या संतांनी उद्गार काढले, यात सर्व काही आले. अशी साडेतीन कोटींची दोन पुरश्चरणे त्यांनी केली. एका पुरश्चरणास रोज ९ तास याप्रमाणे ७ वर्षे व्यतीत करावी लागली.

ते या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात म्हणतात, ''म्हणोनिया जनी साठवावे नाम । अंतरीचे काम निवारोनि ।।'' या जगात शाश्वत धन जर कोणते असेल तर ते भगवंताचे नामच आहे. ''आम्हा विठ्ठल जीवन । टाळ चिपुळीया धन।।'' हे श्रीतुकोपनिषद सांगते. ''करा हरी भक्ती

परलोकीये कामा । सोडविल यमा पासोनिया ।।'' परलोकी येथील एक पैसाही नेता येत नाही. तेथे हरीभक्तीच उपयोगी पडेल. ही अंतःकरणाची तळमळ श्रीतुकयांनी व्यक्त केली आहे.  काही अल्पबचत योजना केली तर त्याचा वृद्धापकाळी उपयोग होतो. तसेच नामधन हे अंती उपयोगी येते. म्हणून ''साचलिया धन होईल ठेवण । तैसी नारायण जोडी करा ।।'' या श्रीतुकाराममहाराजांच्या म्हणण्याचा विचार अत्यंत मोलाचा, ध्यानात ठेवावा असा आहे.

या अभंगाच्या शेवटच्या कडव्यात श्रीमामा सांगतात, ''गोविंद म्हणे तोचि भाग्ये विनटला । जगी धन्य झाला हरीभक्त ।।'' जो मोक्षाचे रेषेवर येऊन साधुचे अंकीत झाला, तोच खरा हरीभक्त, भाग्यवान आहे, असेच श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी आपल्या हरीपाठात स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, ''मोक्षरेखे आला भाग्ये विनटला । साधुचा अंकिला हरीभक्त ।।'' तर ''हरीभक्त विरक्त विज्ञानराशी । जेणे स्थापिले मानसी निश्चयेसी ।। तया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे । तया  भाषणे नष्ट संदेह मोडे ।।'' असेच श्रीसमर्थांनी आवर्जून सांगितले आहे.  वैराग्याशिवाय हरीभक्ती नाही आणि हरीभक्तीपरते भाग्य नाही. ''वैराग्याचे भाग्य । संतसंग हाचि लाभ।।'' किंवा ''तुका म्हणे भाग्य या नावे म्हणिजे । संसारी जन्मीजे याच लागी ।।'' हेच खरे.

*****

# १६.

**नामभक्तिपंथ सकळा वरिष्ठ ।**
**जेथे जीवा कष्ट न पडती ।।१।।**
**दृढ धरी मनी रामनाम कथा ।**
**वाया आणिका पंथा जाऊ नको ।।२।।**
**चालियेला पंथ असे निजदेही ।**
**मनोवेगे जाई आक्रमोनी ।।३।।**
**गोविंद म्हणे देव भेटेल सहज ।**
**रामनाम गूज उमगता ।।४।।**

भगवंताचे नाम हाच सर्वश्रेष्ठ असा भक्तीपंथ असून या पंथाचे आक्रमण करीत असताना जीवाला कोणतेही कष्ट पडत नाहीत. असे याचे खरे वैशिष्ठ्य आहे. हा पंथ मोठा जुनाट असून, भगवान शंकरांनी जे उद्दिष्ट साधले ते येथे जीवाला सहज साध्य होते. कर्मकांडातील काठिण्य भक्तीपंथात नाही. ‘‘केशव नारायण करावे आचमन । तेचि संध्या स्नान कर्म क्रिया ।।’’ हे वर्म श्रीनामदेवमहाराज स्पष्ट करतात. ‘‘नाम हेचि कर्म नाम हेचि ब्रह्म।’’ हे वर्म खुद्द परमात्म्यानेच सांगितले आहे. ‘‘केशवी पै वर्म सांगितले’’ चरणावरून हा बोध होतो. ‘‘नामेविण वेदा आणिक नाही ।’’ हे श्रीनामदेवमहाराज ठासून सांगतात. कर्माची सांगता नामाने होते. मग सर्व कर्मे नामात येत नाहीत काय? असा प्रश्न आहे. ‘‘करिता आचमन केशव नारायण । करीती उच्चारण आधी हेची ।। लग्नाचिया वेळी म्हणती सावधान । लक्ष्मी नारायण चिंतन करा ।।

देहाचिया अंती प्रायश्चित्त देती । शेवटी वदविती रामनाम ।। करिती पितृश्राद्ध कर्म आचरिती । शेवटी म्हणती येको विष्णु ।।'' नामाशिवाय जर कर्म पूर्ण होत नाही तर श्रीनामदेवांचे मते नामच सर्वश्रेष्ठ आहे. म्हणून या भक्तीपंथाला चांगलेच महत्व आहे. ''मना सज्जना भक्तीपंथेची जावे ।'' असाच प्रथम मनाला श्रीसमर्थांनी बोध केला आहे. ''जुनाट हा पंथ शिवाचे हे ध्येय । रामनाम गाय स्मशानी तो ।।'' याच पंथाने भगवान शंकरानी स्मशानात नामसाधना करून आपले उद्दिष्ट सफल केले असे श्रीनाथमहाराज म्हणतात. ''प्याला पिया मस्त बनाया पंथ दिखाया सीधा । सहज समाधी अजब बतावे साधत साधत साधा ।।'' नामाचा पेला ओठाला लागताच उन्मादावस्थेत हा साधा सरळ पंथ दृष्टीसमोर येऊन, साधना साधता साधता सहजसमाधीत जीवाचा सहजतेने प्रवेश होतो, अशी श्रीकमालसाहेबांची प्रचिती आहे. या पंथाने जात असताना संसाराची चिंताच रहात नाही. स्मृती पटलावरून ते सारे चल-चित्र बाजूलाच गेलेले असते. ''रे रे राघोबा । तुझीया पंथारे । सर्व सांडोनी संसार चिंता रे ।'' हे श्रीआनंदमूर्तींचे वचन येथे मोठे चिंतनीय आहे. ''उर्ध्व पंथे चाल बाई ब्रह्मगिरी पाहू । देहभाव विलय तेथे तेचि होऊनी राहू।।'' या श्रीशिवदिनींचे वचनाप्रमाणे हा पंथ उर्ध्वगामी आहे. देहभावाचा येथे लय झाल्याने जीव हा परमात्मरूपच होतो. हा पंथ मोठा शीतल आहे. येथे साधकाला कोणताही ताप होत नाही. ताप शमनासाठी याचे क्रमण अगत्याचे आहे. ''शीतल हा पंथ माहेरीची वाट ।'' या शब्दात श्रीतुकाराममहाराज याचे वर्णन करतात. हा जरी उर्ध्वगामी आहे तरी जवळ, नीट, सुखरूप आहे असे सुचवितात. या पंथाने जाणाऱ्याला कोणत्याही प्रकारची भीती नाही, हेही श्रीरंगनाथस्वामींनी आवर्जुन सांगितले

आहे. ते म्हणतात, ''याची पंथे जाता भय नाही रे । निश्चय बोलती चारी साही रे ।।'' बरे, ही गोष्ट चार वेद आणि सहा शास्त्रे यांनी देखील निश्चयाने प्रतिपादिली आहे. अर्थात अशाप्रकारचा हा पंथ जाणून घेणेही अगत्याचे आहे. कारण याचा संबंध बाहेर दृश्यात कोठे येत नाही. ''आकाश मार्गी गुप्त पंथ । जाणती योगी ये समर्थ । इतरासी हा गुह्यार्थ । सहसा नवचे।।'' हे जे श्रीसमर्थांनी गुह्य प्रगट केले आहे तेच याचे मुख्य कारण आहे. ज्यांनी ज्यांनी हा पंथ जाणून घेतला, ते परमार्थमार्गी संतच झाले. आमचे श्रीचिमडचेमहाराज आपले नित्याचे पंचपदीत म्हणतात, ''जाणुनी जे जन धरतील पंथ । ते ते झाले तव पदी संत।।'' येथे काय अभिप्रेत आहे ते या चरणावरून स्पष्ट होते. ही पंचपदी म्हणजे तर चिमड संप्रदायिकांची संध्या आहे. इतके त्याचे महत्व आहे. या सर्व दृष्टीने नाम-भक्तिपंथ हा सर्वश्रेष्ठ आहे. याशिवाय जगण्यालाच मुळी अर्थ नाही. ''ज्ञानदेवा जीणे नामेविण व्यर्थ'' असे असल्याने श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी ''रामकृष्णी पंथ क्रमियेला'' हेच खरे आणि याकरिता ''संतांचे संगती मनोमार्गे गती । आकळावा श्रीपती येणे पंथे ।।'' हे जे श्रीज्ञानेश्वरमाऊलीनी आपले हरीपाठात महत्वपूर्ण रहस्य प्रगट केले आहे. या दृष्टीने आमचे श्रीमामांनी या अभंगात पहिल्या कडव्यात ''नाम भक्ती पंथ सकळा वरिष्ठ । जेथे जीवा कष्ट न पडती।।'' असे म्हटले आहे. याचा संबंध देहाशी कोठेच येत नाही. हा पंथ अगदी वेगळाच आहे आणि तो ज्याला सापडला तो तरलाच, हे निश्चित. ''धरूनी पंथ परभारे । तरला आनंदतनय विचारे ।'' असे उद्गार श्रीआनंदतनयांनी स्वानुभवाने प्रगट केले आहेत. या पंथाचे आक्रमण करणेचे दृष्टीने काही अंतःकरणात दृढीकरणाची आवश्यकता आहे.

म्हणूनच या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात श्रीमामांनी ''दृढ धरी मनी

रामनाम कथा । वाया आणिका पंथा जाऊ नको ।।'' असेच म्हटले आहे. येथे कथा हा शब्द फार वेगळ्या अर्थाने आहे. ''अहो परवा जे गृहस्थ आपल्याला वाटेत गाठ पडले होते, त्यांची कथा आटपली.'' असे एकानी सांगितले. त्यावर ते म्हणाले, ''अहो, आम्हाला कथा आवडती आणि आम्ही कथेला जात असतो हे तुम्हाला माहिती आहे. मग तुम्ही आम्हाला आधी कसे सांगितले नाही? आम्ही आलो नसतो का?'', तेव्हा ते गृहस्थ म्हणाले, ''अहो, त्यांची कथा आटपली म्हणजे ते वरती गेले. त्यात सांगावयाचे काय? आणि सांगून तुम्ही आला असता काय?'' ''नाही नाही, सांगितले नाहीत तेच बरे झाले'' दुसरे गृहस्थ म्हणाले, अर्थात ही कथा कोणती असा महत्वाचा प्रश्न आहे. मिरजेच्या श्रीआण्णाबुवांना काही लोकांनी कथा करा म्हणून आग्रह केला. ते करतो म्हणाले. माणसांची खूपच गर्दी झाली. आण्णाबुवांची कथा हे एक त्यांना कुतुहल होते. आण्णाबुवा पळत पळत आले आणि एकच वाक्य बोलले, ''घरात दिवा आहे आणि दारात अडखळतो आहे'' झाली कथा. पण हा विचार जन्मभर केला तरी त्याचा पत्ता लागणार नाही. त्याला गुरुकृपाच पाहिजे. ''रामदास म्हणे धन्य त्याचे जीणे। कथा निरूपणे जन्म गेला ।।'' ही कथा जाणून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. ही कथा जाणून ती दृढ झाली पाहिजे. ही चारी वाचे पलिकडे आहेत. ''हरी कथा गोड बहू झाली । वाचे न बोलवे बोली ।'' असेच उद्‌गार आमचे भगवान श्रीसद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज यांनी स्वानुभवाने मांडले, ते मोलाचे आणि बोलके आहे. ''होवोनिया श्रोता वक्ता । आपुली आपण करी कथा ।'' असे श्रीरमावल्लभ दास यांनी म्हटले आहे. याशिवाय जे पंथ आहेत ते वायाच आहेत. त्याचा विचारही करणेची जरुरी नाही. ''गमन नसे ज्या गावी । तेथील वाट कशास पुसावी

।।'' हेच खरे.

अर्थात हा जो पंथ आहे तो निजदेहीच शोधला पाहिजे. म्हणून श्रीमामा तिसऱ्या कडव्यात सांगतात, ''चालीयेला पंथ असे निजदेही । मनोवेगे जाई आक्रमोनी ।।'' ''आम्ही गुरुनाथपंथी । सोपानमार्गे गेलो एकांती ।।'' हा श्रीवेणाबाईंचा विचार येथे चिंतनीय आहे. ''पुष्पाचा परीमळ वेगळा काढीला। हार तो लेईला सोपान देव ।।'' या श्रीचांगदेवांचे उक्तीप्रमाणे हा सोपानमार्ग गुरुनाथपंथी आहेत ते आक्रमितात. ''परीमळ गेलीया वोस फूल दिठी । आयुष्याच्या शेवटी देह तैसा ।।'' संतांनी या पंथाने आयुष्यच साधनीभूत केले, हे महत्वाचे आहे. ''आयुष्याच्या या साधने । सच्चिदानंद पदवी घेणे ।।'' यातच सर्व काही आले आहे. याने सहजच देवाचा साक्षात्कार होतो. फक्त नामातील गूज मात्र उकलले पाहिजे. ''निज गूजागूज तो गे बाई । मोहनाचा मोहन तो गे बाई ।।'' आणि ''तो हा विठ्ठल बरवा'' हे श्रीज्ञानेश्वरांचे सूत्र अंतरी बाणले पाहिजे. तर या साऱ्या गोष्टी श्रीमामा अभंगाचे शेवटच्या कडव्यात म्हणतात, ''गोविंद म्हणे देव भेटेल सहज । रामनाम गूज उमगता ।।''

✻✻✻✻✻

# १७.

**अखंड सुख राम खंड सुख माया ।**
**माझी ऐसी काया जव नव्हे ।।१।।**
**तव खरे सुख येईल ना हाती ।**
**जीवाची विपत्ती दूर नव्हे ।।२।।**
**अखंड चरणगती चाले निजदेही ।**
**साधुबोध होई तरीच कळे ।।३।।**
**गोविंद म्हणे सर्व सुखाचेही सुख ।**
**रामनाम एक आन नसे ।।४।।**

या अभंगात आमचे श्रीमामांनी ''अखंड सुख राम खंड सुख माया। माझी ऐसी काया जव नव्हे ।।'' असे पहिल्या कडव्यात सांगितले आहे. आत्माराम अखंड आहे आणि माया ही खंड स्वरूप आहे. यामुळेच अखंड आहे ते जर आपण जाणून घेतले तर ते सुखही मग अखंडच आहे, हे स्पष्ट केले आहे. परमात्म्याचे सारे काही अखंडच आहे. श्रीकेशवस्वामी म्हणतात, ''मज अखंड राघव कळला रे । कल्पतरू गुरु फळला रे ।।ध्रु.।। रामाच्या विसरे रचिले रे । मायेचे भिंताड खचले रे ।।१।। प्रीती निरंतर लागली रे । तेणे अनादि माया भंगली रे ।।२।।'' याचे ध्यान अखंडपणे जीवाला लागलेलेच आहे, पण त्याचा प्रकारच समजून येत नाही आणि नित्य निरंतर सन्निध असून त्याचा उमज पडत नाही असे श्रीसमर्थ म्हणतात. ''अगा सर्वा जीवांचे शरीरी । परमात्म हंस पदाची थोरी । अखंड असतसे गोचरी । परी नेणती अज्ञान ।।'' असाच

निर्वाळा उत्तरगीतेवरील टीकेत श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी दिला आहे. सर्व जीवमात्रांचे ठिकाणी परमात्मा हंसरूपाने विराजमान असून, अखंडत्वाने तो गोचर असतानाही, अज्ञानी जीव देहाकाराशी तादात्म्य झाल्याने त्याला ओळखत नाहीत हे उघड आहे. ज्यांची वृत्ती या अखंडरूपाशी जडली असे जे संत महात्मे, त्यांची वृत्तीही अखंडच आहे. ''अखंड वृत्ती कोंदली सुखे दाटली नयन पाती । सहज कला लाधली तेथे हारपली दिनराती ।।'' अशी श्रीकेशवस्वामींची अनुभूती आहे. ''अखंडीत भेटी रघुराज योगू । मना सांडी रे मीपणाचा वियोगु ।।'' हा श्रीसमर्थांचा अनुभव येथे लक्षात घेणेसारखा आहे. रघुराजांची भेट अखंड आहे. वियोगाचे कारण मात्र मीपणा आहे. या पायाशी अखंड असावे अशी श्रीतुकाराममहाराज यांची तळमळ त्यांनी ''अखंडीत असावे ऐसे वाटते पायी । साहोनी संकोच लाभ थोडासा देई ।।'' या शब्दात व्यक्त केली आहे. ज्यांना अखंड भेट झाली तेथे अखंड अगर्वता आली. ''अखंड अगर्वता होऊनी असती । तयांची विनय हेचि संपत्ती । जय जय मंत्रे अर्पिती। माझ्या ठायी ।।'' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी म्हटले आहे. ''जयाचिया वाचा पुढा भोजे । अखंड नाम नाचतसे माझे। की जे जन्म सहस्री वोळगी जे । एकवेळ यावया ।।'' या श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे उक्तीत अखंड नामाचे महत्वच प्रगट झाले आहे. ज्याचे मुखात नामामृताची सरिता अखंडपणे वहात आहे तोच एक परमार्थातील पुरा घट आहे असे श्रीनिवृत्तीनाथांनी, ''ज्याचे मुखी नाम अमृत सरिता । तोची एक पुरता घट्टु जाणा ।।'' या चरणात सांगितले आहे. ''नामयाची जनी पिटीत डांगोरा । हरी जप करा अखंडीत।।'' या ठिकाणी श्रीजनाबाईंनी अखंड जपाचा उल्लेख केला आहे. ''तुझी सेवा अखंडीत। घडो रुपी जडो चित्त।।''

या पंचपदीतील चरणात श्रीचिमडचे महाराजांनी भगवान श्रीनिंबरगीकरमहाराज यांची अखंड सेवा घेणेबद्दल मोठ्या तळमळीने प्रार्थना केली आहे. तर ''अखंड मंडलाकारं व्याप्त येन चराचरं'' असे अखंड गुरुरुपाचे वर्णन श्रीगुरुगीतेत केले आहे. अशी अवतरणे तरी किती द्यावीत असा प्रश्न आहे. तात्पर्य, अखंडाचे सारे अखंडच, आहे हेच खरे. ''अखंड न खंडे अभंग न भंगे । तुका म्हणे गंगे मिळणे सिंधू ।'' या वचनाने ज्याला खंडच नाही ते अखंड, हे अखंड ध्यानात घ्यावे असे आहे. आमचे श्रीमामांनी कीर्तन केले, पण तेही एकही दिवस खंड न होता अखंड याला महत्व आहे. भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांनी काय कृपा केली आणि त्यांचे वचनावर मामांची काय निष्ठा होती याची कल्पनाही करणे कठीण आहे. ''हनुमंत सद्गुरु आज्ञे केले अखंड कीर्तन । सर्वस्व वेचियेले समर्पिले पंचप्राण ।।'' अशी त्यांची अवस्था असल्याने अखंडाचे महत्व त्यांनीच सांगावे इतके महत्वाचे आहे. मी कीर्तन करतो हे त्यांचे गावीही नव्हते, म्हणूनच ते अखंड झाले.

ते म्हणतात, ''दासा हृदयी हनुमान। सदा करीतो कीर्तन ।'' यातच अखंडत्वाचे गमक आहे. म्हणून ''अखंड सुख राम म्हटल्यावर खंड सुख माया'' यावर आता वेगळे भाष्य करण्याची जरुरीच नाही. ''माझी ऐसी काया जव नव्हे'' अशी अवस्था झाली तरच ''अखंड सुख राम खंड सुख माया'' हा चरण स्पष्ट होणार आहे. ''मायीक माया सांडुनी काया दृढ धरी रघुराया । दास म्हणे सुख सकळ पावसी साधन मार्ग उपाया ।।'' या श्रीसमर्थांचे वचनाचा सतत विचार होणे आवश्यक आहे. कायेनेच माया प्रतीत होते. चैतन्याचे अधिष्ठानावर काया कार्य करते. पण कायेशी

समरस झालेल्याला डोळ्यासमोर काय आहे तेच दिसते. डोळ्या आड आहे ते डोळ्या आडच रहाते. हीच माया. जी रचली गेली ती खचणारच, तसे चैतन्याचे नाही. म्हणून मामांनी म्हटले आहे, ''अखंड सुख राम खंड सुख माया । माझी ऐसी काया जव नव्हे ।।'' ही अनुभूती जोपर्यंत गुरुकृपेने घेता आली नाही तोवर, ''एक दिन संपत एक दिन विपत । क्यों फुगावे गाल'' असेच श्रीकबीरोक्तीप्रमाणे चालणार.

यादृष्टीने श्रीमामानी या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात ''तव खरे सुख येईल ना हाती । जीवाची विपत्ती दूर नव्हे ।।'' असे म्हटले आहे. खऱ्या अर्थाने जीव पूर्णतः सुखी होत नाही. याचे खरे कारण येथेच आहे. अखंड काय आहे आणि ते मग कळणार तरी कसे हे सांगत असताना मामांनी लगेच तिसऱ्या कडव्यात ''अखंड चरणगती चाले निजदेही । साधुबोध होई तरीच कळे ।।'' असे युक्तीने प्रतिपादन केले आहे. ज्या एका गतीने आपले आयुष्य गतीमान झाले आहे, ज्या गतीने सारे विश्व हे गतीमान आहे, जी गती अध्यात्मदृष्टीने आणि भौतिकदृष्टीने देखील महत्वाची आहे. सारे काही गतीमान आहे, याचा अर्थच गतीमुळे सर्व काही आहे, नव्हे नव्हे गतीतच सारे काही आहे. ते गतीरूप भगवंताचे चरण आपल्या निजदेही सापडणारे आहेत. ज्या निजत्वाने देहाची जाणीव व्हावी अशा निजदेही त्याचा शोध घेणे हे साधकाला शक्य आहे. पण ते केवळ आपल्या बुद्धीने मात्र आकलन होणे सारखे नाही. ''बोला आदि झोंबिजे प्रमेयासी ।'' असे श्रीज्ञानेशोक्तीप्रमाणे काही आगळे असल्याने आणि ''शब्देविण संवादिजे'', आकाशाचा ग्रास झाल्यावर जो सुसंवाद निर्माण होईल तेथेच याची प्राप्ती होणारी असल्याने,

''श्रीगुरुकृपा काय नोहे । ज्ञानदेवो म्हणे ।।'' असे श्रीज्ञानेश्वर माऊलीने जे रहस्य उकलले आहे. त्यादृष्टीने श्रीमामा म्हणतात, ''साधुबोध होई तरीच कळे ।'' साधुबोधाने अनुभवाचा परिपाक होतो. ''साधुबोध झाला नुरोनिया ठेला ।'' असे झाले की मग ''ठायीच मुराला अनुभव ।'' ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी हरीपाठात सांगितलेली प्रचिती, अशा योग्यतेला गेलेल्या साधकाला प्राप्त होते. ''धन्य हा रघुनाथप्रिय साधु'' असे श्रीचिमडचे महाराज म्हणतात. असा महात्मा मात्र आपणास पूर्व पुण्याईने भेटला पाहिजे. अखंड हे अखंडत्वाने का एकदा अंतर्यामी ठसले की मग सुखाला तेथे काय कमी पडणार आहे? सर्व सुखाने तो सर्वसुखी होतो. ''सर्व सुख ल्यालो सर्व अलंकार'' असे होते. ''किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होवोनि तिही लोकी । भजीजो आदि पुरूखी । अखंडित ।।'' हा श्रीज्ञानेश्वरांचे पसायदानाचा प्रत्यय येतो. म्हणून श्रीमामांनी या अभंगाचे शेवटच्या कडव्यात स्पष्ट केले आहे की, ''गोविंद म्हणे सर्व सुखाचे ही सुख । रामनाम एक आन नसे।।''.

✽✽✽✽✽

## १८.

**समाधीचे सुख सांडी ओवाळोनी ।**
**रामनाम वाणी वदे जरी ।।१।।**
**समत्वाचे सुखी हरिची समाधी ।**
**इतर उपाधी नुरे जेथे ।।२।।**
**सदा सर्वकाळ अंतरी अढळे ।**
**कदापि न ढळे तेचि साधी ।।३।।**
**गोविंद म्हणे ऐसी समाधी साधिता ।**
**वैकुंठ ये हाता अनायासे ।।४।।**

समाधीचे सुख फार मोठे वाटते पण रामनामापुढे ते खरे फिकेच आहे असे आपल्याला दिसून येईल. बंदुकीचे बार काढले पण एखादा गृहस्थ हालला देखील नाही, अगदी तटस्थ राहिला, याला समाधी अवस्था असे म्हणतात. हठ योगातील हे आठवे अंग आहे. ''हठ योगाची आठही अंगे । यमनियमादिक साधुनि चांगे । आणिमादिक सिद्धींच्या योगे । लोक भुलवावे ।।१।। नियम पाळावे तैसे फल तोडुनि घ्यावे ।।ध्रु.।।'' असे सुप्रसिद्ध वेदान्ती बाबा गर्दे यांनी म्हटले आहे. यम, नियम, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, आसन, मुद्रा आणि मग समाधी अशी ही एक यौगिक प्रक्रिया आहे. याने अणिमादि सिद्धी प्राप्त होतात. परंतु आत्मसाक्षात्कार संतांनी ज्या नामाने संपादन केला त्या साधनेत प्राप्त होणारी हरिसमाधी ही कांही आगळीच आहे. ज्याला समाधी अवस्था म्हणतात, ती ओवाळून टाकावी अशी ही नामतन्मयता सर्वश्रेष्ठ आहे. ''निळा म्हणे स्वरूप सिद्धी । नित्य समाधी हरिनाम ।।'' हा श्रीनिळोबारायांचा चरण फारच बोलका आहे. स्वरूपाने सर्व काही

सिद्ध होते, उपलब्ध होते, पण जे काही उपलब्ध आहे, त्याने मात्र स्वरूपसाक्षात्कार होत नाही. ''योग याग विधी येणे नोहे सिद्धी ।'' या श्रीहरीपाठातील वचनाचा विचार करता, विधीने सिद्धी आहे का सिद्धीने विधी आहे हाच मुख्य प्रश्न श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी निर्माण केला आहे. आत्म्यामुळे सर्व सिद्ध झाले आहे. म्हणून हे जे सारे सिद्ध झालेले आहे, उपलब्ध आहे, त्याने आत्म्याची सिद्धी होत नाही. जो आत्मा सिद्ध आहे तेथे जर आपण सिद्ध झालो तर ती स्वरूप-सिद्धी आहे. तुम्ही केव्हाही या, आम्ही तुमच्या स्वागताला सिद्ध आहोत, या बोलण्यात जो भाव आहे, तोच येथेही अभिप्रेत आहे. या स्वरूप सिद्धीने नित्य वस्तूची ओळख झाल्याने जे तादात्म्य होते, तेही नित्यच होते, म्हणून त्याला नित्यसमाधी म्हटले आहे. ''सर्वकाळ नामचिंतन मानसी । समाधान चित्तासी समाधी ते ।'' हेच खरे रहस्य श्रीतुकाराममहाराज यांनी प्रगट केले आहे. चित्ताला समाधान हीच समाधी. सर्वकाळ नामचिंतनाने ती प्राप्त होते. यादृष्टीने आमचे श्रीमामांनी या अभंगाच्या पहिल्या कडव्यात ''समाधीचे सुख सांडी ओवाळूनि । रामनाम वाणी वदे जरी ।।'' असे म्हटले आहे.

दुसऱ्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, ''समत्वाचे सुखी हरीची समाधी। इतर उपाधी नुरे जेथे ।।'' ''सांडी कल्पना उपाधी । तीच साधुला समाधी ।।'' या वचनात साधुला कोणती समाधी अवस्था प्राप्त होते तेच व्यक्त केले आहे. ''कल्पना काजळी कल्पिले कवळी । कैचेनि जवळी देव होय ।।''या पंचरत्नी हरीपाठातील वचनाप्रमाणे कल्पना ही काजळी असून ती कल्पनेला कवटाळते. यामुळे जो कल्पक आत्मा तो दूरच रहातो. ''वस्तू ते ओळखा सांडारे कल्पना'' हे श्रीतुकाराममहाराज यासाठीच सांगतात. तर ''मुळी कल्पना दो रुपे तेचि झाली । विवेके तरी

स्वस्वरूपी मिळाली ।।'' असा निर्वाळा श्रीसमर्थ देतात. जीवपणाचे वियोगाशिवाय स्वरूप साक्षात्कार नाही आणि कल्पनेचे उपाधीतून तर जीवभाव जागृत होत असतो. 'कल्पना उपाधी तेणे झाला जीव' हा श्रीनाथमहाराजांचा विचार येथे चिंतनीय आहे. चैतन्याशिवाय जे काही इतर आहे, ती सारी उपाधीच आहे. संतांनी मात्र चैतन्याचाच स्वीकार केला आहे. श्रीज्ञानेश्वरमाऊली म्हणते, ''उपाधीमाजी गुप्त । चैतन्य जे सर्वगत । ते तत्त्वज्ञ संत । स्वीकारती ।।'' म्हणून सर्वत्र सम असणाऱ्या चैतन्याशी तादात्म्य झाल्याने समत्वाचे सुखात जीव येतो आणि असे झाल्यावर हरी समाधी त्याला साधते. ''पैल तुर्येचे मेरे । नयनातुनी नयन हेरे । सर्व साक्षी समरे । परब्रह्म।।'' श्रीज्ञानदेव तेहेत्तीशीतील श्रीज्ञानेश्वर माऊलींची ओवी सतत दृष्टीसमोर ठेवावी अशी आहे. सर्व ब्रह्म जे साक्षीभूत आहे ते सर्वत्र सम आहे. नयनांचे नयनाने तुर्यावस्थेत त्याचे आकलन होते. यातच सारा भक्तिमार्ग सामावला आहे. ''जे जे भेटे भूत । ते ते मानीजे भगवंत । हा भक्तियोग निश्चित। जाण माझा ।।'' असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी भक्तीचे स्वरूप स्पष्ट केले आहे. समत्वाचे सुखात हरीसमाधीसंपन्न जीव होतो. ''समाधी हरीची समसुखेवीण । न साहेल जाण द्वैत बुद्धी ।।'' याठिकाणी द्वैतबुद्धीही सहन होत नाही. द्वैतबुद्धी निर्माण झाली की संपलेच, इतका हा विषय सूक्ष्म आहे. ''सौ सोनारकी एक लोहारकी ।'' पैकी आहे. समसुख, समवस्तु डोळ्यासमोर आल्याने प्राप्त होते. यासाठी समबुद्धीची आवश्यकता आहे. समबुद्धीने नामाचे ग्रहण होणे जरुरीचे आहे. ''जव जव देह हे असेल। तव वोळगी ऐसी कीजेल । मग देहांती नवल । बुद्धी आहे ।।'' हे ज्या बुद्धीचे वर्णन माऊलींनी केले आहे ती बुद्धी आत्मप्रवण झाल्याने, समब्रह्मानुभूतीने समसुख साधून, समाधी अवस्था अनुभवता येते. देहाचा अंत ज्या बिंदूमध्ये होतो, तेथे जी चैतन्याची चमक आहे, ती बुद्धीच येथे

अभिप्रेत आहे. या समबुद्धीने नाम घेतले की साधक हा हरीसमान होतो. तेथे इंद्रियनिग्रह, मनोनिग्रह सहजच होतो. निग्रह आणि संयम याची येथे जरुरीच रहात नाही. ''इंद्रियाते न दंडिता । मनाचा मारू न करता । एथ मोक्ष असे आईता । श्रवणाचि माजी ।।'' इतके हे बुद्धीगम्य नामानुसंधान महत्वाचे आहे. या स्थितीत नामाचे श्रवण होत रहाते. नामानुसंधान म्हणजेच नादानुसंधान किंवा तेच आत्मानुसंधान आहे. येथे आपले संधान पाहिजे. येथे हरीचा साक्षात्कार ही हरीसमाधी आहे. समबुद्धी होण्यासाठी चित्ताची समता साधली पाहिजे. ''अर्जुना समत्व चित्ताचे । तेचि सार जाण गा योगाचे । जेथे मन आणि बुद्धीचे । ऐक्य आथी ।।'' हे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी यादृष्टीनेच म्हटले आहे. चित्ताची समता हेच भक्तियोगाचे सूत्र आहे. योग हा शब्द ऐक्यदर्शक आहे. ''अवघी भूते साम्या आली । देखिली म्या कै होती ।'' या श्रीतुकोपनिषदाप्रमाणे मनाची धारणा होती व ही साधणेसाठी रामनामाचा जप समत्वाने साधावा लागतो. ''राम राम जप समत्वे साधावा । अहंकार टाकावा अहंबुद्धी।।१।। सुटसी रे नामे अपाप संभ्रमे । नित्यनाम नेमे जप तू जाय ।।२।।'' हे श्रीनिवृत्तीनाथांनी जे वर्म सांगितले आहे ते ध्यानात घ्यावे असे आहे. येथे सकार हकाराची पारडी असलेला तराजू सम व्हावयास पाहिजे. नाम घेताना ते तालेतोले घेतले पाहिजे. ''कहत कबीरा सुनोभाई साधु । रामनाम भर तोल।'' हे श्रीकबीर वचन दृष्टीसमोर पाहिजे.

''सद्गुरु वाणी बैसे गगनगोली । वस्तु कोठडी नयन खोली। अजपाजपाची तागडी तोली । परी ग्राहक कोणी मिळेना ।।'' सद्गुरु हे नाम तोलून देतात, पण ते तोलून घेणारे गिऱ्हाईक कोठे आहे? असा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीज्ञानदेव तेहेत्तिशी या ग्रंथात प्रश्न केला आहे. सकार आणि हकार या पारड्यातून अहंबुद्धी आणि अहंकार गेला की ही

पारडी सम होतात आणि मग हा जप समत्वाने साधता येतो. येथे संभ्रम रहात नाही. नित्य जे नाम आहे त्याचा जपच येथे खरा महत्वाचा आहे. तात्पर्य जीवनाचे समतेने मनाची, चित्ताची, बुद्धीची समता होऊन, समब्रह्म साक्षात्काराने समसुखात हरी समाधी संत साधतात. येथे कोणताच बाह्य स्वार्थ नाही. केवळ तटस्थता ही समाधी नव्हे. ''प्रेम छंदे नाचे डोले । हारपला देहभाव ।।'' अशाप्रकारची श्रीतुकाराममहाराजांनी वर्णन केल्याप्रमाणे त्या जीवाची अवस्था होते. यादृष्टीने शरीरात सदासर्वकाळ जे काही आढळते ते साधण्यानेच हे सर्व काही साधले जाते. म्हणून श्रीमामांनी या अभंगाच्या तिसऱ्या कडव्यात ''सदा सर्वकाळ अंतरी अढळे । कदापि न ढळे तेचि साधी ।'' असे म्हटले आहे. श्रीमुक्ताबाईंनी साक्षात्कारी समाधीचे स्वरूप सांगत असताना श्रीचांगदेवांना हेच वर्म सांगितले आहे. त्या म्हणतात, ''बोलता चालता देखता ऐकता । न ढळे सर्वथा तेचि साधी ।। ऐके रे चांगया टाकी रे कल्पना। पावेल ते खुणा । मुक्ताई म्हणे ।।'' यावरून येथे काय म्हणावयाचे आहे ते स्पष्ट होईल. अशी समाधी साधली की वैकुंठनाम परमात्म्याची प्राप्तीच साधकाला निश्चित होते. म्हणून या अभंगाचे शेवटच्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, ''गोविंद म्हणे ऐसी समाधी साधिता । वैकुंठ ये हाता अनायासे।।'' आयासाने जे साधत नाही ते अनायासे साधते, हेच शेवटी खरे आहे.

*****

## १९.

**माळ धरोनिया राम नाम घेता ।**
**द्वैताची तो वार्ता नुरे काही ।।१।।**
**सर्वत्र अद्वैत उरेल गोविंद ।**
**रामनाम छंद मनोमाळे ।।२।।**
**संकल्पात राम विकल्पात राम ।**
**मनोमाळा उत्तम जाणावी ही ।।३।।**
**गोविंद म्हणे धरी रामकृष्ण माळा ।**
**नामी राहील उमाळा अखंडित।।४।।**

माळेशिवाय संप्रदाय नाही आणि संप्रदायाशिवाय माळ नाही, असा संप्रदायाचा व माळेचा अगदी अन्योन्य संबंध आहे. माळेचे महत्व फार मोठे आहे. माळेने नामस्मरणाची माळ सुरू होते. माळेने स्मरण होते म्हणून माळेला स्मरणी असेही म्हणतात. वारकरी संप्रदायात गळ्यात तुळशीची माळ घालतात. भगवंताला तुळस फारच प्रिय आहे. ''तुळसी हार गळा कासे पितांबर । आवडे निरंतर हेचि ध्यान ।।'' असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ''कंठी मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ।। म्हणवा हरीचे दास। तुका म्हणे मज ही आस ।।'' प्रत्येकाने कंठात तुळसीची माळ धारण करून एकादशी व्रत आचरावे. घरोघरी हरीदास व्हावेत अशी श्रीतुकाराममहाराज यांनी आपली उत्कट इच्छा व्यक्त केली आहे. ही माळ ज्याचे गळ्यात आहे. त्याला माळकरी म्हणतात. वारी करणारा वारकरी आणि हाती टाळ धरणारा टाळकरी होतो. वारकरी आणि वारी केव्हातरी करी, माळकरी माळ तुटली तरी, आणि टाळकरी

पण टाळाटाळ करी याला अर्थच नाही. ब्राह्मणाचे जानव्याइतके वारकरी पंथात माळेचे महत्व आहे. गळ्यातील माळेकडे लक्ष गेले तरी भगवत्स्मरण व्हावे, हाच त्याचा मुख्य उद्देश आहे. वारकरी संप्रदायात गळ्यात माळ आहे तर रामदासी पंथात हातात माळ दिसून येते. माळेवर जप करणे हेच त्याचे सूत्र आहे. ''काष्ठाच्या पादुका स्वामींच्या पायात । स्मरणी हातात तुळशीची।।'' असेच भागवत धर्माचे कळस श्रीतुकाराममहाराज यांनी श्रीसमर्थांचे संबंधी आपल्या अभंगात वर्णन केले आहे. श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांचा जन्म मुळी नामासाठी, ''जयाचा जनी जन्म नामार्थ झाला । जयाने सदा वास नामात केला । जयाच्या मुखी सर्वदा नाम कीर्ती । नमस्कार त्या श्रीब्रह्मचैतन्य मूर्ती ।।'' असे ज्यांचे महात्म्य आहे त्या महात्म्यांचे हाती माळ असून, श्रीब्रह्मानंदांचेपासून, श्रीकेतकरमहाराजांचेपासून, सर्वांना त्यांनी माळेचेच महत्व दाखवून दिले आहे. उत्तर हिंदुस्थानात मीराबाई महान भगवत भक्त झाल्या. त्यांचे हातीही ही माळ विलसत होती. ''गलेमे सैली हाथमो सुमरनी। जपत जपत घर जावू रे ।।'' असेच त्यांनी आपल्या पद्यात म्हटले आहे. ''ऐसी माला अंतःकरणी । गुंफोनि ठेविली श्रीराम चरणी । सोऽहं तंतू अखंडपणी। खंडोचि नये।।'' ही समर्थांची ओवी मोठी चिंतनीय आहे. तात्पर्य काय सर्व संप्रदायांतून अंतर्बाह्य माळेचे महत्व अबाधितपणे स्पष्ट आहे, यात प्रश्नच नाही. ही माळ आजकाळची नसून अगदी अनादी कालापासून परंपरेने आलेली आहे. पूर्वीचे ऋषीमुनीदेखील वर्णमालेने जप करीत असत. त्यात तर मन भरकटण्याचा कोठे प्रश्नच येत नाही. इतकी ती महत्वाची आहे. या माळेसंबंधी अंतरंग उकलून दाखविणारे श्रीतुकाराममहाराज यांचे काही चरण सतत विचारात घ्यावेत इतके श्रेष्ठ आहेत. ते म्हणतात, ''तेरा मणियाची माळ एकवट । हाता ये

वैकुंठ सदा सुख।।'' किंवा ''आमुचे माळे दोन मणी । तया नाही मेरू मणी।'', तेरा मण्यांची माळ जर नामस्मरणात एकवटली तर हाती वैकुंठनाम परमात्मा येतो किंवा आमच्या माळेला दोनच मणी आहेत, यामुळे त्यात मेरूमणी ओलांडण्याचा प्रश्नच येत नाही. स्मरण सतत होत रहाते. अशा प्रकाराने नाम हे माळेवर घेतले असताना, त्यात द्वैताचा विचार आत प्रवेशच करू शकत नाही. म्हणून आमचे श्रीमामा या अभंगाच्या पहिल्या कडव्यात म्हणतात, ''माळ धरोनिया रामनाम घेता । द्वैताची तो वार्ता नुरे काही ।।'' हा सारा विषयच अनुभवाचा असल्याने येथे द्वैतमूलक विचार आणि तदनुषंगिक बडबड ही शिल्लक रहात नाही. ''सर्वत्र अद्वैत खरे ब्रह्मज्ञान । अनुभवा वाचुन बडबडते ।।'' हे श्रीतुकोपनिषद येथे विचारात घेणेसारखे आहे.

यादृष्टीने अभंगाच्या दुसऱ्या कडव्यात ''सर्वत्र अद्वैत उरेल गोविंद । रामनाम छंद मनोमाळे ।।'' या मामांनी सांगितलेल्या वचनाप्रमाणेच आमचे मामा होते. ते अजातशत्रू होते. ''निर्वैर व्हावे सर्व भूता सवे'' ही तुकोक्ती त्यांच्या अंगी मुरली होती. म्हणून सर्व पंथातील अध्वर्यूपासून सारे त्यांच्याकडे येत असत. हा एक कोणी आपलाच आहे असे त्यांना वाटावयाचे, हे मामांच्या स्वभावातीलच एक वैशिष्ठ्य होते. ते कोठेच रुपले नाहीत, खुपले नाहीत. ते कोठेच रुपले नाहीत हीच एक बाब काहींना खुपत होती, हे वेगळे. पण असे हाताच्या बोटावर मोजावेत इतके होते असेही म्हणणे थोडे अवघडच. असे सर्वत्र अद्वैत असणारे आमचे मामा, त्यांना मनोमाळेने नाम घेण्याचा मोठा छंद होता. त्यांचे जीवन हे नाममय झाल्याची साक्ष संत सज्जनानांही आलेली आहे. मनोमाळेचे महत्व श्रीकबीरसाहेबांनी सांगितले आहे. ते म्हणतात ''मनमो

माला मनमो मुद्रा । मनमो जाप करे ।।'' या वचनावरून मनोमाळा ही आगळीच, असेच म्हणावे लागेल. 'ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी' ''पांडुरंग ध्यानी पांडुरंग मनी'' ''अखंडीत ध्यानी । पांडुरंग जपा मनी ।।'' ही अध्यात्मातील श्रीज्ञानेश्वरांची, श्रीतुकयांची आणि श्रीजनाबाईंची, पाणिनी सारखी छोटी सूत्रे विचारात घेणे सारखी आहेत. या मनोमाळेचे स्वरूप सांगताना मामांनी तिसऱ्या कडव्यात ''संकल्पात राम विकल्पात राम । मनोमाळा उत्तम जाणावी ही ।।'' असे म्हटले आहे. ''संकल्प विकल्पात्मकं मनः'' असे जगद्गुरु श्रीशंकराचार्य म्हणतात. संकल्प आणि विकल्प हेच खरे तर मनाचे स्वरूप आहे. याच दोनी कट्टीवर जर नाम हे कट्टाने बसले तर मग ती मनोमाळच चालू झाली. मनोमाळेने नाम घेताना संकल्प आणि विकल्प हे नाममय होतात आणि जीवाला आत्मसाक्षात्कार होतो. मनाचे महत्वच शिल्लक रहात नाही. श्रीमामा आपल्या एका अभंगात म्हणतात, ''संकल्पे विकल्पे रामनाम घेता । मग भेटी तत्त्वता अनायासे।।'' यावरून येथे काय म्हणावयाचे आहे ते स्पष्ट होत आहे. अभंगाचे शेवटच्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, ''गोविंद म्हणे धरी रामकृष्ण माळा । नामी राहील उमाळा अखंडीत।।'' मनोमाळे पलीकडे हे मन ज्या जीवभावाचे अस्तित्वावर कार्यरत आहे, तो जीवभाव म्हणजे रामकृष्णवाचा. ही जर नाममयच झाली, तर तीच रामकृष्ण माळा आहे. ''रामकृष्णवाचा भाव हा जीवाचा'' या उक्तीने श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी रामकृष्णवाचा हा जीवाचा भाव आहे हे दाखवून दिले आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी हाच विषय ध्यानाचा केल्याने, हृदयात श्रीमूर्तीं अविर्भूत झाली. ते म्हणतात, ''ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण माळा । हृदयी उमाळा श्रीमूर्ती रया ।।'' ''रामकृष्ण मूर्ती या जपा आवृत्ती । नित्य नामे तृप्ती झाली आम्हा ।।'' हा श्रीनिवृत्तीनाथांचा चरण येथे चिंतनीय आहे. चिमड संप्रदायात माळ

नाही असे वाटते ना? पण श्रीगोपाळकाका कोटणीस म्हणतात ''मुक्ता माळा पाहता तल्लीन वृत्ती हरोहरि । चढता उतरता माळ लागली राम कृष्ण हरी ।।'' ही माळ कोणती असा प्रश्न आहे. माळ बाहेर नसेल, पण आत आहे हे येथे स्पष्टच होत आहे. आमचे भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज म्हणतात,''हरीनामाची माला दिधली । आत्मस्वरूपी वृत्ती वेधली ।।'' हरिनामाची माला, वृत्तीने आत्मस्वरूपाचा वेधच घेत असते. हा वेधच येथे महत्वाचा आहे. सुषुम्नाकार जीवन ही हरीनामाची माला नव्हे काय? असा प्रश्न आहे. ''राम कृष्ण माला घाली पा अढळ'' हे श्रीज्ञानेशवचन कोणत्या अर्थाने आहे याचा विचार करता 'रामकृष्ण' हे शब्द संतवाङ्मयात काय दर्शवितात त्याची कल्पना येईल. म्हणून या अभंगाचे शेवटच्या कडव्यात मामा सांगतात, ''गोविंद म्हणे धरी रामकृष्ण माळा । नामी राहील उमाळा अखंडीत ।।'' रामकृष्ण माळेने नामाचा उमाळा आणि त्याचबरोबर होणारा साक्षात्कार हाही अखंड रहातो. ''स्वस्वरूपी लागला डोळा । निजतेजाचा हाचि उमाळा ।।'' या श्रीमुकुंदराजांचे वचनाचा विचार नेहमी ध्यानी घ्यावा असा आहे. नामाचा व त्याबरोबरच रुपाचा उमाळा अखंड झाला की माळेने नाम अखंडच होत रहाते, असे खरेखुरे माळेचे अंतर्बाह्य महत्व आहे.

*****

## २०.

**जपोनी जपणे जप बोलिलासे ।**
**वाया जात असे काय देही ।।१।।**
**कायेमाजी व्यर्थ जात असे नाम ।**
**तेचि घेणे काम नरदेही ।।२।।**
**जेणे योगे झाला हनुमान देव ।**
**जपे स्वयमेव रामनाम ।।३।।**
**गोविंद म्हणे जप अंतरी करणे ।**
**तुटेल धरणे संसारीचे ।।४।।**

या संदर्भात आमचे ती प.पू.श्रीमामांनी जपाचे महत्व आणि जप कसा व्हावयास पाहिजे, तेच मुख्यतः सांगितले आहे. व्यवहारात 'जप' आणि परमार्थात 'जप' हा शब्द जीवनाशी अत्यंत निगडीत आहे. काही लोकांना रोजचे भविष्य, आठवड्याचे भविष्य, महिन्याचे फार काय वार्षिकही बघण्याचा मोठा छंद असतो. पण त्यात देखील एक मौज मोठी पहाण्यासारखी असते. कुठलीही जरी रास असली तर त्यात काही ग्रह अनुकूल व प्रतिकूल हे प्रत्येकाच्या कुंडीलीत असतातच. यामुळे काही उलट सुलट जरी गोष्टी त्यात सांगितल्या असल्या तरी, शेवटी एक वाक्य अगदी ठरलेलेच असते, ते म्हणजे 'जपून रहा', मग आमचे म्हणणे वरचे भविष्य वाचणेची जरुरीच काय ? आयुष्यभर जपलेच म्हणजे झाले. म्हणजे मग कोणता धोकाच नाही. हेच शेवटी खरे आहे. जपण्याचे महत्व मोठे. मुलगा परदेशी शिकावयास जावयाचा होता. आई वडील सारखे आठ दिवस काही पढवत होते. एकाने शेजारचे गृहस्थाकडे चौकशी केली, आठ दिवस मुलाला आईवडील इतके सारखे काय सांगत होते,

तुम्ही त्याचे शेजारीच असता म्हणून विचारले. काही नाही हो, जपून रहा, येवढेच आईवडील सांगत होते, असे त्या गृहस्थांनी सांगितले. पुन्हा विचारणा झाली, 'जपून रहा' अशी काही त्या आईवडीलांनी हातात जपमाळ घेतली होती? नव्हे हो, साऱ्या सांगण्याचा निष्कर्ष जपून रहा. पुढे मुलगा परदेशी जाताना आईवडील मुंबईला पोहोचवणेसाठी विमानतळापर्यंत गेले. पुढे ज्याचा तो रे. परदेशी ज्याचा तो, मग परलोकी बरोबर कोण येणार? हा प्रश्नच आहे. मुलगा विमानात बसणेसाठी निघाला, आईवडीलांनी डोक्यावर, पाठीवर हात फिरवला आणि म्हणाले, 'जप हं.' वेदांनी, शास्त्रांनी, पुराणांनी आणि संतांनी जीवाला दिलासा देणेसाठी अनेक अनेक सांगितले खरे, पण त्याचा निष्कर्ष 'जप' येवढाच आहे. ''वेद अनंत बोलिला अर्थ इतुकाची साधीला'' ही श्रीतुकोक्तीच खरी आहे. व्यवहारात जप हा शब्द अगदी व्यापक आहे. जप म्हणजे प्रकृती जप, पैशांचे पाकीट जप, सामानसुमान जप, आपली संस्कृती जप, एक ना दोन. वट्टात सारेच जप. तशाप्रमाणे साक्षात्कारी जीवनात सहजतेने स्वयंसिद्ध, स्वयंपूर्ण, स्वयंस्फूर्त, स्वयंचलित, स्वसंवेद्य, स्वयंध्वनीरूप चैतन्याचा सर्वत्र घुमणारा शब्द हा जपून, तेथे समरस होणे यालाच खऱ्या अर्थाने संत महात्मे जप असे म्हणतात. पण हे सारे जाणून घेतले तर. जे फुकट चालले आहे ते जपायचे आहे.

चैतन्याने प्राप्त होणारी उत्साहवर्धक शक्ती मनुष्य मात्र व्यवहाराने गमावीत असतो. ती स्वस्थतेने संपादित केली असता आत्मसमाधान निश्चित मिळते. आत्मसमाधानासारखे जगात समाधान नाही. सारे काही मिळाले पण आत्मसमाधान लाभले नाही, मग त्याने मिळविले तरी काय असा प्रश्न आहे. कामाने झीज व विश्रांतीने भर हे शरीरशास्त्रही सांगते. विश्रांतीच खरी शक्तिवर्धक आहे. ती खऱ्या अर्थाने प्राप्त झाली तर

मानसिक उत्साहाने जीवनमात्र व्यवहारी जगातही कार्यक्षम होऊन आत्मसमाधानी राहतो. म्हणून फुकट जाणारी शक्ती कशी जपता येईल याचा पाठपुरावा केला पाहिजे. झोपेत विश्रांती आहे, पण तो आत्माराम घोररूपाने प्रगट झाल्याने प्राणिमात्र बिनघोर होतो आणि जागृत होताच घोररूपाने प्रगट झालेला आत्माराम जिथल्यातिथे जाऊन तो गुप्तपणे जगाची साक्ष देतो.  त्या आत्मारामाची आणि जीवाची गाठच पडत नाही. ही गाठ पडून नादानुसंधानात जीव जर रममाण झाला तर, ते जीवन अमृतमय आहे, साक्षात्कारी आहे यात प्रश्नच नाही. ही खूण गुरूकृपेने ज्यांनी साधली, त्यांनाच जप हा शब्द संत वाङ्मयात कोणत्या अर्थाने येतो हे जाणून घेता येईल. म्हणून श्रीमामांनी या अभंगाच्या पहिल्या कडव्यात म्हटले आहे, ''जपोनी जपणे जप बोलिलासे । वाया जात असे काय देही ।।'' नदी-बूड जमीन आहे. शेतकऱ्यांनी नुसते पाटातून पाणी फिरविले की पीक भरघोस येणार आहे. त्याला ढगाकडे बघायचे कारणच नाही. पण हे घडले नाही, तर तो कमनशीबीच म्हटला पाहिजे. जीवनात असणारा चैतन्याचा ध्वनी साधला तर सारे जीवन साक्षात्काराने उजळून निघते. मग सुखाला कमीच काय? ''म्हणोनी जाणतेनि गुरु भजिजे । तेणेचि कृतकार्य होईजे । जैसे मूळ सिंचने सहजे । शाखा पल्लव संतोषती ।।'' मुळाला पाणी घातले की ते शेंड्यापर्यंत येते, पण शेंड्याला मारलेले पाणी मुळाकडे जात नाही. नुसत्या देहसुखाने सुखी होण्याचा प्रयत्न हा शेंड्याला पाणी मारण्यापैकीच आहे. पण चैतन्य नामानुसंधानाने सर्व सुखसमृद्धी, तेथे काही दैववशात असो नसो ती होतच रहाते. ''समाधान त्यांची इंद्रिये सकळ। जया तो गोपाळ ध्यानी मनी ।।'' हे श्रीतुकोपनिषद डोळ्यासमोर ठेवावे असे आहे.

या सर्व दृष्टीने  अभंगाच्या दुसऱ्या कडव्यात ''कायेमाजी  व्यर्थ

जात असे नाम । तेचि घेणे काम नरदेही ।।'' असे श्रीमामांनी स्पष्ट केले आहे. कायेत फुकट जाणारे नाम घेणे अगत्याचे आहे. ''औट हाताचा मळा रे । राबती बारा सोळा रे । विधातियाने जप मांडिला । अमृताच्या वेळा रे ।।'' ही श्रीसमर्थोक्ती येथे चिंतनीय आहे. हा जप विधात्याने मांडला असून तेथे श्रवणाकार होऊन राहणेच महत्वाचे आहे. ''जप तो अंतरीच करावा । जप कोणासी कळो न द्यावा ।। जैसा का कृपणाचा ठेवा । तैशापरी ।।'' हे समर्थांनी आवर्जुन सांगितले आहे. जप लोकाला दाखविणेसाठी नसून त्याचा संबंध कोठे तरी अंतरी आहे. ''नाम घेता अंतःकरणी । साह्य होय चक्रपाणी।।'' असे समर्थांनी म्हटले आहे. ''नामजपयज्ञू तो परम । बाधू न शके स्नानादि कर्म। नामे पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थे ।।'' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी नामजपाचे स्वरूप दाखवून दिले आहे. या नामाने श्रीमारुतीराय हे प्रत्यक्ष देवच झाले. त्यांनी अंतर्बाह्य नामसाधना केली. आत नामसाधना असल्यावर बाहेर तरी मग दुसरे काय येणार आहे. ''आत असे तरी प्रगटे बाहेरी। काय ते कस्तुरी सांगो लागे ।।'' हे श्रीमामांचे वचन विचारात घ्यावे असे आहे. नाम रोमरोमी भिनले तर त्या जीवनात दुसरे काही रहातच नाही. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ''माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा लागलासे।।'' असा श्रीतुकाराममहाराजांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. या शरीरात श्वासोश्वास ही क्रिया अनैच्छिक आहे. ती आपल्या इच्छेवर नाही. पण ती आहे, ती मात्र सतत आहे. त्याप्रमाणे या श्वासात असणाऱ्या नामाचीही तीच अवस्था आहे. येथे त्या नामाला आवर घालणेच कठीण आहे. याकरता या अभंगाच्या तिसऱ्या कडव्यात श्रीमामा म्हणतात. ''जेणे योगे झाला हनुमान देव । जपे स्वयमेव रामनाम ।।'' रामनाम हे स्वयमेव आहे. एकादशीच्या दिवशी सकाळपासूनच खाण्याचे काम चालू होते. शेंगदाणे तयारच आहेत. आणायचे मग शिजवायचे हा

तेथे प्रकारच नाही. तसे नाम घेत रहावयाचे हेच खरे. त्यात काय करावे लागते? असा प्रश्न आहे. या प्रकाराने हा जप एकदा अंतर्यामी सुरु झाला की प्रपंचाचे धरणे सुटलेच म्हणून समजावे. दिननिशी होणारे सायास म्हणजे प्रपंच. ''सायास करीसी प्रपंच दिननिशी ।'' असे श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी आपल्या हरिपाठात सांगितले आहे. या सायासात नामाकडे लक्ष जातच नाही. म्हणून पुढे ''हरिसी न भजसी कवण्यागुणे'' असा विषय स्पष्ट केला आहे. ''ज्ञानदेव म्हणे हरिजप करणे । तुटेल धरणे प्रपंचाचे ।।'' हरिजपाने सायास नाहीसे होतात. प्रपंचात तो जीव अलिप्तपणे रहातो. प्रपंचाची बाधा त्यास होत नाही आणि तो या भवसागरातून परपार होतो. ''राम जपो राम जपो राम जपो रे । भवजल भवजल पार करो रे।।'' असे श्रीकबीरसाहेब या दृष्टीनेच म्हणतात. या नादानुसंधानात जीव हा शिवरूप होऊन रहातो. ''अंतरात नाद कसा घुमतसे पहा । नादमयी जहाल्या शिव कळतसे अहा ।।'' या उक्तीप्रमाणे त्या जीवांची सहजच स्थिती होते. म्हणून श्रीमामा या अभंगाच्या शेवटच्या कडव्यात सांगतात, ''गोविंद म्हणे जप अंतरी करणे । तुटेल धरणे प्रपंचाचे।।'' हा शोध साधकांनी आपल्या अंतरी घेणेचा आहे. ''ऐका हो दादाभाई । अंतरीच शोधुनी पाही । वेदांनी कथिले काई । ते सोडुनि करीसी काई ।।'' असे श्रीचिमडचेमहाराज यांनी यादृष्टीनेच म्हटले आहे.

*****

## २१.

**नाम उच्चारणी धरावी आवडी ।**
**याविण तातडी करू नये ।।१।।**
**रामकृष्ण हरी उच्चारिता वाचा ।**
**वंश त्या नराचा पुण्यवंत ।।२।।**
**शिवाचे अंतरी रामनाम आहे ।**
**वाचे पैल जाये तरीच कळे ।।३।।**
**गोविंद म्हणे पुण्य होईल अगाध ।**
**हाचि धरी बोध आन नसे ।।४।।**

नाम उच्चाराची आवड ही परमार्थात अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. नामाचा उच्चार म्हणजे नामच नादरूपाने प्रगट होत असते. नाम म्हणजे शब्द नव्हेत, अक्षरे नव्हेत, ते देणे सारखे नाही, घेणेसारखे नाही, सांगण्यासारखे आणि ऐकण्यासारखे नाही. नाम हे जीवनाशी निगडीत असते. नादब्रह्म सर्व विश्वात दुमदुमत राहिले आहे. नाम म्हणजे मंत्र नव्हे. नाम म्हणजे तंत्र नव्हे. शरीराचा आणि मनाचा खेळ नव्हे. कपोलकल्पीत तर नव्हेच नव्हे. नामातच आत्माराम प्रगट होतो, असा त्याचा साक्षात्कार आहे. ''एका जनार्दनी नाम । नामी प्रगटे आत्माराम ।'' असा श्रीनाथमहाराजांचा अनुभव आहे. नामाने नामी प्रगट होतो. तेथे ना 'मी' अशी अवस्था होते. 'मी' हा शिल्लकच रहात नाही. मीचाच जेथे विसर, तेथे मीला चिकटलेले माझे रहाणारच कसे? असा प्रश्न आहे. ''मी माझे ऐसी आठवण । विसरले जयाचे अंतःकरण । पार्था तो संन्यासी जाण । निरंतर ।।'' असे याचे महत्व श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी स्पष्ट केले आहे. ''ऐसा घेई का संन्यास । करी संकल्पाचा न्यास ।।'' या

श्रीतुकोपनिषदाप्रमाणे संकल्पाचा न्यासच येथे झालेला आहे. ‘लुब्धली नादी की लागली समाधी ।’ ही श्रीतुकोक्तीच येथे सार्थ होत आहे. ‘‘मननात् त्रायते इति मंत्रः’’ हाच मंत्र येथे दृग्गोचर होत आहे. मनाच्या पलीकडील ही अवस्था आहे. ‘मन तर’ म्हणजे मनाच्या पलीकडे जाणे हाच तो मंत्र आहे. नादात मनाचा लयच होत राहिला आहे. ‘‘अनुहत नगारा हमेशा बजाये । गगनहालमो गैब ज्योती लगाये । दिया दस्त पंजा किया मेहरबानी । कहे सिद्धलिंगा गुरूकी निशानी ।।१।। दिखाया सरीखा नही क्या दिखाऊ । लिखाया सरीखा नही क्या लिखाऊ । हमारे गुरूसे अकलसे बताया । निराकार वस्तू उसीमें मिलाया।।२।।’’ असे श्रीचिमडच्या महाराजांनी स्पष्ट केले आहे. गुरूकृपेने हे नाम जाणून घेणे हे आवश्यक आहे. ‘‘जाणुनी जे जन धरतील पंथ। ते ते झाले तवपदी संत ।।’’ असे श्रीचिमडचे महाराज यांनी सांगून ठेवले आहे. ‘नाम जाणे तुकया वाणी’ या उक्तीप्रमाणे श्रीतुकाराममहाराज यांनी हे नाम जाणले आहे. ‘‘उघडा मंत्र जाणा रामकृष्ण म्हणा । तुटती यातना गर्भवास ।।’’ या वचनात श्रीतुकाराममहाराजांनी चांगलाच प्रकाशझोत टाकला आहे. हा मंत्र निरुपाधिक आहे. ‘‘नारायण हरी उच्चार नामाचा । तेथे कळीकाळाचा रीघ नाही ।।’’ दिक्काल आकाश यांच्या अतीत नाम असल्याने त्या उच्चारात कळीकाळाचा प्रवेश नाही, ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची अनुभूति आहे. ‘‘हरी उच्चारणी अनंत पापराशी । जाती विलयासी क्षण मात्रे।।’’ या हरीपाठातील चरणाप्रमाणे अनंत पेशींचे बनलेले शरीर आरपार बदलून जाते. पापवृत्ती आणि देहासक्ति याला येथे थाराच रहात नाही. कंठातून अन्नपाणी जाते तसेच ते श्वसनाचेही स्थान आहे. श्वासात नाम असल्याने त्याचा संबंध कंठाशी येतो. ‘कंठगत नाम । खोले तुझे अंतर्याम ।’ हा चरण येथे चिंतनीय आहे. नामाची गती कंठात आहे. ‘‘नाम श्वासोश्वासी

असे ।'' हे श्रीसमर्थ प्रतिपादन करतात. यादृष्टीने ''नाम उच्चारिता कंठी । पुढे उभा जगजेठी ।'' असा निर्वाळा श्रीतुकाराममहाराज यांनी दिला आहे. ''दहा नये वीसा नये पन्नासा नये साठाही नये ।'' या वचनात पैशाने नाम मिळत नाही हे श्रीतुकाराममहाराज यांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे. ''नामाची आवडी। तोचि जाणा देव ।'' हे श्रीतुकोपनिषद चिंतनीय आहे. गोडीने नामाची जोड झाली तर आवड निर्माण होते आणि हे पूर्व सुकृताने घडते. ''ज्ञानदेवा गोडी हरीनामाची जोडी। रामकृष्णी आवडी सर्व काळ ।।'' हा श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा चरण अत्यंत बोलका आहे. रामकृष्णी आवडी ही जीवननिष्ठा आहे. ''बहुता सुकृताची जोडी । म्हणुनी विठ्ठली आवडी ।'' हेच श्रीज्ञानेश्वरवचन या विषयाची आवड सर्वांनाच का होऊ नये हे दाखवीत आहे. या सर्व दृष्टीने या अभंगाचे पहिल्या कडव्यात ''नाम उच्चारणी धरावी आवडी । यावीण तातडी करू नये ।।'' असे आमचे ती.प.पू. श्रीमामांनी सांगितले आहे. हाच विषय श्रीतुकाराममहाराज वेगळ्या शब्दात सांगतात. ''संतसमागमी धरावी आवडी । करावी तातड परमार्थाची ।'' किंवा ''तुका म्हणे तातड करू । पाय धरू बळकट ।'' या नामाची आवड किती महत्वाची आहे हे सांगताना ''आवडी भुकेली तिने गिळीले गगन ।'' असे श्रीनाथमहाराज सांगतात. आकाशाचा ग्रास झाला की मग आत्मानुभव वेगळा राहिलाच नाही असे या आवडीचे महत्व आहे.

अभंगाच्या दुसऱ्या कडव्यात ''रामकृष्णहरी उच्चारिता वाचा । वंश त्या नराचा पुण्यवंत ।।'' असे श्रीमामांनी म्हटले आहे. रामकृष्णहरी म्हणजेच अकार उकार मकार किंवा सकार हकार मकार अगर रकार अकार मकार. इडा, पिंगला, सुषुम्ना या त्रिवेणीत प्रकर्षाला येणारा चैतन्याचा तो ध्वनि आहे. या ध्वनीत मनाचा लय झाला की जीवन उर्ध्वगामी होते.

त्याचा संबंध कोठे तरी वर येतो. म्हणून उत् + चर यापासून उच्चार हा शब्द होतो. यावरून येथे काय अभिप्रेत आहे हे स्पष्ट होईल असे वाटते. ''नमना एवढा मंत्र । नाही नाही धुंडिता शास्त्र । विचार लक्षण पात्र । तेचि जाणे येथिचे ।।'' ही ज्ञानेश्वरमाऊलींची ओवी येथे चिंतनीय आहे. मनाचे मनत्व हरपून जाणे हाच तो मंत्र आहे. नामाचा उच्चार हा पुण्याईचा डोंगरच आहे. यामुळे ज्याठिकाणी अखंड नामानुसंधान आहे, त्याचा सारा वंशच पुण्यवंत आहे. अर्थात् हे नाम देखील शिवाचे अंतरी आहे. फार काय तो शिवाचा आत्मा आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा । आत्मा जो शिवाचा रामजप ।।'' रामकृष्ण वाचा हा जीवाचा भाव असून रामजप हा तर शिवाचा आत्मा आहे. रामकृष्ण ही जीवनाची गति आहे. त्यावरूनच जीवाचे अस्तित्व जाणवते. अर्थात् या नामानुसंधानात राहणे इतके सहज सुलभ नाही. त्याला थोडी जा - ये ठेवली पाहिजे म्हणजे मग ते जमत जाते. जसे लग्न झालेली मुलगी माहेरी-सासरी, सासरी-माहेरी करता करता, मग ती सासरी रममाण होते. तसाच काही येथे प्रकार आहे. जीवाला अंतर्मुख होणे हे कठीण असलेने आणि तो निसर्गतःच बहिर्मुख असलेने, अंतरी जा आणि ये, ये आणि जा असे केल्याने, अंतर्मुख साधनेतच स्थिर होतो आणि म्हणूनच श्रीमामा म्हणतात, ''वाचे पैल जाये तरीच कळे ।'' ही जा-ये ठेवण्याची साधना हा अभ्यासच आहे. ही एक प्रत्यग्वृत्तीची भेट झाली. प्रत्यय घेऊन येणारी वृत्ति ती प्रत्यग्वृत्ति होय. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ''प्रत्यग्वृत्ति येरझारी । तुझ्या दर्शनाची हरी ।'' श्रीनानामहाराज बर्वे एक कणकवलीचे सत्पुरुष, कोल्हापूर येथे श्रीमंत वालावलकर यांचेकडे आले की, ते सांगलीत आमचे घरी येत. ते विदेही संत होते. मामा आणि आम्ही वर्गबंधु, असे सांगत. त्यांना कोणी विचारले तुम्ही कोठे असता? तेव्हा ते म्हणाले जाऊन

येऊन, येऊन जाऊन असतो, पण त्यांची भाषा कळणार कोणाला? असा प्रश्न आहे. ''परेहोनी परते घर । तेथे राहू निरंतर ।।'' असे श्रीनामदेवमहाराज म्हणतात. हेच ज्यांचे घर झाले, तेथे ज्यांचे जाणे येणे सुरू झाले, त्या वाचेपैलच नाद ब्रह्माचा प्रकाशरूप साक्षात्कार होतो. चारी वाचा कुंठित झाली की ही अनुभूती येते. असे यात मोठे औचित्य आहे. अशाप्रकारे या साधनेत आल्यावर ते अगाध पुण्य आहे आणि परमार्थाचा हा खरा बोध आहे. या बोधस्थितीत अवांतर साधनांची जरुरीच रहात नाही. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''जववरी अर्जुना । तो बोध भेटेना मना । तवचि या साधना । भजावे लागे ।।'' या ठिकाणी ''बोधी बोधिले बोधिता नये ऐसे झाले । बाप रखुमा देवीवरू विठ्ठले माझे मीपण हारविले ।।'' असा अनुभव श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी स्पष्ट केला आहे. याठिकाणी ध्येय-ध्यात-ध्यान, ज्ञेय-ज्ञाता-ज्ञान, गेय-गाता-गान अशा प्रकारची त्रिपुटीच रहात नाही. ही बोधस्थिति सांगताना या अभंगाचे शेवटच्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, ''गोविंद म्हणे पुण्य होईल अगाध । हाचि धरी बोध आन नसे ।।'' असे रहस्य प्रगट केले आहे. ही अवस्था साधकाला प्राप्त होणे हाच खरा बोध आहे. यापेक्षा वेगळा बोधच नाही. ''धन्य हा रघुनाथप्रिय साधु । सद्गुरुवचने करी बोधू ।।'' या श्रीचिमडचे महाराज यांचे उक्तीप्रमाणे हाच बोध मुमुक्षूंना, श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चिमड यांनी केला आहे. यापेक्षा काय सांगावे?

*****

## २२.

**एकांत बाणता लोकांतात हरी ।**
**प्रगट बाहेरी आत दिसे ।।१।।**
**कोणा एकामाजी होत असे अंत ।**
**पहावे चित्तात विचारोनी ।।२।।**
**एक असे आत्मा ज्यात आदि अंत ।**
**तो स्वये एकांत ओळखावा।।३।।**
**गोविंद म्हणे तया स्थानामाजी जाता ।**
**रामनाम वार्ता दूर नसे ।।४।।**

एकांत बाणला तर हरीचा साक्षात्कार अंतर्बाह्य होतो. हे या अभंगात सूत्रमय व रहस्यपूर्ण रितीने आमचे प.पू. ती. श्रीमामा यांनी सांगितले आहे. परमार्थात एकांताला फार मोठे आगळे महत्व आहे. एकांतातच आत्मज्ञानाचा साक्षात्कार होतो. संतांनी हा एकांतच साधला. ''बहु एकांतावरी प्रीती । जया जनपदाची खंती । जाण मनुष्याकारे मूर्ती । ज्ञानाचि तो ।।'' जगापासून दूर एकांतावर ज्याचे खरे प्रेम आहे तो मनुष्याकारे ज्ञानाची मूर्तीच आहे, असे श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी म्हटले आहे. संत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, प्रतिभासंपन्न कवी हे सारे एकांतप्रिय दिसून येतात. त्यांचे खरे विश्वच वेगळे आहे आणि त्या विश्वाचे ते सम्राट आहेत. विश्वच वेगळे म्हटल्यावर तेथील अनुभूतीही तशीच निराळी आहे. पुस्तक वाचून ज्ञान होत नाही. पण एकांतवासात प्रगट होणाऱ्या आत्मज्ञानाने पुस्तकांचा उकल होतो. नकाशावरून प्रवास करण्यापेक्षा, प्रवास करून नकाशा काढलेलाच चांगला, यात प्रश्नच नाही. भागवत धर्माचे कळस श्रीतुकाराममहाराज एकांतवासी होते. ''वृक्षवल्ली आम्हा

सोयरी वनचरे। पक्षीही सुस्वरे आळविती ।।'' अशा एकांत स्थळीच त्यांनी अभंगात वर्णिल्याप्रमाणे त्यांचे उभे आयुष्य गेले. जनसंपर्क न साधता त्यांनी एक चैतन्याचाच संपर्क अहोरात्र साधला. एकांतानेच हा देहसंबंध सुटून जीवनाशी संबंधित असणारा आत्मसंबंध हा सर्वदा संबंधित राहील, असेच त्यांना दिसून आले. ते म्हणतात, ''घडे एकांताचा वास । तरीच नाश या समंधाचा ।।'' देह हा समंधासारखा मागे लागलेला आहे, पण त्याचा नाश एकांत साधल्यानेच होतो. असेच त्यांचे म्हणणे आहे. ''उगाच एकांती बैसावे । तेथे हे समजोन घ्यावे । घ्यावे आणि सांडावे । प्रभंजनासी ।।'' ही समर्थांची ओवी मला आवडणारी आणि अत्यंत बोलकी आहे. उगाच या शब्दाचा अर्थ येथे उगेपणामध्ये येऊन, असाच अभिप्रेत आहे. मूल रडू लागले की आई त्याला उगी, उगी म्हणून थोपटते व तेथेच त्याची समाधी लागते. आयुष्याने मोठे असणारे जीव प्रत्यक्ष रडत नसले तरी ते दुःखी कष्टीच असतात. उगेपणात येणाऱ्या स्वस्थतेनेच त्यांचा अस्वस्थपणा जातो. म्हणून उगेपणाच येथे महत्वाचा आहे. ''उगीयाची माथा ठेविजे चरणी । हेचि भले ।।'' हे श्रीज्ञानेश्वरीतील सूत्र येथे चिंतनीय आहे. उगेपणानेच जीवनात भलेपणा प्राप्त होतो. उगेपणात येणारा जीव हा द्रष्टा होतो. तो नट होऊन देहाचे सुखदुःखाशी समरस होत नाही. देह हा एक या जगातील नाटकाचे मंचकावर जीवाने घेतलेला एक वेषच आहे. ''बहुरूपी याची रावो राणी ।'' अशीच श्रीज्ञानेशोक्तिप्रमाणे जीवनाची अवस्था आहे. आपली भूमिका जे वठवतात, ते कोठेतरी वठून जातात. पण ही भूमिका आहे. आपण कोणी वेगळेच आहोत, हे ज्ञान एकांताने झालेले, आत्मसुखी आत्मतृप्तच रहातात. ''तुका म्हणे उगे रहावे । जे जे होईल ते ते पहावे ।।'' येथे उगे रहाणेच श्रेयस्कर आहे. ''श्रेयस आणि प्रेयस'' जाणले पाहिजे. प्रेयस कळले की श्रेयस वेगळे नाही आणि हेच खरे श्रेयस्कर आहे. म्हणून श्रीसमर्थ

म्हणतात, उगेपणात येऊन स्वस्थपणाने एकांतात वृत्तीची बैठक साधली असता,''वृत्ती पै बैसली पद्मासनी'' हे श्रीज्ञानेश वचन अनुभवीत असता किंवा ''बैसका न मोडे मानसीची'' अशी अवस्था साधली म्हणजे, ''सुनिश्चळु होय अंतरी'' या श्रीज्ञानेश्वरांचे उक्तीप्रमाणे अंतरी एकांतात निश्चळ झाल्याकारणाने, त्या ठिकाणी हे सर्व काही समजून येते. कोणी म्हणेल मग येथे करायाचे तरी काय? तर समर्थ म्हणतात, ''घ्यावे आणि सांडावे प्रभंजनासी'' या चरणात सांडावे हा शब्द महत्वाचा आहे. पाणी सोडणे म्हणजे मनातील विचार बाजूला करणे. पण पाणी सांडणे हे सूर्याला अर्ध्य देणे आहे. सूर्य हा जगाचा आत्मा आहे आणि आत्मा हाच सूर्य आहे असे श्रुती म्हणते. 'सूर्य आत्मा जगतस्तुश्चः' यावरून काय म्हणावयाचे आहे ते स्पष्ट होईल. म्हणून शरीरात वहाणारे वारे हा जो प्रभंजन, हा घेणेचा व सांडणेचा आहे. ही आत्मसूर्याची उपासना आहे. पळी पंचपात्री आणि पाणी याशिवाय कर्मातील काठिण्य घालवून संतांनी सांगितलेली सुधारित संध्या आहे. ही कोणाही जीवाला निःसंकोचपणे साधता येते. यातून आत्मसाक्षात्कार होतो. मात्र हा एकांत या प्रभंजनाचे साधनेने साधता आला आहे. प्रभंजन हा शब्द श्रीज्ञानेश्वरांच्या नमनस्तोत्रात येतो. उदाहरणार्थ, ''नमोकाल कौतुहल । नमो विश्व चालक गोपाल । नमो विश्व प्रतिपाळ । प्रभंजन ।।'' अर्थात हा जो एकांत आहे, तो बाणला पाहिजे. चाळणा करण्यात सारा जन्म गेला तर कृती केव्हा होणार? म्हणून समर्थ म्हणतात, ''चाळणा करावी सर्वही । एकांती राहता बरे । एकांत मानला ज्याला । त्याला साधे हळु हळु ।।'' अर्थात येथेही त्याला साधे भराभरा, असे समर्थ म्हणत नाहीत हे लक्षात ठेवणे सारखे आहे. ''चक्षुदर्पणी जग हे पहा । मग तू परमानंदी रहा ।'' हे श्रीनाथमहाराजांचे वचन येथे चिंतनीय आहे. देहात ज्याने आत्मा पाहिला, त्याला जगात तोच दिसतो. पण नुसते जगाकडे, दृश्याकडे

आणि देहाकडे पाहून मात्र देहात आत्मा दिसत नाही. जे सारे पहातो तेच दिसणार. दुसरे काय दिसणार? ''म्हणवोनी अवघे सारा । पांडुरंग दृढ धरा।।'' असे श्रीतुकाराममहाराजांनी या दृष्टीनेच म्हटले आहे. निसर्गाने वणवण फिरणाऱ्या जीवाला एके ठिकाणी बसणेच खरे कठीण आहे. या दृष्टीने एकांत बाणणे हे महत्वाचे आहे. झोपेतून जागे झाल्यावर जगाचा संबंध. या जगापूर्वी काय होते म्हटले तर एकांत, गूढ अवस्था यापेक्षा काय? म्हणून आमचे श्री प.पू. मामांनी या अभंगाचे पहिल्या कडव्यात ''एकांत बाणता लोकांतात हरी। प्रगट बाहेरी आत दिसे ।।'' असे म्हटले आहे. आत्मा सर्वव्यापी बाहेरही आहे, पण तो दिसतो मात्र आत हे त्यातले वर्म आहे. ''आत्माराम सर्वाठायी पण तो नेत्रांतरी पहावा'' असे भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज यांनी म्हटले आहे. ''हरी बोला एकांती । हरी बोला लोकांती । देहत्यागाअंती हरी बोला।।'' एकांतात साधना झाली तर लोकांतात फार काय, देहत्यागाअंतीही होते. हे यातील स्वारस्य आहे. आमचे मामांनी ही प्रचीति घेतली व त्याचा दृग्प्रत्यय हजारो साधकांनी प्रत्यक्ष प्रमाणाने घेतला. म्हणून त्यांचे या सांगण्यात काही आगळेच महत्व आहे. ''एकांती लोकांती देहांतीहि नाम । प्रचीति उत्तम स्वये दिली ।।'' या श्रीमामांचेवरून लिहिलेल्या निर्याणाचे अभंगात हा विषय स्पष्ट झाला आहे. अनेकांनी हे दृश्य आपल्या डोळ्यांनी आणि कानांनी अनुभवून अंतरी साठविले आहे. जोवर ही माणसे जिवंत आहेत, तोपर्यंत तरी ही कादंबरी होणार नाही हे निश्चित आहे. एकांतात बसले म्हणजेच डोके भरकटते असा साधकांचा अनुभव आहे. एऱ्हवी न येणारे विचार मोकळेपणा आल्याने अधिकच येतात. तळघरात, भुयारात, जंगलात बसणे हा एकांत नव्हे. ''वनेषु दोषां प्रभवन्तीरागिणां'' अशीच स्थिती असते.

म्हणून श्रीमामा या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात म्हणतात, ''कोणा एकामाजी होत असे अंत । पहावे चित्तात विचारोनी ।।'' आपण झोपी

गेलो की हे सारे दृश्य कोठे जाते व आपण जागे झालो की हे प्रत्ययाला कसे येते, हे पाहिले म्हणजे याचे महत्व ध्यानी येईल. हा लय जेथे होतो, तोच खरा एकांत आहे. एक काय आहे याचा विचार करता तेथे दुसरे काही रहातच नाही. दुसरे काही आहे की जे आपण तिसरेपणाने पहातो आणि डोक्यात घेतो येवढेच दुसरे आहे. 'एकं' म्हणजे 'अद्वितीयं' हेच खरे, सर्वांचा आत्मा एक आहे. हाच या अध्यात्माचा गाभा आहे. ''विश्वी विश्वंभर । हे तो वेदांतीचे सार ।'' हे तुकोपनिषद विचारात घ्यावे असे आहे. नामाने याचा अनुभव येतो. अन्यथा मग सारा शीणच आहे. ''तुका म्हणे नामावीण । व्यर्थ वेदांताचा शीण ।'' हेच खरे.

यादृष्टीने या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात श्रीमामा सांगातात, ''एक असे आत्मा ज्यात आदि अंत । तो स्वये एकांत ओळखावा ।।'' ज्यात साऱ्या दृश्याचा आदि अंत आहे तो एकांत, आपण जे कोणी या दृश्यापासून आणि देहापासून वेगळे आहोत की ज्यामुळे आपण हे सारे वेगळेपणाने पाहू शकतो, ऐकू शकतो, तो वेगळेपणा नसता तर या क्रिया कशा घडल्या असत्या? हे जे कोणी आपण आहोत त्याने तो एकांत 'स्वये' ओळखला पाहिजे हे एक मोठे चिंतनीय सूत्र आहे. बरे, हा एकांत आपण साधला. आता काय हा प्रश्न पुनः पुढे रहातोच. याचे उत्तर श्रीमामांनी या अभंगाच्या शेवटच्या कडव्यात सारभूत दिले आहे. ते म्हणतात, ''गोविंद म्हणे तया स्थानामाजी जाता । रामनाम वार्ता दूर नसे ।।'' या स्थानामध्ये नामाचा नाद सारखा घुमतच रहातो. हे याचे खरे महत्व आहे. एकांतप्रिय साधकाचे जीवन हे नाममयच होते आणि यामुळे तेथे स्वात्मसुखाशिवाय काही रहातच नाही. नामाने वृत्ती ही राममय होते. श्रीकेशवस्वामीं म्हणतात, ''राममय वृत्ती झाली आता काय उणे । अहंकार दग्ध झाला स्वात्मसुख घेणे।।'' यापरते परमार्थात मिळविण्याचे तरी काय आहे असा प्रश्न आहे.

*****

## २३.

**अनेक विधाने करोनी चांगला ।**
**परी नाही आला मोक्ष वाटे ।।१।।**
**मोक्षाची ती वाट जवळीच नीट ।**
**रामनाम धीट होऊन घेई ।।२।।**
**धीट होऊनीया पाठ करी त्याचा ।**
**तो नर दैवाचा खरोखरी ।।३।।**
**गोविंद म्हणे एक विधान नामाचे ।**
**तेथे आणिकाचे काम नाही ।।४।।**

देहाच्या अनुषंगाने अनेक प्रकारची विधाने केली. खरे पाहिले तर तो प्राणी चांगला आहे, पण तो मोक्षाच्या वाटेवर काही आला नाही, याचा विषाद वाटतो. एकाचा विसर झाला की अनेक प्रतीत होते हे तर उघड आहे. स्वप्नामध्ये दृष्टीला वास्तविक एकटाच तेथे प्राणी असून, अनेक दिसत असते याचा तरी अर्थ काय असा प्रश्न आहे. हा संसार अगर हे दृश्य, यामध्ये तरी तसे वेगळे काय आहे असा प्रश्नच आहे. अनेक प्रतीत होताना स्वतःचा विसर पडतो आणि स्वतः आपण आपल्याला जाणले तर त्या प्रतीत होणाऱ्या अनेकात आपल्यात जे काही आहे, त्यापेक्षा वेगळे काही दिसून येत नाही. हे विचाराअंती निर्विचार स्थितीत स्पष्ट होते. ज्याचा आपल्याला काही उपयोग नाही, त्याला आपले म्हणून कवटाळण्यात तरी काय तात्पर्य आहे? नुसते म्हणण्याने ज्याला आपण आपले म्हणतो ते किती आपले झाले हा विचारही आवश्यक आहे. ज्याला आपण आपले म्हणतो त्यापेक्षा आपण पुनः वेगळे राहतोच आणि आपण कोणी आहोत हे ज्ञान ज्या एका चैतन्याने जाणीवेत येते,

त्या जाणीवेचे दृष्टीने सर्वत्र चैतन्याचीच जाणीव असते, म्हणून जाणीवेनेच दृश्यातील अनेकाची जाणीव, त्यात तेच चैतन्य असल्यामुळे होते. म्हणजे दृष्टीला अनेक दिसते म्हणून ते अनेक यापेक्षा या म्हणण्यात वेगळा कोणताच अर्थ रहात नाही. चैतन्याने आपली जाणीव आणि जे पाहणार तेथे चैतन्य जागृत असल्याने त्याची होणारी जाणीव विचारात घेता, जाणीवेचे विरहित अस्तित्व आणि अस्तित्व विरहित जाणीव, जाणिवेत येऊ शकत नाही, याची जाणीव आपल्याला पाहिजे. ही जाणीवच प्रत्येक प्राणिमात्रांत निर्माण होण्याची आवश्यकता आहे. येथे मग अनेक विधानांची जरुरीच रहात नाही. मग हे न जाणता अनेक विधाने करून चांगली असली तरी त्याचा बंध जाईलच कुठे? श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''हा निजधर्म जै सांडे । आणि कुकर्मी रति घडे । तैच बंध पडे । सांसारिक।।'' हा निजत्व प्रगट करणारा अस्तित्वदर्शक चैतन्याचा गुण जर विसरला आणि देहासक्तीने प्राप्त झालेल्या कर्मबंधनात जर जीव रममाण झाला तर, हा संसारबंध बंधन करणारा होतो. मग मोक्ष हा नुसता बंध आहे म्हणून एक शब्द वापरावा असा नुसता शब्दच रहातो. पाण्याशिवाय सरोवर, दिव्याशिवाय घर, चंद्राशिवाय रात्र, प्राणाशिवाय शरीर, गुरुशिवाय चेला, पतीविना कांता काय कामाची, तसेच येथेही आहे. अनेक विधाने करणारा चांगला असला तरी त्यात काय चांगुलपणा आहे? त्याला द्वंद्व सुटणार कसे? आणि नाही तो बंध घेऊन विव्हळत राहिला, तर त्याला त्यातून सोडवणारे साधन कोणते? कारण जो बंध आपणच निर्माण केला, त्याला जबाबदार शेवटी आपणच रहाणार. आपण आपली सोडवणूक करून घेणे जरुरीचे आहे. कारण आपली प्रतीति एकत्वात घेतली, तर मग मोक्ष शोधावा लागेल काय? तोच मोक्ष नव्हे काय? म्हणून आमचे ती. प.पू.श्रीमामा या अभंगाचे पहिल्या कडव्यात म्हणतात, ''अनेक विधाने करोनि चांगला

। परि नाही आला मोक्ष वाटे ।।''  मस्त मनुष्यमात्र चांगला आहे, पण तो एक नामाशिवाय फुकट गेला असा संतांचा सिद्धांत आहे. ''काय करावी आपुली । जी का उपेगा न आली ।।'' किंवा ''काय करावा चांगला । नामावीण व्यर्थ गेला ।।'' हे श्रीमामांचे विचार चिंतनीय आहेत. चैतन्याचे देहावर आवरण आहे.  त्याचे अनावरण झाल्याशिवाय वातावरणात तरी काय फरक होणार?  ''अनेकी सदा देवासी पाहे ।'' ही समथोक्ति महत्वाची आहे.  यादृष्टीने अंतर्मुख होण्याची नितांत गरज आहे. ''असाच होई धीट रे । उलटा वाहे पाट रे । रामदास तुज स्पष्ट सांगतो । मोक्षपदाची वाट रे ।।'' असे एक श्रीसमर्थांच्या अभंगातील सूत्र आहे. श्रीचिमडचे महाराज म्हणतात,  ''आकाशातुनि वाट रे । न करावा बोभाट रे । सांडूनी तीनशे साठ प्राण्या । घे वरचा एकसष्ठ रे ।।'' श्रीगोपाळकाका कोटणीस म्हणतात, ''साठावरची कळ लाधलो । शिवशिवचिंतने शिवचि झालो ।। गोपालनाथ पायी वितरलो । अवघे तू मी ।।'' तर श्रीमच्छिंद्रनाथ सांगतात, ''गंगा न जाऊ जमुना न जाऊ ना कोई तीरथ न्हाऊँ । अडसट तीरथ हैं घट भीतर वाहुको मनमल धुवुँ ।।''  या अवतरणावरून येथे काय म्हणावयाचे आहे ते स्पष्ट होईल. जग हा आकाशाचा चमत्कार आहे आणि आत्मा हा दिक्काल आणि आकाश याचे अतीत आहे. आत्म्यापासून निर्माण झालेले आकाश म्हणजे काही नाही.  यातून जे जे निर्माण झाले, ते काही नाहीसे होते. कारण त्याचे मूळ काही नाही हे आहे. म्हणून आकाशाचा गुण  शब्द.  त्यामुळे या दृश्याचे वर्णन शब्दाने होते. आत्मा या पलीकडे असल्याने त्याचे वर्णन शब्दाने होत नाही. तो निःशब्द  आहे.  म्हणून ही मोक्षाची वाट आकाशातून गेली असून तेथे आकाशाच्या लयाने आत्मानुभव येतो.  ''बळिये इंद्रिये येती मना । मन एकवटे पवना । पवन सहजे गगना मिळोचि लागे ।।'' या मार्गाने श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी सांगितल्याप्रमाणे तेथे लय होत जातो. ''नभ

अलिप्त सर्वासी । स्वये अलिप्त होणे नभासी । तरीच पंचभूतांचे माथेयासी। चढणे साच ।।'' ही ज्ञानेश्वरमाऊलींची ओवी डोळ्यासमोर सतत ठेवावी अशी आहे. अशी ही मोक्षाची वाट जवळ असून अगदी नीट नाकासमोर आहे. येथे नामसाधनेने आक्रमण करता येते. यादृष्टीने श्रीमामांनी या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात ''मोक्षाची ती वाट जवळीच नीट । रामनाम धीट होऊनी घेई ।।'' असे म्हटले आहे. ''शीतल हा पंथ माहेरीची वाट । जवळीच नीट सुखरूप।।'' असे श्रीतुकोपनिषद सांगते. ही वाट माहेरची आहे, जवळ आहे, नीट आहे आणि अगदी सुखरूप आहे, हे सारे खरे, पण येथे ''रामनाम धीट होऊनी घेई'' असे श्रीमामांनी का म्हटल आहे? हा प्रश्न विचारात घ्यावा असा आहे. कोणीही कोणालाही काहीही सांगावे, पण राम म्हणावयास कोणी कोणाला सांगू नये. आपल्याला पटले तर, माझा आग्रह नाही. एक जण एकाला म्हणाले, ''तुम्ही राम म्हणा की,'' मग ते गृहस्थ म्हणाले, आम्ही काय मरावे म्हणा? राम म्हणणे हे प्राणोत्क्रमण आहे. प्राणाचे उत्क्रमण आहे. पण कळले तर. नाही तर त्यानी राम म्हंटला म्हणजे मेले असाच त्याचा अर्थ आहे. राम म्हणणाराचा जगाला काय उपयोग? ''राम म्हणता कामक्रोधाचे दहन'' या श्रीतुकाराममहाराजांचे वचनाचा विचार केला तर कामक्रोधाची राखुंडी हाच रामजप आहे. पण ते काही जायुष्यात होत नाही. रामनाम घेत असतानाच राग येत असतो. त्याला या जपाचे महत्व कळले नाही असेच शेवटी म्हणावे लागेल. म्हणून ज्या गोष्टी आयुष्यात घडणाऱ्या नाहीत, त्या शेवटच्या रकान्यात टाकल्या आहेत. उदाहरणार्थ कथा आटपली, देवाज्ञा झाली, हे सारे शब्द शेवटी वापरतात. कारण याचा आयुष्यात कोठे वापर होतच नाही. देव काय प्रत्येकाचे टाळकीत सोटा मारायला बसला आहे काय? त्याचा खरा अर्थ वेगळाच आहे. वासना ठेवू नये अशी खरी देवाची आज्ञा, पण ते घडत नाही म्हणून शेवटच्या

रकान्यात तो शब्द टाकला आहे. ''देवाज्ञा झालीया न ठेवावी वासना ।'' असेच श्रीतुकाराममहाराजांनी म्हटले आहे, ज्याला देवाचा साक्षात्कार झाला त्याची वासना रहातच नाही. असा त्याचा अर्थ अभिप्रेत आहे. या दृष्टीनेच ''काही न राहिली वासना ही'' असे श्रीतुकाराममहाराजांनी स्पष्ट सांगितले आहे. देहाचा बंध ज्या नामाने सुटणारा आहे असे नाम कोण घेण्यास धजेल? यादृष्टीनेच श्रीमामा म्हणतात, ''रामनाम धीट होऊनी घेई'' किंवा ''असाच होई धीट रे'' असे श्रीसमर्थ सांगतात. असा जो मनोधैर्याने ही नामसाधना करेल तो दैववान यात संशयच नाही.

म्हणून श्रीमामांनी या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात म्हटले आहे, ''धीट होवोनिया पाठ करी त्याचा । तो नर दैवाचा खरोखरी ।'' हा पाठच येथे महत्वाचा आहे. ''ज्ञानदेवा पाठ नारायण नाम । पाविजे उत्तम निजस्थान ।'' किंवा ''ज्ञानदेवा फळ नारायण पाठ । सर्वत्र वैकुंठ केले असे ।'' ही हरिपाठातील माऊलीची वचने अगदी बोलकी आहेत. यावर भाष्याची जरुरी नाही. एकत्वात येणेस एक विधानाची आवश्यकता आहे. तेथे अनेक विधानांची जरुरीच काय? म्हणून श्रीमामांनी शेवटच्या कडव्यात म्हटले आहे. ''गोविंद म्हणे एक विधान नामाचे । तेथे आणिकाचे काम नाही ।।'' श्रीतुकाराममहाराज असेच म्हणतात, ''आणिक दुसरे नाही मज आता । नेमिलिया चित्ता वाचोनिया ।।'' हेच खरे.

*****

# २४.

**रामनामी एकविध होऊनी राही ।**
**पतिव्रता पाही पतीलागी ।।१।।**
**मग देव तुझा करील सांभाळ ।**
**जैसी माता बाळकासी जपे ।।२।।**
**तरो अथवा बुडो नाम न सोडीन ।**
**प्रतिज्ञा ही जाण जीवी धरी ।।३।।**
**गोविंद म्हणे तुझा सखा होय हरी ।**
**आणिका प्रकारी काय काज।।४।।**

एकविधता ही परमार्थात अत्यंत श्रेष्ठ आहे. परमार्थात तीन भूमिका आहेत. एकात सगळं, सगळ्यात एक आणि सगळं एक. एकातच सर्व काही आहे ही श्रेष्ठ भूमिका. असा एक दगड पाहिजे की, ज्या ठिकाणी कोणत्याही परिस्थितीत आपण नतमस्तक झाले पाहिजे. दगड हा शब्द येथे मुद्दाम वापरतो आहे आणि असा जिवंत प्राणी पाहिजे की ज्याची आज्ञा शिरसावंद्य. मग त्यात फरक होता उपयोगाचा नाही. एकातच सर्व काही आहे. त्या शिवाय चित्तात दुसरे काही नाहीच, या जीवनाचे धारणेत अद्वितीय शक्ती प्रगट होत असते. सगळ्यात एक म्हटले की ती शक्ती विभागली जाते. यामुळे त्याचा अध्यात्मिक दृष्ट्या तसा परिणाम दिसून येत नाही आणि सगळे एक म्हणजे कवठा क्या आणि कुमठा क्या, सब बारा टक्के याला खरा अर्थच नाही. आई-वडील किंवा गुरु यांचे मनातील ओळखून वागणारा हा नंबर एकचा मुलगा, आज्ञेप्रमाणे वागणारा नंबर दोन, आज्ञा कोणत्या अर्थाने केली आहे याचा विचार करून वागणारा नंबर तीन आणि या खाली नंबरच नाही. ''एक

गुरू एक देव । कोठे तरी असावा भाव । भावार्थ नसता वाव । सकळ काही।।'' ''एको देवः केशवो वा शिवो वा ।'' याचा विचार येथे आवश्यक आहे. सर्व देवांना हाक देताना कोणीच धावून येत नाही. दर महिन्याला भक्ति बदलते, यात एकविधता कोठे आहे? एक मनुष्य महापुरात बुडत होता. तो म्हणाला, शंकरा धाव. नंदीवर बसून शंकर निघतात, तो गजानना म्हणून हाक दिली. गजानन उंदरावर बसून येणार तो, पांडुरंगा म्हणाला. त्याने कमरेवरचे हात बाजूला केले तो, आणि कोणाला हाक दिली. शेवटी कोणीच देव तेथे सोडवावयास आला नाही आणि बिचारा बुडून मेला. आषाढ महिना आला की ''युगे अठ्ठावीस विटेवरी उभा ।'' ही आरती चालते. श्रावणात ''ओवाळू आरती मदन गोपाळा ।''; भाद्रपदात ''सुखकर्ता दुःखहर्ता।'' अश्विनात ''दुर्गे दुर्घट भारी ।'' अशी येथे स्थिती आहे. तेथे आपण एकविध होणार तरी कसे? असा प्रश्न आहे. आमचे भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज हे आपल्या गुरुस्थानाशिवाय कोठेही गेले नाहीत. त्यांना सद्गुरुशिवाय देवच माहित नव्हता. त्यांचे मनात आले असते तर सर्व तीर्थयात्रा त्यांनी निश्चितच केल्या असत्या. पण श्रीचिमडचे महाराज हेच त्यांचे परम दैवत. चिमडचे महाराज सज्जनगड व आळंदी येथे गेले असताना, त्यांचेबरोबर त्यांचेमुळे ते गेले होते. याशिवाय ते कोठेच गेले नाहीत. या गुरूभक्तीला काही तोड आहे का? असा प्रश्न आहे. ''स्थावर जंगम भरली पाही । दासा दैवत त्यावीण नाही।'' अशीच त्यांची अवस्था होती. म्हणून त्यांचा परमार्थ हा कळसाला गेला. ते चिमड संप्रदायाचे कळस झाले, तर त्यांचे पूर्णकृपेने ज्यांनी त्यांची सेवा आजन्म केली असे माझे पितृदेव श्रीमामा, हे श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर या महान सत्पुरुषांचेच शब्दात सांगावयाचे झाले तर, हरिभक्तीचा कळस झाले. ''पैठणक्षेत्री अतृप्त हेतू । सांगलीत पूर्णेच्छा

होतू । हरी भक्तीचा कळस डोलतू । पांडुरंग मनी भरला ।।'' यावरून एकविध म्हणजे काय हे स्पष्ट होत आहे. एकाशिवाय चित्तात काही नाही म्हणजेच एकविध. ''एक धरिला चित्ती । आम्ही रखुमाईचा पति ।'' असे श्रीतुकोपनिषदात स्पष्ट म्हटले आहे. असे काही महात्मे होऊन गेले, ते नुसते विठ्ठलच म्हणणार एवढी एकविधता. सातारला स्टेशनरोडवर धर्माबुवा म्हणून एक महान सत्पुरुष, नेमनिष्ठ पंढरीचे वारकरी, आम्ही डोळ्याने पाहिले आहेत. ते हरीजन, पण श्रीहरीच त्यांना वश होता. तोंडाने नुसते विठ्ठल म्हणावयाचे. गोठ्यात गाय, अंगणात तुळशीवृंदावन, घर अगदी लखलखीत. पोटासाठी मोठी कोळशाची व लाकडाची वखार. कोणी त्यांचेकडे आले की, ''या देवा'' हे शब्द त्यांचे तोंडून येत. आयुष्यात त्यांनी कांदा लसूण खल्ला नाही. गळ्यात तुळशीची माळ, पायी पंढरीची वारी. त्यांना पाहिले की मन प्रसन्न होत असे आणि इतके असून प्रसिद्धी पराङ्गमुख. हे एकविध महापुरुष कोणाच्या नजरेत भरणार? धर्माचरणाचा तो एक आदर्श. आम्ही आमचे आतेबंधू ती.रा.रा. नारायणराव व हरीभाऊ पटवर्धन यांचे बरोबर श्री. वासुनाना छापखाने यांचेकडे वर्षाकाठी जात असल्याने, त्यांना पहाणेचा योग आला. यादृष्टीने आमचे श्रीमामांनी अभंगाचे पहिल्या कडव्यात ''रामनामी एकविध होऊनी राही । पतिव्रता पाही पतीलागी।।'' असे म्हटले आहे. जो जीव एकदा एकविध झाला, पुनः त्यात फरक म्हणून होत नाही. हे त्याचे खरे महत्व आहे. ''एकविध आम्ही न धरू पालट । न संडू ते वाट सापडली ।। म्हणवोनि केला पाहिजे सांभाळ । माझे बुद्धिबळ पाय तुझे ।।'' असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात. एकदा का गळ्यात मंगळसूत्र अडकले की नाव, मधले नाव, व आडनाव सारे बदलले. आरपार जीवनच बदलून गेले. तसेच येथेही आहे. गुरूकृपेने एकतत्त्वाशी समरस झालेला जीव एकविध झाला की, तो एक

कायापालट आहे. सारे जीवनच उजळून निघालेले आहे. मग त्यात फरक होणार कसा? आणि इतक्यातूनही त्याच्या खटकर्माने बदल झाला तर तो मग एकविध कसा? हाही एक प्रश्नच आहे. कोल्हापूरचा नंदी दरवर्षी तीळभर पुढे जातो व पुनः तीळभर मागे येतो आणि असा तो रंकाळ्याला गेला की मग प्रलय होतो, या बोलण्याला तरी काही अर्थ आहे का? एकदा पालट झाला की तो कायमचा. याचे नाव एकविध. ''एकविध आम्ही न धरू पालट । न संडू ते वाट सापडली ।।'' येथे श्रीतुकाराममहाराज, ''वाट सापडली'' असे म्हणतात. ही वाट सापडल्याशिवाय रामकृष्ण गतीवर आरोहण करता येत नाही व साधकाची प्रगती होत नाही. यादृष्टीनेच ''उपजोनी करंटा नेणे अद्वय वाटा। रामकृष्णी पैठा कैचा होय।।'' असे श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी आपल्या हरीपाठात स्पष्ट केले आहे. बरे, ही वाट जी सापडली ती देखील कोण्या महात्म्याने सापडविली म्हणून, न हून ती तशी तर्काने वा प्रयत्नाने सापडणे कठीणच आहे. ''सापडविले वाटे जाता गंगास्नाना। मस्तकी तो जाणा ठेविला कर ।।'' हा श्रीतुकाराममहाराज यांचा चरण येथे चिंतनीय आहे. ''सापडविले वाटे'' हे शब्द महत्वपूर्ण आहेत. म्हणून आम्ही एकविध आहो आता या जीवनात पालट होणे नाही आणि जी वाट सापडली ती आता काही झाले तरी आम्ही सोडणार नाही असे महाराजांनी ठासून सांगितले आहे. आता आपले पाय हेच माझे बुद्धीबळ असल्याने माझा सांभाळ करणे हे सर्वस्वी आपले हाती आहे, असेही त्यांनी येथे सूचित केले आहे. विठ्ठलाशिवाय दुसरा विषय चित्तात नाही मग त्यांचेशिवाय महाराज बोलणार तरी कोणाशी? ''तुका म्हणे मन एकविध झाले । नावडे विठ्ठलेविण दुजे ।'' हे वचन अगदी बोलके आहे. पतिव्रता जशी पतीशी एकरूप असते, तसे नामाशी होणे अगत्याचे आहे. म्हणून या अभंगाचे पहिल्या कडव्यात

पुढे ‘‘पतिव्रता पाही पतीलागी ।’’ असे श्रीमामांनी म्हटले आहे. ‘‘पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आम्हा नारायण तैशापरी ।’’ किंवा ‘‘पतिव्रता नेणे आणिकाची स्तुती । सर्वभावे पती ध्यानी मनी ।।’’ हे श्रीतुकयांचे शब्द अगर ‘‘तुका म्हणे सती । अग्नी न देखे ज्या रिती ।’’ हा विचार, हाच विषय येथे स्पष्ट करीत आहे. म्हणून रामनामी एकविध होऊनी राही । पतिव्रता पाही पतीलागी । असे श्रीमामांनी येथे सांगितले आहे. असे आपण जर एकविध झालो तर आपला सांभाळ देव खचित करतो हेही श्रीमामा सांगणेस विसरले नाहीत.

म्हणून या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, ‘‘मग देव तुझा करील सांभाळ। जैसी माता बाळकासी जपे ।’’ लहान मूल चुलीकडे निघाले आहे. ते काही आईला मी चुलीकडे चाललो आहे, मजवर लक्ष ठेव असे सांगत नाही. तरीपण ते अनन्य, एकविध असलेने आई हेच त्या बाळाचे दैवत असल्याने आई त्याचे मागे असतेच आणि त्याला बाजूला उचलून घेते. तसेच येथे आहे. ‘‘घार हिंडते आकाशी। तिचे लक्ष पिलापाशी ।।’’ या श्रीतुकोक्तीप्रमाणे परमात्म्याचे लक्ष या एकविध भक्तावर असून, तो त्याचा सांभाळ करीतच असतो. ‘‘लेकराचे हीत । जाणे माऊलीचे चित्त ।’’ तशीच येथे अवस्था होते. फक्त एक, काही झाले तरी नाम सोडावयाचे नाही असा अगदी पक्का निर्धार पाहिजे. हेही तितकेच महत्वाचे आहे. ‘‘तरावे बुडावे तुझिया वचने । निर्धार हा मने केला असे ।’’ असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात आणि तसे झाले तर आत्माराम त्या जीवाजवळ आहेच असाही आपला निश्चय व्यक्त करतात. ‘‘तुका म्हणे येथे कराराचे काम । तया आहे राम जवळीच ।।’’ शेंडी तुटो की पारंबी तुटो, नाम घट्ट धरून राहिले पाहिजे, हेच खरे. ‘‘गातो एका । ध्यातो एका । अंतर बाहेर । पहातो एका ।।’’ आम्ही

एकालाच गातो, ध्यातो, फार काय आत बाहेर एकच पहातो, ही श्रीएकनाथमहाराजांची अनुभूती सतत दृष्टीसमोर ठेवावी अशी आहे.

या दृष्टीने श्रीमामांनी या अभंगाच्या तिसऱ्या कडव्यात ''तरो अथवा बुडो नाम न सोडीन । प्रतिज्ञा ही जाण जीवी धरी ।।'' असे कळवळून सांगितले आहे. तरलो तुझ्या नामाने, बुडलो तुझ्या नामाने, जे काही होईल ते तुझ्या नामाने, पण काही झाले तरी नाम सोडणार नाही, अशी प्रतिज्ञा मामांनी आयुष्यात केली. ज्यासाठी वेळ पडली तरी नोकरीवर पाणीही सोडले ते येथे सांगितले आहे. म्हणून त्यांच्या या सांगण्याला महत्व आहे. खरेच जर असे झाले तर त्याचा परमात्माच सखा होतो. या परते भाग्य ते कोणते आहे असा प्रश्न आहे. परमात्माच सखा आहे. म्हणून आमचे मामा या अभंगाचे शेवटच्या कडव्यात या अभंगाचा निष्कर्षच पुढे ठेवतात. ते म्हणतात, ''गोविंद म्हणे तुझा सखा होय हरी । आणिका प्रकारी काय काज।।'' हरिच सखा झाला मग चिंता कशाची?

✻✻✻✻✻

## २५.

**सारासार विचार करोनिया पाही ।**
**तरीच होय काही आत्महीत ।।१।।**
**निगुर्ण हे सार सकळा पैलीकडे ।**
**तया ऐलीकडे तीन गुण ।।२।।**
**तया पैल जाता साधतसे काज ।**
**जेथे देवराज भेटी होय ।।३।।**
**गोविंद म्हणे हीत रामनाम कंठी ।**
**जेणे जगजेठी तुष्ट होय ।।४।।**

हे जग सार आणि असार यांनी भरलेले आहे. ही एक खरी मौज आहे. सार ग्रहणाची परीक्षा या जगाच्या उंबरठ्यावरच होते. जगण्यासाठीच साऱ्यांची धडपड, पण जगणे म्हणजेच काय याचा जगणारा कधी विचारच करीत नाही. मग त्या जगण्याचा काय उपयोग? जगणारा कोण हे कळले तर जगण्याची धडपड संपली. देहाचे आयुष्य वाढविणे म्हणजे जगणे, इतकी सर्वसामान्य कल्पना, म्हणून शेवटी जगणे रहाते आणि जगण्याची कल्पनाच उरते आणि मग काय, कल्पना ती कल्पनाच आणि म्हणूनच ती कल्पना. जगणे आणि जगण्याची कल्पना यात किती अंतर आहे बरे? कल्पक आहे म्हणून कल्पना, कल्पक कळला तर कल्पना उरेल का? आणि कल्पना करता जन्म गेला तरी कल्पक हा गवसेल का? याची कल्पनाच करावी. 'ज' म्हणजे जन्म आणि 'ग' म्हणजे जीवनाचे गमनागमन आणि 'ण' म्हणजे सारे कसे शांत, याचा अर्थ मरण. जन्म आणि मरण ही जीवनाची दोन टोकेच. यातच जगणे सामावलेले आहे. जीवन म्हणजे जगणे आणि असे अखंड जगणे याचा

अर्थ जीवन. येथे देहाचा आणि जगण्याचा संबंधच पोहोचत नाही. ही दोन टोके एकत्र आली की, परमार्थ होतो. यापेक्षाही जीव दूर जातील तितका प्राणी जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडतो. या दोन्ही कुंडल्या एक झाल्या की, फेर संपतो. कुंडलीनी जागृत झाल्याने कुंडली पालटून जाते, सारे विश्व विशाल बनते. खऱ्या अर्थाने विश्वाची ओळख होते आणि विश्वाभास हा पार मावळून जातो. ''आता विश्वात्मके देवे'' या श्रीज्ञानेशोक्तीप्रमाणे हा विश्वाचा जो कोणी आत्मक तो, दृष्टीसमोर येतो. ''हा गे माझा अनुभव विश्वदेव सत्यत्वे।।'' ही श्रीतुकोक्ती सत्यपणे असणारा जो विश्वाचा आत्मक असा देव, तोच फक्त रहातो. सारी देवघेव संपलेली असते आणि ''मावळवीत विश्वाभासू नवल उगवला चंडांशू ।'' या श्रीज्ञानेशोक्तीचा प्रत्यय येतो. हा सारासार विचार किती महत्वाचा आहे बरे! यातच खरे आत्महित साठलेले आहे. आत्म्याचे हित आपण कोण आहोत त्या आपले हित हे महत्वाचे आहे. साऱ्याकरिता सारे केले आणि सारे केलेले कोठे गेले याचा पत्ताच जर लागला नाही तर, सारे केलेले सारे, सारे व्यर्थ आहे. पण हे सारे जाणतात का? नाही. म्हणून संतांचा अभिप्रायच येथे महत्वाचा आहे. काही असे आणि काही तसे असेच हे जग आहे. सारे असेही नाही आणि सारे तसेही नाही. जन्म आणि मरण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हे ज्याला कळले त्याला काय कळले नाही आणि हे ज्याला कळले नाही, त्याला मग कळले तरी काय असा प्रश्न आहे. आपण कोण आहो हे जाणून त्या आपल्या करता जे हितासाठी जागृत असतात. त्यांचे आईवडील धन्य, असे श्रीतुकाराममहाराज यांनी म्हटले आहे. ''आपुल्या हिता जो असे जागता । धन्य मातापिता तयाचिया ।।'' हा विचार चिंतनात घ्यावयाचा तर दगडाखाली सापडलेला हात आपला आपणच बाजूला केला पाहिजे.

''आपुली आपण करा सोडवण।'' आपली सोडवण दुसरे कोण करतील? आणि ते जर काही करू गेले तर त्यातून जे काही घडेल ते तिसरेच. पण आपला ठावठिकाणा आपल्यालाच लागणार नाही. म्हणून ''आपुल्या जीवे शिवासी पहावे ।'' ही जी श्रीतुकाराममहाराज यांनी वर्णिलेली अवस्था हेच आत्मसुख, या परते आत्महित ते कोणते ? हे ज्याने साधले त्याचा देव होतो. ''आपुला तो एक देव करुनी घ्यावा ।'' ही तुकोक्ती येथे चिंतनीय आहे. असे आत्महित सारासार विचार करूनच होते. जीवन म्हटले की तेथे विचार आलाच. विचाराशिवाय जीवन नाही. अविचाराने आत्मनाश होतो. मग हित तर दूरच राहिले. म्हणून सारासार विचार महत्वाचा. विचार कोणता करावा हा विचार येथे विचार करणेसारखा आहे. ''क्षणोक्षणी हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधू। नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ।।'' असा सावधानतेचा इशारा श्रीतुकोपनिषद देते. हा विचार येथे महत्वाचा आहे. ''नाहं देहो'' आपण देह नव्हे. केव्हा तरी देह चिखलाचा गोळा होऊन पडतो. तेथे आपले काय राहिले हा विचार क्षणाक्षणाला करावा असा आहे. ''असारा संसार त्यजुनी बरवे साधन करी'' असे श्रीसमर्थ म्हणतात, तर ''फळकट हा संसार । एक सार भगवंत ।'' असे श्रीतुकाराममहाराज हे आवर्जुन सांगतात. यादृष्टीने आमचे श्रीमामांनी या अभंगात पहिल्या कडव्यात मुख्यतः या सारासार विचाराचे महत्व स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, ''सारासार विचार करुनिया पाही । तरीच होय काही आत्महित ।।'' धावत्या आयुष्याच्या गाडीला कोठेतरी आवर बसणे हे आवश्यक आहे. आयुष्याची गाडी तशी वेगाने धावतच राहिली तर हा सारासार विचार आयुष्यात कोठेच निर्माण होणेचा संभव नाही. जरा क्षणभर स्थिर झाल्याशिवाय आपल्याला सारासार कळणे हे खरे कठीणच आहे. एक भगवंत सार आहे हे जर निश्चित झाले तर, तेथे

आपला संपर्क आपण सतत राखला पाहिजे. ''सार सार सार विठोबा नाम तुझे सार । म्हणोनी शूलपाणी जपताहे वारंवार ।।'' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. नाम हे सार असल्याने भगवान शंकरांनी तेच घेतले. ''नामा परते नाही सार। नामे तरलेची अपार ।।'' इतके नामाचे महत्व श्रीकेशवस्वामी दाखवून देतात. त्रैलोक्यात सारभूत असणाऱ्या या नामाचा उच्चार तरी मनाने व्हावा अशी मनीची तळमळ, ''नामा परते सार नाही त्रिभुवनी । ते का तुम्ही मनी उच्चाराना।।'' या शब्दात श्रीतुकाराममहाराज प्रगट करतात.

अभंगाचे दुसऱ्या कडव्यात ''निर्गुण हे सार सकळा पैलीकडे । तया ऐलीकडे तीन गुण।।'' असे श्रीमामांनी म्हटले आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज आपले हरीपाठात म्हणतात, ''त्रिगुण असार निर्गुण हे सार । सारासार विचार हरीपाठ ।।'' त्रिगुण हे असार असून निर्गुण हे सार आहे आणि सारासार विचार म्हणजेच हरिपाठ आहे. अधोगामी जीवनात त्रिगुण दिसून येतात. या पलीकडे जीवनाचे ऊर्ध्वगामी सूत्र आहे. हेच सूत्र धरून जे ऊर्ध्वगामी झाले त्यांना या निर्गुणाचा साक्षात्कार होतो. ''निर्गुणाचा संग मला आजी जाहला । पूर्व दिशे भानू जसा आत उगवला ।।ध्रु.।। काम क्रोध सर्व कर्म दंडिले बळे । सूत्र धरूनी मध्यभागी वरी चालिले ।।'' हे श्रीमुक्ताबाईचे विचार येथे चिंतनीय आहेत. गुण म्हणजे जीवनाचे सूत्र हाच अर्थ येथे अभिप्रेत आहे. ''निर्गुणाचे भेटी गेलो गुणा संगे। तव तो झालो अंगे गुणातीत ।।'' हे वर्म श्रीगोराकुंभार यांनी साधकांचे पुढे ठेवले आहे. येथे चारी वाचेचा ग्रास होऊन सहज समाधी अवस्था प्राप्त होते. हे गुज श्रीमुक्ताबाई आपले अभंगात व्यक्त करतात. त्या म्हणतात, ''सहज समाधी लागली निर्गुणी । खुंटलीसे वाणी बोलवेना ।।'' हे जे निर्गुण ते येथे सार आहे. याने सर्व असार आपोआपच बाजूला

होते. जीवाचे लक्ष असाराकडे जात नाही. हंसक्षीर न्यायाने सार ग्रहण होत रहाते. ''पाणी सांडूनी दुग्धची घ्यावे ऐसा यत्न करावा । माया सांडुनी भजरंगात्मा नामी अनुभव घ्यावा।।'' ही संतोक्ती आमचे श्रीमामांचे कीर्तनात येत असे, ती सार्थ होते. देहामध्ये हंसस्थिती आहेच. तेथे क्षीर सेवन होऊन, बाजूचे ते बाजूलाच रहाते. त्रिगुणापलीकडे गेले की देवाची भेट होते.

यादृष्टीने मामांनी येथे तिसऱ्या कडव्यात म्हटले आहे, ''तया पैल जाता साधतसे काज । जेथे देवराज भेटी होय ।।'' ''तुम्ही म्हणा रामराम तेणे होईल आमुचे काम ।।'' असे श्रीब्रह्मचैतन्यमहाराज म्हणतात तेच खरे. शेवटच्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, ''गोविंद म्हणे हित रामनाम कंठी । जेणे जगजेठी तुष्ट होय ।।'' कंठी रामनाम हेच आत्महित, हाच सारासार विचार असून याने जगजेठी परमात्मा संतुष्ट होतो. असे याचे महात्म्य आहे. ''सारासार विचार करा उठाउठी ।'' जीवनाच्या उठाउठीत सारासार विचार महत्वाचा आहे. त्याचा खुलासा लगेच पुढे श्रीतुकाराममहाराज यांनी केला आहे. ते म्हणतात, ''नाम धरा कंठी विठोबाचे । नाम उच्चारिता कंठी । पुढे उभा जगजेठी ।।''किंवा ''कंठी नाम सिका । आता कळिकाळासी धका ।'' हे श्रीतुकाराममहाराज यांचे चरण येथे सतत विचारात घ्यावेत इतके त्याचे महत्व आहे.

*****

## २६

**रामनामा माजी साधिलीया पवन ।**
**अनुभव खूण ऐशी असे ।।१।।**
**जव एक श्वास साधेल पवन ।**
**मना समाधान थोर वाटे ।।२।।**
**जव दोन श्वास साधेल पवन ।**
**समधातुक मन होत असे ।।३।।**
**जव चार श्वास साधेल पवन ।**
**विरहीत मन देह बुद्धी ।।४।।**
**गोविंद म्हणे झालीया श्वासाचे साधन ।**
**पळांचे साधन पुढे ऐका।।५।।**

रामनामात पवन साधणे हा तर पवन विजय आहे. येथे पवनाचा आणि नामाचा अति निकटचा संबंध आहे. पवनातच नामाचा ध्वनी सारखा घुमत असतो. हा पवन नाममय होणे हेच त्यातील वर्म आहे. ‘‘हे अजानुबाहो साधुपार्था । मन बुद्धी ठेवी पवनाचिया माथा । मग तुवा पुसलिया तत्त्वार्था। सांगितले फावेल ।।’’ ही उत्तरगीतेवरील श्रीज्ञानेश्वरमाऊलींची टीकेतील ओवी मोठी चिंतनीय आहे. पवनाच्या माथ्यावर आत्मबुद्धी ही आत्मनिष्ठ झाली तर, साक्षात्काराचे वर्म हाती येणारे आहे, हे यातील रहस्य आहे. ‘‘नभ अलिप्त सर्वासी । स्वये अलिप्त होणे तयासी । हेचि पंचमहाभूतांचे माथेयासी। चढणे साच ।।’’ या ज्ञानेश्वरीतील ओवीत या माथ्यावर येणेची प्रक्रिया सांगितली आहे. आकाशाचे ज्ञान ज्याला होते, त्याचे ज्ञान होणे येथे अभिप्रेत आहे. ‘‘नाडीद्वारा खेळे जीवन । जीवनामध्ये खेळे पवन । त्या पवना सरिसा

जाण । आत्माहि विचरे ।।'' आत्मा नेमका कोठे अनुभवास येतो हे या ओवीत स्पष्ट आहे. ''रहाटे जी पवनु । उपाधी माजी आत्मपणु । ते ठायी लाविलिया पणु । चित्तैक्येचि ।। हा चिद्‌क्षरेचि घेयावा । काढितु मागोवा । ना तरी उपरी परतावा । आधीच की ।। चिद्‌क्षरे अक्षरासी । मिळणी होतु जीवासी । जीवभावे शिवा आपैसी । देहांती गाठी ।।'' या श्रीज्ञानदेव आज्ञापत्रातील तीन ओव्या मोठ्या चिंतनीय आहेत. ''बळिये इंद्रिये येती मना । मन एकवटे पवना । पवन सहजे गगना । मिळोचि लागे ।।'' ही ज्ञानेश्वर माऊलीची ओवी म्हणजे या पवन विजयाचे एक सूत्रच आहे. श्रीज्ञानेशकन्या श्रीगुलाबरावमहाराज एका अभंगात म्हणतात, ''आता मज एक सुचला उपाव। घेईन मी नाम श्वासोश्वासी ।।'' आणि या केवळ अभ्यासाने, ''आकाशात आत्मा आत्म्यात आकाश । करोनी मनास दाखवीन ।'' असे सांगून ते मोकळे होतात. ''नाम श्वासोश्वासी असे । परब्रह्म तेथे वसे ।'' यात समर्थांनी काही देखील दडवून ठेवलेले नाही. ही समर्थोक्ति डोळ्यासमोर सतत राहिली पाहिजे. ''श्वासौ लेवे नाम बिना सो जीवन धिःकार । श्वास श्वासमों रामजप वोही धारणाधार ।।'' यात श्रीतुलसीदासजींनी नाम हे जीवनाशी किती निगडीत आहे हे स्पष्ट केले आहे. नाम हीच एक जीवननिष्ठा आहे.  नव्हे नव्हे नाम हेच खरे जीवन. त्याशिवाय जीवन असू शकत नाही. पण ही ओळख जेथे नाही ते आयुष्य आहे, म्हणून देहाच्या आश्रयाने जीवन कंठीत असतात आणि जीवनालाच मुकतात. त्यांना खऱ्या जीवनाचा आनंद घेता येत नाही. जीवनाचे बैठकीवर देह भोगातच गर्क होऊन द्वंद्वाशी झगडा देत रहातात. देह तर कडेपर्यंत येतच नाही. तो सोडावाच लागतो. देह ज्याने धरला आणि ज्याने सोडला, त्याला सोडल्याने देहाची सोबत या अनंत कालावधीत दोन दिवसाचीच ठरते. कबीरसाहेब म्हणतात, ''सीताराम कहोजी मनमो । जब लग श्वास चला तनमो ।'' तर श्रीअक्कलकोटस्वामी सांगतात, ''सकलही संती हे केले साधन । नामाचे स्मरण श्वासामाजी ।''

श्रीब्रह्मचैतन्य महाराज म्हणतात, ''नका करू काही आस । नाम जपा श्वासोश्वास ।'' परमार्थातील अत्यंत महत्वाचा उपदेश, श्वासोश्वास प्रणववाचक होणे हाच आहे. ''प्रणव वाचक श्वासोश्वास। हाचि तारक उपदेश ।'' या चरणात भागवत धर्माचे कळस श्रीतुकाराममहाराज यांनी ठामपणे आपले म्हणणे साधकांसमोर ठेवले आहे. अर्थात हे ज्ञान गुरुकृपेनेच होणारे असून हे जाणणारा भाग्यवान विरळा आहे, हेहि त्यांनी त्याचबरोबर विधान केले आहे. ते म्हणतात, ''परी हे गुरुकृपेचे देणे । विरळा भाग्यवंत जाणे ।'' यावरून या साधनेचे महत्व सर्वार्थाने दिसून येते. श्वासोश्वासी असणारे नाम श्वासोश्वासात घुमत राहिले पाहिजे. जसा आत्मा दिक्, काल आणि आकाश याच्या अतीत आहे, तसेच हे चैतन्य नामही त्याचे प्रमाणेच आहे. श्वासोश्वास हे आयुष्यदर्शक असून, त्याचे अतीत असणारे नाम श्वास आणि उछ्वास यांचे दरम्यान असणाऱ्या सूक्ष्मतर कालावधीत आहे. हेच साधन सर्व संतांनी करून, हे आपले आयुष्यच या नामी वेचून, आयुष्य हे साधनीभूत केले. या स्थितीत जेवढा काळ व्यतीत होईल तेवढी प्रचिती साधकास होते. अमृताचा एक थेंब जरी जीभेला लागला तरी अमर होणारा प्राणी अमृताच्या सागरात गटांगळ्या खाताना मरेल कसा? असा प्रश्न आहे. अमृत हे मृत नव्हे ते चैतन्य असल्याने, तो चैतन्याकारे अमरच होतो आणि अखंड चैतन्याचा आस्वाद घेत रहातो. पाण्यात पोहताना ते नाकातोंडात जात नाही ना, याची दक्षता घ्यावी लागते. तो प्रकार येथे नाही. येथे ज्याची मान वर आहे तेच खलास होतात. असे हे कालचक्र मोठे विचित्र आहे. यादृष्टीने ती.प.पू. श्रीमामांनी अशी साधना भगवान श्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेब महाराज यांचे कृपेने साधली असल्याने, त्यांनी या मार्गात जात असताना साधकाला कसे अनुभव येत रहातात, हाच विषय येथे विशद करून सांगितला आहे. याचे महत्व साधननिष्ठ साधकच जाणू शकतील. आयुष्य हेच जर साधनीभूत झाले तर तो जीव सच्चिदानंद स्वरूपच होतो. नाही तरी यापेक्षा

प्राणीमात्राला आणि काय हवे आहे? म्हणून ते पहिल्या कडव्यात म्हणतात, ''रामनामा माजी साधिलीया पवन । अनुभव खूण ऐसी असे ।'' हा पवन जर नाममय, नादमय, प्रकाशमय, अमृतमय, चैतन्यमय झाला तर त्याच्या काही अनुभवाच्या खुणा स्पष्ट होतात. जे अनुभवी आहेत त्यांनाच या विषयाचा आनंद होणार आहे. ''ज्ञानदेव म्हणे अनुभवी जाणे । अनुभवावाचोनी काहीच नेणे ।'' किंवा ''ज्ञानदेव म्हणे अनुभवी जाणे । संत ये खुणे पारूषले ।'' अगर, ''हे खूण अनुभवाची पिंडी परतोनी पाहे ।'' हे श्रीमुकुंदराज यांचे वचन अगर ''हे खूण गुरुजाणे । येरा टकमक बाणे ।'' ही संतोक्ती येथे चिंतनीय आहे. महाराजांचे कृपेने आत काय चालले आहे हे आपल्यालाही समजत नाही, हे म्हणणेत मतलब नाही. कालचे कीर्तन कसे काय झाले? अगदी उत्कृष्ट - काही कळले नाही इतके चांगले. या म्हणण्याला काही अर्थ आहे कां? आपल्या पदरात काय पडले हे पहाणे येथे आवश्यक नाही असे कोण म्हणेल असा प्रश्न आहे. नाम आहे की नाही, दृष्टी आहे की नाही, प्रचीति आहे की नाही याची आठवण ठेवावी. ही श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांची त्रिसुत्री साधकाने सतत विचारात घ्यावी इतकी महत्वाची आहे. एक श्वास जरी वर पाहिल्याप्रमाणे नामात साधला गेला तरी मनाला थोर समाधान होते. त्यात जे आहे ते जगात नाही व जगात जे नाही ते त्यात आहे. यापेक्षा काय म्हणता येईल? खाण्यापिण्याने, उपभोगाने होणारे समाधान वेगळे आणि हे वेगळे. ''समाधानं किं चितैकाग्रता'' असे श्रीशंकराचार्य म्हणतात. चित्त हे देहाला सुटून असणाऱ्या चैतन्याशी एकाग्र होते. हेच ते समाधान. एकच विषय होणे ही एकाग्रता येथे साधते.

म्हणून श्रीमामा या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात म्हणतात, ''जव एक श्वास साधेल पवन । मना समाधान थोर वाटे।।''; ''एकाग्र करी मन तेणे होईल समाधान रे ।।'' असेच श्रीज्ञानेश्वरांनीही म्हटले आहे. दोन

श्वासांनी मन समाधान होते. मनाचा तोल सुटत नाही. ताळे तोळे तो नाम घेत रहातो. ''गुरूलिंग जंगम। तेणे दाविला आगम । आधी व्याधी झाली सम । तेणे पावलो विश्राम रे ।।'' हीच श्रीज्ञानेश्वर महाराजांनी आपली अनुभूती सहज प्रगट केली आहे. या अवस्थेला साधक येतो. चार श्वास साधन साधल्याने देह, मन, बुद्धी विरहीत साधक होतो. ''देहभाव जेथे विरे ऐसे साधन दिले पुरे । बाप रखुमा देवीवरे। विठ्ठलू रे ।।'' हे जे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, यातच हे रहस्य साठवलेले आहे. देहभावरहित होणे हेच साधन. ''शुद्ध करा मन व्हारे देहातीत ।'' या श्रीतुकाराममहाराज यांचे वचनात हाच आशय त्यांनी व्यक्त केला आहे. अशाप्रकारे श्वासाचे साधन साधल्यानंतर पुढील अभंगात श्रीमामा पळांचे साधन सांगणार आहेत. म्हणून या अभंगात ''जव दोन श्वास साधेल पवन । समधातुक मन होत असे ।।'' हे सांगून ''जव चार श्वास साधेल पवन। विरहीत मन देहबुद्धी ।।'' हा अभिप्राय या अभंगाच्या तिसऱ्या व चौथ्या कडव्यात व्यक्त केला आहे. ''गोविंद म्हणे झालीया श्वासांचे साधन । पळांचे साधन पुढे ऐका ।।'' असे पाचव्या कडव्यात मामांनी म्हटले आहे. तात्पर्य काय, श्वासात नाम जे आहे ते नाममय आपले जीवन होणे, हे महत्वाचे आहे. हा पवन नामात मिसळल्याने श्वासोश्वासरूप आपले जीवन हे नाममय होते व त्यायोगे आत्मसाक्षात्कार होतो, हे यातील स्वारस्य आहे. श्रीरामपाठाचे पंचवीस अभंग सिद्धांतवजा सांगितल्यावर, सव्वीसाव्या अभंगापासून एकोणतीस अभंगांपर्यंतचे हे अभंग आता प्रात्यक्षिक आहे. हा अभ्यासाचा विषय आहे. ''म्हणवोनी अभ्यासासी काही । सर्वथा दुष्कर नाही । यालागी माझ्या ठायी। अभ्यासे मिळ ।।'' असेच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अभ्यासाचे महत्व प्रगट केले आहे. ''एकतत्त्वनाम साधिती साधन । द्वैताचे बंधन न बाधिजे ।'' हे जे माऊलींनी आपले हरीपाठात गुह्य प्रगट केले आहे तेच खरे.

*****

## २७.

**जरी एक पळ साधेल पवन ।**

**होय एकाग्र मन तीही अवस्थे ।।१।।**

**जरी दोन पळ साधेल पवन ।**

**मनाचे उन्मन होत असे ।।२।।**

**जरी चार पळ साधेल पवन ।**

**होतील श्रवण दश नाद ।।३।।**

**जरी आठ पळ साधेल पवन ।**

**होत असे दहन कामाचे ते ।।४।।**

**जरी पंधरा पळ साधेल पवन ।**

**उर्ध्वपंथी गमन साधे बापा ।।५।।**

**जरी तीस पळ साधेल पवन ।**

**होय आगमन ब्रह्मस्थानी ।।६।।**

**गोविंद म्हणे झालीया पळांचे साधन ।**

**घटिकांचे साधन ऐका पुढे।।७।।**

या अभंगात ती.प.पू. मामांनी एक पळा पासून तीस पळापर्यंतचा अभ्यास साधकांचेपुढे ठेवला आहे. एक पळ जर का हा अभ्यास साधिला तर जागृती, स्वप्न आणि सुषुप्ती या तीनही अवस्थेत मनाची एकाग्रता होते, हे दाखवून दिले आहे. आता निसर्गाने आपण ज्या देहाचे अनुषंगाने

प्राप्त होणाऱ्या अवस्था अनुभवितो, त्यापेक्षा या वेगळ्या आहेत. ''जागृती, स्वप्न, सुषुप्ती नाठवे'' या शब्दात श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी प्रगट सांगितल्याप्रमाणे, या देहाचे अनुषंगाने येणाऱ्या अवस्थेत चैतन्याची स्मृती होतच नाही. येथे देहाचे, दृश्याचे आणि त्या अनुरोधाने चर्मदृष्टी समोर येणाऱ्या विषयांचे आकर्षण आहे. संसार हे एक स्वप्न असून त्यात आपण जागे आहोत. ''संसार स्वप्न संकाशं।'' असे श्रीशंकराचार्य म्हणतात. तर ''संसार म्हणजे दीर्घ स्वप्न'' असे श्रीसमर्थ म्हणतात. हाच आशय ''झूटी माया सब सपनकी'' या शब्दात श्रीमीराबाई व्यक्त करतात. मग या प्रकारे ज्याला जागृती म्हणतो ती जर स्वप्नजागृती असेल, तर त्यात अवस्थांतरात दिसणारे स्वप्न, स्वप्नजागृतीत तंद्रील अवस्थेत भासमान होते. तेथे जी एक प्रकारची गुंगी येते, तिलाच आपण सुषुप्ती म्हणतो, हे उघड आहे. गुरुकृपेने जर चैतन्याची जागृती सुषुप्तावस्थेतही प्रतीत होऊ लागली तर ती मात्र खरी जागृती आहे. ''निद्राघोर झाला राम'' या श्रीतुकाक्तीप्रमाणे निद्रेत आत्माराम घोररुपाने प्रगट होतो. तेव्हा या देहाचे भानही न राहता जीव हा बिनघोर होतो आणि आत्माराम जेथल्या तेथे गेला की हा प्राणी जागा होतो. पण त्या जीवाला आज कसे होणार, अशा प्रकारचा घोर लागून तो चिंतामग्न होतो. ''दिनु तैसी रजनी । मज अवस्था लावुनी गेला गे माय ।'' या श्रीज्ञानेशोक्तीप्रमाणे रात्रीचाही दिवस होऊन, दिवसाची रात्र न होता, आत्माराम घोररुपाने नादानुसंधानात प्रतीत झाला तर दिवस आहे का रात्र आहे हे कळतच नाही. ''न गमे दिवस राती । अखंड लागलीसे ज्योती ।'' या संतोक्तीप्रमाणे त्या जीवाची अवस्था आहे. आपण पृथ्वीवर आहोत तोवर दिवसरात्र आहेत. पण सूर्यलोकात काय आहे? तसेच येथे होते. देहानुसंधानाने अवस्थेचे झालेले हे तीन तुकडे गुरुकृपेने रहात नाहीत. एकच अवस्था अखंड रहाते. चैतन्याची

जागृती अखंड झाल्याने, दृष्टीतले दृश्य मावळले की मनासमोर येणारे दृश्य हे चैतन्यच उरते. ध्यानामनाचा आणि जागृती स्वप्नाचा संबंध एकच रहातो. ध्यानावस्था ही जागृती, तर मनापुढे भासमान होणारे चैतन्य हेच त्याचे चैतन्य स्वप्न. आपण आपल्यासमोर आपल्यालाच पहाण्याची अवस्था ज्यात आहे, अशा या स्वप्नावस्थेत तादात्म्य झाला की जी सुषुप्ती तेथे मनाचा लयच होतो. ''मन मुरे मग जे उरे ।'' या श्रीज्ञानेशोक्तीप्रमाणे त्याची अनुभूतीच तेथे हा साधक घेतो व याप्रकारे चैतन्यानुरोधाने येणाऱ्या अवस्था तीन, पण अनुभूती एकच असल्याने या तीनी अवस्थेत देहात्मक अवस्थेचा कोठे संबंध न येता मन एकाग्रच झालेले असते. एक आहे अग्र, त्याला म्हणती एकाग्र, असे होते. अग्र म्हणजे विषय ''अग्रापुढे पहा नीलबिंदू तो'' असे होऊन श्रीगोपाळकाका कोटणीस यांनी म्हटल्याप्रमाणे, ''तल्लीनची होई'' असे होते. तद् + लीन याचा संधी तल्लीन असा होतो. तत् ने जे निर्दिष्ट केले आहे, त्यातच जीव हा लीन होतो. म्हणूनच या अभंगाचे पहिल्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, ''जरी एक पळ साधेल पवन । होय एकाग्र मन तिही अवस्थे ।'' दोन पळ साधनाने मनाचे उन्मन होते. ''जागृती स्वप्न सुषुप्ती तुरीया भोगीती उन्मनी नारी गे ।'' या श्रीज्ञानेशोक्तीप्रमाणे या चारी अवस्था चैतन्याचा आस्वाद घेतात आणि चैतन्य या अवस्थांचा आस्वाद घेते. चैतन्याचे अखंड ज्ञान ही तुरीय अवस्था, तर मनाचे मनत्व रहात नाही ही उन्मनी आहे. या अवस्थेत श्रीपांडुरंगाची भेट होते. ''उन्मनीच्या सुखा आत। पांडुरंग भेटी देत ।'' ही जनाबाईंची अनुभूती आहे. ''मन मारुनी उन्मन करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।'' या मुक्ताबाईंचे वचनाप्रमाणे मन मेले की उन्मन होते. ''मना उन्मनी शब्द कुंठीत राहे ।'' या समर्थोक्तीप्रमाणे येथे

शब्दाचा म्हणजे आकाशाचा ग्रास झालेला असतो. ''रामकृष्ण नामी उन्मनी साधिली । तयासी लाधली सकळ सिद्धी ।।'' असे श्रीज्ञानेश्वरमाऊलीने आपले हरिपाठात नमूद केले आहे. रामकृष्ण ही जीवनाची गती असून निनादित होणाऱ्या अनुसंधानातही उन्मनी अवस्था सहज प्राप्त होते.

म्हणून श्रीमामांनी या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात ''जरी दोन पळ साधेल पवन । मनाचे उन्मन होत असे ।।'' असे सांगितले आहे. चार पळ जर हे साधन साधकाने साधले तर दशविध नादांचे श्रवण होते. ''चिणीती प्रथमा। चिणचिणीती द्वितीया । घंटानादस्तृतिया । शंखनादश्चतुर्थः । पंचमस्तंत्री नादः । षष्ठम स्तालनादः । सप्तमो वेणुनादः । अष्टमो मृदंगनादः । नवमो भेरिनादः । दशमो मेघनादः। नवमं परित्यज्य दशमं अभ्यसेत् ।'' याप्रकारे ''नादो दशविधी जायते ।'' असे हंसोपनिषदात या दशविध चैतन्य नादांचे वर्णन केले आहे. हे सारे नाद चैतन्याचे आहेत. ''तार मंद्र घोर । जाण भेद तीन स्वर ।'' असे श्रीतुकाराममहाराज यांनी नादाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. चिंणीती पासून मेघनादापर्यंत हे नाद घुमत राहतात. नादलुब्ध जीव असल्याने, ''लुब्धली नादी की लागली समाधी ।'' अशी तुकोपनिषदात सांगितल्याप्रमाणे अवस्था होते. या नादाला अनहत म्हणतात. संघाताशिवाय होणारा ध्वनी म्हणजे अनहत. ''नासिकेचा प्राण कोणमार्गी येत । नाद दुमदमत अनुहती।।'' हे श्रीज्ञानेश वचन ''सोऽहं सोऽहं चौदा चक्रे दावी अनुहत ।'' हे श्रीगहिनीनाथांचे उद्गार किंवा ''अनहत गगन गर्जे थोर उठला गजरू ।'' ही श्रीमुकुंदराजांची काव्योक्ति येथे मोठी चिंतनीय आहे.

म्हणून श्रीमामांनी या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात ''जरी चार पळ

साधेल पवन । होतील श्रवण दशनाद ।'' असे म्हटले आहे. नादानुसंधानात मनोलय झाला की, कोणत्याही प्रकारची इच्छाच रहात नाही. ''तुका म्हणे माझी इच्छा पूर्ण झाली । काही न राहिली वासना हे ।'' अशी अवस्था होते. ''काम क्रोध आम्ही वाहिले विठ्ठली । आवडी धरली पायासवे।'' या तुकोक्तीप्रमाणे स्थिती झाल्याने, सारे शरीरातील जीवन हे विठ्ठलमय झाल्याने, काम क्रोध ही पसार होऊन जातात. ''तुका म्हणे देह भरीला विठ्ठले । काम क्रोधे केले घर रिते ।।'' हेच खरे. ''ऐसा जो कामक्रोध लोभा । झाडी करोनी ठाके उभा । तो एवढीया लाभा । गोसावी होय ।।'' या श्रीज्ञानेश्वर माऊलींची ओवी अनुभूतीने साधकाला एक आगळे समाधान देते.

यादृष्टीने या अभंगाचे चौथ्या कडव्यात, ''जरी आठ पळ साधेल पवन। होत असे दहन कामाचे ते ।।'' असे मामांनी म्हटले आहे. ''राम म्हणता कामक्रोधाचे दहन ।'' या चरणात श्रीतुकाराममहाराज यांनी 'दहन' एवढाच शब्द वापरला आहे. नामानुसंधानात कामक्रोधांची तीन चिमटी राख होते. ''करी काम निष्काम या राघवाचे ।'' ही समर्थोक्ती सार्थ होते असे हे एक काम आहे. ते सर्वात महत्वाचे. ''कामामध्ये काम । काही म्हणा राम राम ।'' या श्रीतुकोक्तीप्रमाणे हे मुख्य काम करत राहिले की काम म्हणजे इच्छाच रहात नाही. राघवाची इच्छा बाळगणारा हा निरीच्छ, निःस्वार्थी होतो. खाली देहाशी काही संबंधच राहिला नाही की साहजिकच जीवन हे ऊर्ध्वगामी होते. उष्णतेने झालेली पाण्याची वाफ जशी वर जाते, त्याचप्रमाणे चैतन्याच्या साक्षात्काराने जीवनाची होणारी वाफ हलके हलके वर जाऊ लागते. पंधरा पळांचा अभ्यास जर साधकाचा झाला तर हा अनुभव येतो. असा हा सारा वट्ट अनुभवाचा विषयच येथे सांगितला आहे. म्हणून, ''ऊर्ध्वपंथी चाल बाई ब्रह्मगिरी

पाहू । देहभाव विलय तेथे तेचि होऊनि राहू ।।धृ।।'' हे जे श्रीरंगनाथ स्वामींनी आपले पद्यात स्पष्ट केले आहे, त्याप्रमाणे देहभाव विलयाला जाऊन ऊर्ध्वपंथी जीवन झाल्याने, ब्रह्मगिरीच साधकाचे डोळ्यासमोर येतो. ''निरंजन वनी केशव फुलला । डोंगर शोभला ब्रह्मगिरी ।'' ही चांगदेवांची उक्ती सार्थ होते. या ठिकाणी चैतन्य फुलून जाते. सारे जीवन उजळून निघते.

यादृष्टीने ''जरी पंधरा पळ साधेल पवन । उर्ध्वपंथी गमन साधे बापा।।'' असा या अभंगाचे पाचव्या कडव्यात मामांनी खुलासा केला आहे. यापुढे जाऊन तीस पळ जर हा पवन साधला तर ब्रह्मस्थानी तो साधक येतो. ''पैल तुर्येचे मेरे । नयनातुनी नयन हेरे । सर्व साक्षी समरे परब्रह्म ।।'' ही ज्ञानेशोक्ती प्रतीत होते. म्हणून मामांनी या अभंगाचे सहाव्या कडव्यात ''जरी तीस पळ साधेल पवन। होय आगमन ब्रह्मस्थानी।।'' असे सांगितले आहे. या पळांचे साधनानंतर घटिकांचे साधन साधक साधू लागतो. तेच वर्णन पुढील अभंगात येणारे असल्याने या अभंगाचे शेवटच्या कडव्यात मामा म्हणतात, ''गोविंद म्हणे झालिया पळांचे साधन । घटिकांचे साधन ऐका पुढे ।।''

*****

## २८.

**जया एक घटिका साधेल पवन ।**
**सहज दृष्टी जाण लाधतसे ।।१।।**
**जया दोन घटिका साधेल पवन ।**
**करील उल्लंघन ब्रह्मरंध्र ।।२।।**
**जया चार घटिका साधेल पवन ।**
**तारक बिंदू जाण दिसतसे ।।३।।**
**गोविंद म्हणे झालिया घटिकांचे साधन ।**
**प्रहरांचे साधन ऐका पुढे।।४।।**

या अभंगात ती.प.पू. श्रीमामांनी पळांचे साधनानंतर आता घटिकांचे साधन सांगितले आहे. एक घटिका जर का साधन साधले तर त्या साधकाला सहजदृष्टी प्राप्त होते. केवळ दृष्टी, ज्ञानदृष्टी, शून्यदृष्टी, व्यवहार दृष्टी, अंतरदृष्टी, दूरदृष्टी असे दृष्टीचे अनेक प्रकार आहेत. डोळा असला तरी जशी दृष्टी असेल, तशी सृष्टी त्याला दिसत असते. ''जैसी दृष्टी तैसी सृष्टी'' अशी एक म्हणच आहे. दृष्टीसृष्टी वाद हा एक वाद महत्वाचा आहे. डोळा आहे म्हणून सर्वांनाच सराफी दृष्टी असेल असे नाही. ती दृष्टी असेल तरच त्याला सोन्यामोत्याची पारख डोळ्याला करता येईल. दृष्टीने डोळ्याला एक आगळे सामर्थ्य प्राप्त होते. आत्मदृष्टी, सामाजिक दृष्टी या दृष्टीने जीव हा घडत असतो. सद्गुरुंनी दृष्टी दिली तर त्यांचे कृपेने ही सृष्टी चिन्मय दिसते. आत्मसुखाने आत्मसाक्षात्कार संपादन करता येतो. श्रीशिवराम म्हणतात, 'देऊनी आपुली दृष्टी । अवघी चिन्मय केली सृष्टी ।' श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ''गुरुकृपा झाल्यावरी । ब्रह्मरूप सृष्टी सारी ।'' ''आत्मसुख घ्यारे उघडा ज्ञानदृष्टी ।'' ही संतांचे

जीवनातील सूत्रे चिंतनीय आहेत. अशी दृष्टी ज्याला आहे त्याची माझी भेट व्हावी अशी श्रीसमर्थांनी उघड उघड प्रार्थना केली आहे. ''जेणे राम देखिला दृष्टी । त्याची माझी घडो दे भेटी ।'' असे म्हटले आहे. ज्यांनी दृष्टी गुरूकृपेने साधली त्यांना अनुभूती येते असे महत्व आहे. ''उफराटी दृष्टी लावोनिया दिली । प्रकाशाची केली भेटी जेणे ।'' आपले जीवन अंतर्मुख झाले तर जी दृष्टी प्राप्त होते, त्याला उफराटी दृष्टी असे श्रीतुकाराममहाराज यांनी म्हटले आहे. तेथे जे नाम साधन ते उफराटे. ''मंत्र उफराटा मार्ग उफराटा'' ''नाथाच्या घरची उलटीच खूण'' या श्रीधरस्वामींचे म्हणण्याप्रमाणे सारे जीवनच व्यवहाराच्या उलट दिशेने चाललेले दिसते. ''उफराट्या नामासाठी। वाल्मिक तरला उठाउठी ।'' ही समर्थोक्ती किंवा ''उफराटा हा मंत्र गुरुचा कोण जाणे गती ।'' हे श्रीभगवान श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे वचन अत्यंत बोलके आहे. ज्या दृष्टीने आत्मसाक्षात्कार होतो, ती दृष्टी काही काळ अभ्यासाने साधणे हे वेगळे आणि दृष्टी सहजच तशी होऊन रहाणे हे वेगळे आहे. या जगात सहज काय आहे, हे सहज समजावे, इतके सहज नाही. सहज हा शब्द सहज बोलण्यात वापरला तरी, या जगात जे काही चालले आहे ते सहेतुक आहे. कारणाने कार्य व कार्याने कारण अशीच सांगड आहे. आज कोणीकडे आला? असे एकाने विचारले. येणारा म्हणाला सहज, पण मागून त्याने जी काही लांबड चालू केली, त्यावरून स्पष्ट झाले की तो काही सहज आला नव्हता. सहज फक्त एक वारेच आहे. त्याला मात्र कोणताही हेतू नाही. सकार आणि हकार जेथे जन्माला येतात तेथे जी दृष्टी पोहोचते, त्याला सहजदृष्टी म्हणतात. येथे दृष्टी चैतन्यावरच केंद्रीत झालेली असते. डोळ्याच्या हालचालीवरून माणसाचे दृष्टीची पारख होते. निरखून पाहिले तर निरीक्षण दृष्टी, शोधण्याकरता पाहिले तर शोधक दृष्टी, गुन्हा घडला तर कावरी बावरी दृष्टी, भ्रमला तर भ्रामकदृष्टी, झपाटले

तर भिरभिरणारी दृष्टी, साक्षात्कार झाला की शांत दृष्टी, ही डोळ्याच्या हालचालीवरूनही सामान्यतः समजू शकते. तर्कदृष्टीला हे उमगते. चैतन्यावर दृष्टी केंद्रित झाली हे सांगणारा महात्मा भेटला तरच समजते. बुबुळे या टोकापासून त्या टोकापर्यंत जात आहेत. तर ही सहजदृष्टी होणारच कशी? पाण्यात मासे झोके घेतात तशी प्राणीमात्राची दृष्टी असते. प्रमाणात त्याची हालचाल आहे हे व्यवहारी दृष्टी. प्रमाणाबाहेर हालचाल हा भ्राम किंवा वेडेपणा आला आहे हे दाखविणारी दृष्टी. दृष्टीची लकब चैतन्याकडेच आहे, त्याला उजवीकडे, डावीकडे काय आहे हे पहावयाचे तर सारे तोंड फिरवूनच पहावे लागेल. नुसत्या तिरक्या डोळ्याने त्याला पाहता येणार नाही. तात्पर्य ही दृष्टी एक घटका साधनाने प्राप्त होते. आमचे चिमड सांप्रदायातील एक सत्पुरुष श्री. गोपाळकाका कोटणीस हे साधनाचेवेळी जवळ आरसा ठेवून बसायचे. लोकांना वाटे साधनाला बसल्यावरदेखील आपला मुखडा पाहण्यासाठी यांना आरसा कशाला लागतो? व्यवहारी जगाला व्यवहारापरते काय दृष्टीस भरणार? पण ते आपली दृष्टी ही साधनेमध्ये लागली आहे की नाही हे ते आरशातून पहात व ती लकब आली नाही असे वाटले तर पुनः ती दृष्टी साधेपर्यंत साधनास बसत. नाम आहे की नाही, दृष्टी आहे की नाही, प्रचीति आहे की नाही, हे साधकाने सतत पहावे हे जे श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर म्हणत, त्यात फारच मोठा अर्थ आहे. जेथे दृष्टी ठेवावयास सांगितली आहे तेथे कृपा करून दृष्टी ठेव, म्हणजे कृपादृष्टी आहेच, असे साधकास श्रीभाऊसाहेबमहाराज म्हणत. हाही विचार आणि कृपादृष्टी या शब्दाचा उकल मोठा चिंतनीय आहे. या सर्व दृष्टीने आमचे श्रीमामा या अभंगाच्या पहिल्या कडव्यात ''जया एक घटिका साधेल पवन । सहज दृष्टी जाण लाधतसे ।।'' असे म्हणतात. सहज काय आहे तेथे सहजत्वाने दृष्टी सतत राहिली, सृष्टीला तीच लकब प्राप्त झाली तर ती साधनाभ्यासानंतरही

एऱ्हवी व्यवहार करताना तशीच रहाते, त्यात बदल होत नाही, म्हणून यादृष्टीचे महत्व.

हाच अभ्यास जर दोन घटका झाला तर साधक हा ब्रह्मरंध्रातून ऊर्ध्वगामी होतो, त्या रंध्रात ब्रह्मसाक्षात्काराचा प्रत्यय गवाक्षातून पाहिले तर आत काय आहे ते दिसावे, त्याप्रमाणे येतो. ''औट पीठ त्रिकुट घाट दावी अर्धचंद्र । मातीस माती मिळोनि गेली कैसे ब्रह्मरंध्र ।'' हे श्रीगहिनीनाथ यांनी ब्रह्मरंध्राचे स्वरूप स्पष्ट केले आहे. ''पश्चिमेचेनि पाठे । उन्मनीचे प्रेम लोटे । खोलोनी ब्रह्मरंध्र कपाटे । समाधी सुखा कारणे ।।'' ही ज्ञानदेव तेहेत्तिशीतील श्रीज्ञानेश्वरमाऊलींची ओवी येथे चिंतनीय आहे. ''ज्ञानदेवा आत्मा अणुप्रमाण भासला । सगुण निर्गुण झाला बाईयेवो ।।'' अणुप्रमाण आत्मा सगुण निर्गुण झाला आहे. हा जो अणु आहे हा नभापरता असून, आत्मस्वरूप हा त्याचा गाभा आहे. ''तुका म्हणे नभा । परता अणुचाही गाभा ।।'' हे तुकोपनिषद विचारात घ्यावे असे आहे. यातूनच पुढे क्रमशः विश्वरचना झालेली आहे. हे स्फुरद्रुप असून यात साऱ्या विश्वाचे स्फुरण आहे. ''परमाणुचिया मांदिया । पृथ्वीपणे न वचेचि वाया । तेवी विश्वस्फुर्ती इया । झाकवेना जो ।।'' ही चांगदेवपासष्टीतील ओवी विचारात घ्यावी आणि त्याचा सतत विचार करावा इतकी महत्वपूर्ण आहे. साधनेत साधक असताना चैतन्याच्या खालीवर होणाऱ्या गतीबरोबर शरीराची जी माती जी अणुपरमाणुनी युक्त आहे, ती वर उचलली जाते व एका अणुमध्ये समाविष्ट होऊन, आपले जीवन हे तेथे निरूपाधिकपणे आकाशापेक्षाही विरळ होऊन, तादात्म्य होते. ''अंग अंगा ते वरी । पवनाते पवन धरी । ऐसी अनुभवाची उजरी । होचि लागे।।'' या श्रीज्ञानेश्वरीतील ओवीप्रमाणे साधकाची अवस्था होते. अंग हे चिदांगात प्रविष्ट होऊन वाऱ्याला वारे पकडू लागते. चित्ताचे तेथे तादात्म्य असलेने, त्यातील अनावश्यक भागच बाजूला होऊन, चत्वार देहाचे निरसनाने,

सूक्ष्मतर- सूक्ष्मतम, आकाशरूप जीवन ब्रह्मरंध्रात प्रवेश करते आणि त्या रंध्रातून आत्मप्रत्यय येत रहातो. अशाप्रकारे मातीला माती ज्या रंध्रात मिळून जाते, तेथेच ते ब्रह्मरंध्र आहे आणि एवढ्यासाठीच श्रीमामांनी या अभंगाच्या दुसऱ्या कडव्यात ''जया दोन घटिका साधेल पवन । करील उल्लंघन ब्रह्मरंध्र।।'' असे म्हटले आहे.

चार घटिका जर हे साधन साधले तर तारक बिंदूचे दर्शन होते असे याचे महात्म्य आहे. भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांनी ही अनुभूती एका श्लोकात स्पष्ट केली आहे. ''दिसे तारकु तो चतुर्वक्त्र जाणा । महाविष्णु तो दंडरूपी सुजाणा । सदाशिव तो बिंदूरूपी पहावा । मना राम तो अंतरी साठवावा ।।'' याचा विचार करावा तेवढा थोडा. हा बिंदू दृष्टीला पडला की सारे चैतन्य तेथे विश्रांतीला येते, हे अनुभवाने पहावे असे, श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आपले अनुभवाने स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, ''विसावू पातले चैतन्य बा जेथे । पाहे पा निरूते अनुभवे।।'' असा हा सारा अनुभवाचा विषय असल्याने, मामांनी या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात म्हटले आहे, ''जया चार घटिका साधेल पवन । तारक बिंदू जाण दिसतसे ।'' असे हे घटिकांचे साधन झाल्यावर तारक बिंदूचे दर्शनानंतर, पुढे प्रहराचे साधन सुरू होते. ते मामा आता पुढल्या अभंगात सांगणार आहेत. म्हणून या अभंगाचे शेवटच्या कडव्यात ''गोविंद म्हणे झालिया घटिकांचे साधन । प्रहराचे साधन ऐका पुढे।।'' असे म्हटले आहे. मामांनी हा जो अभ्यास श्रीगुरुकृपेने साधला तो रात्ररात्र साधला. श्री. विष्णु काशिनाथ तगारे यांनी वेळा आलटून पालटून येऊन मामांच्या साधनाची खात्री करून घेतली आहे. यापेक्षा काय सांगावे? आणि म्हणून त्यांच्या या सांगण्याला काही आगळेच महत्व आहे.

*****

## २९.

**ज्यासी एक प्रहर साधेल पवन ।**
**आटतील जाण देहधर्म ।।१।।**
**ज्यासी दोन प्रहर साधेल पवन ।**
**विष्णुचे दर्शन होत असे ।।२।।**
**साधिलीया जीवा विष्णुचे दर्शन ।**
**अष्टौ प्रहर साधन चालतसे ।।३।।**
**गोविंद म्हणे गुरुकृपेचे विज्ञान ।**
**बोलिलो संपूर्ण हनुमंत कृपे ।।४।।**

या अभंगात प्रहराचा अभ्यास व त्याची अनुभूती ती.प.पू.श्रीमामांनी सांगितली आहे. एक प्रहर म्हणजे तीन तास. जर हा अभ्यास साधकाने साधला तर देहधर्म विसरले जातात. आत्मानुसंधानापुढे देहधर्माचे महत्व रहात नाही. ''तै शरीरभाव नासती । इंद्रिये विषय विसरती । जै सोऽहंभाव प्रतीती । प्रगट होय ।।'' ''देह तरी वरचिलीकडे । आपुलिया परी हिंडे । परी बैसका न मोडे । मानसीची ।।'' ''तू मानसा नियमू करी । निश्चळ होय अंतरी। मग कर्मेंद्रिये व्यापारी । वर्तुतु सुखे ।।'' या ज्ञानेशोक्तीप्रमाणे त्या जीवाची अवस्था होते. येथे देहभाव विसरला जातो. आत्मभाव जागृत झाल्यावर देहभाव रहाणारच कसा? ''देहभाव जेथे विरे । ऐसे साधन दिले पुरे । बापरखुमादेवीवरे । विठ्ठलू रे ।।'' अशाप्रकारचे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी म्हटल्याप्रमाणे हे साधन आहे. ''बरवे साधन सुख शांत मन ।'' असे या साधनाचे स्वरूप श्रीतुकाराममहाराज यांनी स्पष्ट केले आहे. मन शांत झाल्यावर देहाची चळवळच थांबली. ''न करवे हालचाली । निवारली चिंता ही ।'' या श्रीतुकोपनिषदाप्रमाणे ही

एक अत्युच्च अवस्था आहे. शरीरभाव नाहीसे झाल्यावर इंद्रियेही विषयांचे भानच विसरून जातात. ''निमाली इंद्रिये विषय विसरले भान ।'' अशीच श्रीनाथमहाराज यांची प्रचिती आहे. देह हा जीवंत असल्याने त्याची निसर्गाने जरी हालचाल होत असलेली दिसली तरी, त्यामागे कोणता हेतू नाही. ''फावल्या त्या करु चेष्टा ।'' हे श्रीतुकयांचे वचनच खरे आहे. ज्यामागे हेतू नाही, त्या हालचालीला अर्थ काय? असा प्रश्न आहे. येथे मनानेच बैठक घेतल्याने ''आली उर्मी साहे ।'' असे होऊन मनाच्या उर्मी चैतन्यमय झाल्याने तो आनंद हा निरुपाधिक, स्वसंवेद्या असा आगळा आहे. ''अवघ्या झाल्या उर्मी एकमय ।'' असेच होऊन जाते. अंतरी निश्चल झाल्याने कर्मेंद्रियांचा व्यापार होऊनही, त्या कर्मातून काही निष्पन्न होत नाही. नैष्कर्म्य सिद्धी प्राप्त होते. कर्म होत असतानाही अलिप्ततेने मोक्षसुखाचा आस्वाद जीवाला सहज घेता येतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी सोदाहरण हा विषय स्पष्ट करून साधकासमोर मोठ्या कळकळीने ठेवला आहे. ते म्हणतात, ''देख पा जनकादिक । कर्मजात अशेख । न सांडीता मोक्षसुख । पावते झाले ।।'' या ओवीचे चिंतन करावे तेवढे थोडेच आहे. ''तयाही देह एक करि आथी । लौकिकि सुखीदुःखी तयाते म्हणती । परी आम्हा ते ऐसी प्रतीती । परब्रह्मचि।।'' येथे त्या जीवाला देह तरी आहेच, म्हणून लौकिकदृष्टीने तेथेही सुखदुःख अटळ आहे. देहावर त्याचा परिणाम झाल्यासारखे वाटल्याने त्याला सुखी, दुःखी असे म्हटलेही जाते. पण साधनेने जीव हा या देहाला सुटलेला असल्याने श्रीज्ञानेश्वरमहाराज मात्र, हा तर परब्रह्मच आहे अशी आमची प्रचीति आहे, अशी ग्वाही देतात. याचा विचार होणे येथे आवश्यक आहे. यावरून ही साधना किती महत्वाची आहे हे स्पष्ट होईल. यादृष्टीने आमचे श्रीमामांनी या अभंगाचे पहिल्या कडव्यात, ''ज्यासी एक प्रहर साधेल पवन । आटतील जाण देहधर्म ।'' असे म्हटले आहे. सोऽहंभाव प्रतीतीने आता चैतन्य सामोरे ठाकले आहे, त्याचे ध्यान लागले आहे,

देहभाव लयाला गेला आहे. अशा स्थितीत दोनप्रहर जर साधन साधले गेले तर तेथे साक्षात् विष्णुचे दर्शन होते. इतके त्याचे महत्व आहे.

म्हणून या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात ''ज्यासी दोन प्रहर साधेल पवन। विष्णुचे दर्शन होत असे ।।'' असे श्रीमामांनी स्पष्ट केले आहे. ज्याने सर्वात प्रवेश केला आहे, तो विष्णु. विश् म्हणजे प्रवेश करणे असा त्याचा अर्थ आहे. त्यापासून विष्णु हा शब्द बनला आहे. चैतन्याने जेथे प्रवेश केला. तेथे जीवाला कोणताही प्रवेश देहाचे आधारे करता येतो. देहाच्या या क्रिया म्हणजे जीवनाचे नाटकातील एक प्रवेशच आहे. परंतु येथे मात्र चैतन्याने जेथे प्रवेश केला, तेथे देहाधारे होणाऱ्या नाटकातील प्रवेश सोडून, जीवाच्या अंतर्यामी असणाऱ्या चैतन्य रुपाशी प्रवेश झाल्याने सारा जीवनातील प्रवेशच बदलून गेला. असा हा प्रवेश आणि त्यातील अभिनय आणि एकरूपता एक प्रचीति देणारी महत्वपूर्ण गोष्ट आहे. म्हणून विष्णुचे दर्शन होते, म्हणजे नेमके काय होते हा प्रश्नही येथे महत्वाचा आहे. दर्शन म्हणजे काही प्रदर्शन नव्हे. दर्शनाचे प्रदर्शन करता येत नाही. दर्शनीभागाचे प्रदर्शन होते. देह आणि दृश्य हा केवळ दर्शनी भाग आहे. हा दर्शनी भाग ज्याने सजविला आहे, त्याचे दर्शन येथे अभिप्रेत आहे. दर्शनी भाग हा देखावा आहे. देखावा वेगळा आणि हा देखावा ज्याने आपणापुढे उभा केला, तो वेगळा. ''जेथे पाहे तेथे देखिचे पर्वत।'' ही तुकोक्ती येथे विचारात घेतली पाहिजे. येथे देखिचे म्हणजे दृश्याचे असा त्याचा अर्थ आहे. द्रष्टा आहे म्हणून दृश्य आहे. तो द्रष्टाच जर दृश्य झाला तर त्या दर्शनाने दृश्य हे अदृश्य होते आणि दृश्य हे अदृश्य झाले की द्रष्टा हा दृश्य होतो. हे यातील स्वारस्य आहे. ''म्हणे खेचर विसा झालासी पिसा । या दृश्याची आशा सांडी नाम्या ।'' हा श्रीविसोबा खेचर यांनी श्रीनामदेवमहाराज यांना केलेला उपदेश येथे मोठा चिंतनीय आहे. देखीचे पर्वत ओसरले म्हणजेच चैतन्याचा साक्षात्कार होतो. जे देखिले ते नाहीसे होते, याचे नाव दृश्य. मनाचे अधिष्ठानावर

दृश्याचा चमत्कार आहे. ''नमन हेचि थोर दिसे । एऱ्हवी तरंगाकार भासे । देखिले तितुके नासे । नैश्वर्य ऐसे श्रुती बोले ।।'' मनाचे मनत्व नाहीसे झाले तर ती थोर अवस्था आहे. एऱ्हवी तरंगणारे हे दृष्य भासमान होत राहिले आहे. जे देखिले ते नाहीसे होणारे आहे. ''यत् द्रष्टं तत् नष्टं'' हे श्रुतीवचन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी स्पष्ट करून दाखविले आहे. ''नमन केलीया विशेष भूती । चित्त रमले तो झाली विश्रांती। तुज देखिलीया श्रीपती । न राहे चित्ती तळमळ ।।'' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी ठामपणे ठासून सांगितले आहे. चैतन्याचे साक्षात्काराने चित्ताची तळमळ नाहीशी होते. ''चित्तचि हारपले अवघे चैतन्यचि झाले ।'' या श्रीनाथमहाराजांचे उक्तीप्रमाणे चित्त हे चैतन्याकार होते. संसाराचा संसरणामुळे होणारा मोह हा केवळ मोह आहे, हे कळल्याने त्याचा मोह होत नाही. ''त्या देवाचे दर्शन तू घे तू घे । संसार मोहातुनी निघे निघे ।।'' ही श्रीसमर्थोक्ती सार्थ होते. ज्याला विष्णुचे दर्शन झाले आहे, त्याच्या चित्तावर सदा समाधान उमटलेले असते. यामुळे संसारदुःखाने तो दुःखी होत नाही. कोणत्याही परिस्थितीत तो प्रसन्न होतो. त्याला पहाणारा निरुत्साही असला तरी त्याला उत्साहाचे उधाण येते. ''देखे अखंडित प्रसन्नता । आथी जेथ चित्ता । तेथ रिगणे नाही समस्ता । संसार दुःखा ।।'' या श्रीज्ञानेश्वरमाऊलींचे वचनाची यथार्थता तेथे जाणवते आणि ''हेचि देवाचे दर्शन । सदा राहे समाधान ।'' या श्रीतुकाराममहाराजांचे वचनाप्रमाणे सदा समाधानच तेथे प्रतीत होते. दर्शन, स्पर्शन, ईक्षण आणि भाषण हे सारे मिळून ते दर्शन आहे. कीर्तन, पुराण, श्रवण, मनन, आणि निदिध्यासन हे सारे मिळून साक्षात्कार आहे. श्रीतुकाराममहाराज यांनी ''सोडू नये कीर्तन पुराण श्रवण । मनन निजिध्यासन साक्षात्कार ।'' असे जे बारा अभंगात सांगितले आहे, तसेच या दर्शनाचे रहस्य श्रीमामांनी ''दर्शन स्पर्शन ईक्षण भाषण । दर्शनाची खूण संता माजी।'' असे आपले एका अभंगात स्पष्ट केले आहे. ''नमो

दर्शन स्पर्शना । नमो उपरवी निधाना । नमो तितिक्षा दारूणा । कमलालया ।'' येथे अलक्षानुभव स्पर्शाने होतो. स्वधर्मानुष्ठानात हा महात्मा रममाण होतो. स्वधर्मानुष्ठान साधल्याने जीवननिष्ठा ही साकार होते आणि असे अध्यात्म तो जगत असतो. हे श्रीज्ञानेश्वरमाऊलींचे श्रीज्ञानेश्वर नमन स्तोत्रातील वचन दृष्टीसमोर ठेवावे असे आहे. दोन प्रहर साधनाचा अभ्यास झाल्यावर विष्णुचे दर्शन झाले की त्याचे महत्व काही वेगळेच आहे. येथे दोन प्रहर म्हणजे दुपारी नव्हे. हा अभ्यास सहा तास व्हावयास पाहिजे. आधी केले मग सांगितले म्हणून याला खरे महत्व आहे.

''साधिलीया जीवा विष्णुचे दर्शन । अष्टौ प्रहर साधन चालतसे।।'' असे मामांनी या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात म्हटले आहे. विष्णु समोरच असल्याने साधन हे मग अखंड चालूच रहाते, हे यातील खरे वर्म आहे. या साधनेचे सारे श्रेय श्रीमामांनी आपले सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज, ज्यांचे आज्ञेने श्रीमामा चिमडक्षेत्री जाऊन श्रीनारायणमहाराज यांचा अनुग्रह घेऊन आले आणि मनीची तळमळ जाणून प्रगटरूपाने देह ठेवल्यावरही ज्यांनी मामांचे मस्तकी हात ठेवून आपले गुरुत्व सिद्ध केले, त्या भगवान सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज यांचेकडेच पूर्णतः सुपूर्त केले आहे. हे ध्यानात घ्यावे इतके महत्वाचे आहे. हे जे काही सारे घडले ते त्या महाराजांनी केवळ घडविले म्हणून. आपलेकडे खरे त्यात काहीच नाही. इतक्या अनन्य निष्ठेने हे महत्वपूर्ण उद्‌गार काढले आहेत. ते महत्वपूर्ण बोलके आहेत. त्यावर भाष्याची जरूरी आहे, असे वाटत नाही. ते चौथे कडवे असे आहे, ''गोविंद म्हणे गुरूकृपेचे विज्ञान । बोलिलो संपूर्ण हनुमंत कृपे ।।'' श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे परमकृपेनेच हा सारा विषय श्रीमामांनी येथे स्पष्ट केला आहे, हे यावरून स्पष्ट होते. यापेक्षा काय त्याचे वर्णन करता येईल असा प्रश्न आहे.

*****

# ३०.

**एक म्हणजे काय जाणावे मीपण ।**
**दोन म्हणजे जाण दुजा भाव ।।१।।**
**तीन म्हणजे काय जाणावे त्रिगुण ।**
**चार म्हणजे जाण चार खाणी ।।२।।**
**पाच म्हणजे काय पंच हे विषय ।**
**सहा म्हणजे काय सहा रिपू ।।३।।**
**सात म्हणजे काय सप्तविध धातू ।**
**आठ म्हणजे होतु अष्टधाही ।।४।।**
**नऊ म्हणजे काय जाणा नवद्वारे ।**
**दहा म्हणजे बारे दशेंद्रिये ।।५।।**
**अकरा म्हणजे काय जाणावे ते मन ।**
**बारा म्हणजे जाण चित्त कुडे।।६।।**
**तेरा म्हणजे काय कुबुद्धि ते पाही ।**
**चौदा म्हणजे काय चौदा विद्या।।७।।**
**गोविंद म्हणे ऐका पुढील प्रकार ।**
**विसावा तोवर नाही जीवा ।।८।।**

या श्रीरामपाठातील पहिले पंचवीस अभंग हे सिद्धांतवजा असून, सव्वीस ते एकोणतीस हे अभंग अभ्यासाचे आणि अनुभूतीचे आहेत. भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांनी आपले पूर्ण कृपेने साधनक्रम कसा घडविला आणि त्यात क्रमशः कशी प्रचीती येत गेली, ही प्रचिती म्हणजे केवळ गुरुकृपाच कशी आहे व कृपेची परिणती म्हणजेच प्रचीति हे अगदी यथाक्रम स्पष्ट केले आहे. आता तीस आणि

एकतीस हे दोन अभंग गणिताचा ताळा करून उत्तराची खात्री आपली आपण विद्यार्थ्याने करून घ्यावी आणि पुस्तकातील उत्तर पाहून त्या उत्तराशी आपले उत्तर जमवणेसाठी गणित करीत राहावे आणि ते गणित चकावे असे न होता, त्यास गणितात छापलेले उत्तर चुकीचे आहे असे ठासून सांगता यावे, तीच येथे साधकाची अवस्था आहे. आपला अभ्यास आणि प्रचीति ही सिद्धांताशी जुळती राहून खरी आहे याची खात्री साधकास या ताळ्याने येऊन, त्याचे आयुष्याचे गणित सहज सुटून, त्याचे जीवन नादप्रकाशामृतयुक्त नादप्रकाश आनंदमय असे होऊन जाते. जन्ममरणाची दुःखपरंपरा कशामुळे जन्म आणि मरण आहे हे निश्चित झाल्याने जन्ममरणाला संक्षेप जाऊन, ते आले अगर न आले तरी तो आनंदमय स्थितीत अखंड राहतो. ''तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी।।'' या तुकोपनिषदाप्रमाणे म्हणण्याचा अधिकार त्यास प्राप्त होतो. या दृष्टीने हा ताळा पहात असताना एकापासून एकोणीसापर्यंत ही अनुभूती साधनेच्या अभावी घेता येत नाही. पण साधनेने एकोणीस परपार झाले की साधक खऱ्या अर्थाने परपार होतो. हे स्पष्ट करताना ती.प.पू. मामांनी, ''एक म्हणजे काय जाणावे मीपण । दोन म्हणजे जाण दुजा भाव ।।'' असे म्हटले आहे. एकापासून एकोणीसापर्यंत सारा मायाबाजार आहे. हे सारे बाजूला होत गेले की तेथे साधनानुभूती आहे. हा याचा भावार्थ आहे. ''एकचि मी पणे नागविले घर । ना तरी संसार ब्रह्मरूप ।।'' असे श्रीज्ञानेश्वर माऊलींनी सांगून ठेवले आहे. मीपणा एकदा का व्यष्टीभावाने जागृत झाला की तेथे तूपणा निर्माण होऊन, दुजाभाव आलाच. असे यात तंत्र आहे. मी आहे म्हणून तू आणि 'तू' आहे म्हणून 'मी'. जेथे मीच नाही तेथे तू कोठे आहे आणि तूच नाही तर दुजाभाव निर्माण होण्यास जागाच कोठे आहे असा प्रश्न आहे. ''मी तू हा विचार विवेके पहावा । गोविंद माधवा याच देही ।।'' या श्रीज्ञानेशोक्तीचा विचार जन्मभर करावा असा

आहे. ‘अ’ स्वतःला मी म्हणतो आणि ‘ब’ ला ‘तू’ म्हणतो. तर ‘ब’ हा स्वतःला ‘मी’ म्हणतो आणि ‘अ’ ला ‘तू’ म्हणतो. मग यातील खरा ‘मी’ कुठला व ‘तू’ कुठला असा प्रश्न आहे. ‘मी-तू’ ला येथे संक्षेप गेल्यावर तेथे शिल्लक काय राहिले, हा प्रश्न आहे. म्हणून ‘मी’ ‘तू’ च्या कट्टीवर श्रीज्ञानेश्वरमाऊली गोविंद माधव ठेवते, असा याचा अर्थ आहे. मी आणि तू हे भूगोलातील अक्षांश - रेखांशासारखे आहेत. ही एक व्यवहाराची सोय आहे. हा व्यवहार लाथाळीकरता नसून आत्मसाक्षात्कारासाठी आहे. पण हेच विसरल्याने दुजाभाव निर्माण होऊन त्यातून काही तिसरेच निर्माण झाले. मग त्यास चौथाच अनुभव आला व आत्मानुभव गेला, तर नवल ते काय? ‘‘मी तो तू गा तू तो मी गा । अज्ञान बापुडी नेणती पै गा ।।’’ हे श्रीज्ञानेशवचन किंवा ‘‘तुका म्हणे जेथे नाही मी तू पण । स्तवावे ते कोणे कोण्या लागी ।’’ हे श्रीतुकोपनिषद येथे चिंतनीय आहे. या एक दोनीचा विचार जेथे घडला नाही, तेथे तिसरे निर्माण होते. म्हणून अभंगाचे दुसऱ्या कडव्यात ‘‘तीन म्हणजे काय जाणावे त्रिगुण । चार म्हणजे जाण चार खाणी ।।’’ असे म्हटले आहे. मुळात एक असता त्यात एक मिसळल्याने दोन झाले. कुठलाही पुढला आकडा एक मिसळल्याने होतो. ‘‘पण आधी बीज एकले ।’’ हे विसरल्याने सारे आयुष्याचे बीजगणीत नष्ट होऊन अंकगणित तयार होते. मग त्याला पुढे गणित रहात नाही. तीन हे त्रिगुण श्रीतुकाराममहाराज स्पष्ट करतात आणि ‘‘रज तम सत्व आहे ज्याचे अंगी । याच गुणे जगी वाया गेला ।।’’ असे ठणकाऊन सांगतात. तीन गुण म्हटल्यावर कफ, वात, पित्तादि त्रिदोष तेथे अटळ झालेच. संतानी या तीनीला तीनीने भागल्याने तेथे एक एकांश झाले. तीन तृतियांश म्हणजे एक एकांश म्हणजेच एकच झाले. ‘‘संतांचे संगती न करावा वास ।’’ कारण ‘‘एखादा गुणदोष येईल अंगा ।’’ ही तुकोक्ती बाह्यात्कारी नसून

संतांचे अंतरंग दर्शक आहे. या त्रिगुणाची आटणी म्हणजे वाचेचा किंवा शब्दाचा पसारा. ही शब्दाची परिणती. शब्दाचा लयही शब्दात, म्हणून सृष्टीक्रम हा लय पावणारा असून, जेथे त्याचा लय आहे तेथेच सत्य हाताशी येते. ''त्रिगुण आटीव वाचेचा पसारा । पडिले विचारा सर्व रस ।'' येथे ''रसोवैरसः'' याची ओळख मग रहातच नाही. द्वैतात्मक जीवनातच जीव रस घेतो व त्याला लाभाचीच गोडी वाटते. याला काय करावे? ''एका पासूनी झाले दोन। दोनी पासुनी झाले तीन । तीनीपासुनी झाले चार । पुढे पाचाचा विस्तार ।।'' या उक्तीप्रमाणे चार म्हणजे चार खाणी, चार वाणी, चार देह, चार शून्ये, चार अवस्था असे सारे प्रकार तिनीतून झाले. तीन गुण तीन दोष तीन लोक, तीन अवस्था, तीन प्रकारचे जीवाला होणारे ताप या साऱ्यापासून या चारीचा उद्‌भव होतो आणि हे सृष्टीक्रमाचे रहाटगाडगे सारखे चालूच रहाते. ''तुका म्हणे  चारी खाणी । भट्टी चालीली अजुनी ।'' हे वचन येथे चिंतनीय आहे. चार देह, चार अवस्था, चार शून्ये हे जे सारे चत्वार आहे, याचे ज्ञान कशामुळे होते, हे निश्चित झाल्यावर येथे चारीचा लय होतो. ''चार देह चार शून्य दावी पाचव्याते। निघोनी जाय श्वासोच्छ्‌वास कोण राहे तेथे ।।'' हे श्रीगहिनीनाथांचे विचार येथे अत्यंत मननीय आहेत. श्वास कोठून निघतो आणि कोठे जातो, तेथे कोण आहे, हा प्रश्नच येथे खरा महत्वाचा आहे. तेथे जो कोणी आहे, तोच कोणीतरी आहे. हे कोणीतरी जाणले तरी कार्यभाग निश्चित आहे. यात पुनः एक मिसळल्याने पाच तत्त्वे, पाच विषय, पाच अवस्था, सारे पाच म्हणजे जेवढे आहे तेवढे निर्माण झाले. हा निर्देश श्रीमामांनी या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात ''पाच म्हणजे काय पंच हे विषय । सहा म्हणजे काय सहा रिपु।।'' या प्रकारे केला आहे. आकाश, वायु, तेज, आप आणि पृथ्वी अशी पाच तत्त्वे आहेत. प्रत्येक तत्त्वात दुसरी चार तत्त्वे असतात, पण प्रमाणाधिक्याने तत्त्व निर्देश होतो. या पंचीकरणाचा

भाग श्रीसमर्थांनी दासबोधात उत्कृष्ट सांगितला असून, तो जिज्ञासूंनी अवश्य पहावा असा आहे. या पाच तत्त्वांचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध असे पाच गुण आहेत. जीव हा देहोपाधीने उपाधीभूत झाल्याने, त्या जीवाचे आकर्षण चैतन्याकडे न रहाता, या पाच विषयाकडे रहाते आणि यातून जन्ममरणादि चक्रात सापडून यमदंड भोगावा लागतो. ''विषयाचे सुख येथे वाटे गोड । पुढे अवघड यमदंड । मारिती तोडिती झोडीती निष्ठूर । यमाचे किंकर बहु साल । तप्तभूमीवरी चालविती पाही । अग्निस्तंभा पाही कवटाळीती ।।'' या कडक शब्दात केले आहे. ''विषयांचे सुख द्वाड । येथे वाटे बहु गोड । पुढे आहे अवघड । यमयातना ।।'' या शब्दात श्रीनामदेवमहाराज सुनावीत आहेत. हे दृश्य प्रत्यक्ष यमलोकी न जाता येथे मृत्यूलोकातही पहावयास मिळते. मागे जे गाडीवान होते, तेच आता बैल होऊन चाबकाचा मार खात आहेत. असा हा सृष्टीक्रम आहे. जागेचे अभावी एक उदाहरण दिले. संतांनी मात्र आपला एक विषय केला आणि त्या एका विषयाने हे सर्व विषय बाजूस होऊन ते निर्विषय झाले. ''विषय तो त्यांचा झाला नारायण ।'' ही त्यांची अवस्था झाली. पंच विषयांनी खेचले की, सहानी घेरले म्हणून समजावेच. म्हणून ''सहा म्हणजे काय सहा रिपु ।'' असे मामांनी म्हटले आहे. ''तरी काम क्रोधु पाही । तयाते कृपेची साठवण नाही । हे कृतांताचे ठायी । मानीजती ।। हे ज्ञान निधीचे भुजंग । की विषय दरीचे वाघ। की भजन मार्गीचे मांग । मारकजे ।। इही शांती साध्वी नागविली । मग माया मांगी श्रृंगारिली । जिये करवी विटाळविली । साधुवृंदे ।।'' या शब्दात षडविकारांचे भीषणत्व श्रीमाऊलींनी प्रगट केले आहे आणि ''एक दोन तीन चार पाच आणि सहा । इतुकीयांचा विचार करूनी परमानंदी रहा ।।'' असे आपले अभंगात सूचित केले आहे. सात हे सात धातु आहेत. आपले शरीर हे आयुर्वेदाचे दृष्टीने सात धातुंचे बनले आहे.

आठ म्हणजे अष्टधा प्रकृती ही पंचमहाभूते आणि तीन गुण यांची बनली आहेत. या अभंगाचे चौथ्या कडव्यात या दृष्टीने ''सात म्हणजे काय सप्तविध धातु । आठ म्हणजे होतु अष्टधाही ।।'' हे सांगून पाचव्या कडव्यात ''नऊ म्हणजे काय जाणा नवद्वारे । दहा म्हणजे बा रे दशेंद्रिये ।।'' असे म्हटले आहे. नऊ दरवाजातून दशेंद्रियाचे आकर्षणाने फिरणाऱ्या जीवाला, दहावा दरवाजा न सापडल्याने, आत्मसाक्षात्कार होत नाही, असे याचे थोडक्यात स्वरूप आहे. ''नवद्वाराते रोधुनी । दशमद्वारी दासी जनी ।'' ही श्रीजनाबाईंची उक्ती येथे चिंतनीय आहे. ''अकरा म्हणजे काय जाणावे ते मन । बारा म्हणजे जाणा चित्त कुडे ।। तेरा म्हणजे काय कुबुद्धीते पाही । चौदा म्हणजे काय चौदा विद्या ।।'' असे पुढे याच अभंगात मामांनी यथाक्रम सांगितले आहे. ''इंद्रियाणां मनश्चास्मि'' हे भगवान म्हणतात. ''इंद्रियामाजी अकरावे । मन ते मी जाणावे ।।'' असे श्रीमाऊली म्हणते. मन मुरल्याशिवाय चैतन्यानुभव नाही हे स्पष्ट आहे. म्हणून, अकरावे मन आणि ''चित्त गुंतले प्रपंचे ।'' या तुकोक्तीप्रमाणे बारावे हे कुडे चित्त, बाहेरच खेचणारे असल्याने, यातून परतावेच लागते. तेराही कुबुद्धी म्हणजे द्वैतबुद्धी. 'कू' म्हणजे द्वैत. चौदा म्हणजे चौदा विद्या. या जरी विद्या असल्या तरी याने आत्मप्रचिती येत नाही. ''एवं पोट भरावयाची विद्या । तीस म्हणो नये सद्विद्या ।।'' किंवा ''चौदा विद्या चौसष्ठ कला । जरी का प्राप्त झाल्या सकळा । एक नसता नाम कळा। सर्वही विकळा जाणाव्या ।।'' ही समर्थोक्ती आणि नाथवचन येथे चिंतनीय आहे. यातून परपार झाले तर साधना आणि अनुभूती. हाच भाग मामा पुढे सांगणार आहेत. म्हणून या अभंगाचे शेवटच्या कडव्यात ते म्हणतात, ''गोविंद म्हणे ऐका पुढील प्रकार । विसावा तोवर नाही जीवा ।।'' हाच भाग आपणही आता पुढील अभंगात पाहुया.

*****

## ३१.

**पंधरा म्हणजे काय जाणावा हंकार ।**
**सोळा ते साचार दहा सहा ॥१॥**
**सतरा म्हणजे काय वासनेचा ठाय ।**
**अठरा म्हणजे काय जीवभाव॥२॥**
**एकोणीस काय शिवाचे विस्मरण ।**
**विसावा तो जाण स्मरता राम ॥३॥**
**गोविंद म्हणे विसावा विसाविया नामी ।**
**सद्गुरुंचे धामी कळो येई॥४॥**

या अभंगात पंधरापासून एकोणीसपर्यंतचा विचार केला असून, हे सारे बाजूला गेल्यानंतर विसावे जे भगवंताचे नाम आहे, त्यातूनच जीवाला श्रीसद्गुरुंच्या धामात खरी विश्रांती मिळते, असे सांगितले आहे. पंधरा म्हणजे अहंकार असून, दहा आणि सहा मिळून सोळा होतात हे दाखवून दिलेले आहे. अहंकारानेच जीव नाडला जातो. एक अहंकार तरी किंवा साक्षात्कार तरी हेच खरे. देवाचा शेजार देहाला आहे, म्हणून देहाची जाणीव आहे. पण या देहाचे जाणीवेने देवाचा विसर पडल्याने, जीवनाचे परिभ्रमणात अहंकाराची लाट उमटत रहाते आणि हा जीव एकदेशी होऊन द्वंद्वाशी झगडत रहाण्याचा प्रसंग त्याला येतो. ''अखंड जयाला देवाचा शेजार । कारे अहंकार नाही गेला ॥'' असा प्रश्न खुद्द नामदेवांचे बाबतीत श्रीमुक्ताबाईंनी केला आहे, हे तर उघडच आहे. श्रीविसोबा खेचरांचे कृपेने हा अहंकार गेल्यावर, श्रीनामदेवांना देवाचा खराखुरा साक्षात्कार झाला. त्यावेळी श्रीनामदेवमहाराज म्हणतात, ''सर्व सत्ता आली हाता । नामयाचा खेचर दाता ॥'' ईश्वरी साक्षात्काराने भागवत धर्माचा प्रसार श्रीनामदेवांनी आसेतु हिमाचल केला. येवढा अधिकार या

साधनेने त्यांना प्राप्त झाला. शीखधर्म ज्या गुरुनानकांनी स्थापन केला, त्यांचे ग्रंथसाहेब या धर्मग्रंथात श्रीनामदेवांचे अभंग आहेत. यावरून याचे महत्व स्पष्ट होईल. कीर्तनाचे माध्यमातून हा प्रसार झाला. ''अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझिया विष्णुदासा भाविकासी । नामा म्हणे तया असावे कल्याण । ज्या मुखी निधान पांडुरंग ।।'' अशी श्रीनामदेवांनी भगवंताची प्रार्थना केली आहे. जसा देव म्हणजे एक वारे आहे, त्याचप्रमाणे अहंकारही एक वारेच आहे. संत संगतीचा जर वारा लागला तर काट्याने काटा काढावा, त्याप्रमाणे देवाचे वारे आत संचरले की अहंकाराचे वारे लयाला जाते. अहंकार हा केवळ वृत्तीभाव नसून तो आपल्या जीवनातच असल्याने तो गेला या शब्दाने तो जात नाही. अधोगामी जीवन ऊर्ध्वगामी झाले की अहंकार नष्ट होतो. ''त्याच्या संगतीचा लागो मज वारा । तेणे सखया पावेन पैलतीरा ।।'' या संतोक्तीप्रमाणे संतसंगतीचा नुसता वारा जरी लागला तरी, देवाचे वारे देहात असलेल्या देहभावाच्या निरसनाने प्रगट झाल्याचे प्रत्ययाला येते. मग तेथे अहंकाराचा वारा रहातच नाही. ''या या देवाचे भरता वारे । अंगी प्रेमाचे फेफरे ।'' हे तुकोपनिषद येथे विचारात घ्यावे असे आहे. ज्याप्रमाणे शरीरातील चैतन्याचे वारे बाहेर गेले की शरीरात दुसरे वारे आत शिरते व शरीरातील हलकेपणा जाऊन जडत्व येते, त्याचप्रमाणे देवाचे वारे आत असलेलेले प्रगटपणे प्रत्ययास आले की, त्या महात्म्याची अवस्था अहंकारातीत साक्षात्कारी अशी होते. ''तो अहंकाराते दवडुनी सकळ काम सांडुनी । विचरे विश्व होऊनी। विश्वाची माजी ।।'' ही ज्ञानेश्वर माऊलींची ओवी येथे चिंतनीय आहे. ज्ञान होणे वेगळे आणि ज्ञानाची घमेंड असणे वेगळे. ''ते गा ज्ञान पै बरवे । जरी मनी आथी जाणावे । तरी संताते या भजावे । सर्वस्वेसी ।।'' हे ज्ञान म्हणजे अनुभूती. येथे अहंकाराला वावच नाही. पण शाब्दिक ज्ञानाने जर कोणी स्वतःला ज्ञानी म्हणवत असेल, तर तो अहंकाराने

खलास झाला असेच समजावे. ''नवल अहंकाराची गोठी । विशेषे न लागे अज्ञानापाठी । सज्ञानाचे झोंबे कंठी । नाना संकटी नाचवी ।।'' ही ज्ञानेशोक्ती येथे सतत डोळ्यांसमोर ठेवावी अशी आहे. दिमाखात एखादा प्रवासी मुंबईला गेला की, त्याचा खिसा कापलाच म्हणून समजावे. हात आत घालतो तो पाकीट, पैसे, तिकीट काहीच नाही. कारण खिसा कापलेला, त्याचा पत्ताही लागला नाही. पण गबाळग्रंथी जर प्रवासी असेल तर त्याच्याजवळ काय असणार आहे? म्हणून त्याच्याकडे कोणी पहातही नाही. जाऊ दे म्हणतात, तसेच येथे आहे. मला काय म्हणावयाचे आहे, याची कल्पना यावरून येईल. अहंकार हा व्यवहारात देखील चांगला नाही. मग परमार्थात तर नाहीच नाही. गर्वाचे घर खाली अशी म्हणच आहे. एकदेशी अहंकाराचा समष्टी भावाने त्याग झाला तर, परमार्थाचा काय सुकाळच आहे. ''एक देशी होतो अहंकारे आथीला । त्याच्या त्यागे झाला सुकाळ हा ।।'' हे श्रीतुकोपनिषद सतत विचारात घ्यावे असे आहे. एकदेशी अहंकाराचे त्यागाने एकदेशी जीव सर्वव्यापी होतो, सर्वांचा होतो. ''एकदेशी जीवकळा । हा सकळा सोयरा ।।'' असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात. उलट अहंतेने सर्व दुःख पदरात येते. ''अहंतागुणे सर्वही दुःख होते । मुखे बोलले ज्ञान ते व्यर्थ जाते ।'' असे श्रीसमर्थ सांगतात. म्हणून अहंकार हलला पाहिजे. तो हलला की दहा सहा हाललेच. नाही तर त्यांनी तेथेच तळ ठोकला म्हणून समजावे. यादृष्टीने ती. प.पू. श्रीमामामहाराज या अभंगाचे पहिल्या कडवयात म्हणतात, ''पंधरा म्हणजे काय जाणावा हंकार । सोळा ते साचार दहा सहा ।'' दोन दहा आणि मध्ये सहा असा जीवनाचा डाव एका अहंकाराने चालला आहे. पण ऐन तोडीच्यावेळी मात्र दान बरोबर न पडल्याने, डाव अंगलट यावा असेच जीवाचे होते. यासाठी दहा सहातून बाजूला होणेच खरे इष्ट आहे. याचा विचार जरूर झाला पाहिजे.

शरीरातून जीव जाताना सतरा तत्त्वे जातात, असे वेदात सांगितले आहे, ती तत्त्वे कोणती असे मला एकांनी, वेदातले अवतरण म्हणून दाखवून विचारले होते. अर्थात त्यांचा वेदाभ्यास गाढा होता यात प्रश्नच नाही. ती सतरा तत्त्वे कोणती याचा खुलासा तेथे नसल्याने त्यांनी हा प्रश्न केला. त्यावर पंचप्राण, पंचज्ञानेन्द्रिये, पंच कर्मेन्द्रिये, मन आणि बुद्धी मिळून सतरा होतात असा खुलासा त्यांना केला. तो त्यांना पटला. हे सतरा जे आहेत तेथेच वासनेने ठिय्या दिला आहे. यातून साधनेने परपार झाला तो परपार होतो, नाही तर ''जन्म घेणे लागे वासनेच्या संगे ।'' या श्रीनाथमहाराज यांचे उक्तीप्रमाणे त्या प्राण्याला पुनः जन्म घ्यावा लागतो. ''वायो सरशी वासना गेली । ते पुनः जन्म घेऊनी आली।।'' हे श्रीसमर्थ वचन या ठिकाणी अत्यंत महत्वाचे आहे. सतरावी जीवनकळा प्रगट झाली किंवा नामसाधनेत साधक आला तर या सतरांना धक्का बसतो. मग अठराव्याचा प्रश्नच येत नाही, नाहीतर मग आपले जीवनात जन्ममरणाचा भीषण प्रश्न उभा रहातो. ''नामामृत गोडी वैष्णवा लाधली । योगिया साधली जीवन कळा ।'' हे श्रीज्ञानेश्वरमहाराज आपले हरिपाठात सांगतात. त्याचीच येथे खरी जरुरी आहे, नाहीतर काय होईल, म्हणून श्रीमामांनी या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात जीवनाचे गणिताचा ताळा घेताना इशारा देऊन ठेवला आहे. ते म्हणतात, ''सतरा म्हणजे काय वासनेचा ठाय। अठरा म्हणजे काय जीवभाव ।'' वासना मेली तर जीवभावाचा शिवभाव होतो. जीवाने शिवाला पाहिले की, तो आत्मसुखाने तृप्त होतो. ज्याला वासना नाही तो आत्मसुखी होतो. नाहीतर आत्मा वासनेकडे ओढला जातो, आणि वासनाही कधीच पूर्ण होत नाही. सुखाचा विचार हा नुसता विचारच रहातो. ''वासना बायको शेजारीण । झगडी कुटिल मोठी दारूण । इचे पायी नागवण । घर बुडविसी ।। मी आलो रायाचा जोशी । होरा ऐका दादाजी ।'' असा भागवतधर्माची ध्वजा फडकवणाऱ्या

श्रीनाथमहाराजांचा प्रसिद्ध होरा मोठा चिंतनीय आहे. म्हणून वासना आणि जीवभाव यातून सुटका झाली तरच ''तुका म्हणे जीवीशिव । हाचि येथिचा अनुभव ।'' अशी श्रीतुकाराममहाराज यांनी निर्दिष्ट केलेली अवस्था जीवाला प्राप्त होते.

वीसातून एक उणा केला की त्याला एकोणीस म्हणतात. एक जे चैतन्य हे चिंतनातून वजा झाले की एक उणा होतो. त्यालाच विस्मरण म्हणतात. म्हणून या अभंगाचे तिसऱ्या कडव्यात, ''एकोणीस काय शिवाचे विस्मरण । विसावा तो जाण स्मरता राम ।।'' असा खुलासा श्रीमामांनी केला आहे. शिवाचे विस्मरणाने देहाकार झालेला जीव, दृश्याशी समरस होतो हा निसर्ग आहे. एक उणा करून साऱ्याचे मोजमाप जीवच करतो आणि त्यामुळे तो दुःखी होतो. उणा आहे त्याचे स्मरण झाले की दुःखाचे कारणच संपले. तेथेच त्याला आत्मसाक्षात्कार होतो. नावेत दहा माणसे होती. सारी आहेत ना पहा, असे कोणी म्हटले. तो मोजू लागला. मोजता मोजता साऱ्यांनी मोजले आणि नऊ आहेत असे म्हणाले. एक मेला म्हणून रडू लागले. असेच साऱ्यांचे झाले, पण ते स्वतःला विसरल्याने हा घोळ झाला. तोच घोळ या जीवनात आहे. म्हणून रामनामाचे म्हणजे आत्मारामाचे स्मरणातच खरा विसावा आहे. एकोणीसा पैल विसाव्या नामात विसावा आहे. तो सद्गुरुंचे धामात गेले तरच खऱ्या अर्थाने मिळतो. गुरूकृपेनेच सद्गुरुंचे धाम काय आहे याचे ज्ञान जीवाला होते. म्हणून अभंगाचे शेवटच्या कडव्यात श्रीमामा म्हणतात, ''गोविंद म्हणे विसावा विसाविया नामी । सद्गुरूंचे धामी कळो येई ।।'' हा ताळा ज्याला कळला त्याला सिद्धांत आणि प्रात्यक्षिक, साधनेने साध्य केले आहे, याचे निश्चित ज्ञान होते. निःसंदेह ज्ञानाने तो समाधानी होतो. म्हणून या ताळ्याचे महत्व आहे. यादृष्टीने तीस आणि एकतीस हे दोन अभंग विचार करावेत असे आहेत, याची कल्पना येईलच.

# ३२.

**अभंग रामपाठ असती बत्तीस ।**
**वाचिता विश्वास धरोनिया ।।१।।**
**तयावरी कृपा करील जगदीश ।**
**सांडोनी आळस पाठ करा ।।२।।**
**करूनी शुद्ध मन एक चित्ते पाही ।**
**धरी सर्वदाही स्मरणजीवी ।।३।।**
**तया रक्षी स्वये रामसीतापती ।**
**सर्वत्र आकांती अंतकाळी ।।४।।**
**ज्ञारेश्वरकृपा प्रसादे रचिले ।**
**तयांचिये बोले समाधान ।।५।।**
**गोविंद करी रेवणसिद्ध पदी नमन ।**
**रामपाठ पूर्ण सांग झाला ।।६।।**

श्रीरामपाठातील हा शेवटचा फलश्रुतीचा अभंग आहे. या रामपाठाचे एकंदर बत्तीस अभंग आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे हरिपाठाचे अभंग अठ्ठावीस आहेत. ''अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस'' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनीच सांगून ठेवले आहे. त्यामुळे अठ्ठावीसावा अभंग कोणता हा प्रश्नच उद्‌भवत नाही. परमात्मा अठ्ठावीस युगे विटेवर उभा आहे. ती कधी सत्तावीसही होत नाहीत अगर एकोणतीसही होत नाहीत, हे लक्षात घेणेसारखे आहे. ''युगे अठ्ठावीस विटेवरी उभा'' ही श्रीनामदेवांची आरती प्रसिद्ध आहे. ''युगे झाली अठ्ठावीस । अजुनी का न म्हणे बैस ।।'' असे श्रीतुकाराममहाराज पुंडलिकास विचारीत आहेत. शिवाय बाहेर सूर्याच्या बारा कळा आणि चंद्राच्या पंधरा कळा आहेत. या सत्तावीस कळेवर

व्यवहार चालत आहे. चंद्राची सोळावी कळा भगवान श्रीशंकरांनी आपल्या मस्तकी धारण केली आहे. ही सोळावी कळा जर चंद्रकलेत मिसळली तर सारे विश्व ब्रह्मरूप होऊन तेथे व्यवहार राहणारच नाही. शंभरनंबरी सोने जर पाहिले तर माणूस वेडा होतो. असे सोने बाजारात येतच नाही. व्यवहार जरा कमी कस असला म्हणजेच होतो. ''बारा सोळा जणी हरिसी नेणती'' अशी अवस्था असलेने त्या रात्रंदिवस फिरत आहेत आणि या जीवनातील गतीचे परिभ्रमणाने जीवाचे बाहेर भ्रमण चालू आहे. बारा सोळांचे जर ऐक्य झाले तर, त्यातून अनहत नाद प्राप्त होतो आणि नादानुसंधानात आत्मसाक्षात्कार होतो. असा श्रीमहीपतींचा अनुभव आहे. ''बारा सोळाजणी गडे ग बारा सोळा जणी । मिळोनी येती गलगा करिती मशि गेल्या घेऊनी ।।'' या चरणात महीपती ज्याला गलगा म्हणतात तो चैतन्याचा ध्वनी या अठ्ठावीस कलातून प्रगट झाला आहे. याला परमार्थ म्हणतात. या बारा सोळांचे ऐक्यातून श्रीहरीची अनुभूति आहे. हे स्पष्ट करणारा हा हरिपाठ असल्याने याचे अभंग अठ्ठावीस आहेत हे उघड आहे. यात जर चित्तचतुष्टय मिसळले तर हा बत्तीस आकडा होतो. बारा सोळामध्ये हे मन, चित्त, बुद्धी आणि अहंकार हे चार जण मिसळले व हे चित्तचतुष्टय वेगळेपणाने राहिले नाही तर तेथे आत्मारामाचा साक्षात्कार होतो. हे या बत्तीस अभंगात दर्शविले आहे. म्हणून रामपाठाचे अभंग बत्तीस आहेत. या दृष्टीने ती. प.पू. श्रीमामांनी या अभंगात ''अभंग रामपाठ असती बत्तीस । वाचिता विश्वास धरोनिया ।।१।। तयावरी कृपा करील जगदीश । सांडोनि आळस पाठ करा ।।२।।'' असे पहिल्या दोन कडव्यात सांगितले आहे. हे बत्तीस अभंग असलेला रामपाठ जो कोणी विश्वास ठेवून वाचेल, त्यावर जगदीश परमात्मा कृपा करील, म्हणून आळस झटकून याचा पाठ करा असे सूचित केले आहे.

तिसऱ्या कडव्यात शुद्ध मन करून एकचित्ताने जीवाचे ठिकाणी

सर्वदा या रामपाठाचे स्मरण ठेवावे असे स्पष्ट केले आहे. ''करूनी शुद्ध मन एकचित्ते पाही | धरी सर्वदाही स्मरण जीवी ||'' आणि असे जर केले तर कोणत्याही संकटात आणि अंतकाळी सीतापती राम रक्षण करतो असा निर्वाळा दिला आहे. ''तया रक्षी स्वये रामसीतापती | सर्वत्र आकांती अंतकाळी ||'' या चौथ्या कडव्यावरून हे आपल्याला दिसून येईल. ''अंतकाळी तैसा संकटाचे वेळी | हरी तया सांभाळी अंतर्बाह्य |'' ही प्रचीति श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी आपले हरिपाठात स्पष्ट केली आहे. तर बारा अभंगात जो कोणी हे अभंग नित्यपाठात घेईल, त्यास मागेपुढे नारायण रक्षण करील, असे आश्वासन श्रीतुकाराममहाराज यांनी दिले आहे. ते म्हणतात, ''तया मागेपुढे रक्षी नारायण| मांडिल्या निर्वाण उडी घाली ||'' यावरून श्रीहरीपाठ, बारा अभंग आणि आमचे श्रीमामांचा रामपाठ यांचे महत्व दिसून येईल. श्रीमामांचे सारे जीवनच श्रीज्ञानेश्वरमय होते. बालपणी, महाराज ज्ञानेश्वर माऊली, हे भजन तीन तीन चार चार तास देहभान विसरून ते करीत. असे त्यांना माऊलीचे वेड होते.आमचे घराण्यात दहा पिढ्या श्रीज्ञानेश्वरमाऊलीचा 'श्रीज्ञानदेवतेहत्तिशी' हा ग्रंथ नित्य पठणात आहे. आळंदीस श्रीज्ञानेश्वर माऊलीने त्यांचे भिक्षेचे वाटेवरती पिंपळाचे पारावर ज्यांना प्रत्यक्ष दर्शन सकाळी भिक्षेचेवेळीच दिले आणि ज्या मामांनी ते चित्र श्रीज्ञानेश्वरीवर असणाऱ्या कोऱ्या कागदावर तेथल्या तेथेच रेखांकित केले, जसे दिसले तसे रेखाटले आणि आपले ज्ञानेश्वरीत ठेवून गुप्तपणे राखले, ज्या श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी मामांना प्लेगचे दुखण्यात जीवदान दिले, जीभेवर परिणाम झाल्याने ज्यांनी ज्ञानेश्वरीची अगदी एक एक अक्षर उमटेल असे वाचत १०८ पारायणे केली आणि पूर्ववत वाचा आली असा मोठा लाभ आम्हाला झाला. ज्यांचेमुळे आम्हाला घरातच श्रीज्ञानेश्वरदर्शन नित्यशः होत आहे, त्या श्रीज्ञानेश्वरांचे कृपेने श्रीमामांना हा श्रीरामपाठ स्फुरला. मामा हे चित्रकला

प्रवीण होते. हे चित्र पाहून श्रीज्ञानेश्वरमहाराज असेच असले पाहिजेत, अशी प्रचीति अनेक साधक व सिद्धांना आली आहे आणि त्यांनी तसे नमूद करून ठेवले आहे. प.पू.श्रीयोगीराज श्रीगुळवणीमहाराज हेही चित्रकला प्रवीण असून त्यांनाही हे चित्र फारच आवडले होते व त्यांनी ते मस्तकी धारण केले होते. जागेचे अभावी जास्त विस्तार करता येत नाही. ''ज्ञानेश्वर माऊलीची कृपा संपादिली। आशीर्वाद योगे रामसीताही पावली ।। हनुमंतसद्गुरु बहु पुण्ये लाधले । देह कष्टवोनी साधन केले ।।'' कै.ह.भ.प.अप्पाराव पोवार या नामनिष्ठ सत्पुरुषांनी असा त्यांचा गौरव आपले अभंगात केला आहे. श्रीगोपाळराव दीक्षित या महान सत्पुरुषांचे वंशात जन्म घेण्याचे भाग्य ज्यांना लाभले आहे. श्रीतात्यासाहेब महाराज यांचा अनुग्रह ज्यांना लाभला आहे, मामांचे बद्दल मोठा जिव्हाळा असलेले सिटी हायस्कूलमधील विद्यार्थी, असे पुण्याचे प्रसिद्ध चित्रकार श्री. जिवाजीपंत दीक्षित यांनी, मामांनी काढलेल्या चित्रावरून श्रीज्ञानेश्वरांचे एक उत्कृष्ट चित्र रेखाटून दिलेले, मामांनी या घरात प्रतिष्ठित केलेले आहे. त्या चित्रात जिवंतपणा आहे, यापेक्षा आणि काय सांगावे? अशा माऊलींचे कृपेने स्फुरलेला रामपाठ एका बैठकीतच मामांनी लिहिला. शके १८५८ मध्ये मामांनी तेरा दिवसात साधनमार्गाला धरून लिहिलेले भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे तेरा अध्यायाचे ओवीबद्ध चरित्रे लिहून पूर्ण केले. त्यात त्यांनी म्हटले आहे, ''चरित्र संपविले तो दिन । शके अठराशे अठ्ठावन्न । पौष शुद्ध चतुर्थी मकर संक्रमण । ते दिवशी संपूर्ण जाहले।।'' याचे दुसरे दिवशीच रात्री रामपाठ लिहिला. एका बैठकीत सारे अभंग लिहून झाले. ''ज्ञानेश्वर कृपा प्रसादे रचिले । तयांचिया बोले समाधान।।'' इतके सारे लिहून झाले. ज्ञानेश्वरकृपेने हा रामपाठ लिहिला असून, त्यांच्या आशीर्वादाने खरे समाधान झाले हे येथे स्पष्ट केले आणि आश्चर्य पुढे काहीच स्फुरेना. एकाच बैठकीत ज्यांनी

इतके लिहिले त्यांना, स्फुरणापलीकडे एका वेगळ्या अवस्थेत गेले होते, हे म्हणणेच अधिक संयुक्तिक होईल. हातात टाक तसाच, तीन तास ते त्या अवस्थेत होते. तीन तास एका विशिष्ट अवस्थेत राहिल्यानंतर त्यांना साक्षात् श्रीरेवणसिद्धांचे दर्शन झाले. आमचा चिमड संप्रदाय हा श्रीरेवणसिद्धांपासूनच आला आहे.  हे ध्यानी घेतले म्हणजे याचे महत्व दिसून येईल.

सिद्धांचे पदी माथा ठेवून या अभंगातील शेवटचा चरण मामांनी लिहिला आणि या रामपाठाची सांगता झाली. या प्रसंगी ''गोविंद करी रेवणसिद्धपदी नमन । रामपाठ पूर्ण सांग झाला ।।'' या प्रसंगी परमप्रिय ह.भ.प. कै.गणपतराव कानिटकर आमचे घरीच रहावयास असलेने, तेथेच होते. त्यांनी हे दृश्य प्रत्यक्ष पाहिले होते.  त्याची सहज आठवण झाली. संक्रमणाचे दिवशी चरित्र पूर्ण झाले. येथे जीवनाचे संक्रमण झाले आणि दुसरे दिवशी किंकरांतीस 'रामपाठ' लिहून झाला.  येथे किंकरत्वाचा अंत झाला.  यालाच किंकरांत म्हणतात. याचा अर्थ पौष शु. पंचमी शके १८५८ मध्ये किंकरातीस या रामपाठाची सांगता झाली. ती रेवणसिद्धांचे दर्शनाने झाली. रेवणसिद्ध दूध प्यावयास घोसरवाडीस आलेने ते श्रीहालसिद्ध झाले.  हा श्रीरेवणसिद्धांचाच अवतार आहे. त्यांनी तर कृपामृताचा आमचेवर वर्षावच केला आहे.  श्रीगोविंदपंत, श्रीबाबूरावअण्णा, श्रीशंकरमामा यांचीही आठवण या प्रसंगी मला झाल्याशिवाय रहात नाही.  अखंड कीर्तनाने व नामस्मरणाने केळकरमामा हे या संप्रदायात अधिकारी पुरुष ठरतील असा आशीर्वाद, श्रीगोविंदपंत घोसरवाडकर यांनी संचारावस्थेत आमचे घरी पाऊल टाकल्याबरोबर दिला होता. यादृष्टीने या सर्व विषयाची संगती येथे लागेल असे मला वाटते. असा हा श्रीरामपाठ ज्या श्रीसिद्धांचे ही सिद्ध अशा श्रीरेवणसिद्धांचे दर्शनाने संपूर्ण झाला, त्यांचे चरणी गुरूपरंपरेचे

स्मरण करून समर्पण करीत आहे.

श्रीगोपाळकाका कोटणीस यांचेसारखे सत्पुरुष श्रीरामपाठाचे पहिल्या आवृत्तीचे प्रस्तावनेत म्हणतात, ''आपण आधी करून तसे करणेस समाजाला शिकवणारे श्रीबापूसारावांसारखे प्रेमळ गुरुभक्त फारच थोडे सापडतील.  बत्तीस अभंगांचे हे त्यांचे पुस्तक आकाराने लहान, पण प्रभावाने फारच मोठे आहे. त्याचे मोल करणे म्हणजे श्रीप्रभुरामरायाचे मोल केलेप्रमाणे होणार आहे.''

*****

## श्रीरामपाठावरील श्लोक

**हरिपाठ तो हा स्फुरणासी आला ।**
**श्रीरामपाठेचि साकार जहाला ।**
**ज्ञानेश दावीत गोविंद सुभटा ।**
**नमस्कार माझा तया रामपाठा ।।१।।**

***

## श्रीरामपाठाची आरती

रामपाठ तो हा हरिपाठ सार ।

गोविंदा स्फुरला अक्षरी आकार ।।

ज्ञानेश्वरकृपे घडला अवतार ।

गोपालनाथा पुढती राम साकार ।।१।।

जयदेव जयदेव श्रीरामपाठा जय रामपाठा ।

ओवाळू आरती चिन्मय पीठा ।।ध्रु.।।

हनुमंत विज्ञान दावी अरुवार ।

श्रीरेवणसिद्ध जहाले गोचर ।

नित्यनेम पढती भाविक अपार ।

दासराम पठणी पावे परपार ।।२।।

***

## श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| १ | चिमड संप्रदाय | २००५ |
| २ | श्रीरामदासस्वामी चरित्र | २००६ |
| ३ | श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग | २००६ |
| ४ | श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन | २००७ |
| ५ | श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | २००७ |
| ६ | दासबोधातील तत्त्वज्ञान | २००७ |
| ७ | श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह | २००८ |
| ८ | श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | २००९ |
| ९ | साधन संध्या | २००९ |
| १० | अनंत अमृत स्मरण | २००९ |
| ११ | श्रीगुरुमहिमा | २००९ |
| १२ | श्रीज्ञानेश्वरी प्रसाद (श्रीज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या अर्थासह) | २००९ |
| १३ | श्रीदासरामगाथा पुरवणी | २००९ |
| १४ | श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | २०१० |
| १५ | श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०१० |
| १६ | श्रीदासराममहाराज श्लोकरचना | २०१० |
| १७ | श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव(समओवी टीकेसह) | २०१० |
| १८ | श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्र | २०१० |
| १९ | समर्थ रामदास स्वामी कृत आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) | २०१० |
| २० | श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २०१० |
| २१ | श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २०१० |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| २२ | **श्रीरामनिकेतन (माहिती पुस्तिका)** | २०११ |
| २३ | **श्रीरामनिकेतनमधील आराधना** | २०११ |
| २४ | **ग्रंथत्रयी** (आत्मबोधप्रत्ययामृत, श्रीदासरामविंशिका, श्रीदासरामपंचविशी) | २०११ |
| २५ | **श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०११ |
| २६ | **अभंगदरबार (आवृत्ती १)** | २०११ |
| २७ | **सद्‌बोध दशक** | २०११ |
| २८ | **श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र** | २०११ |
| २९ | **श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध** | २०११ |
| ३० | **प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ३१ | **पाठांतर सुलभ भगवत्‌गीता** | २०११ |
| ३२ | **श्रीदासराममहाराज लिखित लघु चरित्रे** | २०११ |
| ३३ | **श्रीतात्यासाहेबमहाराजकृत मनोबोध** (निवडक अभंग विवरणासह) | २०११ |
| ३४ | **प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ३५ | **महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का चरित्र** | २०११ |
| ३६ | **तो हा दासबोध** (श्रीमद्‌दासबोधातील सारभूत ओव्या अर्थासह) | २०११ |
| ३७ | **श्रीदासराममहाराज चरितामृत** | २०११ |
| ३८ | **श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र** | २०११ |
| ३९ | **श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ४० | **श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र** | २०११ |
| ४१ | **श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी** | २०११ |
| ४२ | **श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन** | २०१२ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ४३ | **श्रीदासराममहाराज यांची प्रवचने** | २०१२ |
| ४४ | **प.पू.श्रीमामामहाराज केळकर चरित्र** | २०१२ |
| ४५ | **श्रीदासरामगीतम्** (श्रीदासराममहाराज यांचे संस्कृत चरित्र व संस्कृत रचना) | २०१२ |
| ४६ | **श्रीदासराममहाराज वचनसंग्रह** | २०१२ |
| ४७ | **चैतन्यब्रह्म** | २०१३ |
| ४८ | **श्रीदासराममहाराज विरचित वायुलहरी**(विवरण) | २०१३ |
| ४९ | **श्रीदासराममहाराजकृत सात करुणाष्टके**(विवरणासह) | २०१३ |
| ५० | **श्रीगुरुलिंगगीता (६६ पदे व अर्थ)** | २०१३ |
| ५१ | **श्रीरामचंद्रावजीमहाराज, चिमड कृत चिमड संप्रदायातील पंचपदी** | २०१३ |
| ५२ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग -१** | २०१४ |
| ५३ | **श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध**(विवरणासह) | २०१४ |
| ५४ | **श्रीदासरामायण** (श्रीदासराममहाराजांचे गीतचरित्र) | २०१४ |
| ५५ | **श्रीदासराममहाराज केळकर नामसाधना मंदिर वास्तुशांत** | २०१४ |
| ५६ | **श्रीदासराममहाराजकृत रेवणसिद्धपाठ**(विवरणासह) | २०१४ |
| ५७ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग-२** | २०१५ |
| ५८ | **अभंग दरबार** (आवृत्ती २ री) | २०१५ |
| ५९ | **श्रीदासरामचरित्र** | २०१५ |
| ६० | **आत्मारामपाठ** (श्रीदासरामगाथेमधील २० निवडक अभंगांचा समुह) | २०१५ |
| ६१ | **ज्ञानेश्वरीमधील ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) | २०१५ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ६२ | **श्रीमद् दासबोधातील प्रपंचयोग** | २०१५ |
| ६३ | **अभंग दरबार भाग - २** | २०१५ |
| ६४ | **श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह)** | २०१६ |
| ६५ | **श्रीएकनाथमहाराज प्रणित आनंदानुभव** (श्रीदासराममहाराजकृत आनंदविलास टीकेसह) | २०१६ |
| ६६ | **नासदीयसूक्त विवरण** | २०१६ |
| ६७ | **श्रीज्ञानदेवतेहेत्तिशी भावार्थ विवरण** | २०१७ |
| ६८ | **पाठांतर सुलभ भगवद्गीता आवृत्ती दुसरी** | २०१९ |
| ६९ | **दासबोधातील परमार्थ योग** | २०१९ |
| ७० | **चांगदेवपासष्टी एक नामकळा (विवरणासह)** | २०१९ |
| ७१ | **परमार्थ प्रश्नोत्तरी** (पुनर्मुद्रण) | २०१९ |
| ७२ | **चिन्मयबोध** (गुरुपरंपरेतील सिद्धपुरुषांची पदे अर्थासह) | २०१९ |
| ७३ | **श्रीदासराम चिंतनिका** (लेख संग्रह) | २०१९ |
| ७४ | **श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ** (१६ अभंग) | २०१९ |
| ७५ | **अक्षरे चैतन्याची भाग - १** | २०२० |
| ७६ | **अक्षरे चैतन्याची भाग - ३** | २०२० |
| ७७ | **ज्ञानगंगा** | २०२० |
| ७८ | **अक्षरधारा** | २०२० |
| ७९ | **संप्रदाय दर्शन** | २०२० |
| ८० | **श्रीरामपाठांमृत** | २०२० |
| ८१ | **नित्यकीर्तनानंदा** | २०२० |
| ८२ | **अक्षरे ब्रह्मचैतन्याची** | २०२० |
| ८३ | | २०२० |